(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

पृ.शी.: शाहुवाडी तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील रिक्त पदे व इतर प्रश्नांबाबत.

मु.शी.: शाहुवाडी तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील रिक्त पदे व इतर प्रश्नांबाबत डॉ. विनय कोरे, श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.विनय कोरे (शाहुवाडी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शाहुवाडी तालुक्यामधील २६८ पैकी ३४ प्राथमिक शाळा अत्यंत दुर्गम व डोंगराळ क्षेत्रात ज्ञानदानाचे कार्य करत असणे, दुर्गम व डोंगराळ क्षेत्र असल्याने सदर शाळेतील शिक्षक पदे नेहमी रिक्त राहणे, सुगम शाळेतील शिक्षकांची दहा वर्षे बदली होत नसणे, शिक्षक या शाळा स्वीकारण्यास नकार देणे याउलट दुर्गम शाळेतील शिक्षकांची तीन वर्षानंतर विनंती बदली होत असल्याने अनेक शिक्षक दुर्गम शाळा स्वीकारण्याची शक्यता असणे, सध्या तालुक्यात २६८ प्राथमिक शाळेत मंजूर शिक्षकांची ९०० इतकी पदे असून त्यापैकी २३० इतकी पदे रिक्त असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, शासनाने शाहूवाडी तालुक्यातील दुर्गम शाळा निकषांमध्ये बसणाऱ्या १६६ गावातील शाळा दुर्गम व अवघड क्षेत्र म्हणून घोषित केल्यास अधिकाधिक रिक्त पदे भरण्यास मदत होणे व त्यामुळे रिक्त पदाचा प्रश्न मिटेल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नसून तालुक्याचा शैक्षणिक दर्जा उंचावेल याकडे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.हसन मुश्रीफ (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

डॉ.विनय कोरे : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यात आणि देशभरामध्ये शिक्षणाचा आग्रह धरणारे संस्थान म्हणून राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानाची ओळख निर्माण केली होती. राजर्षी शाहू महाराज यांच्या नावाने निर्माण झालेल्या शाहुवाडी तालुक्याचे मी प्रतिनिधीत्व करतो. या तालुक्यातील शिक्षणाची काय अवस्था करण्यात आली आहे याचे वास्तव मी आज या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. या दुर्गम आणि डोंगराळ तालुक्यातील शाळांमधील शिक्षकांची २३० पदे गेल्या चार वर्षांपासून रिक्त होती. सदर लक्षवेधी सूचना दिल्यानंतर त्यातील काही पदे भरण्यात आली आहेत. तरीही आज रोजी माझ्या तालुक्यामध्ये सुमारे १६६ पदे रिक्त असल्याचे मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे. एकूण मंजूर पदांचा व रिक्त पदांचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, या तालुक्यामधील तब्बल ३० टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. मी याच संदर्भाने कोल्हापूर जिल्हयातील इतर तालुक्यांमधील रिक्त पदांचा देखील आढावा घेतला. त्यावेळी असे निदर्शनास आले की, मंत्री महोदयांच्या कागल तालुक्यामध्ये ४ टक्के, करवीर तालुक्यामध्ये २ टक्के आणि हातकणंगले तालुक्यामध्ये ४ टक्क्यांपेक्षा कमी पदे रिक्त आहेत. एकाच जिल्हयातील वेगवेगळया तालुक्यांमधील प्राथमिक शिक्षकांच्या पदांमध्ये एवढी तफावत आहे. त्यामुळे केवळ आमच्या तालुक्यातील विद्यार्थ्यांबाबत प्राथमिक शिक्षण विभागाने नेमके काय ठरविले आहे, असा गंभीर प्रश्न माझ्यासारख्या कार्यकर्त्याला पडतो.

अध्यक्ष महोदय, सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माझे दोन-तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत. पहिला प्रश्न आहे की, शाहुवाडी तालुक्यातील शिक्षकांच्या पदांचा हा बॅकलॉग कसा दूर केला जाणार आहे ? तसेच आमच्या तालुक्यावर हा अन्याय शिक्षक संघटनांनी केला की शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी ठरवून केला आहे याबाबत शासन विचार करणार आहे का ? तसेच भविष्यात कुठल्याही दुर्गम व डोंगरी तालुक्यांच्या बाबतीत अशा घटना घडू नयेत यासाठी काही उपाययोजना केल्या जाणार आहेत का ?

डॉ.विनय कोरे.....

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये मोघमपणे म्हटले आहे की, १५ पेक्षा कमी पट असलेल्या व २ शिक्षक कार्यरत असलेल्या शाळांमधील शिक्षक तात्पुरत्या स्वरुपात रिक्त ठिकाणी वापरले जातात. मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, आमच्याकडे अशा केवळ ४२ शाळा असून तेथे ५७ शिक्षक कार्यरत आहेत. म्हणजेच १६६ पैकी १५ रिक्त शिक्षकांच्या जागा त्यांच्यातून भरुन निघू शकतात. उर्वरित शाळांमधील विद्यार्थी देवाच्या भरोशावरच बसलेले आहेत, अशी अवस्था उत्तरातून समोर येत आहे. आजही आपला विभाग झालेली चूक कबूल न करता आम्ही कसा प्रयत्न करीत आहोत हे खोटे-खोटे सभागृहाला सांगत असेल तर दुर्गम आणि डोंगरी तालुक्यांवर आपण अजून किती अन्याय करणार आहोत, याचाही विचार होण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, अशा तालुक्यांसाठी सुगम आणि दुर्गम असे दोन विभाग केले आहेत. कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा तालुका हा माझा पूर्वीचा मतदारसंघ आहे. आता मी शाहुवाडी तालुक्यामध्ये आमदार म्हणून कार्यरत आहे. गगनबावडा तालुक्यातील सर्वच्या सर्व शाळा जिल्हा प्रशासनाने दुर्गम म्हणून जाहीर केल्या आहेत. शाहुवाडी तालुक्यात राज्य स्तरावरील दुर्गम शाळांच्या निकषांप्रमाणे १६६ शाळा दुर्गम आहेत असे सांगण्याचा आम्ही प्रयत्न केला. परंतु शिक्षकांच्या सोयीसाठी जिल्हा परिषदेमध्ये बसून जे-जे नियम लागू करता येतील ते लावून १६६ पैकी केवळ ७७ शाळा दुर्गम असल्याचे मान्य करण्यात आले.

यानंतर श्री.धुमाळे.....

डॉ. विनय कोरे...

मला प्रामुख्याने विधान भवनाच्या या व्यासपीठावर मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, असा कोणता फरक या दोन तालुक्यात झाला. खरं तर गगनबावडा तालुक्यात १० टक्के सुध्दा गावे अशी नाहीत की जेथे एस.टी. जात नाही. पण शाहूवाडी तालुक्यातील जवळ जवळ १२० पेक्षा अधिक गावांमध्ये आजही एस.टी. महामंडळाची सेवा आपण देऊ शकलो नाही. २ हजार मिलीमिटरपेक्षा जास्त पाऊस तेथे पडतो. प्रामुख्याने जवळ जवळ ८० ते ९० टक्के क्षेत्र वन विभागाने व्यापलेले आहे. अशा सगळ्या दुर्गमचे निकष पात्र असताना सुध्दा फक्त पैसे घेऊन शिक्षकांच्या बदल्या होऊ नयेत म्हणून दुर्गम आणि सुगमचे निकष बदलायचे आणि त्या तालुक्यातील गरीब मुलांवर अन्याय करायचा हे जे धोरण आहे या माध्यमातून घडले आहे त्याच्यावर कुठे तरी योग्य निर्णय मंत्री महोदयांनी घ्यावा, एवढीच अपेक्षा मी या लक्षवेधीच्या निमित्ताने मी व्यक्त करतो.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. विनय कोरे यांनी आता ज्या समस्या मांडल्या आहेत, ती वस्तुस्थिती आहे. परंतु गेल्या २ वर्षापासून जेव्हा हा विभाग माझ्याकडे आला तशी कोरोना महामारीला सुरूवात झाली. त्यामुळे या २ वर्षात आपण ऑनलाईन पध्दतीने करावयाच्या बदल्या थांबविल्या होत्या. कारण गेल्या २ वर्षात शाळाच भरल्या नाहीत. त्यानंतर आपण असे केले की, सुगम आणि दुर्गम या निकषांमध्ये बरीच तफावत होती. एकंदरीत राज्यात २,२७,५९१ शिक्षकांची पदे रिक्त आहेत आणि कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १३०४ पदे रिक्त आहेत. नवीन आरटीआय ॲक्टप्रमाणे वास्तविक सामान्यीकरण हा महत्त्वाचा कायदा आहे. राज्यातील सगळ्या शाळांमध्ये समान शिक्षक पाहिजेत. मागच्या कालावधीत हे प्रमाण सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार व्यस्त झाले. म्हणून आपण पुण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ७ लोकांची एक समिती नेमली आहे. सुगम आणि दुर्गम हे आपण कशासाठी निवडले आहे तर आपल्याकडे तेवढी शिक्षकांची संख्या नाही. बदल्या ऑनलाईन करायचे म्हटले तर त्याला काही अटी व शर्ती असल्या पाहिजेत. म्हणून आम्ही नक्षलक्षेत्र आणि आदिवासी, वार्षिक

श्री. हसन मुश्रीफ..

पर्जन्यमान २ हजार मी.मी.पेक्षा जास्त, नैसर्गिक आपत्ती किंवा सातत्याने संपर्क तुटतो अशी गावे, हिंस्त्र पशुंचा उपद्रव असणारा जंगल व्याप्त प्रदेश, वाहतुकीच्या सुविधेचा अभाव, नेटवर्क नसलेले क्षेत्र, डोंगरी भागाचा प्रदेश आणि राष्ट्रीय राजमार्गापासून १० कि.मी.पेक्षा जादा दूर अंतर असलेले गांव. या ७ अटींपैकी ३ अटी बसत असतील तर सुगम आणि दुर्गम अशी आपण व्याख्या केली आहे. आता सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला की, शाहूवाडी तालुक्यावर फार मोठा अन्याय झाला. हे खरे आहे की, दुर्गममध्ये जास्त गावे असल्याने आणि ३ वर्षात बदली करायची असल्याने शिक्षक तेथे जादा जाण्याचे टाळतात. आपल्याकडे दुर्गम ४४ ते ४७ गावे असताना सुध्दा अजून १५ जागा भरलेल्या गेल्या नाहीत. ही वस्तुस्थिती आहे की, शिक्षकांचा ओढा चांगली तालुके आणि मोठी शहरे यांकडे असतो. डोंगरी भागामध्ये नसतो. म्हणून आम्हाला नियम करावा लागेल की, डोंगरी भागातील शाळेमध्ये शिक्षकांनी जाण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. या शैक्षणिक वर्षात आमचे सॉफ्टवेअर तयार झालेले आहे आणि या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने बदल्या करुन शाहूवाडीमध्ये जो शिक्षकांचा बॅकलॉग राहिला आहे तो आम्ही भरुन काढू.

डॉ. विनय कोरे : अध्यक्ष महोदय, माझ्या २ प्रश्नांचे उत्तर मिळाले नाही. मी मंत्री महोदयांना म्हणालो की, कागल तालुक्यामध्ये फक्त ४ टक्के रिक्त जागा आहेत. संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातील १२ तालुक्यात १ हजारहून अधिक पदे रिक्त असल्याचे त्यांनी सांगितले. त्या हजार पदांपैकी २०० ते २५० पदे एका तालुक्यात आहेत. त्यामुळे जिल्हा पातळीवर हा जो अन्याय आपल्याला स्पष्ट दिसतो तो आपण संपविणार आहात की नाही. शिक्षणाच्या बाबतीत एक तालुका मागे राहिला पाहिजे असे जिल्ह्यातील धोरण असू शकते काय, हा माझा त्यांना स्पेसिफिक प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, त्यांनी जे निकष सांगितले. त्यात २ हजार मी.मी. पेक्षा जास्त पाऊस पडला पाहिजे तर या तालुक्यात तितका पाऊस पडतो. १२० गावांमध्ये एस.टी. जात नाही. वाहतुकीच्या समस्या आहेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

डॉ. विनय कोरे....

त्यामुळे निकष बदलण्यासाठी त्यांनी वेगवेगळे विचार मांडायचा प्रयत्न केला आहे. ते म्हणजे शालेय पोषण आहार देणारी गाडी वर्षातून चार वेळा जाते. तसेच ती गाडी ज्या गावात पोहोचते त्या गावात वाहतुकीची सुविधा आहे असे गृहीत धरायचे. त्या शिक्षकाने त्या गाडीतून तेथील गावात शिकवायला जावे, अशी शासनाची इच्छा आहे काय ? ज्या गावात आपण बसची सुविधा पोहोचू शकलो नाही, त्या गावात शिक्षकांनी कसे जायचे आहे? दूरसंचारच्या बाबतीत त्यांनी तिथे रेंजचा विषय सांगितला, बीएसएनएलने दाखला दिला की, ४५ टक्के गावांमध्ये आमची रेंज नाही. यांच्या अधिकाऱ्यांनी बसून असा निर्णय घेतला की, बीएसएनएलचा हा निकष मान्य करण्यात येऊ नये. आपण सर्व खाजगी कंपन्यांना पत्र देऊन त्यांची रेंज आहे काय याची चौकशी करुया. याचा अर्थ काहीही करण्यात येईल. परंतु हे सर्व करताना मी गांभीर्याने सांगतो की, शिक्षकांच्या संघटना आणि आपले अधिकारी यांच्या पैशाच्या व्यवहारातून हे सर्व करण्यात आले आहे. आज आपण काहीही सांगितले असले तरी देखील आज त्या तालुक्यातील विद्यार्थ्यांची काय दशा केली आहे यासाठी मी पहिल्यांदा माझ्या मनोगतातून सांगितले की, हा तालुका शाहू महाराजांच्या नावाने निर्माण झालेला आहे. त्यामुळे आपला जिल्हा शिकला, त्या काळात मुस्लिम बोर्डिंग, मराठा बोर्डिंग आणि लिंगायत बोर्डिंग काढले. अशा माणसाच्या नावाने असणाऱ्या तालुक्यात आपण त्यांच्या नावाने मत मागतो. शाहु-फुले-आंबेडकर यांचे विचार मांडतो. खरे म्हणजे, आपण कोल्हापूर जिल्ह्याचे माननीय ग्रामविकास मंत्री आहात. आपल्याला स्वत:ला ही बाब पटणारी आहे काय, याचा विचार करुन खास बाब म्हणून हा तालुका १०० टक्के दुर्गम म्हणून जाहीर करणे आणि किमान राज्यातील शिक्षकांची पदे जोपर्यंत भरली जात तोपर्यंत कोल्हापूर जिल्ह्यातील सरासरी रिक्त जागांपर्यंत त्या प्रक्रियेला आणून ठेवणे याबाबत आपण तातडीचा निर्णय घेणार आहात काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच मान्य केले होते की, या दोन वर्षात कोरोनाच्या कालावधीत आपण प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या करु

श्री. हसन मुश्रीफ...

शकलेलो नाही. कारण शाळाच बंद होत्या. त्यांनी जेव्हा ही वस्तुस्थिती मांडली तेव्ही ही त्रुटी माझ्याही नजरेसमोर आली होती. एका तालुक्यामध्ये शिक्षकांची संख्या खूपच कमी आहे आणि दुसरीकडे चांगल्या शहरी भागातील तालुक्यात खूप कमी त्रुटी आहेत. या समस्या दूर करण्यासाठी आपण समिती नेमली. याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला की, शाहूवाडी तालुक्यावर अशा प्रकारचा अन्याय झाला असेल तर आपण निश्चितपणे तो दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल. कारण शाहू महाराजांनी सन १९०२ साली सक्तीचे प्राथमिक शिक्षण मोफत केले. त्या काळात स्त्रियांना शिक्षणाची सक्ती केली. नंतर आपला देश स्वतंत्र होऊन शिक्षणाचा कायदा केला. सन १९०२ साली कोल्हापूर संस्थांनात सक्तीचे आणि मोफत शिक्षण करणारा हा राजा होता. त्यामुळे त्यांच्या नावाने जो तालुका तयार झाला आहे त्यावर अन्याय होणार नाही याची खबरदारी मी स्वत: घेईल. आम्ही अजिबात शिक्षकांच्या बदल्या केलेल्या नव्हत्या. या त्रुटी मागच्या काळातील आहेत आणि त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला जाईल. शाहूवाडी तालुकात सुगम-दुर्गम भागात जो अन्याय झाला आहे तो दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ. विनय कोरे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे त्या माध्यमातून माझी अपेक्षा आहे की, हा लहान मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे. त्यामुळे आपण जे सांगितले आहे त्यासाठी काहीतरी कालमर्यादा ठरवा. ४ वर्षापासून सातत्याने हा अन्याय सुरु आहे. दोन वर्षाचा कालावधी कोरोनाच्या परिस्थितीत गेला, हे मला मान्य आहे. हा प्रश्न तातडीने संपविण्यासाठी आपण निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, या शैक्षणिक वर्षापूर्वी आपण ऑनलाईन बदल्या करणार आहोत. त्यामुळे निश्चितपणे हा अन्याय दूर करण्यात येईल.

श्री. शेखर निकम : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. विनय कोरे यांनी ज्या पद्धतीने हा विषय मांडला त्याचप्रमाणे हा विषय तंतोतंत चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघासाठी सुद्धा लागू आहे. तिथे अनेक शिक्षकांची पदे रिक्त आहेत त्यामुळे

श्री. शेखर निकम....

माननीय ग्रामविकास मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांना माझी अशी विनंती आहे की, सन २०१४ साली माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांच्या कालखंडात बदल्यांसंबधी जो शासन निर्णय झाला होता तो आपण विचाराधीन करणार आहात काय ? त्याचबरोबर ग्रामीण भागातील शाळा शिक्षकांविना रिकाम्या आहेततिथे तातडीने शिक्षक दिले जातील काय ? असे माझे दोन प्रमुख प्रश्न आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, कोकण विभागाची तर दुसरची फार मोठी समस्या आहे. तिथे जवळपास ५० ते ६० टक्के शिक्षक हे कोल्हापूर,सांगली आणि सातारा जिल्ह्यातील आहेत. त्यांची २० वर्षापासून मागणी आहे की, आम्हाला आमच्या गावी परत पाठवा. आता कोकणसाठी शिक्षक भरती करीत असताना आम्हाला एक वेगळी मोहीम काढावी लागेल आणि त्यानुसार तेथील सर्व भूमिपूत्र घ्यावे लागतील. या बाबतीत मी माननीय शिक्षण मंत्र्यांशी बोललो आहे. मला वाटते की, लवकरात लवकर शिक्षक भरती झाली तर हा प्रश्न सुटेल. एवढ्या मोठया प्रमाणात शिक्षकांची पदे रिक्त असताना आपण लहान मुलांच्या शिक्षणासाठी असणाऱ्या कायद्याचे उल्लंघन होत असे मला वाटते. त्यामुळे तात्काळ शिक्षक भरती करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

डॉ. देवराव होळी : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न स्कोपच्या बाहेरचा असला तरी तो राज्याचा प्रश्न आहे. माझा गडचिरोली हा जिल्हा डोंगराळ आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे केव्हा भरणार ? या वर्षी तरी कमीत कमी दुर्गम भागात शिक्षकांची बदली होणार की नाही ? गडचिरोली जिल्ह्यासाठी खास बाब म्हणून शिक्षकांची पदे भरली जाणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत शिक्षकांची पदे भरावी लागतील. माननीय शिक्षण मंत्री यांच्याशी बोलून तत्काळ कार्यवाही सुरु केली जाईल. गडचिरोली जिल्ह्याचा त्यांनी उल्लेख केला. डोंगरी भागातील समस्या दूर करण्याकरिता मी विशेष लक्ष देईन.

उपाध्यक्ष : थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात अनेक शिक्षकाची पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिपाईची पदे रिक्त आहेत. एक शिक्षकी शाळेमध्ये शिक्षकांनाच झाडलोट करावी लागते. तसेच इतर सर्व कामे करावी लागतात. माझ्या मतदारसंघातील धापेगावातील एक शिक्षकी शाळेतील शिक्षक दारु पिऊन येतो. त्याची वैद्यकीय चाचणी झालेली आहे. ६ महिने होऊन देखील या बाबत कारवाई होत नाही.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, हा वेगळा प्रश्न आहे. दोन वर्षामध्ये महाविकास आघाडीचे सरकार आल्यापासून आम्ही एकाही शिक्षकाची बदली केलेली नाही. राज्यात कोरोना सुरु झालेला होता. हे सर्व पूर्वी झालेले आहे. ते दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ७ सीईओ यांची समिती तयार केली आहे. शिक्षक भरती कशी होईल व सर्व ठिकाणी समान शिक्षक जातील या करिता प्रयत्न केला जात आहे. या शिवाय हा प्रश्न मिटणार नाही.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री यांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. पालघर जिल्ह्यातील शिक्षकांची सेवा ज्येष्ठतेची यादी एक वर्षांपूर्वी प्रसिध्द झाली आहे. या शिक्षकांचे प्रमोशन का केले जात नाही, ते कधी केले जाणार ? जर प्रमोशन झाले नाही तर शिक्षकांची रिक्त पदे कशी भरली जाणार ? ही रिक्त पदे भरण्यासाठी प्रमोशनची यादी कधी जाहीर करुन प्रमोशन देणार ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, पालघर जिल्ह्याची माझ्याकडे माहिती नाही. सन्माननीय सदस्यांना माहिती घेऊन मी कळवेन.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय,.....

उपाध्यक्ष : मंत्री महोदयांनी पूर्ण राज्याला अनुसरून उत्तर दिलेले आहे.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, या एकशिक्षकी शाळेत सर्व कामे शिक्षकांना करावी लागतात. बीडीओ यांनी अहवाल दिला आहे की, सदर शिक्षक दारु पिऊन डयुटीवर आहे. ही एक शिक्षकी शाळा आहे. दारु पिऊन तो मुलांना काय शिकवणार आहे ?.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, या संदर्भात आपण माझ्याकडे तक्रार करावी. या बाबत चौकशी केली जाईल.

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक २ बाबत</u>

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, महसूल विभागाकडून आजच हा विषय आमच्याकडे वर्ग झालेला आहे. यामुळे लक्षवेधी क्र. २ च्या उत्तराच्या प्रती वितरित झालेल्या नाहीत. मी या संबंधी उत्तर देण्यास तयार आहे. मात्र निवेदनाच्या प्रती आलेल्या नाहीत. आपण ही लक्षवेधी सूचना नंतर घ्यावी.

पृ. शी. : जि. पुणे, लोणावळा नगरपरिषद (ता. मावळ) प्रशासनाने नगरपरिषदेचा ठराव न करताच कंत्राटदारास रक्कम अदा करणे

मु. शी. : जि. पुणे, लोणावळा नगरपरिषद (ता. मावळ) प्रशासनाने नगरपरिषदेचा ठराव न करताच कंत्राटदारास रक्कम अदा करणे,या संबंधी

श्री. सुनील शेळके वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुनील शेळके (मावळ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्हयातील लोणावळा नगरपरिषद (ता.मावळ) प्रशासनाने नगरपरिषदेचा कोणताही ठराव पारीत न करताच संबंधित कंत्राटदारास माहे मे, २०१२ मध्ये रुपये १.५० कोटी अदा केले असल्याचे निदर्शनास येणे, सदर नगरपरिषदेने कोणतीही कामे वा साहित्य लोणावळा नगरपरिषदेकडे उपलब्ध न केल्यामुळे सन २०१६ सालापर्यंत सुमारे रुपये ८ कोटीहून अधिक रक्कमेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे तसेच त्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागविण्यात आलेल्या माहितीव्दारे ही बाब उघडकीस येणे, मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये तसेच मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रारी दाखल केल्या असल्याचेही निदर्शनास येणे, सदर प्रकरणी मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याप्रकरणी व त्याबाबत तक्रारी दाखल करुनही १ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही कार्यवाही न होणे व त्यामुळे मा.लोकप्रतिनिधींसह सर्वसामान्य

जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

श्री. प्राजक्त तनपुरे (नगरविकास राज्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.सुनील शेळके : अध्यक्ष महोदय, माझ्या मावळ विधानसभा क्षेत्रामध्ये लोणावळा नगर परिषद अंतर्गत भुयारी गटार योजनेच्या संदर्भामध्ये भारतीय जनता पार्टीचे तत्कालीन नगरसेवक सन्माननीय श्री.संजयजी खंडेराव गायकवाड यांनी एक तक्रार दाखल केली होती. लोणावळा नगरपरिषदेमध्ये सन २००९-२०१० मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान उत्सव महाअभियानांतर्गत भुयारी गटार योजना मंजूर झाली होती. त्या योजनेला शासनाकडून ८ कोटी, ६० लक्ष रुपये इतका निधी देखील उपलब्ध झाला. हे काम सुनील फार्मा इंजिनिरिंग कंपनी यांना २६ टक्के ज्यादा दराने देण्यात आले. या कामाची वर्कऑर्डर झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराने ६५ लाख रुपयांच्या डिपॉझिट पावत्या नगरपरिषदेकडे जमा केल्या. त्या आधारे त्यांनी जवळपास दीड कोटी रुपयांची ॲडव्हान्स रक्कम नगरपरिषदेकडून उचललेली आहे.

अध्यक्ष महोदय, या सुनील फार्मा इंजिनिअरिंगचा ठेकेदार कोण आहे, या ठेकेदाराला दीड कोटी रुपयांचा ॲडव्हान्स कशाच्या आधारे दिला, तो ॲडव्हान्स देत असताना त्यांनी ६५ लाख रुपयांच्या बोगस डिपॉझिट पावत्या जमा केल्या. याबाबतची तक्रार भाजपाचे नगरसेवक तत्कालीन श्री.संजयजी गायकवाड यांनी १० वर्षांपूर्वी दाखल केली. याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुन देखील त्यांना न्याय मिळत नव्हता. त्यामुळे त्यांनी माझ्याकडे दि.२६ जानेवारी, २०२० रोजी तक्रार दाखल केली.

अध्यक्ष महोदय, त्यांनी मला सर्व वस्तुस्थिती सांगितली. त्यांच्या म्हणण्यानुसार असे निदर्शनास आले की, त्यांनी प्रशासनाकडे सर्व कागदपत्रे पुराव्यानिशी सादर केली. परंतु, जो भ्रष्टाचार झाला आहे, त्या अधिकाऱ्याला पाठीशी घातले जात आहे, त्याबाबतची रितसर माहिती देखील आम्ही दिली. लोकआयुक्तालयामध्ये देखील त्यावर सुनावणी झाली. ते प्रकरण निकाली काढण्यात आले.

अध्यक्ष महोदय, सदर बाबत दि.१५.७.२०१६ रोजी लोकआयुक्तालयामध्ये सुनावणी झाली. त्यावेळेस ते प्रकरण निकाली काढत असताना असे सांगण्यात आले की, श्री.संजय गायकवाड यांनी या प्रकरणामध्ये सुनावणी संचालक, नगरपरिषद,

श्री.सुनील शेळके ...

प्रशासन यांना सांगितले की, नगरपरिषदेने संबंधित ठेकेदाराच्या विरुध्द बोगस कागदपत्रे दाखल केल्यामुळे एफ.आय.आर. दाखल केला. परंतु, अद्याप तसे कोणतेही प्रकरण किंवा तशी कोणतीही कारवाई झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, त्या पलीकडे असे सांगण्यात आले की, संबंधित ठेकेदाराकडून २ कोटी रुपयांचे पाईप नगरपालिकेमध्ये जमा करुन घेण्यात आले. तसा नगरपालिकेचा अहवाल दिला. दुसरीकडे नगरपालिकेने श्री.संजय गायकवाड यांना लेखी माहिती दिली की, असे कुठल्याही प्रकारचे पाईप नगरपरिषदेमध्ये जमा केलेले नाहीत.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना माझे स्पेसिफिक प्रश्न आहेत की, तत्कालीन नगराध्यक्ष, मुख्याधिकारी यांनी संगनमताने पदाचा गैरवापर करुन जो काही भ्रष्टाचार केला आहे, त्यावर शासन निर्णय घेणार आहे काय, १० वर्षांपूर्वी दीड कोटी रुपयांतील ६०-६५ लाख रुपये जमा झाले. परंतु, १२ वर्षांपूर्वीची ८५ लाख रुपये ही रक्कम अजूनही त्या ठेकेदाराकडे जमा आहे. ती रक्कम व त्याचे व्याज हे दोन्ही वसूल करणार आहात काय? १० वर्षांपासून एक नगरसेवक, एक लोकप्रतिनिधी सातत्याने पाठपुरावा करुन देखील कोणत्या तरी राजकीय वरदहस्ताखाली दबला जात आहे, कोणीतरी या भ्रष्टाचाराला आळा घालण्याऐवजी सपोर्ट करण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, हे संपूर्ण प्रकरण आपण लवकरात लवकर निकाली काढणार काय?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्या त्या अनुषंगाने मला हे सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान योजेनेंतर्गत या भूमीगत गटार योजनेच्या सुमारे २१ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिली होती. त्यामध्ये जवळपास ८ कोटी रुपये नगरपालिकेला वर्ग केले होते. सुनील फार्मा इंजिनिअरिंग कंपनी, मुंबई यांना तेथे वर्क ऑर्डर दिली गेली होती.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.प्राजक्त तनपुरे...

mobilisation advance दीड कोटी रुपये देण्यात आला होता, यासंदर्भात प्रश्न उपस्थित झाले आहेत व त्याबाबत वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळ्या तक्रारी दाखल झाल्या. श्री.जगन्नाथ नायडू यांच्या तक्रारीवरुन संबंधित मुख्याधिकारी व नगर अभियंता यांची DMA ने प्राथमिक चौकशी केली. त्यामध्ये काही तरी अनियमिता आहे, असे वाटल्याने महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ मधील नियम ८ व १२ अंतर्गत तत्कालीन मुख्याधिकारी व नगर अभियंता यांची चौकशी करण्यात आली आहे. त्यामध्ये मुख्याधिकारी यांचेवर आरोप सिद्ध झाले नाही. परंतु नगर अभियंता यांच्यावर अंशत: आरोप सिद्ध झाल्याने त्यांची १ वर्ष वेतन वाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे. मुख्याधिकारी यांना दोषमुक्त करण्यात आले. या प्रकरणी लोक आयुक्त यांचेकडेही तक्रार करण्यात आली होती. त्यांनी दिनांक १५ जुलै, २०१६ रोजी सुनावणी घेतली व याप्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता नाही, असे आदेश पारित करुन प्रकरण बंद केले.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी त्यावेळी २ कोटी रुपयांचे पाईप पडले असे त्यावेळी सांगितले. त्यामुळे लोक आयुक्त यांचेकडे उक्त प्रकरणाचा पुनर्विचार सुरु असून त्याबाबत सुनावणी सुरु आहे. त्यांचेकडून यासंदर्भात पुढील कार्यवाही झाल्यानंतर त्यानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, मुख्याधिकारी व नगर अभियंता यांची चौकशी करण्यात आली आहे. परंतु नगराध्यक्षांची या प्रकरणी कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. जिल्हाधिकारी यांचेकडे नगराध्यक्षांचा अहवाल १ महिन्यात मागविण्यात येईल व उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सुनिल शेळके : अध्यक्ष महोदय, उक्त प्रकरण तपासल्यानंतर कर्मचारी अथवा नगर अभियंता यांचेवर कारवाई करण्यात आली आहे. परंतु मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्या चेक व व्हाऊचरवरील स्वाक्षरीद्वारे ठेकेदाराला रक्कम अदा करण्यात आली आहे. याप्ररकणी नगर अभियंता व कर्मचारी यांच्या स्वाक्षरीने रक्कम

श्री.सुनिल शेळके...

अदा केलेली नसताना त्यांना दोषी का धरण्यात येत आहे ? याप्रकरणातील खरे दोषी मुख्याधिकारी व नगराध्यक्ष आहेत, त्यांना या प्रकरणातून वगळण्यात आले. कर्मचारी व नगर अभियंता यांचेवर किरकोळ कारवाई करुन प्रकरण दडपण्यात आले आहे. उप विभागीय अधिकारी, मावळ यांनी लेखी चौकशी अहवाल दिला असून त्यामध्ये नमूद केले आहे की, नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केला आहे. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्यात यावी. ज्यांनी रक्कम अदा केली, बोगस कंत्राटदार उभा केला, बोगस सुरक्षा अनामत रकमेच्या पावत्या दाखल केल्या त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. या प्रकरणातील ठेकेदार गायब आहेत, ज्यांनी रक्कम अदा केली त्यांची चौकशी करण्यात आलेली नाही. नगराध्यक्ष, मुख्याधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हा उक्त प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येईल काय व नगरपालिकेची रक्कम वसूल करण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मुख्याधिकारी यांची प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, पुणे यांनी चौकशी करुन त्यांना निर्दोष सोडले आहे. ठेकेदाराने १.५ कोटी रुपयांचा मोबिलायझेशन ॲडव्हान्स घेतला व त्यांच्या ६५ लाख रुपये सुरक्षा अनामत रक्कमेच्या संदर्भात काही विषय संशयास्पद होते. त्या रकमेच्या बँकेच्या पावत्या बोगस निघाल्या आहेत.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.प्राजक्त तनपुरे.....

त्यामुळे त्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. संबंधितांनी fraudulent document दिले होते. त्यामुळे त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यांनी दीड कोटी रुपयांचा Mobilisation Advance घेतला होता. त्यापैकी Security Deposit मधून ६५ लाख रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. उर्वरित रक्कम व्याजासह वसूल करण्याबाबत नगरपालिकेने माननीय न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, नगराध्यक्ष यांच्याबाबतीत अन्य अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल एका महिन्यामध्ये सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात येतील. नगरपरिषदा सन १९६५ ॲक्टमधील कलम ५५ब नुसार संबंधित नगराध्यक्षांची सुनावणी घेण्यात येईल. सदर सुनावणीची कार्यवाही पुढील दोन-तीन महिन्यामध्ये संपविण्याचा प्रयत्न केला जाईल. सदर सुनावणीमध्ये नगराध्यक्ष दोषी असतील तर निश्चितपणे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

पृ.शी.: नांदगाव तालुक्यातील वाडी व तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देऊन आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

मु.शी.: नांदगाव तालुक्यातील वाडी व तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देऊन आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत या संबंधी श्री.सुहास (अण्णा) कांदे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सुहास (अण्णा) कांदे (नांदगाव) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक जिल्ह्यातील नांदगांव क्षेत्राची भौगोलिक स्थिती पाहता गावा-गावातील अंतर मोठ्या प्रमाणात असणे, ग्रामस्थांची प्रशासकीय कामाबाबत गैरसोय होणे, त्यामुळे गोरगरीब ग्रामस्थांना उदरनिर्वाहासाठी ८ ते ९ महिने बाहेर गावी जाणे लागणे, ग्रामपंचायत असलेल्या गावांना वाडी व तांडे यामध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना त्यांची कामे वेळेवर करण्यास मोठ्या प्रमाणात आजमितीपर्यंत त्रास सहन करावा लागणे, या त्रासातून त्यांची मुक्तता व्हावी याकरीता व या परिसरातील ग्रामस्थांची अनेक कामे विना विलंब होण्याकरीता व त्यांची होत असलेली गैरसोय दूर व्हावी म्हणून नांदगाव या क्षेत्रातील वाडी व तांड्या वस्तीशी संलग्न असलेल्या ग्रामपंचायती विभक्त करुन देणे या अनुषंगाने शासनाने तात्काळ निर्णय घेऊन त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता.''

श्री. हसन मुश्रीफ (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.सुहास (अण्णा) कांदे : अध्यक्ष महोदय, हे जग चंद्रावर जात आहे. डिजिटल इंडिया व मेक इन इंडियासह अनेक विकासाच्या गोष्टी होत आहेत. परंतु माझ्या मतदारसंघातील वाडी-तांड्यातील लोकांची दूरवस्था मात्र मोठ्या प्रमाणावर होत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये कमीत कमी १५ वाडी व तांडे आहेत. सदर वाडी व तांडे हे ग्रामपंचायतीपासून तीन किलोमीटर अंतरावर आहेत व त्या तांड्यातील लोकसंख्या १ हजार इतकी आहे. या वाडी व तांड्यातील गोरगरीब ग्रामस्थांना उदरनिर्वाहासाठी ८ ते ९ महिने बाहेर गावी जावे लागते. त्यांच्या गावामध्ये फक्त ज्येष्ठ नागरीक असतात. सदर सर्व तांड्यावर एकही परिवहन महामंडळाची बस जात नाही. जनावरांचे दाखल्यांसाठी तीन किलोमीटर चालत जावे लागते. एवढे करुन देखील कधी ग्रामसेवक उपलब्ध नसतात तर कधी सरपंच उपलब्ध नसतात. आजमितीस कोणत्याही वाडी व तांड्यावर कोणत्याही प्रकारचे रस्ते नाहीत, शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच काही तांड्यावर सभामंडप देखील नाही. विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. त्या भागामध्ये प्रचंड पाऊस पडत असल्यामुळे पावसाळ्यातील ६ महिने तेथील विद्यार्थ्यांना शाळेमध्ये देखील जाता येत नाही. त्यामुळे तेथील लोकांना प्रचंड त्रास होत आहे.

अध्यक्ष महोदय, माझा असा प्रश्न आहे की, ज्या ग्रामपंचायतीपासून वाडी व तांडे तीन किलोमीटर व त्यापेक्षा जास्त अंतरावर आहेत, त्या ग्रामपंचायतीचे विभाजन होऊन सदर वाडी व तांड्याना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देणार आहात काय? उक्त कार्यवाहीसाठी शासनाने सन २००४ मधील लोकसंख्येचा विचार करु नये. खास बाब म्हणून लोकसंख्येसाठी ग्रामपंचायत ठराव, पंचायत समितीचा ठराव ग्राह्या धरुन सदर ग्रामपंचायतीचे विभाजन करणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, सन २००४ मधील लोकसंख्येचा विचार न करता ग्रामपंचायतीपासून तीन किलोमीटर अंतर असणाऱ्या वाडी व तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यात यावा, अशी मी दिनांक २ फेब्रुवारी, २०१९ रोजी पत्रान्वये शासनास विनंती केली होती. सन २००४ मध्ये अत्यंत कमी लोकसंख्या

श्री.सुहास (अण्णा) कांदे.....

होती. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, सदर तांड्यातील लोकसंख्या कमी असल्यामुळे उक्त तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देता येत नाही. शासनाचे असे धोरण असेल तर वाडी व तांड्यामध्ये विकास करायचा नाही काय? तेथील गरिबांच्या मुलांनी शिक्षण घेऊ नये काय?

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील एका तांड्यावर चार महिन्यापूर्वी एक घटना घडलेली आहे. आगीमध्ये ज्येष्ठ नागरीक व त्यांची अर्धांगिनी असे दोघांचाही जळून मृत्यू झाला. त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्या तांड्यातील लोकांना दोन दिवसांनंतर समजले. एवढी दूरवस्था आहे. तेथील लोकसंख्या कमी आहे म्हणून सदर तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देता येणार नाही. तसेच सदर तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा दिल्यानंतर तेथे ग्रामपंचायत कार्यालय उभारावे लागेल तसेच तेथे ग्रामसेवक उपलब्ध करुन द्यावे लागेल, अशा प्रकारचे उत्तर मंत्री महोदयांनी देऊ नये, अशी मी विनंती करतो. सदर तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देऊन तेथे आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो. सदर तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यासाठी किंवा ग्रामपंचायतीचे विभाजन करण्यासाठी

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. सुहास (अण्णा) कांदे.....

खास बाब म्हणून मंत्री महोदयांनी ग्रामसभा आणि पंचायत समितीचा ठराव घ्यावा, अशी मी यानिमित्ताने आग्रही मागणी करणार आहे.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, शासन निर्णयाप्रमाणे ग्रामपंचायत स्थापन करावयाची असेल तर त्याकरिता लोकसंख्येचा निकष आहे. लोकसंख्या २ हजार पेक्षा जास्त असली पाहिजे, आदिवासी पाड्यांसाठी एक हजार लोकसंख्या असली पाहिजे. तसेच तीन कि.मी. पेक्षा अधिक अंतर असेल तर १ हजार लोकसंख्या असली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली आहे त्यामध्ये अस्वलदरा गावाची लोकसंख्या ३८३ आहे. आझादनगर येथील लोकसंख्या ४३०, डॉक्टरवाडी येथील लोकसंख्या ४६८, नारायणगाव येथील लोकसंख्या ६७५, घाटगेवाडी येथील लोकसंख्या ७८२, पोई येथील लोकसंख्या ६३४, पारेकरवाडी येथील लोकसंख्या ५८१, चंदनपुरी येथील लोकसंख्या ९३५, वसंतनगर येथील लोकसंख्या ५३५, ढेकू बुद्रूक येथील लोकसंख्या ७२० आणि गणेशनगर येथील लोकसंख्या १०४४ इतकी आहे. अशा प्रकारे ही गावे कमी लोकसंख्येची आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, २००४ च्या लोकसंख्येचा विचार करुन चालणार नाही. जर येथे ग्रामपंचायत करावयाची असेल तर तेथे ग्रामसेवक उपलब्ध करुन द्यावा लागेल आणि इतर सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागतील. तसेच याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये येऊन पुन्हा त्यास वित्त विभागाची मान्यता घ्यावी लागेल. सन २०११ च्या जनगणनेनुसार तेथील लोकसंख्या वाढली आहे. याचा निश्चितपणे विचार केला जाईल. ४०० ते ५०० लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायत स्थापन करणे अशक्य आहे. जी गावे मार्जिनल आहेत आणि लोकसंख्येचा निकष पूर्ण करीत आहेत, त्यांचा विचार करुन त्याबाबत मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये हा विषय उपस्थित केला जाईल.

श्री. सुहास (अण्णा) कांदे : अध्यक्ष महोदय, सन २००४ ची लोकसंख्या गृहीत धरु नये. शासनाला आणि मंत्री महोदयांना खास बाब म्हणून काही अधिकार आहेत. त्याबाबत शासन निर्णय देखील आहे. आवश्यकता भासल्यास त्या शासन निर्णयाची

श्री. सुहास (अण्णा) कांदे.....

प्रत मी मंत्री महोदयांना देतो. ग्रामसभा आणि पंचायत समितीचा ठराव केला तर.... मंत्री महोदयांनी वाचून दाखविलेली लोकसंख्या ही सन २००४ मधील आहे. आता सन २०२२ सुरु आहे. मागील १९ वर्षामध्ये लोकसंख्या अनेक पटीने वाढली आहे, हे मंत्री महोदयांनाही माहित आहे. मंत्री महोदय हे मतदारसंघातील कामे करीत असतात. गरिबांचे कैवारी म्हणून त्यांना ओळखले जाते. सन २००४ ची लोकसंख्या गृहीत धरली तर तेथील गावांचा आणि लोकांचा विकास होणार नाही. गरीब लोकांनी गरीबच राहावयाचे काय ? माननीय अध्यक्षही आदिवासी विभागाचे नेतृत्व करीत आहेत. मंत्री महोदयांनी असे उत्तर पाहिजे की, खास बाब म्हणून ग्रामसभा आणि पंचायत समितीचा ठराव घेण्यात येईल. चार वर्षाच्या लोकसंख्येचे उत्तर मंत्री महोदयांनी देऊ नये.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी खुलासा केला आहे की, मंत्रीमंडळाने हा निर्णय घेतलेला आहे. विशेष बाब म्हणून करावयाचे असेल तर त्याकरिता याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या बैठकीत न्यावा लागेल. तसेच यात अनेक आर्थिक बाबींचा समावेश आहे. यात ग्रामसेवक आणि इतर सुविधा द्याव्या लागणार आहेत. ग्रुप ग्रामपंचायतीमार्फत इतर सुविधा मिळत असतात. मार्जिनलबाबतचा निश्चितपणे विचार केला जाईल. सन २०११ च्या जनगणनेपेक्षा आता लोकसंख्या वाढली आहे, ही बाब खरी आहे. याचा विचार करुन त्या ग्रामपंचायती कशा प्रकारे देता येतील याचा विचार केला जाईल.

डॉ. राहुल आहेर : अध्यक्ष महोदय, या विषयाच्या अनुषंगाने मी मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. राज्यात अनेक प्रकरणे लोकसंख्या आणि अंतराच्या निकषात बसत नसल्यामुळे प्रलंबित आहेत किंवा फेटाळले आहेत. एखादी समिती गठीत करुन प्रलंबित असलेली प्रकरणे स्वतंत्ररित्या तपासून घ्यावीत. या प्रकरणांना हेच निकष न लावता समिती गठीत करुन कालबद्ध कार्यक्रम तयार करावा. अनेक ग्रामपंचायतीनी विभाजनासाठी दोन-दोन पंचवार्षिक निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे अशी जी प्रकरण आहेत, त्यांच्याकरिता

डॉ. राहुल आहेर ....

कालबद्ध कार्यक्रम तयार करावा. प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करुन न्याय देण्यात येणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव बनकर : अध्यक्ष महोदय, नाशिक जिल्हयातील निफाड मतदारसंघात अशाच पाच ग्रामपंचायती आहेत. त्यांच्या संदर्भात सन २०११ ची जनगणना विचारात घेण्यात आलेली आहे. सन २०२१ साली कोरोनामुळे जनगणना होऊ शकली नाही. लालपाडी, चांदोरी, पिंपळगाव निपाणी, औरंगपुरा आणि करंजी या पाचही गावांची लोकसंख्या १ हजारपेक्षा जास्त आहे. चार-चार पाच-पाच किलोमीटर अंतरावर ही गावे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुहास (अण्णा) कांदे यांनी देखील नांदगाव येथील प्रश्न मांडला. तसाच प्रश्न निफाड तालुक्यातील उपरोक्त पाच ग्रामपंचायतींचा आहे. त्यामुळे या पाच ग्रामपंचायतींसाठी खास बाब म्हणून परवानगी देण्यात येईल का ?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुहास (अण्णा) कांदे यांच्या प्रश्नावर उत्तर देतानाच मी सांगितले की, आजची लोकसंख्या पाहून आम्ही यासंदर्भात निश्चित विचार करु.

श्री.भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, पुणे जिल्हयातील खडकवासला मतदारसंघामध्ये घेरा-सिंहगड ही ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायत हद्दीतील एका टोकाच्या वाडीतून शेवटच्या वाडीपर्यंत जायचे म्हटले तर सुमारे ४० ते ४५ किलोमीटर अंतर आहे. या ग्रामपंचायतींतर्गत एकूण १३ वाडयांचा समावेश होतो. त्यामध्ये आचकरवाडी, सांबरेवाडी, दुरुगदरा, घेरा-सिंहगड, थोपटेवाडी यांचा समावेश होतो. तसेच सिंहगड किल्ल्याचा देखील समावेश होतो. त्यामुळे माझी विनंती आहे की, सदर ग्रामपंचायतीचे दोन ग्रामपंचायतींमध्ये विभाजन करणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रस्ताव द्यावा. मी याबाबत निश्चितपणे विचार करेल.

पृ.शी.: पाटोदा (जि.बीड) येथील नगरपंचायत हद्दीतील मांजरा नदीवरील ब्रीज कम बंधाऱ्याच्या बोगस कामाबाबत.

मु.शी.: पाटोदा (जि.बीड) येथील नगरपंचायत हद्दीतील मांजरा नदीवरील ब्रीज कम बंधाऱ्याच्या बोगस कामाबाबत सर्वश्री. प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश सोळंके (माजलगाव) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पाटोदा (जि.बीड) येथील नगरपंचायत हद्दीत मांजरा नदीवरील ब्रीज कम बंधारा कामासाठी शासनाने २ कोटी ९२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करणे, सदर कामाच्या ई-निविदासाठी अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यतेचा अधिकार नसताना देखील सा.बां.विभागाच्या अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद यांची तांत्रिक मान्यता सादर करणे, परंतु सा.बां.विभागाच्या अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद यांनी सदर कामास तांत्रिक मान्यता दिली नसल्याचे लेखी पत्र देणे, एकंदरीत सदर ई-निविदा बोगस पद्धतीने करणे, प्रत्यक्ष अंदाजपत्रकानुसार काम न करता २ कोटी ६० लक्ष रुपयांचे देयक अदा होणे, यामध्ये तत्कालीन नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगर अभियंता व ठेकेदार यांनी संगनमत करून भ्रष्टाचार करणे, या कामासाठी अतिरिक्त १ कोटी रूपयांच्या निधीची मागणी करणे, दरम्यान या नगरपंचायतच्या सन २०१७ ते २०२१ या ५ वर्षांच्या कालावधीमध्ये विविध सार्वजनिक व मुलभूत योजनेच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार होणे, एकंदरीत या नगरपंचायतचे सन २०१७ ते २०२१ या कालावधीमधील विशेष लेखापरिक्षण करण्याची आवश्यकता असणे,

श्री.प्रकाश सोळंके.....

तसेच बंधारा कम ब्रिज कामाच्या अपहार प्रकरणी दोषी विरुद्ध फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करून अपहाराची रक्कम शासनाने वसूल करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

श्री.प्राजक्त तनपुरे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, पाटोदा नगरपंचायत अंतर्गत मांजरा नदीवर बंधारा कम ब्रीज या बांधकामासाठी शासनाने ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. सदर कामाला अधिक्षक अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिली. खरे तर, अधिक्षक अभियंता यांना २.५ कोटी रुपयांपर्यंतच्या कामाला तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे सदर कामाची तांत्रिक मान्यता नियमानुसार मुख्य अभियंता यांच्याकडून घेणे आवश्यक होते. परंतु बोगस तांत्रिक मान्यतेच्या आधारे, अधिक्षक अभियंता यांचे बोगस शिक्के मारुन, अधिक्षक अभियंता यांच्या अधिकारात नसताना प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, हे काम संपूर्णत: बेकायदेशीर आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या जागी प्रत्यक्ष जाऊन पाहिले तर केवळ २५ ते ३० लाख रुपयांचे काम झाल्याचे दिसून येते. परंतु संबंधित कंत्राटदाराला सुमारे २ कोटी ८० लाख रुपये देण्यात आले आहेत. कंत्राटदार, नगराध्यक्ष, जनरल बॉडीचा ठराव असल्यामुळे सर्व नगरसेवक, संबंधित अभियंता, मुख्याधिकारी अशा सर्वांच्या संगनमताने सदर गुन्हा घडला आहे. यामध्ये शासनाच्या पैशांचा अपव्यय व लूट झालेली आहे. त्यामुळे मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, उपरोक्त सर्वांवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन अपव्यय झालेल्या सुमारे अडीच-तीन कोटी रुपयांची त्यांच्याकडून वसुली करणार का ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नव्याने स्थापन केलेल्या सदर नगरपंचायतीला नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य या योजनेंतर्गत शासनाने ३ कोटी रुपये निधी मंजूर केला होता. नवीन नगरपंचायत असताना या ३ कोटी रुपये निधीमध्ये कोणकोणती कामे करणे अपेक्षित होते व त्यामध्ये या बाबीचा समावेश होतो किंवा कसे हे आम्ही अगोदर तपासून पाहू. कारण बंधारा कम ब्रिजचे काम या योजनेमध्ये अनुज्ञेय आहे किंवा कसे हे सर्वप्रथम पाहिले जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की सदर कामाला बोगस तांत्रिक मान्यता दिलेली आहे. उपलब्ध कागदपत्रे पाहता सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यामध्ये निश्चितपणे तथ्य असल्याचे दिसून येते व

श्री.प्राजक्त तनपुरे.....

त्यामुळे शंकेला पुरेसा वाव आहे. तांत्रिक मान्यतेचा भाग असलेली recapitulation sheet माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यामध्ये मुख्याधिकारी, नगरपंचायत पाटोदा, नगराध्यक्ष, नगरपंचायत पाटोदा या दोघांच्याही सहया आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे...

२ कोटी ९३ लाखाचे ते काम आहे. त्यामध्ये तांत्रिक मान्यता, जीएसटी वगैरे धरुन वेगवेगळ्या कामाचे एकूण २ कोटी ९३ लाख होतात, असे सांगितले. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद यांच्या सही शिक्क्याचे हे पत्र आहे. दुसरे म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सविस्तर खुलासा आलेला आहे. त्यानुसार अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर अडीच कोटींच्या कामांना तांत्रिक मान्यता देता येत नाही. त्यांनी स्पेसिफिकपणे सांगितले आहे की, आम्ही अशा प्रकारची कोणतीही तांत्रिक मान्यता दिलेली नाही. त्यामुळे यामधून हे बऱ्यापैकी सिध्द होते की, Fraudulent पध्दतीने तांत्रिक मान्यता देऊन पुढे प्रशासकीय मान्यता मिळाली आणि पुढील सर्व काम झाले आहे. त्यामुळे जरी या ठिकाणी अशी कागदपत्रे असली तरी आम्ही डी.एम.ए. यांना सांगून पुढील १५-२० दिवसात.... कारण यामध्ये बऱ्यापैकी फॅक्ट दिसत आहेत. म्हणून डी.एम.ए. यांनी पुढील १५-२० दिवसात याची शहानिशा करावी. त्यामध्ये फौजदारी स्वरुपाचे गुन्हे शासन निश्चितपणे दाखल करीन.

श्री. बाळासाहेब आजबे : अध्यक्ष महोदय, हा विषय माझ्या मतदार संघातील आहे. पाटोदा नगरपंचायत ही माझ्या मतदार संघात येते. अशा प्रकारच्या तांत्रिक मान्यता बऱ्याच कामांसाठी घेतलेल्या आहेत.

उपाध्यक्ष : सभागृहाची वेळ १०.५० वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. बाळासाहेब आजबे : अध्यक्ष महोदय, आष्टी आणि पाटोदा या दोन्ही ठिकाणी अधीक्षक अभियंता यांनी न देता किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी न देता खोटी कागदपत्रे जोडून त्या तांत्रिक मान्यता घेतल्या आहेत. ही एकच नाही तर गेल्या २-३ वर्षात सर्वच कामे त्या पध्दतीने झालेली आहेत. आष्टी आणि पाटोदा या दोन्ही ठिकाणी असे घडले आहे. त्यामुळै या दोन्ही ठिकाणच्या अशा सर्व कामांची चौकशी करण्यात यावी.

श्री. बाळासाहेब आजबे...

अध्यक्ष महोदय, या प्रकरणात अधीक्षक अभियंता यांनी लिहून दिले आहे की, मी ही तांत्रिक मान्यता दिलेलीच नाही. वास्तविक पाहता त्यांना अडीच कोटी रकमेच्या वर तांत्रिक मान्यता देण्याचा अधिकार नाही. तो मुख्य अभियंता यांना आहे. त्यामुळे त्यांनी ती मान्यता दिलेली नाही. आम्ही या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे देखील तक्रार दाखल केली आहे. पण हे सर्व उघड दिसत असताना माझे म्हणणे असे आहे की, या सर्वांवर लवकरात लवकर कारवाई झाली पाहिजे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी सांगितले आहे की, या स्पेसिफिक बाबींचा १५ दिवसात डीएमए यांच्याकडून अहवाल घेऊ आणि इतरही काही बाबी असतील तर सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणाव्यात, त्याच्यावर योग्य विचार केला जाईल.

ॲड श्री. आशिष जयस्वाल : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्री महोदयांना या सभागृहात येण्यापूर्वी ब्रिफिंग होत असते. पण उत्तरातून आता मंत्री महोदयांनी सांगितले की, नव्याने स्थापन झालेल्या नगर पंचायतीला नागरी सुविधेकरिता अनुदान देणे हे काम या योजनेमध्ये बसते की नाही हे तपासावे लागेल, असे उत्तर या सभागृहात देता येत नाही. ब्रिफींगमध्ये ही गोष्ट त्यांना माहिती असायला हवी होती. तसेच जर ते काम या योजनेमध्ये बसत नसेल तर या कामाला जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता कशी दिली, ही माझी हरकत आहे.

श्री. प्राजक्त तनपुरे : मी याबद्दलचे ब्रिफिंग वगैरे घेतले नाही. पण मला आता आढळले म्हणून मी तशी शंका असल्याचे म्हणालो. कारण सर्वच जीआर आपल्याला तोंडपाठ नसतात. पण आता समोर आल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी माहिती विचारली त्याच्या खोलात जाऊन आपण याचा विचार करीत आहोत. त्यामुळे आपण त्याचे स्वागत केले पाहिजे.

श्री. प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी त्या नगरपंचायतीच्या कामाचा एक नमूना आहे. परंतु जेव्हापासून ही नगरपंचायत अस्तित्त्वात आली तेव्हापासून सर्व कामे अशा बोगस तांत्रिक मान्यतेच्या आधारावर आणि बोगस कागदपत्रे जोडून केली आहेत. कारण तो कंत्राटदार संबंधित नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्याचा मुलगा आहे. आपण डी.एम.ए.मार्फत १५ दिवसात चौकशी करु असे आपण उत्तर दिली आहे. परंतु नगरपंचायत पाटोदा आणि नगरपंचायत आष्टी यांच्या संपूर्ण कारभाराचे स्पेशल ऑडीट करुन त्यानुसार आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तो कंत्राटदार एका नगरसेवकाचा मुलगा आहे तर आपण त्याबाबत २ निर्णय करु. एक म्हणजे त्या नगरसेवकावर अपात्रतेची कारवाई करु.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन मुद्दे सांगितले आहेत. ठेकेदार जर नगरसेवकाचा मुलगा असेल तर त्या नगरसेवकावर अपात्रतेची कारवाई करु. दुसरे असे की, हा विषय तांत्रिक आहे. बाकी अनियमितेबाबत आपल्या काही तक्रारी दिल्या तर त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अहवाल घेऊन त्यात काही आढळून आले तर आपण विशेष ऑडिट देखील लावू.

उपाध्यक्ष : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी १०.५० ते ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

असुधारित प्रत

वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

उपाध्यक्ष : आपल्या सभागृहाच्या सदस्या तसेच माननीय राज्यमंत्री श्रीमती आदिती तटकरे यांचा आज वाढदिवस आहे. त्यांना मी या निमित्ताने सभागृहाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देतो.

पृ.शी /मु.शी : तोंडी उत्तरे

हिंगोणा (ता.यावल, जि.जळगाव) येथील ग्रामपंचायतमध्ये दलित वस्ती निधीचा गैरवापर झाल्याबाबत

(१) * ४२५०८ श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोणा (ता.यावल, जि.जळगाव) येथील ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्ती निधीचा गैरवापर झाला असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारस निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे ऑनलाईन निविदे प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप तसेच आर्थिक व्यवहार करुन अनियमितता झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नाही, सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झालेली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कोणावरही कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. शिरीष चौधरी : अध्यक्ष महोदय, शासकीय अधिकाऱ्यांनी दिशाभूल करणारी माहिती मंत्री महोदयांना दिलेली आहे. ग्रामसेवक व सरपंच यांना खुलासा नोटीस पाठवली होती. त्यांच्याकडून खुलासा मागवला होता. संदर्भ क्र. ३ नुसार मासिक सभा दि.१७.११.२१, ठराव क्र. ५ अन्वये दलित वस्तीतील ३ कामे सूचवली होती, त्या जागेचा वाद उद्भवल्यामुळे सदरची टेंडर प्रक्रिया तूर्त स्थगित करण्यात येऊन ही प्रक्रिया रद्द करण्यात यावी. आवश्यकता वाटल्यास नवीन प्रकिया करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले आहे. या नंतर दि. २७.१२.२१ रोजी मासिक सभा विषय

ता.प्र.क्र. ४२५०८.....

श्री. शिरीष चौधरी .....

क्र. ६ नुसार, जागेचा विषय मिटला नाही. दलित वस्तीचे काम सुरु करण्याबाबत सर्व सदस्यांना आमंत्रित केले असता ई- निविदा प्रक्रिया करावी असे नमूद केले. दलित वस्तीतील कामाची निकड पाहता ग्राम विकास विभागाचा शासन क्र. २०२१ प्र.क्र. ७८ क्र. ४ दि. २७ मे २०२१ नुसार

उपाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री. शिरीष चौधरी : अध्यक्ष महोदय, दिशाभूल कशी केली हे मी सांगत आहे. या करिता हा संदर्भ आवश्यक आहे. मक्तेदार पद्धतीने काम करण्याचे ठरले असताना आपणाकडे एकच मक्तेदाराची मागणी कशी प्राप्त झाली. तसेच मासिक सभा दि. १७.११.२१ च्या ठरावानुसार, ई निविदा का राबवण्यात आली नाही व वरील नमूद ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णायानुसार मासिक सभेत चर्चा का केली नाही, हे प्रश्न असे दर्शवतात की,सरपंच, ग्रामसेवक व तेथील ग्रामपंचायत सदस्य यांचे संगनमत झाले होते. जो कंत्राटदार आहे तो ग्रामपंचायत सदस्याचा जावई आहे, त्याकरिता केवळ एक निविदा घेऊन हे काम देण्यात आले आहे. ई निविदा केली नाही. यामध्ये लबाडी होत आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यात २७ हजार ९२० ग्रामपंचायती कार्यरत आहेत. अनेक ग्रामपंचायतीमध्ये अशा प्रकारे लबाडी होत असून शासनाच्या निधीचा गैरवापर, अपहार होत आहे. या दृष्टीने गांभीर्याने कारवाई करणे आवश्यक आहे. माननीय मंत्री यांना माझा प्रश्न आहे. अशा प्रकारच्या ग्रामपंचायतीच्या विविध योजनांच्या विकास कामातील गैरव्यवहार थांबवण्यासाठी सक्षम अधिकारी किंवा प्राधिकारी यांची नेमणूक करणार काय ? सदर दलित वस्ती योजनेतील गैरव्यवहाराकरिता जबाबदार सरपंच, ग्राम विकास अधिकारी, हिंगोणा यांच्यावर गुन्हा नोंदवला पाहिजे, अशी मागणी आहे. हा गुन्हा नोंदवला जाणार काय ?

ता.प्र.क्र. ४२५०८.....

श्री. शिरीष चौधरी .....

गटविकास अधिकारी यांच्या कारणे दाखवा नोटीस मधील खुलासा नमूद केलेला आहे. हे स्पष्ट होत आहे की, त्यांनी ई टेंडर केले नाही. केवळ टेंडर प्रक्रिया राबवली व एकाच व्यक्तीला टेंडर दिले आहे. टेंडर ज्या व्यक्तीला मिळाले तो ग्रामपंचायत सदस्याचा जावई आहे. सरपंच, ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य यांनी संगनमत करुन हे काम केलेले आहे. या बाबत काय कारवाई केली जाणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती सांगितली आहे. मौजे हिंगोणा, ता. यावल येथील ग्रामपंचायतीच्या अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेत ३ कामे होती.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित

ता.प्र.क्र. ४२५०८...

श्री.हसन मुश्रीफ ...

ग्रामपंचायतीने या ३ कामांच्या ई-निविदेबाबत दि. ३ नोव्हेंबर ते दि. ९ नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत संकेतस्थळावर नोटिस काढली होती. दरम्यान ई निविदा पूर्ण होण्याच्या आधीच या जागेबाबतचा वाद निर्माण झाल्याने दि.१७.११.२०२१ रोजी ग्राम ठराव करुन त्यांनी ही निविदा प्रक्रिया रद्द केली. त्यामुळे ही निविदा होऊ शकली नाही. परंतु, त्यानंतर त्या जागेचा वाद संपष्टात आल्यावर त्या ग्रामपंचायतीने ई निविदा न करता दरपत्रक मागवून श्री.अविनाश नारायण अडकमोल याला हे काम देण्याचा प्रयत्न केला.

अध्यक्ष महोदय, त्यांनी ग्रामविकास विभागाच्या दि.२७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाचा संदर्भ जोडला आहे. त्या निर्णयानुसार ३ लाखांच्यावर १० लाखांपर्यंतच्या कामांकरिता ई निविदा पध्दत रद्द केलेली होती. त्याचा संदर्भ घेतला. मात्र १० लाख रुपयांच्यावरील कामांकरिता ई निविदा काढायचीच होती. ते काम १५ लाखांच्यावर होते. त्यांनी दरपत्रिका मागविली. त्यामध्ये एकट्याचेच दरपत्रक आले. त्याला काम दिले. परंतु, बीडीओंना ही गोष्ट समजल्यानंतर त्यांनी दि. ११.३.२०२२ रोजी ही प्रक्रिया रद्द केली. त्यांनी असे सांगितले की, ई निविदा काढल्याशिवाय तुम्हाला काम देता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, त्यामुळे एकही पैसा खर्च झालेला नाही. त्यांनी ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटिस काढली. त्यामुळे काम झाले नाही. त्यांनी दरपत्रक मागवून काम देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, त्यावर एक पैसाही खर्च झाला नाही. सरपंच व या तिघांचे संगनमत आहे हे खरे आहे. परंतु, शासनाचे म्हणजे ग्रामपंचायतीचे कुठलेही नुकसान झालेले नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ग्रामपंचायतीचे सदस्य, तो कंत्राटदार, सरपंच व ग्रामसेवक यांची पुन्हा एकदा नव्याने चौकशी करण्यात येईल.

ता.प्र.क्र. ४२५०८...

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझी मंत्री महोदयांच्या उत्तराला हरकत आहे. मंत्री महोदयांनी असे सांगितले की,... (अडथळा).. सन्माननीय सदस्य श्री.शिरीष चौधरी मी आपल्याला मदत करीत आहे. दि.११ मार्च, २०२२ रोजी बीडीओंनी ऑर्डर काढली. सन्माननीय सदस्य १ महिना अगोदर पत्र देऊन प्रश्न पाठवतात. मंत्री महोदय सन्माननीय सदस्यांनी १ महिना अगोदर प्रश्न पाठविल्यानंतर विभागामध्ये हालचाल सुरु झाली. अधिवेशन सुरु असताना ... म्हणजे अधिकाऱ्यांची हिंमत पहावी. अधिकाऱ्यांची ... शासनाची आणि शासकांची बदनामी हे अधिकारी कसे करतात ते पहावे. दि. ११ मार्च, २०२२ रोजी बीडीओ ऑर्डर काढतात व सर्व प्रक्रियेला स्थगिती देतात. याचा अर्थ त्यामध्ये अधिकारी सामील आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर त्यांच्या सर्व हालचाली सुरु झाल्या. मंत्री महोदय आपण या तारांकित प्रश्नाला जी लेखी उत्तरे दिलेली आहेत ती सर्व चुकीची आहेत. ते आपण प्रथम मान्य करावे. मंत्री महोदयांनी हे मान्य केले पाहिजे की, सर्व उत्तरे चुकीची आहेत. मंत्री महोदय आपण उत्तर सुधारणार काय? ज्या अधिकाऱ्यांनी अशा पध्दतीने कारवाई केली त्यांच्यावर आपण तातडीने निलंबनाची कारवाई किंवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविणार काय?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी मघाशी या प्रश्नाचे उत्तर देताना सांगितले की, ही ई निविदा त्यांनी काढली नाही. दरपत्रक मागवून त्यांनी एका कॉंट्रॅक्टरला काम देण्याचा प्रयत्न केला. त्यात संगनमत असावे. कारण प्रश्न विचारल्यानंतर ते रद्द करण्यात आलेले आहे. फक्त ग्रामविकास अधिकाऱ्याला यामध्ये कारणे दाखवा नोटिस देण्यात आलेली आहे. त्याऐवजी यामध्ये संगनमत असणाऱ्या सर्वांवर याची कारवाई करण्यात येईल.

श्री.शिरीष चौधरी : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये जवळपास २६ ते २७ हजार ग्रामपंचायती आहेत. त्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये अशा प्रकारे रक्कमांचा अपहार केला जातो. त्यासंबंधात आपण काही प्राधिकरण किंवा त्याबाबत काळजी

ता.प्र.क्र. ४२५०८...

श्री.शिरीष चौधरी...

घेण्यासाठी काही अधिकारी नेमणार आहात काय, असा मी प्रश्न विचारलेला आहे. मंत्री महोदयांना मी विनंतीपूर्वक विचारतो की, आपण यासंबंधी काही कार्यवाही करणार आहात काय?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये ३४ हजार ग्रामपंचायती आहेत. या सर्वांवर देखरेख करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जवळजवळ आयएएस सर्व जिल्ह्यांवर आहेत. एमपीएससी मार्फत सिलेक्ट होणारे गटविकास अधिकारी तेथे आहेत. तेथे एवढी मोठी यंत्रणा आहे. ती बळकट करुन आपण या अपहाराच्या विरुध्द कडक पावले उचलण्याचे आदेश त्यांना पुन्हा नव्याने देऊ.

श्री.संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, या पर्टिक्युलर बाबतीत तेथे आंदोलन करण्यात आले होते. त्या आंदोलनानंतर त्या अधिकाऱ्यांनी कॉंट्रॅक्टर व त्यांच्यामध्ये सेटलमेंट घडवून आणले. मंत्री महोदय आपण जे सांगत आहात की, ते दरपत्रकाने दिले. ते नंतर केले गेले. हे यांच्या सेटलमेंटमध्ये आहे. खरे तर १० लाखांच्या आत काम असेल तर ई निविदा नाही काढली तरी चालते. परंतु, त्यातही सहकारी सोसायटीवर निविदा पध्दतीने काम दिले जाते. दरपत्रक काढून काम दिले जात नाही. मग यांनी दरपत्रक काढले याचा अर्थ ते देखील चुकीचेच काम केले आहे. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्याने दरपत्रकाने हे सर्व काम देण्याचा प्रयत्न केला, त्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार काय?

नंतर श्री.शिंदे ....

ता.प्र.क्र.४२५०८...

श्री.संजय सावकारे...

उक्त प्ररकणी चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सदरहू बाब सिद्ध झाली असल्याने चौकशी समिती नेमण्याची आश्यकता नाही. ई-निविदा काढण्यात येते, याप्रकरणी तक्रार करण्यात येते, त्याबाबतचा वाद संपुष्टात येतो व दरपत्रक लगेच मागविण्यात येते, उक्त कार्यवाही संगनमाताने झालेली असल्याने यासंदर्भात आता संशय नाही. त्यामुळे या प्रकरणी नव्याने चौकशी करण्यात येईल. ग्रामविकास अधिकारी यांना निलंबित करण्याची नोटीस काढण्यात आली आहे. या प्रकरणात ज्यांनी संगनमत कले त्या संबंधितांविरुध्द जी कारवाई करावयाची असेल ती करण्यात येईल.

असुधारित प्रत

(२) * ४०८४५ श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका चालकांना माहे एप्रिल, २०२१ पासून मानधन मिळाले नसल्याने रुग्णवाहिका चालकांनी दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास कामबंद आंदोलन सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णवाहिका चालकांना मानधन न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार वाहन चालकांना मानधन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
श्री. राजेश टोपे : (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक १६ जानेवारी, २००३ नुसर प्राथमिक आरोग्य केंद्र आकृतीबंधानुसार मंजूर पदांपैकी वाहनचालक यांचे नियमित पदावरील नियुक्त कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर वाहनचालकाची पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्याबाबत निर्देश आहेत. सन २०२१-२२ मध्ये कंत्राटी वाहनचालक यांचे वेतन अदा करण्यासाठी अनुदान प्राप्त झाले होते. त्यातून एप्रिल, २०२१ या कालावधीतील वाहनचालकांचे वेतन अदा करण्यात आले आहे. तथापि मे, २०२१ ते डिसेंबर, २०२१ या कालावधीत पुरवठादाराने वाहनचालकांचे मानधन अदा केले आहे. सद्यस्थितीत पुरवणी मागणीद्वारे अनुदान प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.राजन साळवी : अध्यक्ष महोदय, माणूस या जगात आहे तोपर्यंत आरोग्य व रुग्णवाहिका सेवा कार्यरत राहणार आहे. आरोग्य मंत्री महोदयांनी व त्यांच्या विभागाने कोविड काळात केलेल काम सलाम करण्यासारखे असल्याने मी त्यांचे अभिनंदन करतो. मुंबई-गोवा महामार्गावरील राजापूर-ओनी या ठिकाणी अपघाताच्या प्रमाणात खूप वाढ झाली आहे. याभागातील अपघातग्रस्त रुग्णाला उपचारासाठी मुंबई, कोल्हापूर येथे उपचारासाठी घेऊन जावे लागते. त्यामुळे उक्त

ता.प्र.क्र.४०८४५ ...

श्री.राजन साळवी...

रस्त्यावर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यासाठी बांधकाम विभागाने ५ एकर जागा आरोग्य विभागास हस्तांतरित केली असल्याने उक्त ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात येईल काय ? रत्नागिरी जिल्ह्यात ६७ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत, १०२ क्रमांकाची सुविधा असलेल्या ६७ रुग्णवाहिका व ६७ कंत्राटी वाहन चालक असून ते मागील १० वर्षापासून काम करीत आहेत व त्यांना अद्याप सेवेत कायम केले नाही, त्यांना सेवेत कायम करण्यात येईल काय ? उक्त कंत्राटी कामगारांना वेळेत वेतन अदा करण्यात येत नाही ते दर महिन्याच्या शेवटी त्यांना अदा करण्यात येईल काय ? देशात व राज्यात १०८ क्रमांकाची सुविधा असलेली रुग्णवाहिका सेवेत असून त्या माध्यमातून अनेक रुग्णांना उपचारासाठी जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर घेऊन जाण्यात येते. ही सेवा भारत विकास ग्रुपच्या माध्यमातून सन २००८ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. राज्यात ९३७ रुग्णवाहिका व माझ्या जिल्ह्यात १७ रुग्णवाहिका आहेत. त्यांची अवस्था मागील ८ वर्षांच्या कालावधीत दुरावस्था झाली आहे. त्यामुळे राज्याच्या वतीने नवीन रुग्णवाहिका देण्यात येतील काय, त्या कधीपर्यंत देण्यात येतील ?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी ४ प्रश्न विचारले आहेत. यामधील बरेच प्रश्न या तारांकित प्रश्नाशी संबंधीत नाहीत. परंतु सन्माननीय सदस्य यांचा मान राखून त्यांच्या प्रश्नाची जमेल तेवढी उत्तरे देण्याचा प्रयत्न नेहमी करण्यात येतो. आरोग्य विभागाचे राज्यात नाशिक व अमरावती या दोन ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आहेत. त्यानुषंगाने सन्माननीय सदस्य यांनी कोकणातही सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याची मागणी करण्यात आली आहे, त्यासंदर्भात निश्चितपणे विचार करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, प्राथमिक रुग्णवाहिकेचे वाहन चालकांचा प्रश्न उपस्थित केला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्राम विकास विभागाच्या अंतर्गत असतात.

ता.प्र.क्र.४०८४५ ...

श्री.राजेश टोपे....

त्यामध्ये आरोग्य विभागाचे केवळ डॉक्टर कार्यरत असतात, आम्ही त्यांना वेतन देतो. उर्वरित सर्व कर्मचारी हे ग्राम विकास विभागाचे असतात. कायम स्वरुपी जागेवरील लोक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया होत राहील. परंतु तोपर्यंत त्यांच्या जागेवर कंत्राटी तत्वावर पदे भरण्याचा विषय आहे. कंत्राटी तत्वावर वाहन चालकांची पदे भरण्यात येतात व त्यांचे वेतन थकीत आहे. त्यासाठी २६ कोटी रुपयांची पुरवणी मागणी मंजूर झाली आहे.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)

ता.प्र.क्र. ४०८४५.....

श्री.राजेश टोपे.....

पूर्वी मंजूर करण्यात आलेले १० कोटी व आता मंजूर करण्यात आलेले २६ कोटी असे एकूण ३६ कोटी रुपयांचे वितरण लवकरात लवकर करण्यात येईल. आताच मी अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांच्याशी चर्चा केली. सदर पैसे लवकरात लवकर रिलीज करण्यात यावे, असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे थकीत असलेल्या वेतनाची रक्कम देण्यात येईल तसेच अन्य थकीत देयके देखील देण्यात येतील, असे मी विश्वासाने सभागृहाला सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत प्रश्न विचारण्यात आलेला आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, सदर मंजूर पदे परीक्षा घेऊन ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून भरली जातात.

अध्यक्ष महोदय, १०८ रुग्णवाहिकेसंदर्भात देखील प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, प्रसुतीवेळी ने-आण करण्यासाठी राज्यातील सर्व ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रांना १०२ च्या रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.राजन साळवी यांच्या मते १०८ च्या रुग्णवाहिका जुन्या झालेल्या आहेत. त्यांचे हे म्हणणे अगदी बरोबर आहे. सदर १०८ च्या सर्व रुग्णवाहिका बदलण्याबाबत शासन विचाराधीन आहे. १०८ च्या एकूण १,००० रुग्णवाहिका आहेत. सदर सर्व रुग्णवाहिका बदलण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखून टप्प्या-टप्प्याने निश्चित सर्व रुग्णवाहिका बदलण्यात येतील.

श्री.सुभाष देशमुख : अध्यक्ष महोदय, अनेक ठिकाणी आमदार निधीतून रुग्णवाहिका व शववाहिका उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. परंतु त्या रुग्णवाहिका चालकांचे वेतन कोणी द्यावे, हा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी हतबल झालेले आहेत. रुग्णवाहिकेसाठी लागणारे डिझेल संबंधित रुग्णाकडून वसूल

ता.प्र.क्र. ४०८४५.....

श्री.सुभाष देशमुख.....

केले जाते. त्यामुळे आमदार निधीतून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रुग्णवाहिका व शववाहिकेसाठी राज्य शासनाकडून चालक व डिझेलची व्यवस्था केली जाणार आहे काय?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, होय.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन साळवी यांनी राजापूर येथील समस्यांबाबत प्रश्न विचारला असला तरी, तो या राज्यातील आरोग्य विभागामध्ये कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीचा हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, कोरोना काळामध्ये आपल्याला आरोग्य विभागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनीच आधार दिलेला आहे. परंतु त्यांना मानधन देताना अधिकाऱ्यांचे हात जड का होतात, हे मला समजत नाही. अशा अतिशय गंभीर परिस्थितीमध्ये गरीब कुटुंबातील मुलांना नोकरी मिळत नाही. त्यासाठी अनेकजण धावपळ करुन कंत्राटी पद्धतीने का होईना नोकरी करतात. अशा कर्मचाऱ्यांना मानधन देण्याबाबतची फाईल माननीय श्री.अजित पवार आता मंजूर करतील, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. कोरोना काळामध्ये एकही विकासाचे काम केलेले नाही. राज्याचे सर्व उत्पन्न कोरोनासाठी व आरोग्य विभागाला समर्पित केले होते. असे असताना देखील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन थकीत ठेवणे, अतिशय चुकीचे आहे.

अध्यक्ष महोदय, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक सफाई कामगार कोरोनामध्ये माझ्याकडे अनेक अडचणी घेऊन येत होते. त्यामुळे सफाई कामगार व रुग्णवाहिकेच्या चालकांचे थकीत मानधन हे शासन तत्काळ देणार आहे काय?

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा आहे. शासकीय सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन दर महिन्याला आणि वेळेवर दिले जाते.

ता.प्र.क्र. ४०८४५.....

श्री.प्रकाश आबिटकर.....

परंतु अत्यंत तुटपुंज मानधनावर काम करणाऱ्या अशा सर्व कर्मचाऱ्यांचे मानधन वेळेवर देण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्याची अतिशय माफक मागणी आहे. ज्यांनी काम केले, त्यांना वेळेवर मानधन मिळालेच पाहिजे, या मताशी शासन निश्चितपणे सहमत आहे. याबद्दल दुमत असण्याचे कोणतेही कारण नाही.

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्या मंजूर झालेल्या आहेत. सर्व कर्मचाऱ्यांचे थकीत मानधन तात्काळ देण्याबाबत पुढील ८ दिवसांमध्ये पूर्ण कार्यवाही करावी, असे श्री.अजित पवार यांनी संबंधित सचिव महोदयांना सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे आता कोणत्याही कर्मचाऱ्यांचे मानधन थकीत राहणार नाही, असा मी विश्वास व्यक्त करतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

ता.प्र.क्र.४०८४५.....

श्री.राजेश टोपे ...

लोकसंख्या, अंतर या निकषानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राथमिक आरोग्य केंद्रांना मंजुरी दिली जाते. त्यानुसार ग्रामीण रुग्णालयाचेही अपग्रेडेशन केले जाते. वाढत्या संख्येमुळे खर्चदेखील वाढत असतो. नॉन सॅलरी एक्सपेंडिचर्स, जनरल खर्च देखील वाढत असतो. त्याबाबत वित्त विभागासोबत चर्चा केली आहे. ठराविक साचेबद्ध पद्धतीने दरवर्षी ज्याप्रकारे बजेट ॲलोकेशन केले जाते तसे ते न करता, जेवढी प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढते आहे, त्यानुसार निधी आणि बजेटचे नवीन ॲलोकेशन केले पाहिजे. ही बाब वित्त विभागाने मान्य केली आहे. या संदर्भातील योग्यती काळजी निश्चितपणे घेतली जाईल.

श्री. कैलास पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत बाह्य यंत्रणेद्वारे जे वाहन चालक नियुक्त केले आहेत त्यांचे मानधन अदा केले आहे. परंतु उस्मानाबाद जिल्ह्यातील ५८ रुग्णवाहिका चालकांचे ऑक्टोबर, २०२१ पासूनचे मानधन अद्यापपर्यंत देण्यात आले नाही. दुसरे असे की, शासनामार्फत एका वाहन चालकाकरिता संबंधित कंपनीला किती रुपये दिले जातात आणि ती कंपनी वाहन चालकाला किती रुपये देते, याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, मी आताच सांगितले आहे की, राज्यातील कोणाचेही मानधन किंवा देयक थकीत राहणार नाही. दुसरे असे की, मिनिमम वेजेस ॲक्टनुसार १५ हजार ८०० रुपये दर महिन्यास वाहन चालकांना मिळावयास हवेत. ईएसआयसी आणि पीएफबाबतची तरतूद कंत्राटदाराने त्यामध्ये करावयास पाहिजे. कंपनीने किंवा कंत्राटदाराने तशा प्रकारे मानधन दिले पाहिजे. याबाबत कोणती तक्रार असेल तर त्याबाबत गांभीर्याने दखल घेऊन संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कारवाई केली जाईल.

ता.प्र.क्र.४०८४५.....

श्री. हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, रुग्णवाहिकेवरील वाहन चालकास २४ तास सतर्क राहावे लागते. कधी फोन येईल आणि कधी कामावर जावे लागेल, याचा अंदाज नसतो. तसेच हे वाहन चालक श्रीमंत नसतात. ते अतिशय गरीब असतात. आरोग्य विभागातील डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांचे वेतन होत असते. या वाहन चालकांचे वेतन करण्यासाठी एकत्रित निधीतून हा खर्च करावा. ज्यावेळेस विभागाचा अर्थसंकल्प मंजूर होईल, त्यावेळेस हा खर्च पुन्हा एकत्रित निधीत जमा करता येतो. त्यामुळे एकत्रित निधीतून दर महिन्याला या वाहन चालकांचे पगार करण्यात येणार आहेत काय ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, पूर्वीच्या काळात ठराविक किंवा साचेबद्ध पद्धतीने तरतूद केली जात होती. आज याबाबतचे धोरण बदलावे, याकरिता विशेष बैठक घेतली आहे. वाढत असलेल्या संस्थांचा पूर्ण विचार करुन बजेटमध्ये तरतूद करावी, ही बाब वित्त विभागाने मान्य केली आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी याबाबतच्या सूचनाही दिल्या आहेत. या वाहन चालकांचे पगार वेळेत होतील, याची काळजी घेतली जाईल.

श्री. बळवंत वानखेडे : अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागावर आता चर्चा सुरु आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि डिस्पेन्सरीमधील गट – अ आणि गट – ब चे वैद्यकीय अधिकारी यांचे पगार मागील तीन महिन्यापासून झाले नाहीत. त्यांचे दोन-दोन, तीन-तीन महिने पगार होत नाहीत. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, या डॉक्टर्सचे पगार कधीपर्यंत होणार आहेत ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर यापूर्वीच दिलेले आहे.

श्री. महेश लांडगे : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना या प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेरील प्रश्न विचारु इच्छितो. पिंपरी-चिंचवड महानगरपलिकेमार्फत कोरोना काळात मानधनावर घेतलेले रुग्णवाहिका चालक आणि स्टाफ नर्सेस यांचा ठराव मंत्री

ता.प्र.क्र.४०८४५.....

श्री. महेश लांडगे.....

महोदयांकडे पाठविलेला आहे. ते वाहन चालक रुग्णवाहिका, शववाहिका चालवित होते. कोरोना काळात अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये यांनी काम केलेले आहे.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४०८४५.....

श्री.महेश (दादा) लांडगे.....

गेल्या दोन-तीन वर्षांपासून हे आमच्या महापालिकेमध्ये मानधनावर कार्यरत आहेत. यांना सेवेमध्ये कायम करण्याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेने ठराव करुन शासनाकडे पाठविला आहे. याबाबत शासन निर्णय घेईल का ?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, प्रत्येक पदाचे विशिष्ट सेवाप्रवेश नियम असतात. त्यामुळे कंत्राटी तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना थेट सेवेमध्ये कायम करता येत नाही. याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या पाच-पाच न्यायाधिशांच्या बेंचने अनेक मोठे निर्णय दिलेले आहेत. रोजंदारीवर किंवा कंत्राटी तत्त्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत कोणत्याही कायद्यामध्ये तरतूद नाही. त्यामुळे या प्रकरणी देखील तशी कार्यवाही करता येणार नाही. सेवाप्रवेश नियमातील तरतुदींप्रमाणे परीक्षेच्या माध्यमातूनच कर्मचाऱ्यांना सेवेमध्ये घेता येईल.

श्री.शेखर निकम : अध्यक्ष महोदय, ए.एन.एम. यांच्यासोबत स्टाफ अटेंडंट व्हिजिटला जात असतात. ते पूर्णवेळ काम करतात परंतु त्यांना केवळ ३ हजार रुपये मानधन आहे. माझा प्रश्न आहे की, अशा स्टाफ अटेंडंटचे मानधन वाढविण्यात येईल का ?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

बोदाड (ता. मारेगांव, जि. यवतमाळ) येथील अंगणवाडी इमारत बांधकामास निधी उपलब्ध करण्याबाबत

(३) * ४२१०१ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय महिला व बालविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदाड (ता.मारेगांव, जि.यवतमाळ) येथील अंगणवाडी इमारत बांधकामाकरिता निधी उपलब्ध झाला नसल्याने सदर बांधकाम दहा वर्षापासून अपूर्ण असल्याने गावातील लहान मुलांना अंगणवाडी केंद्रात मिळणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध होत नसल्याचे दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम मंजुर असतानाही संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या दुर्लक्षतेमुळे अद्यापही काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर बांधकामास दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह अंगणवाडी इमारत बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) : (१) हे खरे आहे.

बांधकाम पूर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. मौजे बोदाड येथील अंगणवाडी केंद्र सद्यस्थितीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या रिकाम्या वर्ग खोलीमध्ये भरविण्यात येत आहे व अंगणवाडी केंद्रात दिल्या जाणाऱ्या सर्व सोयी सुविधा नियमित देण्यात येत आहेत.

ता.प्र.क्र.४२१०१.....

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे).....

(२), (३) व (४) सदर कामास दिनांक १२/०३/२०१२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच उपअभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग, झरी यांचेकडून दिनांक २६/०७/२०१२ रोजी तांत्रीक मान्यता प्रदान करण्यात आली होती. सचिव ग्रामपंचायत यांना दिनांक २४/०८/२०१२ रोजी काम सुरू करण्याकरिता आदेश देण्यात आला. सदर जागेवर अतिक्रमण असल्यामुळे काम सुरू करण्यास विलंब झाला. उपलब्ध निधी सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील असल्याने तो माहे मार्च २०१३ पर्यंत खर्च करणे बंधनकारक असतांना माहे मार्च २०१३ पर्यंत जोताकाम पूर्ण झालेले असून बांधकामासाठी लागणारे आवश्यक साहित्य बांधकामाच्या जागी उपलब्ध करण्यात आले होते. परंतु माहे मार्च २०१३ नंतर निधी खर्च करण्याची परवानगी नसल्याने उर्वरित काम पूर्ण करता आले नाही.

त्यानंतर महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१४/ प्र.क्र.७८/का.६, दिनांक १०/०९/२०१५ नुसार अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी देण्यात आली होती. परंतु प्राकलनातील मंजूर दर व सन २०१५-१६ मधील शासकीय प्रचलित दरात बरीच तफावत असल्यामुळे उर्वरित अंगणवाडी बांधकाम पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असलेल्या निधीपेक्षा (रक्कम रू.२.७० लक्ष) जास्त निधीची (रक्कम रू.५.२५ लक्ष) आवश्यकता असल्यामुळे अंगणवाडी बांधकाम होऊ शकले नाही.

सदर अर्धवट बांधकामावर रू. १,३९,०००/- एवढा खर्च झालेला असून, उर्वरित अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्याकरिता लागणाऱ्या निधीकरिता बांधकामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून रू. ७,८०,०००/- एवढा निधी सदर अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्याकरिता लागणार आहे. सदर निधी चालू वित्तीय वर्षात प्राप्त होणाऱ्या जिल्हा नियोजन समिती निधीमधून देण्यात येईल व काम पूर्ण करून घेण्यात येईल.

ता.प्र.क्र.४२१०१.....

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे).....

तसेच बांधकाम विहित मुदतीत पूर्ण न करणे यास जबाबदार असलेले तत्कालीन कर्मचारी/अधिकारी यांचा खुलासा मागविण्यात आलेला असून खुलासा प्राप्त होताच दोषी आढळलेल्या संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४२१०१.....

श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरालाच माझा आक्षेप आहे. कारण मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, अतिक्रमणामुळे सदर कामास विलंब झाला. माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, अतिक्रमण होते तर जोत्याचे बांधकाम कसे झाले ? कारण अतिक्रमण असते तर जोत्याचे बांधकाम झालेच नसते. सन २०१२ मध्ये या कामाला प्रशासकीय मान्यता देऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यानंतर निधीअभावी किंवा अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हे काम बंद आहे.

अध्यक्ष महोदय, हा प्रश्न मारेगांव तालुक्यातील बोदाड गावचा असला तरीही माझ्या मतदारसंघातील इतरही अनेक अंगणवाडयांची कामे अर्धवट आहेत. अशा सर्व अंगणवाडी इमारतींच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन मंत्री महोदय निधी उपलब्ध करुन देतील का ? तसेच सदर अंगणवाडी इमारतीच्या बांधकामास उशीर होऊन आदिवासी भागातील लहान मुलांवर अन्याय झाला. त्यामुळे विलंबास कारणीभूत संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणार का ?

ॲड.यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेले प्रश्न बरोबर आहेत. सदर ठिकाणी अंगणवाडीचे बांधकाम रखडले गेले होते. परंतु तेथील शाळेची एक खोली देऊन मुलांची व्यवस्था करण्यात आली होती. अंगणवाडीमध्ये असतात त्या सर्व व्यवस्था सदर ठिकाणी करण्यात आल्या होत्या.

अध्यक्ष महोदय, सर्वच सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, अंगणवाडीच्या माध्यमातून आपण समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचू शकतो. अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या बालकांची व्यवस्था करणे ही अर्थातच शासनाची जबाबदारी आहे. अंगणवाडयांची कामे अर्धवट राहत असतील तर त्या भागातील बालके व स्तनदा मातांपर्यंत आपल्याला पोहचता येत नाही. त्यामुळे परवाच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पामध्ये माननीय वित्त मंत्री तथा उप मुख्यमंत्री यांनी घोषणा केली की, जिल्हा व नियोजन समितीमार्फत ३ टक्के विशेष निधी महिला व बालकल्याण विभागाला देण्यात येईल.

ता.प्र.क्र.४२१०१.....

ॲड.यशोमती ठाकूर.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, त्यावेळचा डी.एस.आर. दर कमी असल्यामुळे सदर अंगणवाडीचे काम अर्धवट राहिले. निधी दिला गेला नाही असे नसून त्या ठिकाणी अतिक्रमण होते व त्यामुळे बांधकाम होऊ शकले नाही. त्यानंतर पुढील दोन वर्षे देखील बोदाड येथील अंगणवाडीचे काम झाले नाही. परंतु आता जिल्हा व नियोजन समितीमार्फत दिल्या जाणाऱ्या निधीतून हे काम करण्यात येईल. केवळ हीच अंगणवाडी नव्हे तर ज्या-ज्या अंगणवाडया अर्धवट आहेत त्यांची कामे आपण पूर्ण करु. अर्थात, जिल्हा परिषदेकडून पूर्वी मिळायचा तो निधी तर मिळणार आहेच परंतु आता आणखी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. हा निधी जिल्हाधिकारी यांच्याकडे येत असतो. त्या-त्या जिल्हयाच्या पालकमंत्र्यांच्या परवानगीने हा निधी वितरित केला जातो. तसे आपण पुढील वेळी करु. त्यातून हे सर्व प्रश्न सुटतील.

यानंतर श्री.धुमाळे.....

ता.प्र.क्र.४२१०१...

श्री. संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी लिहिले आहे की, अंगणवाडी केंद्र सध्या जिल्हा परिषद शाळेमध्ये अंगणवाडी भरविली जाते. याचा अर्थ अंगणवाडीची सुविधा तेथे उपलब्ध नाही. त्या ठिकाणी अंगणवाडी उपलब्ध असली पाहिजे आणि अंगणवाडीबरोबर तेथे किचन शेड आणि स्वच्छतागृह तेथे उपलब्ध असायला हवी. आताच्या जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये जेथे अन्न शिजविले जाते ती किचन शेड उपलब्ध आहे काय, हा पहिला प्रश्न. तसेच तेथे स्वच्छतागृह आहे काय याचेही उत्तर त्यांनी द्यावे. दुसरा प्रश्न असा आहे की, राज्यात ज्या अर्धवट अंगणवाड्या आहेत त्यांची माहिती आपण सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहात काय ?

ॲड यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे तो असा आहे की, त्या ठिकाणी शासन जेव्हा म्हणते की अंगणवाडी शाळेमध्ये भरविली जाते म्हणजे तेथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात आणि मगच आपण त्या ठिकाणी अंगणवाडी भरवू शकतो. नाही तर भरवू शकत नाही. त्या मुलांची आपण गैरसोय होऊ देत नाही. समजा त्या शाळेमध्ये अशा सुविधा नसतील तर त्या ठिकाणी जी दुसरी शाळा असेल त्या ठिकाणी आपण अशा अंगणवाडीची व्यवस्था करीत असतो. पण अर्धवट अंगणवाड्यांच्या माहितीबाबत त्या कशा पूर्ण करता येतील त्याबाबत मी आधीच्या प्रश्नांमध्ये उत्तर देताना सांगितले आहे. पण त्याशिवाय सन्माननीय सदस्यांना आणखी काही माहिती हवी असेल तर ती सर्व माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

ॲड राहूल कुल : अध्यक्ष महोदय, हा अपूर्ण बालवाड्यांच्या बांधकामच्या बाबतीतील जरी प्रश्न असला तरी राज्यातील बालवाड्यांची परिस्थिती, अंगणवाड्यांची परिस्थिती आणि प्राथमिक शाळांची स्थिती अतिशय गंभीर आहे. भगवान भरोसे हे सर्व सुरू आहे. त्यामुळे समाजाचा पाया ज्या ठिकाणी निर्माण होतो त्या शिक्षण व्यवस्थेतील इमारतींचे बांधकाम पूर्ण होण्याबाबत म्हणजे अंगणवाडी, बालवाडी आणि प्राथमिक शाळा यांच्या बाबतीत राज्य शासन काही कालबध्द

ता.प्र.क्र.४२१०१...

ॲड राहूल कुल...

कार्यक्रम हाती घेणार आहे काय ? कारण वारंवार अपघात होतात. चुकीच्या इमारतीमध्ये शाळा आणि अंगणवाड्या भरविल्या जात आहेत.

ॲड यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने ऑलरेडी कालबध्द कार्यक्रम हाती घेतलेला आहे. एका वर्षभरात जेवढी बांधकामे पूर्ण करता येतील तेवढी आम्ही नक्की पूर्ण करु. त्यासाठी आमच्या विभागाला निधी देखील उपलब्ध झाला आहे.

श्रीमती प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना केवळ २ प्रश्न विचारु इच्छिते. माझ्या सोलापूर जिल्ह्यातील १० नवीन अंगणवाड्या सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव गेल्या २ वर्षापासून प्रलंबित आहेत. आपल्या विभागाकडून नेहमीच असे उत्तर मिळते की केंद्र शासनाने मान्यता दिली नसल्याकारणाने महाराष्ट्रातील अनेक नवीन अंगणवाड्या प्रस्तावित आहेत त्या सुरू झाल्या नाहीत. एक तर कोरोना काळात मुले शिक्षणापासून वंचित राहिल आहेत. आता अंगणवाड्यांची मागणी होत असताना देखील केंद्र शासनाने परवानगी न दिल्यामुळे राज्य शासनाच्या माध्यमातून नवीन अंगणवाड्या मंजूर होत नाहीत, हे खरे आहे काय?

ॲड यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर होय, हे खरे आहे, असे आहे. सन २०१४ पासून आजपर्यंत राज्यात एकाही नवीन अंगणवाडीला मंजुरी मिळालेली नाही.

अध्यक्ष महोदय, काल आमची माननीय खासदार श्रीमती प्रियंका चतुर्वेदी यांच्यासमवेत चर्चा झाली होती. त्यानुसार त्यांनी संसदेमध्ये तो विषय मांडलेला आहे. हा विषय प्रतिक्षेत आहे. आता माननीय मंत्री श्री. अब्दुल सत्तार येथे उपस्थित नाहीत. त्यांचे म्हणणे असे होते की, फक्त माझ्या मतदार संघातील प्रस्ताव द्या, मी तो मंजूर करुन आणतो. पण हा विषय अतिशय गंभीर आहे. केंद्र सरकारकडे आमचा

ता.प्र.क्र.४२१०१...

ॲड यशोमती ठाकूर...

पाठपुरावा सातत्याने सुरू आहे. केंद्र सरकारने ते मंजूर केले तरच आपण त्या अंगणवाड्या सुरू करु शकू.

श्रीमती प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, राज्यातील मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे. केंद्र शासन मान्यता देत नाही. मी आदरणीय अर्थमंत्र्यांना विनंती करते की, आपण सर्वांनी जाऊन केंद्र शासनाकडे या विषयाबाबत रेटा धरुन राज्यासाठी अंगणवाड्या मंजूर करुन आणाव्यात.

ॲड यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, माननीय वित्तमंत्री महोदय येथेच आहेत. आम्ही त्याबाबतची चर्चा त्यांच्यासमवेत करु. आमच्या विभागाचे सचिव आणि मी देखील तेथील सन्माननीय महिला व बालकल्याण मंत्री महोदयांना भेटून आली आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता. प्र. क्र. ४२१०१....

ॲड. यशोमती ठाकूर....

त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला तरच आपण अंगणवाडी देऊ शकू. कारण अंगणवाडी देण्याचे प्रयोजन केंद्र शासनाचे आहे. त्यामुळे राज्य शासन हा निर्णय घेऊ शकत नाही. परंतु सरकारकडून जो पाठपुरावा करायचा आहे तो यापूर्वी झालेला आहे आणि यानंतरही होईल.

श्रीमती नमिता मुंदडा : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, बऱ्याच ठिकाणी अंगणवाड्यांचे बांधकाम झालेले नसल्यामुळे अंगणवाडीची इमारत नाही. पण बीड जिल्ह्यामधील परिस्थिती खूप वाईट आहे. मी काल याची आकडेवारी काढलेली आहे. पूर्ण जिल्ह्यामध्ये ३००० अंगणवाड्या आहेत त्यापैकी १५०० म्हणजे ५० टक्के अंगणवाडयांना इमारती नाहीत. ही बाब गांभीर्याची आहे. माझ्या मतदारसंघात सुद्धा १०० ते १५० पेक्षा जास्त अंगणवाड्यांना इमारती नाहीत. तसेच त्या ठिकाणी हायजिनचा मोठा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांना माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, बीड जिल्ह्यातील अंगणवाडयांसाठी आपण बजेटमध्ये वेगळे काही ॲलोकेशन करणार आहात काय ? तसेच याचे नियोजन कधीपर्यंत आणि काय होईल ? हे माननीय मंत्र्यांनी सांगावे.

ॲड. यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छिते की, आपण कोणत्याही एका जिल्ह्यासाठी विशेष असे ॲलोकेशन करीत नाही. पूर्ण सभागृहाला मी पुन्हा एकदा विनंती करते की, डीपीडीसीच्या माध्यमातून महिला व बालविकास विभागासाठी ३ टक्के निधी वितरीत केलेला आहे. त्यामध्ये अंगणवाड्या मागण्यासाठी आपण पर्याय ठेवलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जर आग्रहास्तव व्यवस्थित मागणी केली तर या वर्षामध्ये आणि पुढच्या वर्षामध्ये अर्धवट राहिलेल्या सर्व अंगणवाडया पूर्ण करु शकतो.

ता. प्र. क्र. ४२१०१....

श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले मागच्या १० वर्षापासून शाळेच्या वर्गखोलीमध्ये मुले बसत आहेत. परंतु प्रत्यक्षात माझा मुद्दा असा आहे की, तिथे शाळेची वर्गखोलीच नाही. लहान मुले तिथे वरांडयात बसतात आणि पावसाळ्यात तर मुले शाळेत येतच नाहीत. पोषण आहाराच्या वाटपापुरतेच त्या लहान मुलांना वरांडयात बसवले जाते. दुसरे आपण म्हणता की, अतिक्रमण असल्यामुळे उशीर झाला आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, अतिक्रमण असते तर सन २०१३ मध्ये जोताकाम पूर्ण झाले नसते म्हणून जोताकाम पूर्ण झाल्यानंतर अतिक्रमणाचा प्रश्न येत नाही. अतिक्रमणाची जबाबदारी देखील आपलीच आहे. १० वर्षापासून इमारत अर्धवट ठेवणे हे पुरोगामी महाराष्ट्र राज्याला शोभत नाही.

ॲड. यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य जे म्हणाले ते खरे आहे, असे मी यापूर्वी सुद्धा म्हटले आहे. पूर्ण जोता झालेला आहे. त्याच्यानंतर तिथे अतिक्रमणाचा विषय होता. २ वर्षापर्यंत तो निधी पूर्णपणे खर्च झालेला नाही. कारण तो निधी आपण २ वर्षापर्यंत खर्च करु शकतो त्यानंतर त्यासाठी परवानगी लागते. सन २०११ पासून सन २०२२ पर्यंत एखादी बाब पूर्ण होत नाही यासाठी कोणी अधिकारी किंवा इतर कोणी जबाबदार असतील त्यांची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. मला वाटते की, एवढ्या वर्षांचा कालावधी निघून गेलेला आहे तर आता मागची कुरघोडी काढण्यापेक्षा आपल्याला ती अंगणवाडी पूर्ण करायची असेल तर फक्त बोदाड येथील नाहीतर आपण प्रत्येक अंगणवाडीचे व्यवस्थित त्याचे नियोजन करु शकतो. त्यासाठी निधी उपलब्ध करुन देत आहोत. मागच्या काळात जे झाले ते चुकीचे झाले, ते कोणी केले आणि काय केले त्या अधिकाऱ्यांवर काय चौकशी किंवा कारवाई करायची ती आपण नक्की करु. परंतु आपल्याला ती अंगणवाडी पूर्ण करायची आहे त्या लेकरांना बसण्यासाठी शाळेत जागा दिली पाहिजे. या एक वर्षात फास्टट्रॅकचा कार्यक्रम राबविण्यासाठी घोषणा मी सभागृहात करीत आहे. जेवढया जास्त अंगणवाडया पूर्ण करता येतील त्या केल्या जातील.

असुधारित प्रत

रस्त्यावर राहणाऱ्या अनाथ, बेघर मुलांच्या पुनर्वसनाबाबत

(४) * ४२२२१ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागामार्फत रस्त्यावर राहणारे अनाथ, बेघर तसेच दिवसभर रस्त्यावर राहून रात्री जवळच्या झोपटपट्टीतील कुटुंबासमवेत राहणाऱ्या बालकांचे सर्वेक्षण करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांद्वारे मुलांचे पुनर्वसन करण्यासाठी राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्त्यावर राहणाऱ्या मुलांच्या पालनपोषणाकडे दुर्लक्ष होत असल्याने ही मुले बालमजुरी किंवा बाल गुन्हेगारीकडे वळू नयेत याकरिता त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील तरतुदींनुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाद्वारे तयार केलेल्या, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांचा बचाव व पुनर्वसनासाठीच्या मानक कार्यप्रणालीची (SOP) अमलबजावणी करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविले आहे. या अनुषंगाने जिल्ह्यांमध्ये रस्त्यावर राहणाऱ्या बालकांचा सर्वे सुरु आहे. सर्वे करताना आढळून आलेल्या बालकांची चौकशी करून त्यांना सर्वप्रथम त्यांचे पालक किंवा नातेवाईकांकडे पुनर्स्थापित करण्यात येते. तसेच बालकांना बालसंगोपन योजनेचा लाभ देण्यात येत आहे. बालकांच्या आई-वडील किंवा इतर नातेवाईकांचा शोध न लागल्यास अशा बालकांना बाल कल्याण समितीच्या समोर आणून आवश्यकतेनुसार बालगृहात दाखल करण्यात येत आहे. राज्यात ३२६ इतकी बालगृहे आहेत. तसेच महानगर पालिका क्षेत्रात बालकांसाठी ४३ खुली निवारागृहे

ता.प्र.क्र. ४२२२१....

ॲड. यशोमती ठाकूर.....

आहेत, त्या ठिकाणी या बालकांची व्यवस्था करण्यात येत आहे. सदर समस्या शहरी भागामध्ये जास्त असल्याने आयुक्त, महिला व बालविकास यांच्या दिनांक ११/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सर्व जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील शहरे निवडून तेथील हॉट-स्पॉट घोषित करण्याच्या व हॉट-स्पॉट घोषित केलेल्या ठिकाणी तातडीने रेस्क्यू ऑपरेशन राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच केवळ शासकीय योजनेचा लाभ नव्हे तर CSR व देणगी मधून देखील लाभ मिळवणेसाठी व जिल्हास्तरीय निधीमधून मदत करणेबाबत निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४२२२१.....

श्री रईस शेख : अध्यक्ष महोदय, महिला व बालविकास विभाग के माध्यम से राज्य भर में बहुत योजनाएं बनायी जा रही है. मेरा प्रश्न ऐसा है कि Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015 और सुप्रीम कोर्ट की गाईडलाईन के हिसाब से शासन की जिम्मेदारी यह है कि राज्य भर में जो अनाथ और बेघर बच्चे है, ऐसे जो बच्चे दिन भर परिसर में घूमते है और रात को झोपड़पट्टी में रहते है, उनका सर्व्हे किजिए. सरकार ने जवाब में कहा है कि हमने सर्व्हे किया है. ऐसी जितनी भी योजनाएं होती है जिसको सोशल डेव्हलपमेंट कहते है, उसे आप कलेक्टर के पास दे देते है और अपना एसओपी बनाते है. कलेक्टर के पास इम्प्लीमेंटेशन एजेन्सी कोई नहीं है. आपने सर्व्हे के लिए कहा है, तो सर्व्हे कब शुरु हुआ, कौनसी एजेन्सी ने किया, सर्व्हे कब खत्म होगा और क्या इसका कोई इनिशियल डेटा राज्य में पब्लिश हुआ है? मेरा दूसरा प्रश्न ऐसा है कि कलेक्टर इम्प्लीमेंटेशन एजेन्सी है और यंत्रणा नहीं है, तो क्या लोकल बॉडी को आप जबाबदारी देंगे और जबाबदार मानेंगे ? इसमें आपने कहा है कि हॉट स्पॉट्स डिटेक्ट करना है. तो क्या आपने हॉट स्पॉट्स डिटेक्ट किए है और वे पब्लिश हुए है? चाईल्ड राईट्स प्रोटेक्शन कमिटी बनी हुई है. आपने इसमें बहुत काम किया है. मेरा प्रश्न यह है कि इसको सुधारने लिए आपने क्या कदम उठाया है ?

ॲड. यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न विचारलेला आहे तो अतिशय संवेदनशील आहे. या बाबत जे काम केलेले आहे ते मी या ठिकाणी सांगते. एनसीपीसीआर अंतर्गत नोव्हेंबर २०२१ पासून सर्व्हे सुरु झाला. जसजशी मुले येतात तसतसा सर्व्हे केला जातो. या सर्व्हेमध्ये जवळपास ५,१५३ बालके कुटुंबासोबत रस्त्यावर राहतात असे दिसून आले. आपण या बालकांना दूर करु शकत नाही कारण त्यांचे पालक मजूर असतात. या मुलांना डे केअर सेंटरमध्ये नेऊन त्यांची व्यवस्था केली जाते. सर्वेक्षणा नुसार दिवसा रस्त्यावर

ता.प्र.क्र. ४२२२१.....

ॲड. यशोमती ठाकूर.....

राहून रात्री झोपडपट्टयांमध्ये राहणारी मुले१,२६६ आहेत. पालक नसलेले किंवा कोणाचा आधार नसलेले जवळपास ३९ मुले आढळून आली आहेत. ही ३९ मुले सीडब्ल्यूसीच्या समोर घेऊन जातो. सीडब्ल्यूसीच्या निर्णयानुसार, या मुलांना चाईल्ड केअर सेंटरमध्ये ठेवले जाते. या ठिकाणी हॉटस्पॉट बाबत विचारले. राज्यात १९५ हॉटस्पॉट निश्चित करण्यात आलेले आहेत. यावर सातत्याने गृह विभागाच्या मदतीने देखरेख केली जाते. सापडलेल्या मुलांना अंगणवाडी, डे केअर सेंटर किंवा शाळेमध्ये पाठवले जाते. त्यांची जी व्यवस्था करायची असते ती सातत्याने केली जाते.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो. कारण त्या अतिशय संवेदनशीलपणे काम करीत आहेत. या विषयामध्ये जेव्हा केव्हा त्यांच्याशी चर्चा झाली आहे तेव्हा त्यांनी अतिशय सखोलपणे या गंभीर विषयाकडे पाहिले आहे. आमची आपल्याकडून जास्त अपेक्षा आहे. नोव्हेंबर २०२१ पासून सर्व्हे केला आहे. यामध्ये जवळजवळ ५,१५३ बालके परिवारासह सापडली आहेत. ही संपूर्ण राज्यातील संख्या असेल असे मला वाटते. मुंबईमध्ये प्रत्येक सिग्नलला बालके असतात. काही विशिष्ट सिग्नलला तर खूपच बालके परिवारासह असतात. ते काही ना काही रोजगार करतात, गोष्टी विकतात,गाड्या साफ करतात. या माध्यमातून स्वत:चा रोजगार करतात. ५,१५३ हा खरे तर कमी आकडा आहे. या बाबत अजून नीट सर्व्हे केला पाहिजे. ठाण्यामध्ये सिग्नलची शाळा ही सिग्नलवरच एका कंटेनरमध्ये सुरु आहे . या भागातील मुलांकरिता एनजीओ यांना बरोबर घेऊन सिग्नलच्या कंटेनरमध्ये अंघोळ घालणे, जेवायला देणे, प्राथमिक शाळा घेणे इ. गोष्टी केल्या जातात. अशी सिग्नलवरील शाळा मुंबई महापालिकेच्या मदतीने मुंबईत आवश्यक त्या ठिकाणी सुरु करण्याचा प्रयत्न करणार काय ?

यानंतर श्रीमती गिरप...

ता.प्र.क्र. ४२२२१ ...

ॲड.आशिष शेलार …

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, ३२६ बालगृहे आहेत आणि महानगरपालिका क्षेत्रात ४३ खुली निवारागृहे आहेत. तेथे आपण मुलांना पाठवता. राज्यभर किंवा महापालिका क्षेत्रातील ही दोन स्थाने त्यांच्याकरिता 'अनाथांचा नाथ' अशी घरे आहेत. त्याचे बजेट काय आहे?

ॲड.यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सिग्नलवरच्या शाळांना आपण डे केअर सेंटर म्हणतो. शासन स्थानिक एनजीओंच्या मदतीने तसेच महानगरपालिका किंवा नगरपालिका यांच्या मदतीने या शाळा चालवते. बजेटिंगचा जो विषय आहे त्यामध्ये आपल्याला काही मदत ही सीएसआर ॲक्टिव्हीटीज मधून होत असते. काही मदत महानगरपालिकेकडून होत असते. पुणे येथे WCD आहे. तेथे देखील त्या एनजीओंना आपण मदत करीत असतो. पूर्ण आकडा आता माझ्याकडे नाही.... (अडथळा)... ११.४३ कोटी रुपये... अर्थ मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. पुढच्या अर्थसंकल्पामध्ये आम्ही याची मागणी करु. आपल्या माहितीसाठी सांगते की, या अर्थसंकल्पामध्ये भरपूर योजना व खूप मोठ्या गोष्टी झालेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मी ज्यावेळेस मी महिला व बालकल्याण मंत्री म्हणून या खात्याचा पदभार सांभाळला, त्यावेळेस बालसंगोपनासाठी फक्त ४२५ रुपये दिले जात होते. ते आता आपण ११२५ रुपये केले आहेत. अर्थ मंत्री महोदयांनी सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प मांडताना एक घोषणा केली. त्यानुसार जे ४२५ रुपये दिले जात होते ते आता २५०० रुपये केलेले आहेत.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, सम्माननीय मंत्री महोदया इस विभाग में बहुत अच्छा काम कर रही है. विशेषकर मेरे मतदार क्षेत्र में जो चिल्ड्रेन होम है उसके लिए उन्होंने अच्छी योजनाएं अमल में लायी है. मेरा स्पेसिफिक प्रश्न रास्ते पर रहने वाले और जो बेघर बच्चे है, उसके संबंध में है. जो रेड लाईट एरिया के बच्चे है उनके

ता.प्र.क्र. ४२२२१ ...

श्री अमिन पटेल...

लिए आपका स्पेसिफिक कार्यक्रम क्या है ? उनको वहां से निकालकर, उनको अच्छी जिंदगी और शिक्षा देने के लिए महिला और बालविकास विभाग क्या काम कर रहा है?

ॲड.यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी अतिशय गांभीर्याने प्रश्न विचारलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छिते की, रेडलाईट एरियातील मुलांकरिता देखील महिला व बालकल्याण विभाग त्या ठिकाणी डे केअर सेंटर राबवते. तसेच, त्या ठिकाणी शाळा देखील आहेत. काही अंगणवाड्या आहेत. तेथे शासन विशेष लक्ष देत असते. सन्माननीय सदस्यांच्या अजून काही सजेशन असतील किंवा काही करायचे असेल तर आपण एक बैठक घेऊन तो विषय नक्कीच निकाली काढू.

श्री रईस शेख : अध्यक्ष महोदय, सम्माननीय मंत्री महोदया ने बहुत ही अच्छा जवाब दिया है और काम भी कर रही है. मेरा प्रश्न ऐसा है कि जिस तरह से आपने डीपीडीसी में ३ प्रतिशत निधी आईसीडीएस के लिए रिजर्व किया है, सम्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार जी ने आपको थाने का उदाहरण दिया कि "डे केअर सेंटर" सिग्नल पर चल रहा है. ये पायलट प्रोजेक्ट है और थाना नगर निगम ये अपनी मर्जी से कर रहा है, कोई बंधनकारक नहीं है. मेरा आपसे यह कहना है कि कलेक्टर के पास इम्प्लीमेंटींग एजेन्सी नहीं है. क्या आप लोकल बॉडी को डीपीडीसी के स्तर पर ३ या ५ प्रतिशत निधी इस पर इस्तेमाल करने के लिए कहेंगे? क्या आप लोकल बॉडी को सर्व्हे, अमल और अकाऊंटीब्लिटी के लिए जिम्मेदार ठहराएंगे? मतलब उसके लिए शासन क्या करेगा ?

ॲड.यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्थानिक स्तरावर मुलांची काळजी घेण्याकरिता काय केले जात आहे, असा प्रश्न विचारलेला आहे. ग्रामीण भागामध्ये VCPC आहेत म्हणजे व्हिलेज चाईल्ड प्रोटेक्शन

ता.प्र.क्र. ४२२२१ ...

ॲड.यशोमती ठाकूर ...

कमिटीज आहेत. त्यांचे बळकटीकरण करण्याची आवश्यकता आहे. व्हिलेज चाईल्ड प्रोटेक्शन कमिटीज आहेत तशा UCPC देखील आपल्याला स्थापन करता येतील काय, या अनुषंगाने आम्ही काम करीत आहोत. आतापर्यंत तर UCPC नाहीत.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४२२२१...

ॲड.यशोमती ठाकूर...

तेथे डीसीपी युज जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आहेत. व्हीसीपीसी आणि युसीपीसी स्थापन करुन दोन्ही संस्था आणखी मजबूत केल्या तर उक्त बालकांसाठी भरपूर मदत करता येऊ शकेल. आपण या प्रयोजनासाठी ३ टक्के निधी डीपीडीसीमधून घेतला त्याप्रमाणे महानगरपालिकेने ५ टक्के निधी उपलब्ध करुन देणे बंधनकारक केले आहे. सन्माननीय सदस्य यांना अशी बाब आढळून आली तर त्यासाठी महानगरपालिकेचा निधी वितरीत करता येऊ शकेल व त्या मुलांची काळजी घेता येईल.

श्री.समाधान औताडे : अध्यक्ष महोदय, अनाथ बालगृहांचा विषय अतिशय संवेदनशील आहे. अनाथ बालगृहामध्ये १८ वर्षापर्यंतच्या बालकांना सांभाळण्यात येते. आपली मुले १० वी पास झाल्यानंतर ११ वीमध्ये प्रवेश घेतांना कोणता अभ्यासक्रम व विषय निवडावे असा प्रश्न आपल्याला पडतो. १८ वर्षावरील अनाथ बालकांना सांभाळण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

ॲड.यशोमती ठाकूर : अध्यक्ष महोदय, राज्यात After Care Center असून त्यांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे, हे मला मान्य आहे. त्याबाबत पुढील कालावधीत विचार करण्यात येईल. कोविड कालावधीत १८ ते २१ व २१ ते २४ वर्षापर्यंतच्या त्या मुलांना बालगृहामध्ये ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अशा पद्धतीचा निर्णय घेणारे आपले राज्य देशातील पहिले राज्य आहे. आपल्या निर्णयानंतर इतर काही राज्यांनी असा निर्णय घेतला आहे. कोविड काळात २३-२४ वयापर्यंतच्या त्या मुलांना बालगृहामध्ये ठेवण्यात आले आहे. तसेच कौशल्य विकास मंत्रालयासोबत समन्वय साधून कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने कोविड कालावधीपासून यासर्व बाबी सुरु आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करणेबाबत

(५) * ४२६३६ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना या महामारी काळात कोविड योद्धा म्हणून आरोग्य कर्मचारी अत्यंत कमी वेतनावर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालय व महिला व बाल रुग्णालय येथे कोविड-१९ साठी काम करणाऱ्या कर्मच्याऱ्यांचे माहे जुलै, २०२१ ते डिसेंबर, २०२१ चे वेतन अजून पर्यंत अदा करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेतन मिळावे याकरिता हे कर्मचारी शासन स्तरावर वारंवार पाठपुरावा करीत असूनही त्याना अजूनपर्यंत वेतन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कर्मचाऱ्यांचे जुलै, २०२१ ते डिसेंबर, २०२१ चे थकीत वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे : (१) हे खरे नाही,

गडचिरोली जिल्हयात कोरोना महामारीच्या काळात आरोग्य सेवा प्रभावीपणे पुरविण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार पदनिहाय मंजूर असलेले मानधन आरोग्य कर्मचाऱ्यांना देण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही,

माहे जुलै २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीतील वेतनासाठी अनुदान उपलब्ध नसल्यामुळे वेतन विहित कालावधीत अदा करण्यात आलेले नव्हते. तथापि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी निधी उपलब्ध झाल्यानंतर तातडीने माहे जुलै, २०२१ ते डिसेंबर, २०२१ या कालावधीतील कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही,

(४) माहे जुलै, २०२१ ते डिसेंबर, २०२१ या कालावधीतील कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत कोणत्याही कर्मचाऱ्याचे मानधन थकीत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.
ता.प्र.क्र.४२६३६...

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, तारांकित प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी योग्य दिले आहे. उक्त प्रश्न सादर केल्यानंतर दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी थकीत वेतन अदा केले आहे, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्य विभागातील बरीच पदे रिक्त असून काही पदांना मान्यता घ्यावयाची आहे. बोरी, ता.चामोर्शी जि.गडचिरोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे संपूर्ण लोकार्पण करण्यात आले आहे. परंतु त्यामधील सर्व पदे अद्याप रिक्त आहेत. उक्त पदांना तत्काळ मान्यता देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली येथील १०० खाटांच्या महिला रुग्णालयाची सर्व निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश देणे बाकी आहे, तो केव्हा देण्यात येईल ? मंत्री महोदयांचे गडचिरोली जिल्ह्यावर विशेष प्रेम असल्याने कुणगाडा, ता.चामोर्शी जि.गडचिरोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत तयार झाली असून तिच्या लोकार्पणासाठी ते येतील काय ?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.देवराव होळी यांनी ३ प्रश्न विचारले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न रिक्त पदांच्या संदर्भातील आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील पदे ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून भरण्यात येतात. ग्रामीण रुग्णालय व सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गतची पदे आरोग्य विभागाच्या माध्यमातून भरण्यात येतील. वर्ग ३ व वर्ग ४ ची पदे लवकर भरण्यासंदर्भातील कार्यवाही केली जाईल.

(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

यानंतर श्री.तेलंग...

ता.प्र.क्र.४२६३६ .....

श्री.राजेश टोपे.....

मला अभिमानाने सांगावसे वाटते की, महाविकास आघाडी सरकारने या राज्यातील १८०० डॉक्टरांची पदे भरलेली आहेत. नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांची पदे मंजूर करण्याचा अधिकार माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चाधिकार समितीला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रांना मान्यता दिलेली आहे परंतु त्या केंद्रातील आवश्यक पदांना मान्यता दिलेली नाही. त्यामुळे सदर पदांच्या मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात येईल व सदर पदांना लवकरच मान्यता दिली जाईल. तसेच कार्यारंभ आदेश आणि लोकार्पण यासंदर्भात देखील लवकरात लवकर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

श्री.राम सातपुते : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील ४ प्राथमिक आरोग्य केंद्र व ११ उपकेंद्रांना मंजुरी देण्याबाबतचे प्रस्ताव सन २०१९ मध्ये आरोग्य विभागाकडे सादर केलेले आहेत. परंतु अद्याप त्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली नाही. सदर प्रस्तावास किती दिवसांमध्ये मंजुरी देणार आहात, याबाबतची माहिती देण्यात यावी.

श्री राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र मंजूर करण्यासाठी शासनाचे काही निकष आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यानी सादर केले ४ प्राथमिक आरोग्य केंद्र व ११ उप केंद्राचे प्रस्ताव शासनाच्या उक्त निकषांमध्ये बसत असतील तर त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. निकषांमध्ये बसत असलेले प्रस्ताव नाकारण्याचे कोणतेही कारण नाही.

श्री.कृष्णा गजबे : अध्यक्ष महोदय, कोरोनाच्या काळामध्ये अनेक लोकांनी कोरोना केअर सेंटरमध्ये अतिशय चांगले काम केले आहे. परंतु अद्यापपर्यंत त्यांचे पेमेंट झालेले नाही. त्यामुळे त्यांचे पेमेंट सरकार केव्हा देणार आहे?

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्ह्यातील कुडाळा येथील उप केंद्राला प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा देण्यात आलेला आहे.

ता.प्र.क्र.४२६३६ .....

श्री.कृष्णा गजबे.....

आताच मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्रातील पदे ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून भरण्यात येत आहेत. परंतु सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उद्याप पदभरती करण्यात आलेली नाही. तसेच आरमोरी तालुक्यातील मौजे देऊळगाव येथील आरोग्य केंद्रास प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव सर्व निकषांचे पालनकरुन तो आरोग्य विभागाकडे सादर केलेला आहे. त्यामुळे उक्त प्रस्ताव केव्हा मंजूर करणार आहात?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, कोरोना केअर सेंटरमध्ये काम केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे माहे डिसेंबरपर्यंतचे सर्व पेमेंट देण्यात आलेले आहेत. जानेवारी, फेब्रुवार आणि मार्च या महिन्यांचे पेमेंट करण्यासाठी १ कोटी ५९ लाख रुपये एसडीआरएफच्या माध्यमातून देण्याची व्यवस्था करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदर पमेंट लवकरात लवकर देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदभरती ग्रामविकास विभागामार्फत केली जाते. त्या अनुषंगाने माननीय ग्रामविकास मंत्री आवश्यक कार्यवाही करीत आहेत. सदर पदांची भरती लवकरच होईल, असे मी विश्वासाने सांगू इच्छितो. तसेच देऊळगाव येथील आरोग्य केंद्रास प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव मागवून घेण्यात येईल व सदर प्रस्ताव शासनाच्या निकषांनुसार असेल तर त्यास मान्यता देण्यात येईल.

श्रीमती देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय ऑन ड्युटी कोविड योद्धाचा मृत्यू झाल्यानंतर शासनाने त्यांच्या कुटुंबियांसाठी मदत जाहीर केलेली आहे. त्यामुळे आतापर्यंत शासनाने किती कोविड योद्धांच्या कुटुंबियांना मदत केलेली आहे व किती योद्धांना मदत करणे बाकी आहे, याबाबतची सर्व माहिती पटलावर ठेवणार आहात काय?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, होय.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

ता.प्र.क्र.४२६३६.....

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, कोरोना काळात कंत्राटी पद्धतीवर ज्यांनी काम केले होते, त्यांना नंतर कामावरुन काढून टाकण्यात आले होते. आता नव्याने कंत्राटी पद्धतीने कर्मचारी कामावर घेतले जात आहे. ज्यांनी कोरोना काळात काम केले आहे, त्यांना प्राधान्याने घेण्यात येणार आहे काय ? याबाबतच्या सूचना मंत्री महोदय देणार आहेत काय ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सेवा प्रवेश नियमानुसार काम करावे लागते. त्यामुळे कोरोना काळात काम केलेले कर्मचारी हे कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेले असतात. त्यांना थेट कायमस्वरुपी नियुक्ती देता येणे शक्य नसते. गरजेनुसार त्यांना कायम केले जाईल.

उपाध्यक्ष : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत

माहितीच्या मुद्याबाबत

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनवर बोलू इच्छितो. राज्यात अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. मागील तीन ते चार दिवसांच्या हवामान विभागाच्या अंदाजानुसार वातावरणातील उष्णता वाढणार आहे. आज मुंबई शहरामध्ये ३० अंश से. आणि नागपूर शहरामध्ये जवळपास ४२ अंश से. तापमान आहे. येणाऱ्या तीन दिवसांमध्ये तापमानात मोठी वाढ होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मी यानिमित्ताने एक विनंती करणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज राज्यातील जनता पाहत आहे. ज्यावेळेस अशा प्रकारे तापमान वाढून उष्णता वाढते, तेव्हा उष्माघाताचे अधिक बळी जाण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने आरोग्य विभागाने कोणती उपाययोजना केली आहे ? लोकांमध्ये जनजागृतीकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत ? तसेच यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे, याचे निवदेन माननीय आरोग्य मंत्र्यांनी करावे, अशी मी विनंती करतो. जेणेकरुन राज्यातील जनतेला हे सरकार या विषयाबाबत दक्ष आहे, हे समजेल.

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांनी अतिशय महत्त्वाचा आणि समयोचित प्रश्न उपस्थित केला आहे. दिनांक १ मार्च, २०२२ पासून आरोग्य विभागाने उष्माघाताबाबत मॉनिटरींग आणि रिपोर्टिंग करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. त्याचप्रमाणे जिल्हा रुग्णालयात याकरिता विशेष खाटा उपलब्ध केल्या आहेत. 'मॅनेजमेंट ऑफ हिट स्ट्रोक' कसे करावे, याची कार्यवाही केली जात आहे. त्याचप्रमाणे IEC इन्फॉर्मेशन, एज्युकेशन आणि कम्युनिकेशनबाबत जनजागृती करण्याची कार्यवाही केली जाते. जसे की आऊटडोअर ॲक्टीव्हिटी कमी केल्या पाहिजेत, अधिक प्रमाणात पाणी पिले पाहिजे, चहा, कॉफी पिण्याचे प्रमाण कमी केले पाहिजे आणि पांढरे कपडे घालून डोके झाकले पाहिजे, अशा सूचना देण्यात येत आहेत. याबाबतचे सविस्तर निवेदनदेखील करण्यात येईल.

पृ.शी. : लेखी उत्तरे
मु.शी. : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

ॲड. यशोमती ठाकूर (महिला व बाल विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबईतील डोंगरी येथील बाल सुधार गृहाच्या दुरावस्थेबाबत" या विषयावरील सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांच्या दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ५३१४ ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवते.

उपाध्यक्ष : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस :** येथे अधिकची माहिती छापावी.)

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, या विषयाबाबत आपण निर्देश देण्याची आवश्यकता आहे. तारांकित प्रश्न क्रमांक ५३१४, दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीची माहिती आता देण्यात येत आहे. आता राज्य सरकारच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे पगार १ लाख कोटी रुपयांवरुन २ लाख कोटी पर्यंत होत आहोत. या विधानसभेचे काही पावित्र्य आहे किंवा नाही ? सन २०१५ मध्ये या प्रश्नाचे अनुपूरक उत्तर द्यावे, असे आपण ठरविले आहे. परंतु ते उत्तर सन २०२२ मध्ये मिळत आहे. मी विनंती करतो की, अनुपूरक उत्तरे, माहिती एक महिन्याच्या आत किंवा जास्तीतजास्त दुसऱ्या अधिवेशनापर्यंत देण्यात यावी, असे निर्देश आपण द्यावेत. अन्यथा २ लाख कोटी रुपये वेतनावर खर्च करुनही सात वर्षाचा कालावधी उत्तर देण्यासाठी लागत आहे. अशीच कामे होत असतील तर 'सरकारी काम आणि दहा वर्षे थांब' असा नवीन मंत्र तयार होईल. त्यामुळे मी विनंती करतो की, याबाबत आपण निर्देश द्यावेत.

उपाध्यक्ष : लवकरात लवकर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.नितीन राऊत (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपाध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधीमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

ॲड.अनिल परब (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपाध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधीमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

ॲड.अनिल परब (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

(क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा त्रेसष्टावा वार्षिक अहवाल.

(ख) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल.

(ग) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० चे वार्षिक अहवाल.

उपाध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. सदरहू अहवाल विधीमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी. : विधानसभा आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.कैलास गौरंटयाल (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा आश्वासन समितीचा दुसरा अहवाल सभागहाला सादर करतो.

उपाध्यक्ष : विधानसभा आश्वासन समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

असुधारित प्रत

पृ.शी.: नियम स्थगित ठेवणे.

मु.शी.: नियम स्थगित ठेवण्याबाबत उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा प्रस्ताव.

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"अर्थसंकल्पातील अनुदानासाठीच्या मागण्यांवर चर्चा व मतदानाच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २५१ (१) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत

<u>पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत</u>

श्री.संदीप कुणावार : अध्यक्ष महोदय, गेल्या अनेक वर्षांपासून मनोरा आमदार निवासाचे बांधकाम रखडलेले आहे. सुमारे १२०० किलोमीटर अंतरावरुन प्रवास करुन आम्ही मुंबईला येतो. आम्हाला येथे हॉटेलमध्ये राहणे परवडत नाही. तसेच आमच्या मतदारसंघातील रुग्ण, विद्यार्थी मुंबईला आल्यानंतर त्यांनी कुठे राहायचे हा देखील प्रश्न आहे. साडे तीन वर्षांपासून मनोरा आमदार निवासाचे बांधकाम सुरु होत नाही. अनेक आमदारांच्या यासंदर्भात व्यथा आहेत. कारण निवासासाठी कधी हॉटेल मिळते तर कधी मिळत नाही आणि त्यामुळे खूप त्रास होत आहे. आमची विनंती आहे की, किमान आमदारांना तरी तातडीने घर द्यावे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

उपाध्यक्ष : आता आपण चर्चेला सुरूवात करावी.

श्री. किशोर पाटील : अध्यक्ष महोदय, मी काल या सभागृहात माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी घेतलेल्या निर्णयाचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. परंतु काल एवढा मोठा चांगला निर्णय घेतल्यानंतरही संबंधित अधिकारी अजूनही शेतकऱ्यांची तोडणी केलेली वीज पुन्हा जोडणी करायला तयार नाहीत. त्यांच्याकडून असे सांगितले जाते की, आम्हाला अजून लेखी आदेश प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे मला मंत्री महोदयांना विनंती करायची आहे की, काल या सभागृहात झालेल्या निर्णयानंतरही पुन्हा त्या अधिकाऱ्यांना स्पेसिफिक ऑर्डर देण्याची गरज आहे काय आणि असेल तर आपण त्यांना तसे आदेश देणार आहात काय ?

श्री. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, या बाबीची नोंद घेतली आहे. तसे आदेश निर्गमित करण्यात येतील.

असुधारित प्रत

माहितीचा मुद्दा

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, डहाणू येथे महालक्ष्मीची यात्रा होत असते. त्या यात्रेवर तिकडच्या आदिवासी आणि १२ बलुतेदारांचे संपूर्ण वर्षाचे उत्पन्न अवलंबून आहे. तहसिलदारांनी वरिष्ठांकडे ही यात्रा सुरू करण्यासाठी पत्र पाठविले आहे. त्यामुळे आपण ही यात्रा सुरू करणार आहात काय ?

अध्यक्ष महोदय, दुसरे म्हणजे रामनवमीचे उत्सव प्रत्येक गावागावात होतात तर आपण त्या उत्सवाला परवानगी देणार आहात काय ?

असुधारित प्रत

माहितीचा मुद्दा

प्रा. देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय, मला या माहितीच्या मुद्याद्वारे सभागृहाचे व माननीय पर्यटन मंत्री यांचे लक्ष वेधायचे आहे.

अध्यक्ष महोदय, प्रादेशिक पर्यटन विकास योजना २०२१-२२ याची यादी काल माझ्यापर्यंत आली आहे. त्या विषयाबाबत या वर्षी माझ्या मतदार संघातील एक प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पीडब्ल्यूडीच्या माध्यमातून शासनाकडे पाठविण्यात आला आहे. यामध्ये अनेक कामांची यादी आहे. नाशिक जिल्ह्यातील जवळपास २३ गावे आहेत. पण या २३ गावांच्या प्रस्तावामध्ये पर्यटन विभागाकडून जो निधी मागण्यात आला आहे त्या यादीतील काही प्रस्तावांच्या नावासमोर शिवसेनेच्या उपमहानगर प्रमुखाचे नाव आहे तर काही ठिकाणी जिल्हा प्रमुखांचे नाव आहे आणि मी जो अभिनव भारत मंदिराचा प्रस्ताव दिला होता. आदरणीय स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १९६८ त्याची मागणी केली होती. या अभिनव भारत मंदिराची आता पडझड झाली असून ते नव्याने बांधण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी माजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. त्यासंबंधी माझा प्रस्ताव असताना माझ्याकडे उपलब्ध असलेल्या यादीमध्ये त्या कामाच्या नावासमोर तेथील खासदारांचे नाव आले आहे. म्हणून मला या सभागृहाचे लक्ष वेधायचे आहे की, माननीय आमदारांच्या हक्कांचे हनन करण्याचे काम या सभागृहात शासनाच्या माध्यमातून होत आहे काय? या विषयासंबंधी मला सरकारच्या वतीने स्पष्टीकरण हवे आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, आपल्या सर्वांना माहिती आहे की, शिमग्याचा सण खूप मोठा असतो आणि काल माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी...

श्री. आदित्य ठाकरे (पर्यटन मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता जे नमूद केले आहे त्यानुसार त्यांच्या विनंतीची आम्ही नक्कीच दखल घेऊ. ज्यांची ज्यांची पत्रे जसजशी येत असतात त्यानुसार आम्ही त्यावर कार्यवाही करीत असतो. प्रस्ताव येतात तसे आम्ही पुढे जात असतो. मला सन्माननीय सदस्य महोदया काल परवाच भेटल्या आहेत. मी त्यांना देखील आश्वासित केले आहे की, तेथे

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जे स्मारक आहे त्यासाठी त्यांच्या पत्रानुसार आम्ही निधी देऊ.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

माहितीच्या मुद्याबाबत

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, कोकणात शिमग्याचा सण खूप मोठा असतो. या सणासाठीच आपण उद्या सभागृहाला सुट्टी दिलेली आहे. आजची सर्व वर्तमानपत्रे किंवा इलेक्ट्रॉनिक मिडियावर आपण बघितले तर आपल्या लक्षात येईल आणि त्यासाठीच मला माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधायचे आहे की, कोकणात मुंबई-कोकण या एसटीच्या गाड्या ज्या प्रमाणात सुरु व्हायला पाहिजे. त्या काही कारणास्तव सुरु नसल्यामुळे आज खाजगी वाहतुकदार किंवा खाजगी बसवाले भाडयाच्या रुपाने प्रवाशांकडून किमान तीन ते चार पट पैसे उकळत आहेत. त्यामुळे माननीय परिवहन मंत्र्यांना माझी विनंती आहे की, कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात जाणाऱ्या या खाजगी बसेसच्या भाडे घेण्यावर आपण तात्काळ नियंत्रण आणणार काय किंवा आपण तसे नियंत्रण आणावे, अशी माझी विनंती आहे.

ॲड. अनिल परब : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी जी सूचना केलेली आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, अशाप्रकारे जर कोणी पैसे उकळत असतील तर त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करावी, अशा सूचना काल संध्याकाळीच परिवहन आयुक्तांना दिलेल्या आहेत. त्याचबरोबर मी एसटी विभागाला सुद्धा सूचना केलेल्या आहेत की, या ठिकाणी गाडया कमी पडत असतील तर बाजुच्या ज्या डिव्हिजनमध्ये कमी गाडया लागतात तेथील गाड्या होळीच्या सणासाठी रत्नागिरी जिल्ह्याला शिफ्ट कराव्यात.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आम्हाला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. सन्माननीय सदस्या प्रा. देवयानी फरांदे त्यांच्या अधिकाराच्या विषयावर बोलल्या आहेत.

उपाध्यक्ष : माननीय मंत्र्यांनी यावर उत्तर दिलेले आहे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आपण माझे म्हणणे ऐकून घ्या. कारण आपणच आम्हाला संरक्षण दिले पाहिजे आणि जर आपणच संरक्षण देणार नसाल तर आम्ही खाली बसू.

अध्यक्ष महोदय, मी स्वत:सुद्धा त्या ठिकाणी गेलो होतो. यापूर्वीच्या सरकारच्या काळात सुद्धा त्यांचा प्रस्ताव होता. त्यासाठी निधी येऊन कामाची सुरुवात सुद्धा झाली होती. परंतु आता अतिरिक्त निधी येत असताना त्याच सन्माननीय सदस्यांचा प्रस्ताव असताना दुसऱ्यांचे नाव आहे. राजकारणाचे मुद्दे बरेच आहे. केवळ एवढेच नाही तर माननीय मंत्र्यांनी याचे ही स्पष्टीकरण दिले पाहिजे की, नाशिक जिल्ह्यात किंवा काही ठिकाणी सन्माननीय सदस्य राष्ट्रवादी पक्ष किंवा कोणत्याही पक्षाचे असले तरी देखील युवा सेनेच्या अध्यक्षाला क्रेडिट दिले जात आहे. ही काय पद्धत आहे ? सन्माननीय सदस्यांच्या कामाला सुद्धा आपल्या पक्षाच्या अध्यक्षांच्या नावाने प्रस्ताव मान्यता देणार असाल ही कोणती पद्धत आहे. यासाठी आपणच संरक्षण दिले पाहिजे. सन्माननीय सदस्यांचा प्रस्ताव असताना माननीय खासदारांचे नाव, दुसऱ्या एखाद्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या सन्माननीय सदस्यांचा प्रस्ताव आणि युवा सेनेच्या अध्यक्षांचे नाव हे सर्व कुठेतरी थांबले पाहिजे. माननीय मंत्र्यांनी या बाबतीत मन मोठे करावे कारण आपण युवा सेनेचे अध्यक्ष असाल तर आपले स्वागतआहे. पण त्याला आपण अशा विषयामध्ये आणू नका. सदस्यांचा प्रस्ताव असताना दुसरे कोणाचे तरी नाव, एवढे खालच्या पातळीवरील राजकारण आपण करु नका. त्यामुळे आपल्या कडून आमची अपेक्षा आहे की, सन्माननीय सदस्यांच्या अधिकारांचे रक्षण झाले पाहिजे. माननीय मत्र्यांना आपण निर्देश दिली पाहिजे, असे माझे म्हणणे आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, हा राजकारणाचा मुद्दा नसून आपल्या प्रशासकीय व्यवस्थेचा हा महत्त्वपूर्ण मुद्दा आहे. आपण याला राजकारणाच्या चष्म्यातून बघू नका. माननीय मंत्र्यांच्या हातून चूक झाली असेल तर ती दुरुस्त करता येईल. चूक झाली याचा अर्थ मी काही त्यांच्यावर आरोप प्रत्यारोप करण्यासाठी उभा नाही. माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित पवार यांना तर आमच्यापेक्षा जास्त अनुभव आहे. शेवटी प्रशासकीय यंत्रणेमध्ये एखादा कागद लोकांपर्यत पोहोचला तेव्हा त्यावर विधानसभा, लोकसभा, विधानपरिषद किंवा राज्यसभा सदस्यांची नावे आपल्याला टाकता येतात. या घटनेतून आपण निर्देश दिले नाही किंवा सुधारणा केली नाही तरी काही बिघडणार नाही. कारण काही काळ आपण असे चालवाल परंतु नंतर हीच प्रथा, परंपरा पडेल. उद्या केंद्राकडून एखादा शासकीय आदेश करायचा असेल तर तिथे आमची नावे टाकली जातील. त्यामुळे ही पद्धत योग्य नाही. संसदेमध्ये सुद्धा कोणत्याही पक्षाचे माननीय खासदार असतील तरी त्या पक्षाच्या नावाने एखादा शासकीय कागद खरे म्हणजे, असा कोणाच्या नावाने काढता येत नाही. परंतु तो काढायचा असेल तर शासकीय लोकप्रतिनिधींच्या नावाने काढला जातो. त्याला जर बदलवायचे असेल तर काहीच बिघडणार नाही कारण काही काळ प्रत्येकाचेच चालते पण ही पद्धत,प्रथा अतिशय चुकीची होईल. त्यामुळे आपल्याला माझी विनंती की, त्यांनी सांगितले की त्यांचे काम द्यावे, मी करतो. तुम्ही ते काम मोठया मनाने कराल. परंतु ही पद्धत पुढे होणार नाही, एवढीच काळजी घ्यायची आहे. बाकी यावर काही आक्रोश असण्याचे कारण नाही.

श्री. आदित्य ठाकरे : अध्यक्ष महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. भास्कर जाधव)

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

सभागृहातील कामकाजाबाबत

तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) : आता आपण अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु करु. पॉईंट ऑफ इन्फर्मेशन हे कामकाजपत्रिकेवरील विशेष असे कामकाज नाही. सन्माननीय सदस्य श्री.मुफ्ती मोहम्मद इस्माईल हे बऱ्याच वेळेपासून उभे आहेत, त्यांना मी संधी देतो.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, दि. १४ व १५ मार्च हे दोन्ही दिवस मिळून ४ तास ५३ मिनिटे म्हणजे जवळपास ५ तास आता पर्यंत चर्चा झाली असून १३ सदस्यांची भाषणे झालेली आहेत. काल संध्याकाळी आपण निर्णय घेतला होता की, काल संध्याकाळी रात्री उशिरा जेवढे सदस्य सदनात होते त्यांनी भाषण करावे. माझी सदनाला विनंती आहे की, आपल्याला या नंतर पुरवणी मागण्यांवर विभागवार चर्चा घ्यायची आहे. ज्या सदस्यांना विभागावरील चर्चेवर बोलायचे असेल त्यांनी त्या बाबत चर्चा करावी. चर्चेकरिता जी वेळ ठरली होती, त्यापेक्षा बराच अधिक वेळ चर्चा झालेली आहे. आपण थोडेसे सहकार्य करावे. आता माननीय अर्थमंत्री यांचे उत्तर देखील आहे. सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे यांचे व आपले काल बोलणे झालेले आहे. जेवढया कमीत कमी वेळात चर्चा संपवता येईल तेवढया वेळात आपण ती संपवावी, अशी विनंती आहे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री यांचा प्रसताव असा आहे की, अर्थसंकल्पीय भाषणावर काल जेवढे सदस्य या ठिकाणी होते त्यांनी सहकार्य करावे. आम्ही सहकार्य करु, अडचण नाही. अधिकाधिक सदस्यांना पुरवणी मागण्यांवर बोलता येईल. आपण वेळापत्रक ठरवावे. मंत्री महोदयांचे उत्तर महत्त्वाचे आहे. या नंतर आपली चर्चा आहे. आता साडे बारा वाजले आहे. या नंतर अर्थसंकल्पावर चर्चा आहे. दीड तास दोन्ही बाजूच्या सदस्यांना जर वेळ दिला तर दीड ते दोन वाजता मंत्री महोदयांचे उत्तर होईल. साधारणपणे तासभर त्यांचे उत्तर होईल असे मी अपेक्षित धरतो. ३ वाजता मागण्यांवरील चर्चा करता येईल अशी वेळ ठरवून आपण पुढे जाऊ. माझी विनंती आहे. यामुळे सदस्यांना चर्चा करता येईल.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, आमची हरकत नाही. आता पर्यत जवळपास ५ तास चर्चा झाली. आता अडीच तास चर्चा होणार असेल तर एकूण वेळ साडे तास होईल. आता या चर्चेची वेळ दोन तास ठेवायची असेल तर एक तासाची वेळ सर्व सदस्यांना द्यावी व एक तासाची वेळ मला उत्तराच्या भाषणाकरिता द्यावी. तसेच जर अडीच तास वेळ असेल तर दीड तास सर्व सदस्यांना व एक तासाची वेळ माझ्यासाठी ठेवावी. माझी तयारी आहे. आज पुरवणी मागण्यांवर देखील चर्चा आहे. त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, अशी विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : चर्चेवरील वेळेचा मुद्दा कळीचा आहे. माननीय उप मुख्यमंत्री, अशा प्रकारे हा मुद्दा सुटत नाही. आपण २ दिवस साधारणपणे ३-३ तास चर्चा केली, त्यातून वेळेचा तिढा सुटला नाही. काल झालेल्या चर्चेनुसार शिवसेनेची २९ मि ५ सेकंद वेळ शिल्लक आहे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची २३ मि.१०सेकंद शिल्लक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे २८ मि. १० सेकंद शिल्लक आहेत. बीजेपीकडे एकही सेकंदाची वेळ शिल्लक नाही. अशा वेळी वेळेचे कसे वाटप करावे, हे माननीय नेते यांनी ठरवावे व त्या नुसार चार्ट तयार करावा.

ॲड अनिल परब : अध्यक्ष महोदय, आता माननीय उप मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे.

डॉ. संजय कुटे (बसून) : अध्यक्ष महोदय, ...

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे आपण एवढे तावातावाने बोलण्याची काही आवश्यकता नाही. माझ्यावर हेत्वारोप करायचा नाही. मी आपल्याला वॉर्निंग देत आहे, हे चालणार नाही. अजिबात चालणार नाही. मी आपल्याला शिस्तीत सांगत आहे. असे अजिबात चालणार नाही....आपणही बोलू नका. इतका हेत्वारोप करुन चालणार नाही. वेळेचे नियोजन करा. अडीच तास चर्चा करायची असेल ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात)

ॲड अनिल परब : अध्यक्ष महोदय, आता सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी विरोधी पक्षातर्फे सांगितले. माननीय उपमुख्यमंत्री यांनी देखील या बाबत सांगितले आहे. अडीच तासाची जर चर्चा घ्यायची असेल तर दीड तास सर्व पक्षाच्या सदस्यांनी घ्यावेत. एक तासाचे उत्तर माननीय वित्त मंत्री यांचे असेल. आपल्या पक्षातर्फे जो वेळ दिला होता तो संपला आहे तरी देखील जे सदस्य राहिले आहेत त्यांच्यापैकी कमीत कमी सदस्यांची नावे द्यावीत. जेणेकरुन हे सर्व वेळेत होईल.

असुधारित प्रत

माहितीचा मुद्दा

श्री मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है.

अध्यक्ष महोदय, मालेगाव महानगरपालिका के शिक्षण मंडल में बहुत ज्यादा गड़बड़ और घोटाला है. वहां पर एक नगरसेवक ने उपायुक्त को लेकर स्कूलों का दौरा शुरु किया, विजिट शुरु की. कुछ लोगों को टार्गेट करके, उन्होंने स्कूल में जाकर उनकी व्हिडियो शुटींग की, उनको हॅरेसमेंट किया. वहां पर हेडमास्टर को अटैक आया. अटैक आने पर जगह पर ही उसकी मृत्यु हो गई. मैं आपके माध्यम से सदन का ध्यान इस ओर दिलाना चाहता हूं कि इस तरह से महानगरपालिका के शिक्षण मंडल में कुछ नगरसेवक इस तरह की हरकत कर रहे है, उसकी जांच होनी चाहिए और छुट्टियों के दिनों में और अन्य दिनों में इस तरह की जो हरकते की जा रही है, उससे मुझे ऐसा लगता है कि ये वसूली का एक तरीका है. इस बारे में मैं आपके जरिये जांच करवाना चाहता हूं.

तालिका सभाध्यक्ष : ठीक है.

.....

तालिका सभाध्यक्ष : आता आपण सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात करु. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना निम्मा-निम्मा वेळ द्यायचा. सन्माननीय सदस्य श्री.जयकुमार गोरे आता आपण आपल्या भाषणास सुरुवात करावी. या चर्चेमध्ये बोलण्याकरिता शिवसेना पक्षाच्यावतीने सन्माननीय सदस्यांची नावे कळविण्यात आलेली नाहीत.

.....

पृ.शी. : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी. : सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.जयकुमार गोरे (माण): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर माझे मत मांडण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या २ दिवसांपासून या सभागृहामध्ये अर्थसंकल्पावर चर्चा होत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडलेली आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी देखील या अर्थसंकल्पावर आपले मत मांडलेले आहे. त्यावेळेस त्यांनी त्यांची भूमिका देखील आपल्या सर्वांसमोर मांडलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते जेव्हा अर्थसंकल्पावर बोलतात त्यावेळेस साधारणपणे माननीय अर्थ मंत्री महोदय हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणाला उत्तर देतात, अशी आजपर्यंत या सभागृहात माझ्या निदर्शनास आलेली गोष्ट आहे.

अध्यक्ष महोदय, काल या सभागृहामध्ये या अर्थसंकल्पावर चर्चा होत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी माननीय श्री.अजित पवार यांचे काम खूप कमी केले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या प्रत्येक मुद्दयाला त्यांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केला. वास्तविक पाहता सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावर आपले मत मांडण्याची आवश्यकता होती. कशा पध्दतीने अर्थसंकल्प चांगला आहे, माननीय श्री.अजित पवार यांनी या अर्थसंकल्पामध्ये काय नवीन तरतुदी केलेल्या आहेत, यावर बोलले पाहिजे होते. परंतु, त्यांनी अशा पध्दतीने उत्तर देण्याचा प्रयत्न केला की, जणू काही या सभागृहामध्ये माझ्याशिवाय कोणाला कळतच नाही. माननीय विरोधी पक्ष नेते सर्व गोष्टी चुकीच्या बोलत आहेत, अशा प्रकारची भूमिका मांडण्याचा प्रयत्न काही सन्माननीय सदस्यांनी केला.

श्री.जयकुमार गोरे ...

अध्यक्ष महोदय, ४ लाख ३ हजार कोटींचा महसुली जमेचा अर्थसंकल्प या सभागृहात मांडण्यात आला. जवळजवळ ४ लाख २७ हजार ४८० कोटीचा महसुली खर्चाचा अर्थसंकल्प असताना जवळजवळ २४ हजार, ३५३ कोटीचा तुटीचा अर्थसंकल्प या सभागृहात मांडला.

अध्यक्ष महोदय, सभागृहात अर्थसंकल्प मांडत असताना अर्थ मंत्री महोदयांनी विकासाची पंचसूत्री आपल्या सर्वांच्या समोर, या सभागृहाच्या समोर, या राज्याच्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला. ही विकासाची पंचसूत्री मांडत असताना कृषी असेल, आरोग्य असेल, उद्योग असेल, मनुष्यबळ असेल किंवा दळणवळण असेल या सर्व गोष्टींचा समावेश या पंचसूत्रीमध्ये त्यांनी केला.

अध्यक्ष महोदय, अर्थ मंत्री महोदयांनी जेव्हा ही पंचसूत्री सभागृहासमोर मांडण्याचा प्रयत्न केला तेव्हा केंद्र शासनाच्या सर्व योजना या पंचसूत्रीचा मुख्य पाया असल्याचे निदर्शनास आले. सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावर भाषणे केली. ही भाषणे करीत असताना केंद्र शासन या महाराष्ट्रासाठी काहीच करीत नाही, अशा पध्दतीची भूमिका या सभागृहामध्ये मांडण्याचा प्रयत्न झाला.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.जयकुमार गोरे...

अर्थसंकल्पातील विकासाच्या पंचसूत्रीचा मूळ पाया केंद्र शासनाच्या योजना असल्याचे दिसून आले आहे. केंद्र शासन या राज्यासाठी काही करीत नाही, असे सत्ताधारी सन्माननीय सदस्यांच्या भाषणातून सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील पंचसूत्रीचा पाया असलेल्या प्रधान मंत्री ग्रामीण आवास योजना, प्रधान मंत्री नागरी आवास योजना, प्रधान मंत्री सडक योजना या केंद्र शासनाच्या योजना आहेत. राष्ट्रीय ग्रामीण स्वास्थ्य मिशन योजनेवर आरोग्याचा सर्व भार असतो, ही योजना देखील केंद्र शासनाची आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्यात व मागील अधिवेशनात कोविड लसीकरणाच्या संदर्भात खूप चर्चा झाली. केंद्र शासन या राज्याला लस देत नाही, अशी चर्चा करण्यात आली होती. आता राज्याचे मंत्री महोदय सांगत आहेत की, कोविड लसीकरणामध्ये महाराष्ट्र राज्य देशात पहिल्या क्रमांकाचे आहे. या सरकारने स्वत:च्या खर्चातून केलेल्या लसीकरणाची आकडेवारी जाहीर करावी. माननीय प्रधान मंत्री यांनी कोविड लसीकरणाचा कार्यक्रम आखला त्यामाध्यमातून राज्यात १०० टक्के लसीकरण करण्यात आले आहे. केंद्र शासनाने राज्याला कोविड लसचा सर्व पुरवठा केला आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील पंचसूत्रीचा पाया असलेल्या महात्मा गांधी रोजगार योजना, प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना, बळीराजा जल संजीवनी योजना, अन्न सुरक्षा योजना या केंद्र शासनाच्या आहेत. कोविड काळामध्ये राज्यातील जनतेला केंद्र शासनाच्या अन्न सुरक्षा योजनेच्या माध्यमातून अन्न धान्य देण्यात आले आहे. आदिवासी कल्याण योजना केंद्र शासनाची आहे. नैसर्गिक आपत्तीसाठी केंद्र सरकारने मदत दिली आहे. घर घर जल ही योजना देशातील सर्व नागरिकांच्या घरापर्यंत पाणी पोचविण्याच्या दृष्टीने माननीय प्रधान मंत्री यांनी सुरु केली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात या योजनांच्या संदर्भातील सर्व मोठी आकडेवारी नमूद आहे.

श्री.जयकुमार गोरे...

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन योजनेकरिता राज्य शासनाला सुमारे २४ हजार कोटी रुपये निधी देण्यात आला आहे. आयुष्यमान भारत, उज्ज्वला गॅस योजना केंद्र शासनाच्या आहेत.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या निधीच्या आधारे राज्याच्या अर्थसंकल्पातील पंचसूत्रीला बळ देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पंचसूत्रीमध्ये आरोग्य या विषयाचा खूप मोठा उल्लेख करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्री यांना सांगू इच्छितो की, कोविड कालावधीत त्यांचे मोठ्या प्रमाणात कौतूक करण्यात आले आहे. मीडीयाच्या माध्यमातून आरोग्य विभागाने खूप चांगले काम केल्याचे सर्वांसमोर आले आहे. या पंचसूत्रीला बळ देण्याकरिता आरोग्याचा प्रश्न आपल्या सर्वांसमोर आहे. ग्रामीण रुग्णालयांची दुरवस्था झालेली आहे. तेथे डॉक्टर, नर्स, लॅब टेक्निशिअन, रुग्णवाहिकेसाठी वाहन चालक नाहीत. राज्यातील एकाही जिल्हा रुग्णालयामध्ये एम.डी.फिजिशिअन कोविड कालावधीत नव्हता, यापेक्षा दुर्दैव काय असू शकते ? आपण मोठ्या घोषणा करता, मोठ्या विषयावर बोलत असता.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.जयकुमार गोरे.....

राज्य सरकार मोठमोठ्या घोषणा करीत आहे. परंतु रुग्णवाहिकेला चालक नसल्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण गेलेले आहेत. त्यामुळे शासनाने फक्त पंचसुत्री मांडून चालणार नाही तर त्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून सर्व कामे करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, कोरोना काळामध्ये आरोग्य विभागातील अनेक कर्मचाऱ्यांनी अतिशय चांगले काम केले आहे. परंतु काही डॉक्टर्स व शासकीय कर्मचारी गायब झाले होते. त्यामुळे शासनाने कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांची भरती करून त्यांच्याकडून सर्व कामे करून घेतलेली आहेत. तसेच या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी देखील अतिशय चांगले काम केले आहे. त्यामुळे सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना नोकरभरतीमध्ये प्राधान्य देण्यात येईल, असे आरोग्य विभागामार्फत माननीय श्री.राजेश टोपे यांनी आश्वासन दिले होते. मागील काळामध्ये आरोग्य विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर नोकरभरती करण्यात आली. परंतु त्या नोकरभरतीमध्ये कोणत्याही कोरोना योद्धांना प्राधान्य देण्यात आल्याचे दिसून आले नाही.

अध्यक्ष महोदय, कोरोना काळामध्ये अंगणवाडी सेविका व आशा सेविकांनी अतिशय चांगले काम केले आहे. कोरोना काळामध्ये एकमेकांना माणसे भेटत नव्हती तेव्हा आशा सेविकांनी घरोघरी जाऊन रुग्णांची सेवा केलेली आहे. तरी देखील या सरकारने आशा सेविकांच्या मानधनामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ केलेली नाही. हे शासन आता तरी आशा सेविकांच्या मानधनामध्ये वाढ करणार आहे काय?

अध्यक्ष महोदय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना बळ देण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक व ग्रामीण रुग्णालयांमध्ये डॉक्टरांच्या नेमणुका करण्याची नितांत आवश्यकता आहे. आरोग्य विभागावर फक्त चर्चा करून काही होणार नाही. त्यासाठी रुग्णालयामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून कोरोनासारख्या संकटाला सामोरे जाण्याची ताकद देण्याची आवश्यकता आहे.

श्री.जयकुमार गोरे.....

अशा प्रकारचे काम केले तरच शासनाने घोषित केलेल्या पंचसुत्रीला बळ प्राप्त होईल. अन्यथा ही पंचसुत्री कागदावरच राहील, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मागील अडीच वर्षापासून हे सरकार काम करीत आहे. मागील सरकारने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना मोठ्या ताकतीने राबविलेली होती. या योजनेच्या माध्यमातून मागील सरकारने गावा-गावांना जोडण्याचे काम केलेले आहे. परंतु ही योजना मागील दोन वर्षापासून बंद होती. परंतु आता ती पुन्हा सुरू करण्याचा निर्णय या सरकारने घेतलेला आहे. शासनाच्या या निर्णयाचे मी स्वागत करतो. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील दहा हजार किलोमीटरचे रस्ते करण्यात येणार आहेत व त्यासाठी शासनाने साडे सात हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी एवढा निधी पुरेसा नाही, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत देखील ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची कामे केली जात आहेत. या योजनेंतर्गत जिल्हा, राज्य व राष्ट्रीय मार्गांच्या रस्त्यांची कामे केली जातात. परंतु ग्रामीण भागातील गावामधील रस्त्यांची कामे जात नाहीत. या संदर्भात वारंवार सभागृहांमध्ये चर्चा होते, परंतु त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात नाही. गाव व वाड्या वस्तीतील रस्त्यांच्या कामासाठी वेगळ्या निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. तसेच याबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करण्याची देखील आवश्यकता आहे. या सर्व बाबींचा विचारकरुन माननीय अर्थमंत्री यांनी याकडे विशेष लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची कामे सुरू आहेत त्याबाबत मी माननीय श्री. नरेंद्र मोदी व माननीय श्री. नितीन गडकरी यांना धन्यवाद देतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. जयकुमार गोरे....

राज्यातील सर्व आमदारांच्या मतदारसंघामध्ये मोठ्या प्रमाणात केंद्रीय रस्ते तयार होत आहेत. राज्यातील चारही पालखी मार्गाचे काम अतिशय चांगल्या प्रकारे पूर्णत्वास जात आहे. तेथे अतिशय चांगले काम सुरु आहे. केंद्रीय रस्त्यांचे ग्रामीण आणि इतर सर्व ठिकाणी अतिशय चांगल्या प्रकारे काम सुरु आहे. याबाबत मी माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी आणि माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पातील पंचसुत्रीमध्ये शेतकऱ्यांना बळकट करण्याची भूमिका घेण्यात आली आहे. याबाबत मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे आभार मानतो. दोन वर्षाने का होईना नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम या सरकारने केले आहे. शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा केली आहे. हे अनुदान तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांची वीज तोडणीबाबत बोलत आहेत. शेतकऱ्यांची वीज तोडणी हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. यासोबतच शेतकऱ्यांना नियमित वीज मिळाली पाहिजे, याचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये केला नाही. शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली पाहिजे. हे सरकार शेतकऱ्यांवर इतका अन्याय का करीत आहे, याबाबत चर्चा होण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यास रात्री अपरात्री शेतात पिकांना पाणी द्यावे लागते. याबाबत मी माननीय उर्जा मंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी शेतकऱ्यांना न्याय द्यावा. आता या सरकारने शेतकऱ्यांची वीज तोडणी केवळ तीन महिन्याकरिता थांबविलेली आहे. या तीन महिन्यानंतर हा प्रश्न पुन्हा येणार आहे. शेतकऱ्यांचा हा प्रश्न कायमचा केव्हा निकाली निघणार आहे ? तीन महिन्यानंतर पुन्हा अधिवेशन आहे. त्यावेळेस पुन्हा हा विषय उपस्थित होईल. शेतकऱ्यांच्या वीज तोडणीबाबत कायमस्वरुपी तोडगा काढला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांसमोर शेतीच्या पाण्याचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. राज्य सरकारला पंतप्रधान कृषि सिंचन योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात

श्री. जयकुमार गोरे....

निधी मिळाला आहे. परंतु या योजनेत महाराष्ट्र राज्यातील किती योजनांचा समावेश झाला, याचा अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारकडून या योजनांकरिता मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेत राज्यातील अधिकाधिक सिंचन प्रकल्पाचा समावेश कशा प्रकारे होईल, यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करावयाचे असतील तर प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेतील हजारो कोटी रुपये राज्य सरकारला मिळतात. त्यातून ते प्रकल्प मार्गी लागले पाहिजेत. परंतु आपल्या राज्यातील केवळ सहा ते सात प्रकल्पांचा यात समावेश केला आहे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेत काही नव्या योजनांचा समावेश करण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे. महाराष्ट्रातील आणि विशेषत: माझ्या मतदारसंघातील झे-कटापूर योजनेचा समावेश प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेत केला पाहिजे. झे-कटापूर आणि उरवळी योजना माझ्या मतदारसंघातील आहे. परंतु या योजनेतील निविदा प्रक्रिया राजकीय कारणामुळे मागील एक वर्षापासून प्रलंबित ठेवली आहे. या योजनांकडे राजकीय दृष्टीकोनातून न पाहता, त्या योजना समाजोपयोगी आहेत या दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, उर्वरित योजनेची निविदा प्रक्रिया तातडीने पार पाडावी. मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना एक विनंती करणार आहे. पुणे- बंगळुरू कॅरीडॉर विकसित करण्याचा निर्णय झाला आहे.

यानंतर श्री. चौधरी...

श्री.जयकुमार गोरे.....

तसेच माण-खटाव या दुष्काळी भागामध्ये एक एम.आय.डी.सी. आणण्याचा निर्णय देखील राज्य सरकारने जाहीर केला. परंतु सदर एम.आय.डी.सी. दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट केली जाणार असल्याच्या बातम्या अलीकडील काळामध्ये येत आहेत. अर्थात, तसे केले जाणार नसेल तर मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे मन:पूर्वक आभार मानतो. माण-खटाव या दुष्काळी भागामध्ये कसल्याही परिस्थितीत सदर एम.आय.डी.सी. होऊन दुष्काळी भागातील लोकांना न्याय मिळाला पाहिजे, अशी या निमित्ताने माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये आहोत. या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना माननीय अर्थमंत्र्यांनी जी विकासाची पंचसूत्री मांडली त्यामध्ये शिक्षण हा देखील एक घटक आहे. परंतु ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची अवस्था पाहिली तर ती अतिशय दयनीय असल्याचे दिसते. शिक्षकांना साठ-सत्तर हजार रुपये पगार दिला जातो परंतु ते ज्या शाळेमध्ये ज्ञानदानाचे काम करतात त्या शाळांची अवस्था अतिशय खराब आहे. ग्रामीण भागातील शाळेतील ७० हजार रुपये पगार घेणाऱ्या शिक्षकाचा स्वत:वर देखील विश्वास नसतो त्यामुळे ते स्वत:ची मुले खासगी शाळांमध्ये शिकायला पाठवितात. अलीकडे तर अशी फॅशन आली आहे की, ७० हजार रुपये पगार घेणारा शिक्षक आपल्या जागेवर एखाद्या डी.एड. झालेल्या बेरोजगार युवकाला १२ ते १५ हजार रुपये पगार देऊन नेमतो व स्वत: गावचे राजकारण करीत फिरतो.

अध्यक्ष महोदय, शाळा-खोल्या बांधण्यासाठी जिल्हा नियोजन समिती...(अडथळा...) अनेक सन्माननीय सदस्य कालपासून सभागृहामध्ये आपापल्या भावना व्यक्त करीत आहेत...(अडथळा...) आपल्या भावना योग्य आहेत.

अध्यक्ष महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारितील शाळांची अतिशय दुरावस्था झाली आहे. या शाळांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे सांगितले जाते.

श्री.जयकुमार गोरे.....

परंतु जिल्हा नियोजन समितीकडून मिळणाऱ्या निधीला मर्यादा आहेत. त्यामुळे शाळा- खोल्यांच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पातच वेगळा निधी देण्याची आवश्यकता आहे. शासनाने याबाबत योग्य भूमिका घ्यावी, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्य सातत्याने केंद्र सरकारला दोष देत असतात. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, केंद्र सरकारच्या माध्यमातूनच या अर्थसंकल्पाचा पाया उभा राहतो. यातून केंद्र सरकारच्या योजना वजा केल्या तर किती योजना शिल्लक राहतात याचा अभ्यास सन्माननीय सदस्यांनी करावा.

अध्यक्ष महोदय, अनेक सदस्यांना माझे विचार ऐकून त्रास झाला असेल. काल सत्ताधारी पक्षाचे नेते बोलत असताना हेच सदस्य बाके वाजवित होते. अर्थात, आपण कशासाठी बाके वाजवित आहोत हे देखील त्यांच्या लक्षात येत नव्हते. केवळ समोरचा वाजवतो आहे म्हणून आपण बाके वाजवायची अशी त्यांची भूमिका असते. त्यामुळे त्यांना देखील मी सांगू इच्छितो की, आपण हे सर्व विषय समजून घ्यावेत.

अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व सन्माननीय सदस्यांनी असेच बाके वाजवत राहावे या शुभेच्छा देऊन माझे भाषण संपवितो.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.जयकुमार गोरे हे दुपारी १२.२६ ते १२.४८ वाजेपर्यंत बोलले आहेत.

श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच अतिशय क्रांतीकारी असा अर्थसंकल्प माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री.अजित पवार यांनी मांडला आहे, त्याबद्दल मी त्यांचे विशेष अभिनंदन करतो. गेल्या दोन वर्षांपासून आपण कोरोना या महामारीच्या सावटाखाली जगत आलो आहोत. दरम्यानच्या काळात राज्याचा आर्थिक विकास मंदावला होता. त्याला गतिमान करण्यासाठी 'विकासाची पंचसुत्री' हा विशेष कार्यक्रम राबविण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला आहे. पुढील तीन वर्षांमध्ये यासाठी सुमारे ४ लाख कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याचे धोरण शासनाने निश्चित केलेले आहे. खरोखरच राज्याच्या विकासाला नवी दिशा देणारी ही पंचसुत्री असेल, असा मला ठाम विश्वास आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. दिलीप बनकर...

राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा तसेच शेती आणि शेतकरी यांना समृध्द करण्याच्या दृष्टीकोनातून तयार करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पातून पायाभूत सुविधा रस्ते, पाणी, महिला व बालविकास यावर भर देताना कृषी विकासावर अधिक भार देण्याचे काम केलेले आहे. कर्जमाफीच्या बाबतीत अर्थमंत्र्यांनी नियमित कर्जफेड करणाऱ्या जवळपास २० लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदान देण्याचे या अर्थसंकल्पात जाहीर केल आहेत. त्यासाठी जवळपास १० हजार कोटी रुपयांची तरतूदही केलेली आहे. तसेच शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत शेततळ्यांच्या कामासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात ५० टक्के वाढ करण्यात आली आहे. निर्यातीबाबतचे कृषी धोरण राबविणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिलेच राज्य आहे. या कामी महाविकास आघाडी सरकारने विशेष भर दिल्याने मला या सरकारचा अभिमान आहे. राज्यातील बाजार समित्यांनी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची शंभरटक्के परतफेड करण्यासाठी शासनाने अर्थसहाय्य करण्याचे जाहीर केलेले आहे. त्यामुळे बाजार समित्यांना उर्जितावस्था आणण्यासाठी व शेतकऱ्यांच्या हितासाठी एक चांगला निर्णय महाविकास आघाडी सरकारने केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, कोरोनाच्या काळात आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीकोनातून अस्तित्त्वात असलेल्या आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्याचा चांगला निर्णय शासनाने घेतला. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो व आभार मानतो. या अर्थसंकल्पातून कृषी धोरणाला चालना देण्याच्या दृष्टीकोनातून महाविकास आघाडी सरकार काम करीत आहे. परंतु त्याचबरोबर माझी एक खंतही आहे. आपल्या राज्यातील सुमारे ७० टक्के लोकांचा उदरनिर्वाह हा शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेती विकासासाठी अनेक योजना राबविल्या जातात. परंतु अजूनही त्यातून शेतकरी समृध्द झाल्याचे दिसत नाही, याबद्दल खरोखरच वाईट वाटते. शेतकऱ्याच्या मुलाला शेतकरी व्हावे, असे कधीच वाटत नाही. सरकार कोणते आहे किंवा कोणाचे आहे, हे महत्त्वाचे नाही तर आपण शेतकऱ्यांना समृध्द

श्री. दिलीप बनकर...

करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. शेतीमध्ये शेतकऱ्याला शाश्वत उत्पन्न मिळेल अशी शाश्वती राहिली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या बाबतीत निर्माण होणारी परिस्थिती बदलण्याचे काम तुम्हा आम्हा सर्वांना एकत्रितपणे करावे लागेल. तरच हा शेतकरी, पोसिंदा खऱ्या अर्थाने...

तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला अशा पध्दतीने भाषण वाचता येणार नाही. संदर्भासाठी आपल्याला मुद्दे घेता येतील. परंतु आपल्याला भाषण नैसर्गिकच करावे लागेल.

श्री. दिलीप बनकर : अध्यक्ष महोदय, जगाचा पोसिंदा जगला पाहिजे यासाठी शासनाने काम केले पाहिजे. ग्लोबल वार्मिंग हा एक विषय शेतकऱ्यांच्या बाबतीत पुढे येत आहे. कधी पावसाळा येतो तर कधी उन्हाळा येतो. याबाबत गेल्या ४ दिवसांपूर्वी आमच्या नाशिक जिल्ह्यात पाऊस पडला. त्यामुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. त्याबद्दल काही पंचनामे झाले आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक मदत देण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने करणे गरजेचे आहे. नाशिक जिल्ह्यात द्राक्षे, कांदा, गहू या पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्यामध्ये मदत देण्याची भूमिका महाविकास आघाडी सरकारने घ्यावी.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर आमच्या नाशिक जिल्ह्यात नांदूर मध्यमेश्वर हे धरण आहे. ब्रिटीशकालीन हे धर आहे. सन २००८-०९ मध्ये आपण या धरणाच्या ८ गेटचे काम केले होत. त्यानंतर पुन्हा १० गेटच्या कामांचा प्रस्ताव माननीय जलसंपदा मंत्र्यांकडे दिलेला आहे. त्या ठिकाणी जवळपास ३ लाख क्युसेकने पाणी सर्व ७-८ धरणांचे एकत्रित गोळा होते आणि त्यामुळे निफाड तालुक्यातील सुमारे २५-३० गावे पाण्याखाली जातात. निश्चितच त्या गावांना त्रास होऊ नये म्हणून या १० गेटच्या बांधणीचा प्रस्ताव शासनस दरबारी पाठविण्यात आला आहे. त्याला तत्वत: मान्यता देऊन त्यासाठी १३० कोटी रुपयांचा निधी मिळवून द्यावा, अशी मी शासनाला विनंती करतो.

श्री. दिलीप बनकर...

अध्यक्ष महोदय, नगरमविकास विभागाच्या माध्यमातून ज्याप्रमाणे नगरोत्थान अंतर्गत कामांसाठी एक हेड तयार केले आहे. या ठिकाणी त्याच पध्दतीने २५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या ज्या गावांमध्ये असेल त्या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री आणि ग्रामविकास मंत्र्यांनी बैठक तेथे घेतली. नगरोत्थानप्रमाणेच ग्रामविकास विभागामध्ये हेड तयार करुन तेथे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाबतीत सर्वात महत्त्वाचा एक विषय आहे. या ठिकाणी संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित आहेत किंवा नाहीत ते मला माहिती नाही. परंतु शासनाकडून ९.३५ टक्के इतका एकूण लोकसंख्येच्या आधारे आदिवासी विकास विभागाला निधी दिला जातो. परंतु नाशिक जिल्ह्यात आणि विशेषत: माझ्या मतदार संघात ९५८१० आदिवासी तेथे आहेत. या आदिवासींना गेल्या अडीच वर्षात एक रुपया सुध्दा आदिवासी विकास मंत्र्यांनी दिलेला नाही.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. दिलीप बनकर....

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री किंवा माननीय आरोग्य मंत्री यांनी श्रेणिवर्धनच्या संदर्भात एक चांगला निर्णय घेतला आहे. परंतु त्यामध्ये निफाड येथील रुग्णालयात ५० खाटावरुन १०० खाटा करण्याचा आणि पिंपळगाव येथील रुग्णालयात ३० वरुन ५० खाटा करण्याचे असे आमचे दोन प्रस्ताव आहेत. यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांकडे हा प्रस्ताव गेलेला आहे त्याला तात्काळ मान्यता देण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विषयाच्या संदर्भात बोलत असताना माननीय पर्यटन मंत्री आता सभागृहामध्ये उपस्थित आहेत. नांदूर-मधमेश्वर धरण हे नाशिक जिल्ह्यातील खूप मोठे धरण आहे. या धरणाला "रामसर दर्जा" प्राप्त असून असा दर्जा प्राप्त असलेले ते भारत देशातील एकमेव धरण आहे. २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव गेल्या दीड वर्षापासून आपल्याकडे पाठवलेला आहे. तरी देखील त्या प्रस्तावाला तात्काळ मान्यता देऊन एक चांगल्या प्रकारचे पर्यटन स्थळ निर्माण करण्यात यावे, अशी मी अपेक्षा करतो.

अध्यक्ष महोदय, कविवर्य कुसुमाग्रज म्हणजेच वि.वा. शिरवाडकर यांनी आमच्याच निफाड तालुक्यामध्ये जन्म घेतलेला आहे. त्यांनी पिंपळगाव येथील शाळेत पहिली ते चौथीपर्यंत शिक्षण घेतले. त्या शाळेला मदत मिळावी, अशी मी विनंती करतो. तसेच त्यांच्या माध्यमातून तिथे चांगल्या प्रकारचे काम झाले आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा प्रस्ताव ९ वर्षापासून राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवलेला आहे. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा अशी आमची अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, क्रीडा क्षेत्राच्या बाबतीत शासनाची काही धोरणे असतात. तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल निर्माण केलेले आहे. तालुका लहान आणि गावे मोठी असतील जसे की, माझ्या मतदारसंघात ओझर, पिंपळगाव ही जवळपास ६५ ते ७० हजार लोकसंख्येची गावे आहेत. त्या ठिकाणी क्रीडा संकुल होण्याच्या बाबतीत शासनाने प्रयत्न करावेत अशी मी विनंती करतो.

श्री. दिलीप बनकर....

अध्यक्ष महोदय, सहकार विभागाच्या बाबतीत अतिशय चांगले काम करण्यात आले आहे. कर्मविर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखाना महाविकास आघाडी सरकारने चालविण्यासाठी दिला. परंतु निफाड सहकारी साखर कारखाना बंद आहे. अशा प्रकारचे तीन-तीन कारखाने बंद असल्यामुळे शासनाच्या माध्यमातून त्याबाबत काही करता येईल काय यासाठी प्रयत्न करावा.

अध्यक्ष महोदय, भू-विकास बँकेचे ३४ हजार ७८८ सभासदांचे ९६४ कोटी रुपयांचे कर्ज शासनाने माफ केले त्याबद्दल मी महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो. जे शेतकरी नियमित कर्ज परतफेड करतात त्यांच्यासाठी ५० हजार रुपये देण्याचे आणि २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असणाऱ्यांचे कर्ज फेडण्याचे आपण मान्य केले आहे. त्याबाबत लवकरात लवकर निर्णय करुन शासनाने त्यांना दिलासा देण्याचे काम करावे.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विषयाच्या बाबतीत तर अतिशय वाईट परिस्थिती आहे. कारण कालच माननीय ऊर्जा मंत्र्यांनी निर्णय घेतलेला आहे. परंतु याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांचा प्रश्न निर्माण झालेला होता. विजेच्या बाबतीत गेल्या १० ते १२ वर्षात वसुली झालेली नाही. परंतु आता खूप पठानी स्वरुपाने वसुली करण्यात आली. ग्रामीण भागातील सर्वच शेतकऱ्यांची वीज कट करण्यात येत होती. यासाठी तीन महिन्याची मुदत वाढ दिलेली असली तरी देखील ते आजचे मरण उद्यावर टाकलेले आहे. ऊर्जा विभागाने प्रत्येकाला व्यवस्थित बिल पाहिजे.

तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) : प्रत्येक पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी ४५ मिनिटांचा वेळ आहे. त्यातील भारतीय जनता पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी २२ मिनिटे घेतली आहेत. त्यांना मी सांगू शकलो नाही. परंतु आपल्याला तरी मला सांगितले पाहिजे की, बाकीच्या सन्माननीय सदस्यांना वेळ मिळाला पाहिजे.

ॲड. आशिष जैस्वाल (रामटेक) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे. माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार हे अत्यंत अनुभवी आहेत. कारण त्यांना अनेक वर्षापासून मंत्री पदाचा अनुभव आहे. त्यांनी या राज्याला अनेक अर्थसंकल्प दिले आहेत. कोविडच्या जागतिक संकटासमोर महाविकास आघाडी सरकारचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या माध्यमातून त्यांनी वर्षानुवर्षापासून प्रलंबित असलेला भू-विकास बँकेच्या कर्जमाफीचा विषय मार्गी लावला. मी अनेक वर्षापासून सभागृहात भू-विकास बँकेचा विषय उपस्थित करीत होतो. परंतु त्याला यावर्षी न्याय मिळाला आणि त्या बँकेतील शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली. हा एक मोठा निर्णय या शासनाने केला त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल....

महाविकास आघाडी शासनाचा पहिला अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता तेव्हा सरकारने परचेस पॉलिसीमध्ये बदल केला जाईल व महिला बचत गटाच्या माध्यमातून होणाऱ्या खरेदीकरिता धोरणामध्ये बदल केला जाईल, असे सांगितले होते. मागील २ वर्षात हा बदल झालेला नाही. शासनाने २०२२ हे महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष जाहीर केले आहे. या वर्षी राज्यात शासनाच्या, माविम व उन्मेषच्या माध्यमातून अनेक महिला बचत गट तयार केले. आजही हजारो गावांमध्ये महिलांचे बचत गट तयार केले आहे. त्या मधील महिला आमच्याकडे कामाची मागणी करतात. वेगवेगळा निधी महिला बचत गटांना दिला आहे, मात्र तो अत्यंत तोकडा आहे. आपल्या राज्यात मनुष्यबळाचा खरा वापर करायचा असेल, राज्यातील महिला शक्तीला बरोबरीत आणायचे असेल तर या धोरणामध्ये बदल केला पाहिजे. राज्याला ज्या वस्तूंची गरज आहे, त्याची निर्मिती करणे किंवा अन्य राज्यांवरील अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे. असे झाले तर राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठे योगदान देता येईल.

अध्यक्ष महोदय, कृषी निर्यात धोरण शासन जाहीर करीत आहे. आता हमीभावाने खरेदी केली जाते, यामुळे शासनावर मोठे दायित्व तयार होते. निर्यातीच्या संबंधी जेवढया सुविधा निर्माण होतील तेवढाच शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. कृषी निर्यात धोरण तयार केले पाहिजे. भविष्यात आपल्या राज्यातून ज्या गोष्टींची निर्मिती होत आहे, ज्याचा आपल्याकडे खप होत नाही, त्याची निर्यात करण्यासाठी सुटसुटीत धोरण केले तर मोठे काम या निमित्ताने होईल.

अध्यक्ष महोदय, धान उत्पादक शेतकऱ्यांबाबत मी सांगू इच्छितो. मागील अधिवेशन नागपूरला होणार होते, हे अधिवेशनही नागपूरला होणार होते मात्र ते झाले नाही. नागपूरच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केला जातो. तेव्हा माननीय वित्त मंत्री यांनी सदनात आश्वासन दिले होते की, धान उत्पादक शेतकऱ्यांना थेट अनुदान देऊ, बोनसचे पैसे देत नाही. याअर्थसंकल्पात त्या बाबत उल्लेख दिसत

ॲड. आशिष जैस्वाल....

नाही. आज अधिवेशनानंतर जेव्हा मतदारसंघात आम्ही जाऊ तेव्हा आम्हाला शेतकऱ्यांचे फोन येतील की,धानाच्या बोनसचे पैसे आम्हाला मिळाले नाहीत. मंत्री महोदयांनी सदनात जाहीर केले होते. राज्यातील सर्व जनतेने ते पाहिले आहे. शासनाने विधानसभेमध्ये आश्वासन दिल्यानंतरही त्याची जर पूर्तता झाली नाही तर ते अत्यंत दुर्दैवी ठरेल. याचे काय करण आहे, याचे उत्तर माननीय वित्त मंत्री यांनी द्यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शासनाने मानव विकास मिशन हा कार्यक्रम जाहीर केला. १२५ मागास तालुक्यांमधील लोकांच्या दरडोई उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी प्रत्येक तालुक्याला २ कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. या नंतर या रकमेवर कट लावून १ कोटी रुपये दिले. शासनाने असे सांगितले होते की, राज्यातील सर्व तालुक्याला हा निधी देऊ. शेवटी विकास होत राहणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजनेतून मागील ६० ते ७५ वर्षांमध्ये विकास केला गेला. गावाच्या मुलभूत गरजा आता पूर्ण होत आल्या आहेत. राज्यातील कोणताही लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघात कार्यरत असतो, तो लोकांना भेटायला जातो तेव्हा लोक सांगतात की, आमच्या मुलाला रोजगार द्या, आम्हाला काम द्या. विकासाच्या कामा बाबत कोणी सांगितले तर आम्ही ताबडतोब त्यांचे काम करुन देतो.

अध्यक्ष महोदय, राज्य व केंद्र शासनाच्या अनेक योजना आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला आहे. मानव विकास मिशन कार्यक्रमाला अधिक गती देण्याची आवश्यकता आहे. त्याची व्याप्ती वाढवण्याची गरज आहे. माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे नागपूरला आले होते तेव्हा त्यांच्याशी चर्चा झाली होती. मानव विकास मिशन असा नवीन विभाग तयार करुन राज्यात जेवढे मनुष्यबळ आहे त्यांच्या शक्तीचा वापर करुन भविष्यात रोजगाराची निर्मिती करुन उत्पादकता कशी वाढवता येईल या करिता प्रयत्न करावा.

यानंतर श्रीमती गिरप...

ॲड.आशिष जैस्वाल...

माझी विनंती आहे की, या सरकारमध्ये एक नवीन मानव विकास मंत्रालय लवकरात लवकर निर्माण करावे. या राज्यामध्ये ज्या काही रोजगार, स्वयंरोजगाराच्या योजना आहेत, त्या या मंत्रालयाच्या माध्यमातून करुन जास्तीत जास्त लोकांना त्याकरिता अनुदान देण्याची गरज आहे. दुर्दैवाने मानव विकास मिशन या विषयाकडे नियोजन विभागाचे दुर्लक्ष झालेले आहे. त्याला वेळेवर निधी मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, शासनाने १२५ तालुके हे मागासलेले म्हणून निवडलेले आहेत. तेथील लोकांचे दरडोई उत्पन्न कमी आहे. त्या तालुक्यातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी निधी लवकर उपलब्ध केला जात नाही. तो निधी मार्च महिन्यामध्ये उपलब्ध करुन दिला जातो. मात्र मार्च महिन्यामध्ये तो सर्व निधी सरेंडर होतो. त्याची एसओपी सरकारने तयार केलेली नाही. याकरिता माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने त्याची एसओपी लवकरात लवकर तयार करावी व महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांना या संदर्भात एक ठोस निधी देण्याबाबत शासनाने विचार करावा.

अध्यक्ष महोदय, मला खूप बोलायचे होते. परंतु, मला वेळेची मर्यादा माहीत आहे. आजचा दिवस हा या आठवड्यातील अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. मी आता शेवटचा विषय मांडणार आहे. पर्यावरणाचा विषय अतिशय महत्वाचा झालेला आहे. माननीय श्री.आदित्य ठाकरे सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी या खात्याचा न्याय देण्याचा प्रयत्न केला. कोविडचा प्रसार थोडा कमी झाल्यानंतर त्यांनी ज्या पध्दतीने काम केले व नागपूर जिल्ह्यामध्ये येऊन त्यांनी पर्यावरणाच्या संदर्भातील जे प्रश्न होते त्यांना मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

अध्यक्ष महोदय, आज आपल्याला माहिती आहे की, तापमान वाढत आहे. वातावरण बदल होत आहे. काल मुंबईचे तापमान ४० अंश सेल्सीअसपर्यंत गेले. नागपूरच्या तापमानाची तर त्यापेक्षा वाईट अवस्था आहे. मार्च महिन्यामध्ये ही अवस्था आहे. भविष्याच्या कालखंडाचा विचार केला तर आजतागायत या

ॲड.आशिष जैस्वाल...

विषयाकडे सर्वांचे दुर्लक्ष झालेले आहे... (अडथळा)... अध्यक्ष महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडतो. अध्यक्ष महोदय, मी नवीन मुद्दा मांडणार नाही. परंतु, आपण मला या संदर्भात २ मिनिटे बोलू द्यावे. माझी विनंती आहे की, या पर्यावरण बदलाच्या विषयावर शासनाकडून विशेष कार्यक्रम होण्याची आवश्यकता आहे. आज पर्यावरण विभागाचा निधी आपल्याला खर्च करावयाचा असेल तर त्याबाबत कोणतीही कार्यपध्दती नाही. पाणी पुरवठा योजना करावयाची असेल तर विभाग त्याचे एस्टीमेट करतो. रस्ता करावयाचा असेल तर विभाग त्याचे एस्टीमेट करतो. परंतु, आपल्याला आपल्या निधीतून पर्यावरणाच्या संदर्भात काही काम करावयाचे असेल तर, त्याची देखभाल, दुरुस्ती कोण करणार, ते काम कोण करणार, त्याचे अंदाजपत्रक कोण करेल, त्याचे डीएसआर कोण करेल, या संदर्भात कुठलीही व्यवस्था नाही. त्यामुळे खनिज प्रतिष्ठानचा निधी किंवा राज्यातील वेगवेगळ्या योजनेतून जेव्हा आपण पर्यावरणाचा निधी विशिष्ट कामासाठी राखून ठेवावा असे म्हणतो तेव्हा मार्चपर्यंत पर्यावरण विभागाकडून आपल्याला तसा कुठलाही प्रस्ताव तयार करता येत नाही. आमच्या मनात खूप इच्छा आहे की, या संदर्भात काम व्हावे. परंतु, तो निर्णय होत नाही. शासनाने या संदर्भात निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आहे. हा क्रांतिकारक निर्णय व्हावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

ॲड.राहुल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर माझे मत व्यक्त करण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण जनतेच्या या अर्थसंकल्पाकडून खूप अपेक्षा होत्या. परंतु, त्यांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब या ठिकाणी पाहण्यास मिळाले नाही. ग्रामीण भागातील वेगवेगळे प्रश्न आहेत. त्यापैकी एक महत्वाचा म्हणजे चिबड जमीन निर्मूलन कार्यक्रम. बरेच वर्षे चिबड जमीन निर्मूलनासंदर्भात मी शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. परंतु, शासनस्तरावर अतिशय निरुत्साह या चिबड जमीन निर्मूलन कार्यक्रमाबाबत पहावयास मिळत आहे.

अध्यक्ष महोदय, मापदंड ठरविण्याच्या नावाखाली मागची कित्येक वर्षे कुठलेही धोरण ठरविले गेलेले नाही. त्यामुळे चिबड जमीन निर्मूलन कार्यक्रम हाती घेणे शक्य होत नाही. त्याचा या अर्थसंकल्पामध्ये जरी समावेश नसला तरी, माननीय उप मुख्यमंत्री यांनी त्या संदर्भात त्यांच्या उत्तरामध्ये उल्लेख करावा, अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, शेती व शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. शेतीची सर्व अर्थव्यवस्था ही पाण्यावर अवलंबून आहे. वेगवेगळ्या योजनांकरिता तरतुदी करणे ठीक आहे. परंतु, या पाण्याच्या संदर्भामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर भरीव तरतुदी होणे अपेक्षित होते. परंतु, या अर्थसंकल्पामध्ये शेतीच्या पाण्यासंदर्भात कुठल्याही प्रकारची दिशादर्शक अशी गोष्ट पहावयास मिळाली नाही.

अध्यक्ष महोदय, मागच्या शासनाने जलयुक्त शिवार ही चांगली योजना राबविली. परंतु, ज्या शेतीच्या पाणी योजना आहेत त्या संदर्भामध्ये कुठल्याही प्रकारचे ठोस धोरण या अर्थसंकल्पामध्ये पहावयास मिळाले नाही. वर्षानुवर्षे जलसंपदा प्रकल्पाच्या दुरुस्त्या झाल्या नाहीत. त्याकरिता वेगळी तरतूद आवश्यक आहे. तशा प्रकारची तरतूद झाली नसली तरी माननीय उप मुख्यमंत्री यांनी त्यांच्या उत्तरामध्ये त्याचा उल्लेख करावा, अशी माझी अपेक्षा आहे.

ॲड.राहुल कुल ...

अध्यक्ष महोदय, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया असणाऱ्या पोलीस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर, होमगार्ड यांना कुठल्याही प्रकारची सुरक्षितता नाही. खरे तर या कोविड काळात या सर्व लोकांनी अतिशय चांगले काम केले. त्यातील बरेच कर्मचारी कंत्राटी आहेत. ज्या वेळेस त्यांची नियमित स्वरुपात भरती होईल तेव्हा त्यांना एक विशेष राखीव जागा या संदर्भामध्ये ठेवणे अपेक्षित आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

ॲड.राहूल कुल...

आशा सेविका चांगले काम करतात त्यांना शासन पाठिंबा व प्रोत्साहन अनुदान देत नाही, पुढील कालावधीत त्यांना संरक्षण देणे ही काळाजी गरज राहणार आहे.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या निमित्ताने ग्रामीण अर्थव्यवस्था कुचकामी असल्याचे पाहण्यास मिळाले आहे. आपण इतिहासातून शिकले पाहिजे व या प्रकरणी राज्याचा एक रोड मॅप तयार करण्याची आवश्यकता आहे. कोविडच्या पहिल्या लाटेनंतर दुसऱ्या लाटेमध्ये आपण एक्सपोज झालो. त्यानंतर तरी ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेकरिता ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. महात्मा फुले आरोग्य योजनेची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे. धर्मादाय रुग्णालय असले तरी प्रत्यक्षात योजनांच्या अंमलबजावणीत खूप अडचणी येत आहेत. यासंदर्भात नियमित कायदा करण्याची आवश्यकता आहे. त्यावर काम करण्यात येत असले तरी त्यावर निर्णय झाला तर खऱ्या अर्थाने गरजू रुग्णांना मदत होऊ शकते.

अध्यक्ष महोदय, तालुका स्तरावर किमान एक तरी मोठे रुग्णालय सुरु करण्यात यावे. जेणेकरुन कोरोना सारखा मोठा प्रसंग आपल्यावर आला तर त्यास तोंड देण्याची क्षमता आरोग्य विभागाकडे असणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, शासन नदी किंवा एमआयडीसी च्या माध्यमातून होणाऱ्या प्रदूषण या विषयावर गंभीर नाही. माझ्या मतदारसंघामध्ये कुरकुम एमआयडीसी आहे. त्यामधून होणाऱ्या प्रदूषणाच्या संदर्भात मी सातत्याने पाठपुरवा करीत आहे. तेथील अधिकारी व कंपन्या यांचा काय घोटाळा सुरु असतो तो आम्हाला वर्षानुवर्षे समजलेला नाही. उक्त कंपन्याकडून मोठ्या प्रमाणात प्रदूषण केले जाते. सदरहू दूषित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी येणारा खर्च हा उत्पादन खर्चातील मोठा भाग असल्याने तो टाळण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. या भागातील पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झाल्याने शेतीचे मोठे नुकसान होत. एमआयडीसी ग्रामपंचायतीला पाणी देते त्यावर आकारणी करण्यात येते. प्रदूषण एमआयडीसीने केले आहे, ग्रामपंचायतीला पाणी देणे त्यांचे कर्तव्य आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायतीची सर्व वीज देयके माफ केली पाहिजेत व पुढील काळात मोफत पाणी

देण्याची आवश्यकता आहे. तसेच ज्या शेतीचे नुकसान झाले त्यासंदर्भातील पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव) : आपल्या पक्षासाठी ४५ मिनिटांचा वेळ आहे, त्यामधील अगोदरच्या वक्त्यांनी २३ मिनिटे घेतली असून आपण ६ मिनिटे बोलला आहात. आपण एकटे बोलला तरी माझी हरकत नाही परंतु इतर सन्माननीय सदस्यांना संधी मिळणार नाही, याचा आपण विचार करावा.

ॲड.राहूल कुल : अध्यक्ष महोदय, मी माझे भाषण दोन मिनिटांत संपवितो. शेतीच्या पाण्याच्या संदर्भात अडचण आहे. तसेच त्यांना एमआयडीसीने नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांचा आणखी एक प्रश्न आहे. शेकऱ्यांना वन जमिनींचे पुनर्वसन व वेगवेगळ्या कारणांसाठी वाटप करण्यात आले आहे. परंतु सदरहू जमिनी डी फॉरेस्ट करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे त्या लोकांना नैसर्गिक न्याय मिळत नाही. यासंदर्भात केंद्र शासन व माननीय सर्वोच्च न्यायलय यांच्या माध्यमातून मार्ग काढण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता आहे. सदरहू मूळ जमीन वर्ग १ असताना त्यानंतर वन विभागाच्या जमिनी देण्यात आल्या आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचा काही दोष नसताना शेतकऱ्यांच्या हजारो हेक्टर जमिनीवर आरक्षण आहे, ते कमी करण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मागील सरकारने पांदण व शिव रस्त्याचे धोरण तयार केले होते. या दोन रस्त्यांसह ग्रामीण रस्त्यांची परिस्थिती अतिशय अडचणीची आहे. आपण शहरांमध्ये मोठमोठे मार्ग तयार करीत आहोत, परंतु ग्रामीण मार्गांची दुरवस्था झालेली आहे त्यासाठी तरतूद करावी.

अध्यक्ष महोदय, शासकीय जमिनीवरील भूमीहिनांची अतिक्रमणे नियमित करण्यासंदर्भात धोरण आहे. मी वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद !

श्री.दीपक केसरकर (सावंतवाडी) : अध्यक्ष महोदय, मी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधरण चर्चा करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मला मागील ५ वर्षांच्या कालावधी वरिष्ठ सभागृहामध्ये अर्थसंकल्प मांडण्याची संधी मला माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे मिळाली होती.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्य यांनी सांगितले की, सकारात्मक सूचना द्याव्यात, टीका करु नये. अशा पद्धतीने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्य यांनी आपले मत मांडले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्य यांनी सांगितले की, राज्याचा अर्थसंकल्प केवळ केंद्र शासनाच्या मदतीवर चालतो. ही बाब संपूर्णपणे खोटी आहे. केंद्र शासनाकडून केवळ १२ टक्के ग्रँट मिळते. आपण एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, केंद्र शासनाच्या कराचा एक वाटा असतो.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.दीपक केसरकर.....

करासंदर्भात जेव्हा नवीन सुत्रे निश्चित करण्यात आली तेव्हा बिहार व त्यासारखी इतर मागासलेल्या राज्यांना मोठ्या प्रमाणावर कराचा हिस्सा जात होता. परंतु सर्वात जास्त कर देणाऱ्या राज्याला मात्र ९ टक्के कराचा हिस्सा प्राप्त होत आहे. त्यामुळे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी देखील केंद्र सरकारकडे निवेदन करुन किमान राज्याची ग्रँट वाढवून घेणे आवश्यक आहे. सुत्राप्रमाणे कराचा हिस्सा कमी मिळत असला तरी ग्रँटच्या माध्यमातून तरी या राज्याला अधिकचे पैसे मिळणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मी ज्यांच्यासोबत अर्थ राज्य मंत्री म्हणून काम केले ते माजी अर्थ मंत्री आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. ज्यावेळी आम्ही अर्थसंकल्प तयार करीत होतो, तेव्हा राज्यातील सर्व लोकांकडून सूचना मागवून घेत होतो. वेगवेगळ्या स्टेकहोल्डन यांच्याकडून सूचना घेतल्या जात होत्या. जेंडर बजेट कसे असते, त्याबाबत देखील चर्चा करीत होतोत. परफॉर्मन्स बजेट कसे असते, याबाबत चर्चा केल्यानंतर सभागृहामध्ये अर्थसंकल्प सादर केला जात होता.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प हा माझ्यासारख्या सदस्याला एक सुखद धक्का होता. कारण आपले राज्य आर्थिक संकटामध्ये असताना देखील अतिशय सर्वसमावेशक अर्थसंकल्प सादर केलेला आहे. या अर्थसंकल्पातून समाजातील प्रत्येक वर्गाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, ज्या बाबींचा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये केलेला नाही, त्याबाबतच बोलू इच्छितो. मराठी भाषेला न्याय देत असताना सीमा भागाचा उल्लेख करण्याचे अर्थसंकल्पामध्ये राहून गेलेले आहे. सीमा भागामध्ये जे लोक १४ वर्षे वास्तव्य करतात, त्यांना महाराष्ट्राचा नागरिक असण्याचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्यामुळे तेथे लायब्ररी ग्रँट देऊ शकतो. त्या भागातील मराठी भाषेला प्रोत्साहन देऊ शकतो. अनेक मराठी भाषित हा लढा लढत आहेत. परंतु तो लढा संपविण्याचे काम आपल्यामधील काही लोकांनी तेथे जाऊन केलेले आहे. मराठीचा हा लढा कायम सुरु राहिला पाहिजे,

श्री.दीपक केसरकर.....

यासाठी अर्थसंकल्पामध्ये देखील उल्लेख करणे आवश्यक होते. मागील सरकारने तेथे असलेल्या लायब्ररींना ग्रँट दिली होती. अशा प्रकारे आपण त्यांना अप्रत्यक्ष मदत करु शकतो आणि ती या सरकारने करावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्यावर मोठ्या प्रमाणावर कर्जाचा बोजा आहे, असे म्हणत अनेक सन्माननीय सदस्यांनी टीका केली. परंतु एक बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सरकार सत्तमध्ये आले तेव्हा राज्यावर ६१ हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. या सरकारने १५ वर्षे राज्य केले. त्यावेळी त्या कर्जामध्ये वाढ होऊन २ लाख ४६ हजार कोटी इतके झाले होते. म्हणजे १५ वर्षांमध्ये २ लाख कोटी रुपयांचे कर्ज वाढले होते. मागील सरकारमध्ये अर्थ राज्यमंत्री म्हणून मी ५ वर्षे काम केलेले आहे. मागील १५ वर्षामध्ये जेवढे कर्ज वाढले होते, तेवढे कर्ज मागील ५ वर्षामध्ये वाढलेले आहे. परंतु मागील सरकारच्या काळामध्ये अनेक विकासाच्या योजना राबविण्यात आलेल्या आहेत. मागील दोन वर्षापासून कोरोनाचे संकट असल्यामुळे या सरकारला देखील नवीन कर्ज घ्यावे लागले आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्थसंकल्पासाठी २३ टक्क्यापेक्षा कमी टक्केवारी असणे आवश्यक आहे. परंतु ही टक्केवारी मागील काळामध्ये १९ टक्क्यापर्यंत खाली गेली होती. परंतु आता तर ती टक्केवारी १७ टक्क्यापर्यंत खाली आणलेली आहे, त्याबद्दल मी माननीय श्री.अजित पवार यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यातील जनतेला न्याय देत असताना मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र अशा पद्धतीने निधीचे वाटप करण्यात आलेले आहे. कोकण सर्व विभागापेक्षा वेगळा आहे. कारण कोकणातील प्रश्न वेगळेच आहेत. कोकणाला वेगळे वैधानिक विकास महामंडळ हवे आहे, असे आपण एकमताने मान्य करतो. परंतु अर्थसंकल्पामधील कोकणाचा स्वंतत्र विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, कोकणाच्या वाट्याला फारसा निधी येत नाही. अर्थसंकल्पामध्ये कोकणासाठी निधीची तरतूद केली नसली तरी जे शेतकरी १०० टक्के कर्ज भरतात, त्या शेतकऱ्यांसाठी शासनाने ५० हजार रुपयांचे अनुदान घोषित केले आहे.

श्री.दीपक केसरकर.....

यामधील अनुदानाची सर्वात मोठी रक्कम कोकणाच्या वाट्याला येणार आहे. कारण कोकणातील कोणताही शेतकरी कर्ज बुडवित नाही. ज्यावेळी कर्जमाफी जाहीर झाली तेव्हा आपल्या खात्यावर ५० हजार रुपये जमा होतील, असे गृहीत धरुन काही शेतकऱ्यांनी पुढील हप्ते भरलेले नाहीत. त्यामुळे ज्या तारखेस कर्जमाफी जाहीर झाली, त्याच तारखेपासून या योजनेची अंमलबजावणी झाली पाहिजे, तरच कोकणातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकतो.

अध्यक्ष महोदय, पिकांच्या विम्यासाठी शासनाने अनेक योजना जाहीर केलेल्या आहेत. यामध्ये वेदर सिस्टीमची संख्या वाढविणे आणि झोनिंग करणे कोकणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण आंब्याचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना विमा कंपनी न्याय देत नाही. हळद पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी शासनाने १०० कोटी रुपयांची घोषणा केलेली आहे. परंतु या राज्यामध्ये आंब्यामुळे २४ कोटी रुपयांचे उत्पन्न होत आहे. आंब्याचा महोर जळाल्यानंतर आंब्याच्या उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर घट होते. त्यामुळे जळणाऱ्या महोरावर संशोधन करण्यासाठी भरीव निधीची तरतूद करीत असल्याचे माननीय अर्थ मंत्री त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये घोषित करतील, अशी मी अपेक्षा करतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. दीपक केसरकर.....

अध्यक्ष महोदय, शिवसेना पक्षाकडून मी तिसरा वक्ता म्हणून बोलत आहे. मी कोकणातील प्रश्नांबाबत बोलत आहे. आपणही कोकणातील आहात. कोकणाकरिता निधी मिळण्यासाठी अन्याय होत असला तरी बोलण्यासाठी आपण मला न्याय द्याल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, मी माननीय वित्त मंत्र्यांचे सर्वप्रथम आभार मानतो. ज्यावेळेस माननीय मुख्यमंत्री कोकणामध्ये आले होते तेव्हा त्यांनी सिंधुरत्न योजनेची घोषणा केली होती. पूर्वीच्या योजनेचे २४० कोटी रुपये शासनाने परत घेतले आहेत. असे असताना दरवर्षी केवळ ५० कोटी रुपये दिले तर तीन वर्षात केवळ १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. याचा अर्थ जेवढे पैसे परत गेले आहेत तेवढे देखील परत मिळणार नाहीत. मी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करणार आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी इतर बजेटमधून निधी मिळत नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, ५० कोटी रुपयांऐवजी १०० कोटी रुपये दरवर्षी दिले तर येणाऱ्या तीन वर्षात ३०० कोटी रुपये मिळतील. यातून पर्यटन, शेती, बागा, गरीब महिला, तरुणांचा रोजगार यांच्यांकरिता निधी मिळू शकेल. माननीय अध्यक्षांनीही माननीय वित्त मंत्र्यांना बोलून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी १००-१०० कोटी रुपये निधी देण्याची विनंती करावी. ही बाब त्यांच्याकडून मान्य करावी.

अध्यक्ष महोदय, ज्यावेळेस राज्याचे उत्पन्न वाढविले जाते तेव्हा अर्थसंकल्प बळकट होऊ शकतो. माननीय वित्त मंत्र्यांनी तीन वर्षाकरिता स्टॅम्प ड्युटीमध्ये कर सवलत जाहीर केली आहे. राज्याचे उत्पन्न वाढले पाहिजे. याकरिता असलेल्या समितीचा मी सदस्य होतो. त्यावेळेस वर्ग – २ मधील जमिनी विविध सहकारी संस्थांना गृह बांधणीसाठी दिलेल्या आहेत. त्या जमिनींचे वर्ग – १ मध्ये रुपांतर करण्यासाठी २५ टक्के कर भरण्याची तरतूद केली होती. परंतु हे पैसे लवकर भरले जावेत, याकरिता असे ठरले की, पहिल्या तीन वर्षात ही रक्कम भरली तर ती २५ टक्क्यांने भरावी. अन्यथा चौथ्या वर्षापासून ६० टक्के रक्कम भरली पाहिजे. मागील

श्री. दीपक केसरकर.....

तीन वर्षे कोरोना काळात गेली आहेत. ज्याप्रमाणे स्टॅम्प ड्युटीकरिता मुदतवाढ दिली आहे त्याप्रमाणेच वर्ग – २ चे वर्ग – १ मध्ये रुपांतर करण्यासाठी तीन वर्षाची मुदत देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, कापूस, सोयाबिन पिकासाठी तीन वर्षाकरिता १ हजार कोटी रुपयांची घोषणा केली आहे. काजुपासून कोकणामध्ये ६ हजार ५०० कोटी रुपयांची उलाढाल होत असते. काजू पिकाला जर फ्लाऊरींग सिजनमध्ये पाणी दिले तर काजू पिकाचे दीड पट अधिक उत्पादन होऊ शकते. यासाठीही शासनाने अधिक निधी दिला पाहिजे. शासनाने काजू धोरणास मान्यता दिली तर राज्यातील उत्पन्नात दीड हजार कोटी रुपयांची वाढ होईल. मराठवाडा आणि कोकणातील विद्यापिठाला ५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. याबाबत मी माननीय वित्त मंत्री यांचे आभार मानतो. मी सभागृहास जाणीवपूर्वक सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा असल्यामुळे तेथे उद्योग येत नाही. ईको सेन्सिटीव्ह झोनकरिता जसे निर्बंध असतात, तसेच निर्बंध संपूर्ण देशात केवळ या जिल्ह्यात आहेत. असे असताना या अर्थसंकल्पामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाकरिता एकही घोषणा करण्यात आली नाही. माननीय पर्यटन मंत्री तरुण असून त्यांचे पर्यटनावर विशेष लक्ष असते. त्यामुळे राज्याचा विकास करीत असताना पर्यटनातील ठराविक भाग हा सिंधुदुर्ग जिल्ह्याकरिता राखीव ठेवावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील गोसीखूर्द, औरंगाबाद येथील जायकवाडी, पश्चिम महाराष्ट्रातील शिव-सागर प्रकल्पांबाबत घोषणा झाली आहे. परंतु कोकणातील एकाही जलक्रीडा प्रकल्पाची घोषणा झालेली नाही. तिलारी हा प्रकल्प गोवा राज्याच्या सीमेवर आहे. तेथे जल केंद्राची घोषणा व्हावी. एमआयडीसी जागा देत असल्यामुळे राज्यात औद्योगिक विकास झाला आहे. तसे धोरण पर्यटनाबाबत करण्यात यावे. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जैवविविधतेचे केंद्र आहे. त्यादृष्टीने कोकणात पाणबुडीची योजना जाहीर केली असून त्यासाठी निधीही दिला होता. मी माननीय

श्री. दीपक केसरकर.....

पर्यटन मंत्री आणि माननीय वित्त मंत्री यांना विंनती करतो की, त्यांनी या योजनेची तातडीने अंमलबजावणी करावी.

अध्यक्ष महोदय, किल्ल्यांचे संवर्धन करीत असताना मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले कोकण आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. विजयदूर्ग, सिंधुदुर्ग किल्ल्यांना निधी दिला आहे. याबाबत मी राज्य सरकारचे आभार मानतो. त्याचप्रकारे कोकणातील स्थानिक राजे, महाराजांचे किल्ले स्टेट एएसआय म्हणून घोषित केले आहेत. ते किल्ले डिनोटीफाय करुन त्यांचा पर्यटनाकरिता वापर झाला पाहिजे. यासाठी तातडीने कार्यवाही करावी. ज्याप्रमाणे राजस्थानमध्ये पर्यटन व्यवसाय वाढला आहे, त्याप्रमाणे कोकणामध्येही पर्यटन व्यवसाय वाढू शकेल.

अध्यक्ष महोदय, हायब्रीड ॲन्युईटीमध्ये प्रत्येक जिल्ह्याकरिता निधी मिळाला आहे. परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्याचे ५५० कोटी रुपये अद्यापपर्यंत खर्च होऊ शकले नाहीत. ज्यावेळेस माननीय वित्त मंत्री सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते, तेव्हा त्यांनी जाहीर केले होते की, याकरिता पर्यायी योजना दिली जाईल. परंतु आजपर्यंत तेथे पर्यायी योजना दिली नाही आणि या अर्थसंकल्पातही त्याची घोषणा झाली नाही. याबाबतचा विचार मंत्री महोदयांनी करावा, अशी मी विनंती करतो.

श्री. चौधरी.....

श्री.दीपक केसरकर.....

ि अध्यक्ष महोदय, सिंधुदुर्ग हा असा एकमेव जिल्हा आहे की ज्या जिल्हयामध्ये राष्ट्रीय महामार्गाचे १०० टक्के काम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे रायगडसोबतच सिंधुदुर्ग जिल्हयातून देखील कोस्टल हाय-वेचे काम सुरु केले तर पर्यटनाला गती मिळू शकेल. त्यामुळे या सूचनेचा विचार व्हावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक महसूल विभागामध्ये इनोव्हेशन हब देण्याचे मान्य केले आहे. त्याप्रमाणे कोकणात देखील द्यावे. तसेच पुणे जिल्हयासाठी बाय-पास रोडची घोषणा करण्यात आली आहे. आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयातून देखील राष्ट्रीय महामार्ग जातो. त्यासाठी देखील बाय-पास रोड मंजूर करावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाला मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. परंतु आमच्या जिल्हयातील मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलसंदर्भात केवळ शासन स्तरावर बैठक न झाल्यामुळे दोन वर्षांपासून काम रखडलेले आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात बैठक घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सर्वच सन्माननीय सदस्यांच्या दृष्टीने एक अतिशय महत्त्वाची घोषणा केली होती की, आमदार निधीमध्ये वाढ करुन ५ कोटी रुपये करण्यात येईल. माझी सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने विनंती आहे की, घोषणेप्रमाणे आमदार निधीमध्ये वाढ करुन ५ कोटी रुपये एवढा करण्यात यावा. धन्यवाद.

श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी पंतप्रधान पीक विमा योजनेचा उल्लेख केला व सांगितले की, योजनेमध्ये काही बदल करण्यासंदर्भात त्यांनी माननीय पंतप्रधानांना भेटून विनंती केली आहे. ती विनंती मान्य झाली तर ठीक आहे अन्यथा वेगळा विचार करण्यात येईल, असाही उल्लेख त्यांनी केला. सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य ग्रामीण भागातील आहेत व पीक विमा हा विषय सर्वांच्याच जिव्हाळ्याचा आहे. दिनांक २९ जून, २०२० प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अनुषंगाने एक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. या शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे सांगितले होते की, "काही वाद झाला, काही तक्रारी झाल्या व त्या २५ लाखांच्या वर असतील तर या बाबी राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे जातील." राज्य सरकारने आणि खासकरुन माननीय कृषी मंत्री यांनी हा विषय व्यवस्थित समजून घ्यायला हवा होता. तसे झाले असते तर माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांना ज्याप्रमाणे मोठया प्रमाणात पीक विमा मिळाला तसाच पीक विमा आता देखील मिळाला असता.

अध्यक्ष महोदय, सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे राज्य तक्रार निवारण समितीची बैठकच घेण्यात आलेली नाही. २५ लाख रुपयांपेक्षा जास्त नुकसानीच्या संदर्भात तक्रारी असतील तर सचिवांनी बैठक घेतली पाहिजे व बैठकीत होणारा निर्णय सर्व घटकांना मान्य असेल, असेही शासन निर्णयामध्ये नमूद आहे. विमा कंपन्यांना या समितीचा निर्णय कळविला तर तो त्यांना मान्यच करावा लागतो. परंतु दुर्दैवाने आजपर्यंत राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीची एकही बैठक घेण्यात आलेली नाही. त्यामुळे माननीय अर्थमंत्र्यांना माझी विनंती आहे की, राज्य तक्रार निवारण समितीच्या संदर्भातील या विषयाकडे आपण विशेष लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, काही जिल्हयांमध्ये महिला रुग्णालये तर काही ठिकाणी महिला व शिशु रुग्णालये स्थापन करण्यासंदर्भात माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या

श्री.राणाजगजितसिंह पाटील.....

भाषणात घोषणा केली. त्यामध्ये काही ठिकाणी नवीन बांधकाम केले जाणार आहे तर काही ठिकाणी श्रेणीवर्धन केले जाणार आहे. यामध्ये एकूण १८ जिल्हयांचा समावेश आहे परंतु यात उस्मानाबाद जिल्हा नाही. उस्मानाबाद येथे केवळ ६० खाटांचे स्त्री-रुग्णालय आहे. माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना कल्पना आहे की, या ठिकाणी २०० खाटांचे रुग्णालय व्हावे अशी आमची मागणी आहे. या रुग्णालयामध्ये सर्वसाधारणपणे १५० च्या आसपास महिला रुग्ण ॲडमिट असतात परंतु केवळ ६० खाटा असल्यामुळे उर्वरित महिलांवर जमिनीवर गादी अंथरुण उपचार केले जातात. त्यामुळे माझी आग्रहाची विनंती आहे की, उस्मानाबाद जिल्हयाचा देखील यामध्ये समावेश करुन २०० खाटांच्या रुग्णालयास मान्यता द्यावी.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. राणा जगजितसिंह पाटील...

उस्मानाबादच्या मेडिकल कॉलेजच्या बाबतीत अर्थमंत्री उस्मानाबादला आले होते तेव्हा काही प्रमाणात चर्चा झाली होती. साधारणपणे या वित्तीय वर्षात ९ कोटी ४० लाख रुपये इतकी तरतूद यासाठी करण्यात आली आहे. परंतु यामध्ये काहीच होणार नाही. त्या ठिकाणी इमारत बांधायची आहे, नवीन जागा ठरवायची आहे. म्हणून माझी विनंती आहे की, या प्रकल्पासाठी अधिकचा निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा. बारामतीमध्ये मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलची अतिशय चांगली इमारत बांधण्यात आली आहे. त्याच धर्तीवर उस्मानाबादला देखील मेडिकल कॉलेजची इमारत आणि नवीन हॉस्पिटल बांधण्यात यावे, अशी मागणी मला या निमित्ताने करायची आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्याला कल्पना आहे की, राज्य मंत्रिमंडळामध्ये उस्मानाबादचे ३ जावई आहेत. आपल्याला याचीही कल्पना आहे की, उस्मानाबाद जिल्ह्यातील ४ विधानसभा सदस्यांपैकी ३ जण सत्ताधारी पक्षाचे आहेत. तरी देखील उस्मानाबाद जिल्ह्याकडे दुर्लक्ष होते, ही खंत मला व्यक्त करायची आहे. उस्मानाबाद जिल्ह्यासाठी महत्त्वाची बाब म्हणजे सोलापूर, तुळजापूर, उस्मानाबाद ही रेल्वेलाईन सुरू करायची आहे. या ठिकाणी उपस्थित माननीय संसदीय कार्यमंत्री यांना याची पूर्ण कल्पना आहे. माननीय देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली होती. यामध्ये ५० टक्के हिस्सा राज्य शासन उचलेल, असे केंद्रीय रेल्वे मंत्री पियुष गोयल यांना लेखी स्वरुपात कळविले होते. आपल्या राज्याच्या परिवहन खात्याच्या सचिवांनी रेल्वे बोर्डाला कळविले होते. आतापर्यंत केंद्र सरकारने ३२ कोटी रुपये दिले आहेत. परंतु राज्य शासनाने एक रुपयाचीही तरतूद केली नाही. म्हणून या निमित्ताने माझी आग्रहाची मागणी आहे की, राज्य शासनाने आपला मॅचिंग शेअर द्यायला हवा. परंतु राज्य सरकारने यासाठी एकही रुपयाची तरतूद केलेली नाही. माननीय वित्तमंत्र्यांनी उल्लेख केला की, अहमदनगर, बीड, परळी वैजनाथ, वर्धा, यवतमाळ, नांदेड या विविध रेल्वे मार्गांचा उल्लेख केला. अनेक बाबतीत त्यांनी तरतूदही केली.

तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपले अजून १० वक्त भाषण करण्याचे शिल्लक आहेत.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महोदय, मी फक्त मुद्देच मांडतो. दुसरा विषय कौडगावच्या एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राचा आहे. २५०० एकरची एमआयडीसी आहेत तेथे मान्यता मिळाली होती. त्या ठिकाणी दीड हजार जमीन उपलब्ध आहे. तेथे ५० मेगावॅटचा प्रकल्प माननीय श्री. अजित पवार यांनी काही वर्षांपूर्वी मान्य केला होता. सन २०१९ मध्ये त्या प्रकल्पाचे काम सुरू झाले होते. २ वर्षे होऊन गेले तरी अजूनही काम सुरूच आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाची खूप मोठी गुंतवणूक झाली आहे. परंतु उद्योग खात्याचे मंत्री कधी उस्मानाबादला आलेले नाहीत. खूप आग्रह करुन त्यांनी बैठकही घेतली नाही. तेथे टेक्निकल टेक्सटाईल पार्क उभारण्यासाठी केंद्र सरकार तयार आहे. परंतु राज्य शासनाकडून प्रस्तावच जात नाही.

अध्यक्ष महोदय, शेवटचा मुद्दा असा आहे की, श्री संत जगनाडे महाराजांच्या समाधी स्थळासाठी माननीय वित्तमंत्र्यांनी १० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तेर येथे संत श्रेष्ठ गोरोबा काका महाराज यांचे मंदिर आहे. तेथे विकास कामे सुरू आहेत. परंतु निधी कमी पडत आहे. त्यासाठी वित्तमंत्री महोदयांनी अधिकचा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

श्री अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ के लिए एक अच्छा अर्थसंकल्प महाविकास आघाडी की सरकार ने पेश किया है. उस अर्थसंकल्प पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, पिछले तीन दिनों से मैं रोज सुबह आता हूं और शाम तक यह सोचकर बैठता हूं कि बोलने के लिए अब अपना समय आएगा. आज सुबह से काँग्रेस पक्ष की ओर से बोलने वाला मैं पहला वक्ता हूं और पूरे बजट सत्र में बोलने वाला मैं तीसरा वक्ता हूं. ये मिलीजुली सरकार है, महाविकास आघाडी की सरकार है. थोड़ासा ॲडजस्टमेंट करना पड़ता है. पिछले १२ साल से हम इस विधानसभा में आते है. एक अच्छा बजट, One of the best budget, पंचसुत्री डेवलपमेंट का बजट वित्त मंत्री सम्माननीय श्री अजित दादा पवार जी ने इस सदन में पेश किया है. मुझे पूरा विश्वास है कि सम्माननीय मंत्री श्री अजित दादा पवार जी ने जो यहां पर कहा है कि पंचसुत्री ऑफ डेव्हलपमेंट जिसमें चार लाख करोड़ रुपये तीन साल में आने वाले है. वह इन पांच सेक्टरों में खर्चा होगा. वह खर्चा पक्का होगा. हमारे प्रदेश को वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमि होने से कोई ताकत रोक नहीं पाएगी. इस पर मुझे पूरा भरोसा है. बजट पर बोलने के लिए मेरी बहुत तैयारी थी, लेकिन समय बहुत कम बचा है. मैं ज्यादा विस्तार से न बोलते हुए केवल मुद्दों पर ही फोकस करुंगा.

अध्यक्ष महोदय, मेरे पास कुछ डेटा है. यह मेरा डेटा नहीं है, महाराष्ट्र विकास आघाडी सरकार का डेटा नहीं है. जो प्राईव्हेट पीआरएस लेजिस्लेटीव रिसर्च सेंटर है उसका डेटा मेरे पास है. यह एक बहुत ही बेहतरीन आऊट ले है. पुलिस विभाग में ३० प्रतिशत ज्यादा खर्च करने का प्रोविजन है. अलग अलग सेक्टर है. एज्युकेशन विभाग में, स्पोर्टस विभाग में १२ प्रतिशत, पिछले साल के मुकाबले ज्यादा खर्च करने की बात है. ॲग्रीकल्चर विभाग में १० प्रतिशत ज्यादा खर्च करने की बात है. हेल्थ और फॅमिली वेलफेअर विभाग में खर्च करने की बात है. पिछले साल के मुकाबले में १३ प्रतिशत कम आऊट ले है. मेरे पास कुछ डेटा है, वह मैं सदन के सामने रखना चाहता हूं. ४.४ प्रतिशत ऑफ दी आऊट ले हम हेल्थ पर खर्चा करने जा रहे है. हम जो खर्चा करने की बात कर रहे है, वह प्रति व्यक्ति १,५२० रुपये खर्चा

श्री अमिन पटेल.....

करने हम जा रहे है. सम्माननीय दादा, यह बात सदन के सामने रखने में मुझे बड़ा अफसोस होता है. लेकिन मजबूरी है. अगर मैं यह बात नहीं कहूंगा तो मैं अपने साथ ही नहीं, तो महाराष्ट्र के हजारों मरीज जो जे.जे. हॉस्पिटल में इलाज के लिए आते है, उनके साथ नाइंसाफी करुंगा. मैं आपके साथ यह बात बहुत जिम्मेदारी के साथ रखना चाहता हूं. मुंबई में जो जे.जे.हॉस्पिटल है, उसमें आज बॅण्डेज, ग्लोव्हज, पॅरासिटामोल नहीं है. हर दवाई मरीज को बाहर से लानी पड़ती है और एक किऑस, एक ऐसा माहौल वहां पर बन गया है कि गरीब आदमी के आँखो से आँसु के अलावा कुछ निकल नहीं रहा है. विभाग की मांग थी कि मेडिसीन के लिए ४५० करोड़ रुपये दिए जाने चाहिए. इस बजट में केवल १५० करोड़ रुपये मेडिसीन के लिए रखे गए है. सम्माननीय दादा, मेरी आपसे नम्र विनती है कि आप इसको रिकंसिडर किजिए और दवाई के लिए जो ४५० करोड़ रुपये महाराष्ट्र में देने की बात है, वह ४५० करोड़ रुपये आपने दवाई के लिए देना चाहिए. वह दिन दूर नहीं है कि जब मुझे लोगों के लिए जे.जे. हॉस्प्टिल में भूख हड़ताल के लिए बैठना पड़ेगा. आज का दौर वहां पर बहुत खराब चल रहा है. वहां पर बिल्कुल दवाई नहीं है. ये क्यों हो गया है, इसकी वजह क्या है? हाफकिन को दवाई खरीदने के लिए एक प्रोसीजर तय हुआ है. आज हाफकिन दवाई खरीदती नहीं है. वर्क कॉन्ट्रैक्ट से दवाई खरीदी जा सकती है. जो रेट फाइनल होगा उससे डीन या हॉस्पिटल दवा खरीद सकता है. हाफकिन दवा खरीदने के बारे में ॲब्स्युलेटली फेल, टोटली फेल हो गया है. वित्त मंत्री सम्माननीय श्री अजित दादा से मेरी विनती है. सम्माननीय मंत्री श्री अमित देशमुख जी सदन में उपस्थित नहीं है. ये दवाई खरीदने के लिए पैसे और चेंज हाफकिन से हटाकर रेट कॉन्ट्रैक्ट करने की जरुरत है. यदि हम ऐसा नहीं करते है, हेल्थ सेक्टर पर यदि हम ध्यान नहीं देते है, तो आने वाले दिनों में केवल जे.जे. हॉस्पिटल ही नहीं, तो पूरे महाराष्ट्र के हॉस्पिटल्स कोलॅप्स हो जाएंगे, दवाई नहीं मिलेगी. उसके लिए हमें कोई निर्णय लेना होगा. हेल्थ पर कम खर्चा हो रहा है. यह बात मैंने बतायी है.

...इसके बाद श्रीमती करंदीकर

श्री अमिन पटेल....

अध्यक्ष महोदय, मायनॉरिटी के बारे में सम्माननीय दादा ने अच्छे निर्णय लिए है. ६७७ करोड़ रुपये का प्रावधान इस बजट में किया गया है. पिछली बार का पैसा खर्च नहीं हुआ है. मायनॉरिटी विभाग को कम से कम एक हजार करोड़ रुपये देने की जरुरत है, ताकि उसकी सारी योजनाएं अमल में आ सके.

अध्यक्ष महोदय, मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल के ५०० करोड़ रुपये की बात बजट में हुई. लेकिन मुझे सदन में बताने में बड़ा खेद होता है कि मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल के पिछले पांच साल और ये दो साल, ऐसे कुल सात साल में एक रुपये का भी लोन लोगों को दिया नहीं गया है. जो छोटे व्यापारी है, ५० हजार रुपये, १-२ लाख रुपये का कर्जा मिलता था, उनको अब बिजनेस के लिए एक रुपये का भी कर्ज पिछले सात सालों में नहीं दिया गया. आज जो पैसा दिया जा रहा है वह कम है. मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल को और भी ज्यादा पैसा दिया जाना चाहिए. छोटे और बड़े बिजनेस लोन जल्द से जल्द शुरु करने चाहिए.

अध्यक्ष महोदय, जो मोन्युमेंट है, उसके लिए इस बजट में बड़ा फंड दिया गया है, देना भी चाहिए. यह जरुरी बात है. जो ऐतिहासिक स्थल है, पर्यटन स्थल है, उसके लिए पैसा दिया जाना चाहिए. मैं बड़ी खुशी के साथ कहना चाहता हूं कि हाजीअली दरगाह के परिसर में ब्युटीफिकेशन के लिए एक आराखड़ा तैयार हुआ है, आर्किटेक्ट श्री आबा लांबा को नियुक्त किया गया है और वह काम हो रहा है. लेकिन उसके साथ साथ ऐसे कई पर्यटन स्थल है जहां पर सभी मजहब के लोग, सभी धर्म को मानने वाले लोग आस्था के साथ वहां जाते है. जहां पर बाबा हजरत शाह का दरगाह है, मेरे इलाके में हाजी अब्दुल बाबा का दरगाह है. मगदूम शाह माहिमी का माहिम में दरगाह है. यहाँ पर सभी मजहब के लोग आते है. सदन के माध्यम से माननीय उप मुख्यमंत्री जी से मेरी विनती है कि जिस तरह से अन्य मोन्यूमेंट के लिए पैसा दिया गया है, उसी तरह मुंबई में और विशेषकर नागपुर में बाबा ताजुद्दीन का दरगाह है, वहां पर स्पेशल प्रोविजन करके फंड देना चाहिए.

श्री अमिन पटेल....

अध्यक्ष महोदय, आरक्षण की बात होती है. मराठा को आरक्षण मिलना चाहिए. इस बात से हम पूरी तरह से सहमत है. ओबीसी को पॉलिटीकल आरक्षण मिलना चाहिए, उसके लिए हम आपके साथ में है. लेकिन मुंबई उच्च न्यायालय ने मायनॉरिटीज को, जो स्पेशियली इकॉनॉमिकली बैकवर्ड है, उनको एज्युकेशन में आरक्षण देने की बात की है. पिछले दो साल में इस पर इस सदन में चर्चा नहीं हो रही है. मेरी सरकार से विनती है कि जो सोशली इकॉनॉमिकली बैकवर्ड है, उनको आरक्षण मिलना चाहिए. मैं धर्म के नाम पर आरक्षण नहीं मांगता हूं. धर्म के नाम पर आरक्षण नहीं मिल सकता. यह बात सदन और समाज भी जानता है. लेकिन जो सोशली इकॉनॉमिकली बैकवर्ड है, जिसके पास अपने बच्चे को खिलाने और पढ़ाने के लिए पैसा नहीं है, उनको एज्युकेशन में आरक्षण देने की बात मुंबई हाई कोर्ट ने की है. उस बात को ध्यान में रखते हुए इनको आरक्षण दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, कल एक लक्षवेधी के माध्यम से मैंने सम्माननीय श्री अजित दादा जी से बात कही थी और उनकी बात से मुझे ऐसा लगता है कि बजट का जवाब देते समय मुंबई की जर्जर इमारतों पर उनकी नजर जाएगी. मुंबई हो, महाराष्ट्र हो या देश हो, हर चीज पर उनकी पूरी नजर है. मुंबई में जो १६ हजार इमारते जर्जर हालात में है, उसके लिए १०० करोड़ रुपये का बजट है. मुझे पूरी उम्मीद है कि सम्माननीय दादा जब इसका जवाब देंगे तो उसमें म्हाडा को पुरानी इमारतों की मरम्मत के लिए, रिपेअर के लिए कम से कम २५० करोड़ रुपये इस बजट में देंगे.

अध्यक्ष महोदय, पर्यावरण विभाग के सम्माननीय मंत्री सदन में उपस्थित है. मैंने देखा है कि मुंबई में सी-लिंक क्रॉस करने के बाद वर्ली में आने पर ऐसा लगता है कि हम ठाकरे मतदार क्षेत्र में आ गए है. वहां बहुत अच्छा काम हो रहा है. मैं सम्माननीय मंत्री श्री आदित्य ठाकरे जी से कहना चाहता हूं कि पिछली सरकार के माननीय मंत्री श्री जयकुमार रावल जी के पास मैंने एक प्रपोजल दिया था. महात्मा ज्योतिबा फुले मार्केट से लेकर गेट वे ऑफ इंडिया तक का जो पूरा परिसर है, वह एक ऐतिहासिक परिसर है, सिस्टर सिटी है. लंदन में आप और हम जाते है तो देखते है.

श्री अमिन पटेल....

"लंडन आय" जैसा "मुंबई आय" होना बहुत जरुरी है. चाहे फिर वह चौपाटी पर करें, बांद्रा में करें या जहां भी करना है, मुंबई में वह चीज होनी चाहिए. विशेषकर महात्मा ज्योतिबा फुले मार्केट से लेकर गेट वे ऑफ इंडिया तक जो हेरिटेज इमारते है, वहां लाईटींग वगैरह करके एक अच्छा काम किया जाना चाहिए. डिजिटल टेक्नोलॉजी होती है, स्कॅन करके वह चीज वहां पर आती है. वह चीज वहां पर होनी चाहिए. पर्यावरण और पर्यटन को ध्यान में रखते हुए वहां पर कुछ करना बहुत जरुरी है. पर्यटन को लेकर मुंबई में करोड़ों डॉलर का इन्वेस्टमेंट हो सकता है. जैसे कि एअर इंडिया की बिल्डिंग है, एम्पायर इस्टेट बिल्डिंग न्यूयार्क में है. उसकी गैलरी है. ये सब चीज हम बना सकते है जिससे बड़ा रेवेन्यू मिल सकता है और ये आकर्षित हो सकता है.

अध्यक्ष महोदय, पर्यटन के बारे में मुंबई के विधायकों के साथ एक बैठक ली जाएगी, तो हमारे जो मत है वह हम आपको अच्छी तरह से दे सकेंगे. आपने मुझे बहुत सुकून से बोलने दिया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं. जय हिंद, जय महाराष्ट्र.

...यानंतर श्रीमती गिरप

श्री.राजेश पवार (नायगांव): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वप्रथम मी आपल्याला विनंती करतो की, आपण मला बोलण्याकरिता किमान ५ मिनिटांचा कालावधी द्यावा. माझे नाव राजेश पवार आहे. मी जेव्हा कोणालाही माझे नाव सांगतो तेव्हा लोक असे म्हणतात की, सरकार पवारांचे आहे तर, तुम्हाला काही अडचण नाही. मी सरकार मधील पवार जरी नसलो तरी माझ्या नावामुळे मला एखाद्या एक्स्ट्रा मिनिटाचा फायदा द्यावा.

अध्यक्ष महोदय, माझे सर्व प्रश्न हे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी संबंधित आहेत. सन्माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मला त्यांना हे सांगावयाचे आहे की, या अर्थसंकल्पामध्ये ३ लाख, ३० हजार रोजगार निर्मिती करणार असे उद्दिष्ट आपण जाहीर केलेले आहे. 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' हा उपक्रम करणार असल्याबाबतही आपण सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, विदर्भ व मराठवाड्यामध्ये कमीत कमी २००-२५० एवढ्या छोट्या लोकसंख्येचे गाव असले तरी, तेथील कमीत कमी १०० युवक हे पुणे, मुंबई, हैदराबाद या ठिकाणी नोकरीकरिता असतात. त्यांना फक्त १० ते १२ हजार एवढे वेतन मिळते. त्यामुळे त्यांचे पूर्ण वेतन हे त्या ठिकाणी राहणे, खाणे व वर्षातून २ वेळा गावी येण्यामध्ये जाते.

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगू इच्छितो की, आपले जे उद्दिष्ट आहे, आपण जे नवीन उद्योग आणणार आहात ते विदर्भ, मराठवाड्यातील जे नांदेड, लातूर, परभणी, वाशिम, अकोला असे जिल्हे आहेत, अशा ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये पुनर्वसन व्हावयाचे खूप गाव आहेत. ही पुनर्वसनाची कामे कागदोपत्री जास्त झालेली आहेत त्यासाठी तसेच, माझ्या मतदारसंघात बंजारा समाज मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आपण या मंत्रालयाला

श्री.राजेश पवार...

पुनर्वसन व तांडा वस्तीसाठीचा अधिकचा निधी द्यावा, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागामध्ये ज्या घरकुल योजना केल्या जातात त्याकरिता सर्व मिळून दीड लाख रुपये दिले जातात. शहरी भागात अडीच लाख रुपये दिले जातात. परंतु, ही तफावत अन्यायपूर्ण आहे. जेवढा खर्च शहरामध्ये येतो, तेवढाच खर्च हा ग्रामीण भागामध्ये येतो. त्यामुळे आपण केंद्र शासनाच्या माध्यमातून किंवा केंद्र व राज्य शासन मिळून ग्रामीण भागामध्ये देखील घरकुल बांधणीसाठी किमान अडीच लाख रुपये द्यावेत, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, लंडन... मुंबई, रिंगरोड, कोस्टल रोड, ॲक्वेरिअम अशा बऱ्याच गोष्टी शहराकरिता होत आहेत. परंतु, ग्रामीण भागामध्ये जेव्हा एखाद्या कुटुंबामध्ये एखादे लग्न होते, त्यावेळेस ते कुटुंब कमीतमी १० ते १५ वर्षे मागे जाते. कारण त्यांना एक तर जमीन विकावी लागते किंवा सावकाराकडून खाजगी कर्ज घ्यावे लागते व हे कर्ज ते २०-२० वर्षे फेडू शकत नाहीत. त्यामुळे मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील प्रत्येक गावामध्ये आपण किमान २ हजार सर्वसामान्य लोकांना लग्नकार्याकरिता, धार्मिक कार्याकरिता उपयोगी पडेल असे सभागृह बांधावे. त्याकरिता कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी महानायक श्री.अमिताभ बच्चन यांच्या 'बागवान' या सिनेमातील काही ओळी आपल्याला वाचून दाखवतो. हा अत्यंत गंभीर मुद्दा आहे. त्या सिनेमातील एका गाण्यातील ओळी अशा आहेत की,"बाग को जन्म देने वाला बागवान, परिवार को जन्म देने वाला पिता, दोनों ही अपने खून-पसीने से अपने पौधों को सींचते है. न सिर्फ अपने पेड़ से, बल्कि उसके साये से भी प्यार करते है. क्योंकि उसे उम्मीद है कि एक रोज जब वह जिंदगी से थक जाएगा, तो वही साया उसके काम आएगा."

श्री.राजेश पवार ...

अध्यक्ष महोदय, मी हेच मराठीमध्ये देखील सांगतो,

तुझ्या-माझ्या संसाराला आणि काय हवे,

तुझ्या-माझ्या लेकराला घरकुल नवे

अध्यक्ष महोदय, यातील घरकुल माननीय श्री.नरेंद्र मोदिजींनी दिले आहे.

नव्या घरामंदी नवीन काय घडले,

घरकुलासंग समद वेगळ हुईल,

दिस जातील, दिस येतील,

भोग सरल, सुख येईल.

अध्यक्ष महोदय, आईवडिलांच्या मुलांकडून अपेक्षा असतात. त्यांना असे वाटते की, माझा वाईट काळ येईल तेव्हा माझ्याकडे कोणीतरी लक्ष देईल. परंतु, आता ग्रामीण भागामध्ये प्रत्येक गावामध्ये वृध्दाश्रम स्थापन करण्याची वेळ आलेली आहे. आम्ही गावामध्ये जातो तेव्हा वयोवृध्द स्त्री-पुरुषांची एकच मागणी असते की, आम्ही ६० वर्षांचे आहोत आम्हाला काही पैसे द्यावेत. आम्ही त्यांना विचारतो की, तुम्हाला मुले नाहीत का, तर ते म्हणतात की, मुले आहेत, परंतु त्यांना जाळता काय? याचा अर्थ ग्रामीण भागातील आईवडिलांकडे मुले आता लक्ष देत नाहीत. माझी विनंती आहे की, आपण ग्रामीण भागातील ६० वर्षांच्या प्रत्येक वयोवृध्दांना पेन्शन देण्याबाबत विचार करावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

श्री.अशोक पवार (शिरुर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्याकरिता व त्याला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे उप मुख्यमंत्री माननीय श्री.अजित पवार यांनी एक सुंदरसा अर्थसंकल्प मांडलेला आहे. माझ्या मतदारसंघामध्ये स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक आहे. वडु व तुळापूर या दोन गावांसाठी सुमारे २५० कोटी रुपये शासनाने जाहीर केले आहेत, त्याकरिता मी माननीय श्री.अजित पवार यांना माझ्या मतदारसंघातील तमाम जनतेच्यावतीने मनापासून धन्यवाद देतो.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.अशोक पवार...

भूविकास बँकेच्या कर्जदार शेतकऱ्यांच्या ९६४.१५ कोटी रुपये कर्जास आघाडी सरकारने कर्जमाफी दिली, हे फार मोठे काम केले आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी फळबाग लागवड योजना आणली होती. त्यामध्ये काही फळ पिकांचा समावेश करणे त्यावेळी राहून गेले होते. त्यामध्ये आता उदा.द्राक्ष, ड्रॅगन फळ, मसाले व इतर महत्त्वाच्या फळांचा समावेश केला आहे, त्याबद्दल मी महाविकास आघाडी सरकारला मनापासून धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, आमच्या परिसरामध्ये बैलगाडा शर्यतीला फार महत्त्व दिले जाते. ती पुन्हा सुरु करण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्री व महाविकास आघाडी सरकारने माननीय सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन प्रयत्न केले. या प्रकरणी माननीय खासदार श्री.अमोल कोल्हे यांनी सातत्याने लोकसभेत सातत्याने पाठपुरावा केला आहे. सदरहू शर्यत सुरु करण्यास यश मिळाले आहे. याबद्दल मी महाविकास आघाडी सरकारचे मनापासून अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, कोविड काळात माननीय आरोग्य मंत्री श्री.राजेश टोपे यांनी चांगले काम केले आहे. पुणे जिल्ह्यातील पुनावाला यांनी कोविड लस निर्मिती केली आहे. त्यांच्या नावाची भारतरत्न पुरस्कारासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मला दोन तीन मिनिटे वेळ वाढवून द्यावा ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे शहराजवळ ३०० एकर जागेत इंद्रायनी मेडीसीटी उभारण्याचे सरकारने जाहीर केले आहे. याचा फायदा संपूर्ण परिसर व राज्यातील सामान्य जनतेला होणार आहे. आरोग्य सेवा क्षेत्रात पुढील ३ वर्षात ११ हजार कोटी रुपये खर्च करण्याचा सरकार प्रयत्न करणार आहे. हा आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

श्री.अशोक पवार...

अध्यक्ष महोदय, पंडीत रमाबाई शताब्दी महिला उद्योजक योजना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येईल. आता मी माझे भाषण कमी करुन केवळ सूचना मांडतो.

अध्यक्ष महोदय, शासन अनेक वेळा शासन निर्णय निर्गमित करते त्यामध्ये आमदार महोदयांची नावे नसतात त्यांच्या नावाचा त्यामध्ये समावेश करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी माझे भाषण वेळे अभावी पूर्ण करतो. धन्यवाद !

तालिका सभाध्यक्ष : आता विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचा २ मिनिटे वेळ शिल्लक आहे. तेवढया वेळेत त्यांनी त्यांचे भाषण पूर्ण करावे. वेळ वाढविणे तालिका सभाध्यक्षांच्या अधिकारात नाही. यासंदर्भात सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्य यांनी निर्णय घ्यावयाचा असतो.

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा करण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, मातृत्व अनुदान योजनेवर मी बोलणार आहे. प्रत्येक स्त्रीचे माता होण्याचे स्वप्न असते. परंतु काही स्त्रिया माता होऊ शकत नाहीत. पुणे येथील गॅलेक्सी केअर येथे भारतातील पहिली युट्रस ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया करण्यात आली असून यामुळे ४० ते ४५ महिला माता होऊ शकल्या आहेत. या शस्त्रक्रियेचा खर्च प्रत्येक मातृत्वापासून वंचित राहणाऱ्या महिलांना झेपू शकत नसल्याने गर्भाशय ट्रान्सप्लांटसाठी विशेष निधीची तरतूद करण्यात यावी. जेणेकरुन त्याचा लाभ माता न होऊ शकणाऱ्या अनेक महिलांना होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ व माननीय मंत्री श्री.धनंजय मुंडे यांना पत्र देऊन तृतीय पंथीयांना ओळख पत्र देण्यात यावे व रेशन कार्ड देण्यात यावे, अशी विनंती केली होती. त्यासाठी त्यांनी तरतूद केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.चिंमणराव पाटील (एरंडोल) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये राज्याचा.....

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य माननीय ॲड.अनिल परब यांच्या भोवती एकत्र उभा थांबलेले आहेत, याचा अर्थ त्यांची काही तरी मागणी असावी, असे मला वाटते. अर्थसंकल्पावरील चर्चेची वेळ वाढविण्याबाबतची मागणी असेल तर ती मान्य करणे आवश्यक आहे. याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार सभागृहाला आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम २४५, २४६, २४७, २४८ या नियमानुसार अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा ही ६ दिवस होणे आवश्यक आहे. आपण यावर उत्तर द्याल की, आपल्या काळामध्ये ६ दिवस चर्चा केलेली आहे काय? तुमचे आणि आमचे करणे हे महत्त्वाचे नाही. कारण तेव्हा अशा प्रकारच्या चर्चेची कोणी मागणी केली नसावी. आता चर्चेसाठी अनेक सन्माननीय सदस्य तयार आहेत. त्यामुळे आपण वेळेचे नियोजन करणे आवश्यक आहे. आपण कायद्याच्या बाहेर जाऊन नियोजन करतो, हे मला मान्य आहे. ६ दिवसांऐवजी दोन दिवसच चर्चा का करीत होतो, कारण सर्वसाधारण चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्य भाग घेत नव्हते. अर्थसंकल्पाचा पूर्ण अभ्यासकरुन त्यावर मत व्यक्त करण्यास अनेक सन्माननीय सदस्य तयार नव्हते. त्यामुळे ६ दिवस होणारी चर्चा आपण दोन दिवसांमध्ये पूर्ण करीत होतोत. परंतु आता जनहितासाठी प्रश्न मांडण्याची सन्माननीय सदस्यांची इच्छा असेल तर त्यांच्या इच्छा व आकांक्षाचा गौरव, सत्कार व सन्मान करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता श्री.देवेंद्र फडणवीस यांनी अमूक वेळ चर्चा केली. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी अमूक वेळ चर्चा केली. आम्ही चर्चा केली म्हणजे संविधानाच्या बाहेर जाऊन केली आहे काय? ६ दिवस चर्चा असताना देखील आम्ही आमचे मत मांडायचे नाही काय?

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

वेळेच्या चौकटीमध्ये जनतेचे प्रश्न गुदमरुन जातील, असे मला वाटते. विनंती करीत असलेल्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. मागणी करीत असलेले सन्माननीय सदस्य आमच्या पक्षाचे नाहीत. तरी देखील मी त्यांची बाजू घेत आहे. विधानसभा नियम २४६ (२) मध्ये असे नमूद केले आहे की, "अध्यक्षांना योग्य वाटेल तर, त्यांना, भाषणांसाठी कालमर्यादा विहित करता येईल."

अध्यक्ष महोदय, आपण अशा प्रकारचे प्रश्न अनेक वेळा उपस्थित केलेले आहेत. आता आपण अध्यक्ष पदावर बसलेले आहात, सन्माननीय सदस्यांना न्याय देण्याची आपली भूमिका आहे. अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी तयार आहेत. त्यामुळे त्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी, अशी मी विनंती करतो. आम्ही जास्त वेळ घेतला म्हणून आपण त्यांना बोलण्यापासून वंचित ठेवू नका. आमच्यामुळे त्यांना बोलण्यापासून वंचित ठेवत असाल तर आम्ही आमची भाषणे बंद करु.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार आपण बराच वेळ मार्गदर्शन केले आहे. परंतु तालिका सभाध्यक्ष म्हणून माझे मत ऐकाल काय? आपण विधानसभा नियम २४५,२४६ व २४७ या नियमांचा मला दाखला दिलेला आहे. त्याचे उत्तर मी देऊ इच्छितो. आता माझ्या हातामध्ये विधानसभा नियमाचे पुस्तक नाही, तरी देखील मी आपणास उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देऊ इच्छितो. अर्थसंकल्पावर ६ दिवस सर्वसाधारण चर्चा करण्याचा नियम असला तरी ती चर्चा दोन दिवसांमध्ये पूर्ण करण्याबाबत माननीय श्री.अजित पवार यांनी विधानसभा नियम ५७ अन्वये नियम स्थगित करण्याचा प्रस्ताव मांडला होता आणि त्यास सभागृहाने एकमताने मान्यता देखील दिलेली आहे. त्यामुळे यावर भाष्य करण्याची आवश्यकता नाही, असे मला वाटते. अशी परिस्थिती उद्भवणार हे मला माहिती होते. म्हणून मी माननीय संसदीय कार्य मंत्री व आपणास एकत्र बसून वेळेचे नियोजन करावे, असे सांगितले होते. कारण शेवटच्या वक्त्याला भाषण करण्यासाठी वेळ मिळत नाही. अनेक सन्माननीय सदस्य आज वेळ मिळेल उद्या वेळ मिळेल, या आशेवर भाषण करण्यासाठी तयारी करुन येतात. परंतु त्यांना संधी मिळत नाही.

तालिका सभाध्यक्ष.....

माझे मित्र डॉक्टरसाहेबांनी खाली बसून माझ्याबद्दल टिप्पणी केली. आपण खाली बसून अशा प्रकारची टिप्पणी करु नका, असे सांगत होतो, तेवढ्यात आपण माझ्यावर उसळून उठलात. शेवटी काय होणार हे माहिती असल्यामुळे मी शांतता घेतली.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

तालिका सभाध्यक्ष.....

सभागृहाच्या ट्रेझरी बाकावरील सन्माननीय सदस्य, मंत्री महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री, गट नेते जो निर्णय घेतील तो निर्णय आणि त्यावेळेचे नियोजन करणे, हे पिठासीन अधिकाऱ्याच्या खुर्चीचे काम आहे. त्याप्रमाणे माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी अडीच तासांचा वेळ वाढवून दिला आहे. त्यांनी याबाबत सांगितले की, या अडीच तासांच्या वेळेमध्ये निम्मावेळ विरोधी पक्षाकरिता आणि निम्मा वेळ सत्तारुढ पक्षाला दिला पाहिजे आणि एक तास माझ्या उत्तराकरिता ठेवण्यात यावा. ते दुपारी २.०० वाजता उत्तर देण्यासाठी उभे राहणार होते. परंतु मी सांगू इच्छितो की, पहिले वक्ते २६ मिनिटे बोलेले होते. त्यावर मी काहीही बोललो नाही. मी आपणास पूर्णवेळ दिला आहे. मी पलिकडच्या सन्माननीय सदस्यांनाही बोलण्यासाठी वेळ दिला आहे. आता माननीय अर्थमंत्री दोन वाजता भाषणास सुरुवात करणार होते. म्हणून शेवटचा एकेक मिनिट मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी देत होतो व ठीक २.०० वाजता माननीय वित्त मंत्री बोलण्यासाठी उभे राहतील, अशा प्रकारे मी नियोजन करीत होतो. परंतु आताच्या परिस्थितीमध्ये सभागृहाने निर्णय घ्यावा. त्यानुसार पिठासीन अधिकाऱ्यांच्या आसनावर जो कोणी असतील त्यानुसार ते काम करतील.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सभागृहाच्या भावना पाहता अजून अर्धा तासाचा वेळ सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी देण्यात यावा. मी अडीच वाजता उत्तर देण्यास सुरुवात करतो. (...अडथळा....) यात आता वेळ वाया घालवू नये.

तालिका सभाध्यक्ष : सभागृहाच्या भावना लक्षात घेता मी पुन्हा माननीय संसदीय कार्यमंत्र्याना सांगू इच्छितो की, यात रोटेशन ठरवून घ्यावे. आता भारतीय जनता पक्षाच्या चार सन्माननीय सदस्यांनी भाषण केले आहे आणि सत्तारुढ पक्षातील एकेक सन्माननीय सदस्यांनी भाषण केले आहे. वेळेचे नियोजन दोन्ही बाजुला समान आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी मिळाली पाहिजे, असे रोटेशन असले पाहिजे. आता सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : अध्यक्ष महोदय, संजय गांधी निराधार योजनेंतर्गत विधवा महिलांना मिळाणारे पेन्शन किमान १,५०० रुपये केले पाहिजे. त्यात अनेक जाचक अटी आहेत. अनेक मुले त्यांच्या आई-वडीलांचा सांभाळ करीत नाहीत. रेशनकार्डमध्ये मुलाचे नाव असेल तर त्या महिलांना पेन्शन मिळत नाही. मी विनंती करते की, यात शासनाने लक्ष घालावे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मी त्यांना एक विनंती करणार आहे. बीपीएलधारक कुटुंबातील मुलींच्या लग्नासाठी ५० हजार रुपये दिले पाहिजेत. बीपीएलमधील गरीब कुटुंबातील मुलींचे लग्न होत असताना अनेक अडचणी येत आहेत. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यात मुलींच्या लग्नासाठी १ लाख रुपयांची मदत केली जाते. असे असताना आपल्या राज्यात गरीब कुटुंबातील मुलींच्या लग्नाकरिता ५० हजार रुपये शाासनाने द्यावेत, अशी मी मागणी करते.

अध्यक्ष महोदय, मी माननीय पालकमंत्र्यांचे अभिनंदन करते. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना दहिसर-कांदळपाडा ते सुभाष चंद्र बोस मैदान येथील पुलासाठी चार हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यासाठी मी त्यांचे मनापासून अभिनंदन करते.

अध्यक्ष महोदय, कृषि विभागासंदर्भात मी थोडक्यात बोलणार आहे. तौक्ते चक्रीवादळामध्ये पालघर जिल्ह्यातील पॉली हाऊस, ग्रीन हाऊस असलेल्या लोकांना पैसे मिळालेले नाहीत. ज्यांचे पंचनामे झाले आहेत त्या शेतकऱ्यांना पैसे मिळावयास हवेत.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करते.

धन्यवाद !

यानंतर श्री. चौधरी....

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मी आपणास विचारु इच्छितो की आणखी किती सन्माननीय सदस्य बोलणार आहेत ?

तालिका सभाध्यक्ष : प्रतोदांनी दिलेल्या यादीनुसार भारतीय जनता पक्षाचे ७, शिवसेना पक्षाचे ५, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ९ आणि काँग्रेस पक्षाचे ११ सन्माननीय सदस्य बोलणार आहे. त्याव्यतिरिक्त अपक्ष, अखिल भारतीय मजलीस-ए-इतोहादूल मुस्लिमीन, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राष्ट्रीय समाज पक्ष, जनसुराज्य शक्ती पक्ष, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया यांना प्रत्येकी अर्धा मिनिट वेळ आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार हे देखील या बाबीला साक्षीदार आहेत की, काल माननीय संसदीय कामकाज मंत्री यांनी सांगितले होते की जे सन्माननीय सदस्य सध्या सभागृहामध्ये उपस्थित आहेत त्यांनाच उद्या बोलण्याची संधी देण्यात येईल. इतर सन्माननीय सदस्यांना संधी देण्यात येणार नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, जे सन्माननीय सदस्य काल उशिरापर्यंत सभागृहात थांबले होते त्यांनाच बोलण्याची संधी देण्यात यावी. जे सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते त्यांना का बोलण्याची संधी दिली जात आहे ?

तालिका सभाध्यक्ष : मघाशी माझा तसाच प्रयत्न होता परंतु काही सन्माननीय सदस्यांचा गैरसमज झाला. मी पुन्हा सांगू इच्छितो की, काल संध्याकाळी उशिरापर्यंत थांबलेल्या सन्माननीय सदस्यांची यादी त्या-त्या पक्षाच्या प्रतोदांनी द्यावी. त्या सदस्यांना प्राधान्याने संधी देण्यात येईल.

माझ्याकडे प्रिंटेड यादी आलेली आहे. सदर यादी मी एकदा वाचून दाखवितो.

शिवसेना - श्री.दीपक केसरकर, श्री.प्रकाश आबिटकर, श्री.रमेश कोरगावकर, श्री.योगेश कदम, श्री.दिलीप लांडे, श्री.चिंमणराव पाटील, ॲड.आशिष जैस्वाल.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव बनकर, श्री.अशोक पवार, श्रीमती सरोज अहिरे, श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे, डॉ.किरण लहामटे, श्री.अतुल बेनके, श्री.संदिप क्षिरसागर, श्री.यशवंत माने, श्री.सुनिल भुसारा, श्री.चेतन तुपे आणि श्री.शेखर निकम.

तालिका सभाध्यक्ष.....

राष्ट्रीय काँग्रेस पार्टी – सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल, श्री.सुभाष धोटे, श्री.रावसाहेब अंतापूरकर, श्री.विक्रमसिंह सावंत, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.राजू पारवे, श्रीमती सुलभा खोडके, श्री.राजेश एकडे, श्री.शिरीषदादा चौधरी, श्री.शिरीषकुमार नाईक, श्री.सहसराम कोरोटे आणि श्री.हिरामण खोसकर.

भारतीय जनता पार्टी – सन्माननीय सदस्य श्री.जयकुमार गोरे, ॲड.राहूल कुल, श्री.राणाजगजितसिंह पाटील, श्री.राजेश पवार, डॉ.भारती लव्हेकर, श्रीमती मनिषा चौधरी, श्रीमती मोनिका राजळे, श्रीमती सीमा हिरे, श्री.गणपत गायकवाड, श्री.कृष्णा गजबे, श्री.संजय केळकर, श्री.प्रतास अडसड आणि श्री.रवि राणा.

तसेच अपक्ष सन्माननीय सदस्यांची नावे आलेली नाहीत परंतु त्यांना अर्धा-अर्धा मिनिट वेळ आहे.

श्री.हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घ्यायचा आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, आज सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देऊन सोमवारी मंत्र्यांचे उत्तर घेण्यात यावे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सोमवारी उत्तर देण्यापेक्षा अधिवेशन संपल्यानंतरच मी उत्तर देतो.

तालिका सभाध्यक्ष : आता आपण चर्चेला सुरुवात करु.

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.कालिदास कोळंबकर)

श्री.चिंमणराव पाटील (एरंडोल) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. सर्वप्रथम माननीय अर्थमंत्र्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. कारण अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, भू-स्खलन अशा अनेक संकटांमुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील चांगला व आदर्श अर्थसंकल्प त्यांनी सादर केला. त्याबद्दल मी त्यांचे अत:करणपूर्वक आभार देखील मानतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्य हे संपूर्ण देशभरात आर्थिक आणि इतर सर्वच बाबतीत कसे अग्रेसर राहील याचा प्रामाणिक प्रयत्न महाविकास आघाडी सरकारने या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून केला आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. चिमणराव पाटील...

अध्यक्ष महोदय, हा अर्थसंकल्प मांडत असताना आपल्याकडे जी साधन सामग्री उपलब्ध असते आणि जो निधी उपलब्ध असतो त्या माध्यमातून राज्याला कोणत्या क्षेत्रात संधी दिली पाहिजे याचा विचार करीत असतो. आपण त्याचा प्राधान्यक्रम सुध्दा ठरवित असतो की, उपलब्ध साधनसंपत्तीमध्ये आपल्याला कोणत्या क्षेत्राला प्राधान्य द्यावे लागेल. मला प्रामाणिकपणे असे वाटते की, आपल्याकडे उपलब्ध साधनसामुग्री कमी असल्यामुळे उर्जा आणि सिंचन या २ क्षेत्राकडे अधिकाधिक लक्ष देऊन या २ क्षेत्रांवर जास्तीत जास्त निधी कसा खर्च करता येईल त्यावर आपण विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आम्ही ग्रामीण भागात राहणारे लोकप्रतिनिधी आहोत. ग्रामीण भागाची व तेथील शेतीची अवस्था काय आहे. आज शेती वीजेच्या अभावी होत नाही. शेतीवर निसर्गाच्या संकटानंतर दुसरे कोणते संकट असेल तर वीजेची अनुपलब्धता हे आहे. शेतीला आज वीज मिळत नाही. शेतकऱ्यांचे प्रचंड हाल चालू आहेत. काल आपण वीजेची जोडणी कट करु नये, असा निर्णय घेतला त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना दिवसातून १०० फोनपैकी ७० ते ८० फोन वीजेच्या बाबतीत असतात. इतकी वाईट स्थिती वीजेच्या बाबतीत झाली आहे. केवळ वीज उपलब्ध होत नसल्यामुळे शेती आणि शेती व्यवस्था प्रचंड अडचणीत आली आहे. म्हणून मला वित्तमंत्र्यांना विनंती करायची आहे की, इतर क्षेत्रांकडे दुर्लक्ष झाले तरी चालेल. परंतु महाराष्ट्राची आपल्याला खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाची उन्नती करायची असेल तर वीज आणि सिंचन या दोन क्षेत्राकडे लक्ष घालणे आवश्यक आहे. जळगांवला कार्यक्रम असताना उपमुख्यमंत्री महोदय आणि मुख्यमंत्री महोदयांनी अत्यंत महत्त्वाची कामे मागितली होती. त्यामध्ये माझ्या मतदार संघातील अंजनी प्रकल्प आणि पद्मालय प्रकल्पासाठी मी विनंती केली आहे.

अध्यक्ष महोदय, मला या ठिकाणी सांगताना अत्यंत दु:ख होत आहे की, माझ्या मतदार संघातील अंजनी नावाचा प्रकल्प पूर्ण झाला आहे. त्या प्रकल्पामध्ये

श्री. चिमणराव पाटील...

पाण्याचा पूर्ण साठा होतो. परंतु वितरण व्यवस्था नसल्यामुळे तो साठा आम्हाला कधी नदीच्या तर कधी नाल्याच्या पात्रातून वितरण व्यवस्था करावी लागते आणि केवळ वितरण व्यवस्था होत नसल्याकारणाने ७ हजार हेक्टर शेतकऱ्यांच्या जमिनीला आम्ही पाणी देऊ शकत नाही. धरण भरलेले असताना सुध्दा आम्हाला त्याकडे निमूटपणे बघण्यापलिकडे आम जनतेच्या हातामध्ये काही नाही.

अध्यक्ष महोदय, मी उपमुख्यमंत्री यांना सांगितले की, या प्रकल्पासाठी मला लवकरात लवकर सुप्रमा द्या आणि हे काम लवकरात लवकर कार्यान्वीत करावे. त्यांनी मला आश्वासन दिले की हे काम आम्ही लवकरात लवकर करु. म्हणून या धरणाचे काम जेवढे लवकरात लवकर करता येईल तितके ते लवकर करावे.

अध्यक्ष महोदय, दुसरा पद्मालय प्रकल्प आहे. त्या पद्मालय प्रकल्पाच्या माध्यमातून जवळपास २०० ते २५० कोटी रुपये भूसंपादनासाठी दिले आहेत. मूळचा हा फक्त १८ कोटींचा होता. आज त्या प्रकल्पाची किंमत २५० ते ३०० कोटी इतकी झाली आहे. या प्रकल्पामध्ये पुनर्वसन करायचे कोणतेही गाव शिल्लक नाही. त्यामुळे त्यामध्ये कोणताही निधी खर्च होणार नाही. म्हणून माननीय वित्तमंत्री आणि माननीय जलसंपदा मंत्री यांना विनंती करायची आहे की, आपण या प्रकल्पासाठी एकरकमी सुप्रमा मंजूर करुन त्याची रक्कम एकरकमी द्यावी की जेणेकरुन माझ्या मतदार संघातील या दोन्ही धरणांची कामे मी चांगल्या पध्दतीने करु शकेल.

अध्यक्ष महोदय, परवा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणातून सांगितले की, आता कोरोना जरी आटोपला तरी जळगांवला ऑक्सीजन जनरेशन प्लॅन्ट सुरू करायचे आहेत. परंतु मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, कोरोनाच्या नावाखाली जी खरेदी झाली किंवा जी कामे झाली ती अत्यंत निकृष्ट अशी कामे झाली. मी या ठिकाणी जबाबदारीने सांगू इच्छितो की, १५ ते २० ऑक्सीजन जनरेशन प्लॅन्ट उभारण्याचा संकल्प झाला. परंतु आज एकही ऑक्सीजन प्लॅन्ट तेथे सुरू नाही.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. चिमणराव पाटील....

अध्यक्ष महोदय, हा विषय फक्त ऑक्सिजन प्लान्ट पुरता मर्यादित नाही. थर्मामिटर, पीपीई कीट किंवा व्हेंटीलेटर अशा काही बाबी कोरोना काळात घेण्यात आल्या होत्या. त्यातील व्हेंटीलेटरच्या बाबतीत जिल्हाधिकारी, सिव्हिल सर्जन यांच्याकडे आम्ही तक्रारी दिल्या होत्या. तेव्हा असे आढळले की, ते व्हेंटीलेटर ज्या कंपनीचे यायला पाहिजे आणि आपल्या स्पेसिफिकेशनप्रमाणे आलेले नाहीत. तरी सुद्धा विभागाने ते व्हेंटीलेटर स्विकारले. परंतु तक्रार झाल्यानंतर त्यांनी ते व्हेंटीलेटर परत केले. अशा प्रकारे त्यामध्ये गैरव्यवहार करण्याचा प्रयत्न झालेला आहे. कोविड काळामध्ये डीपीडीसीच्या माध्यमातून जी ५० कोटी रुपयांची कामे झालेली आहेत. त्याची चौकशी करण्याची मागणी आम्ही जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये केली होती. त्याची चौकशी त्रयस्त एजन्सी कडून करण्यात यावी आणि याची वस्तुस्थिती काय आहे हे जनतेला अवगत करावे. कारण आज लोकप्रतिनिधींच्या संदर्भात जनतेच्या मनामध्ये गैरसमज निर्माण झाला आहे की, त्यांनी काहीतरी गैरव्यवहार आणि चुकीच्या बाबी केलेल्या आहेत. हा गैरसमज दूर करण्यासाठी माननीय आरोग्य मंत्र्यांना माझी विनंती आहे की, या संदर्भात आपण लक्ष घालून या विषयाला चालना द्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो, धन्यवाद !

श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठे महांकाळ) : अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री श्री. अजित पवार यांनी दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी सभागृहात अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प समाजातील सर्व घटकांना न्याय देणारा असल्याने माननीय मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे तसेच माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे जाहीर आभार मानते.

अध्यक्ष महोदय,अर्थसंकल्पात नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली. त्याचप्रमाणे भू-विकास बँकेची कर्जमाफी करुन या शासनाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्याचे काम केले आहे. परंतु, सहकारी बँका तसेच इतर बँका यांची मुदत वर्षाअखेर जून महिन्यात संपत असते, परंतू या बँका मार्च महिन्यापासुनच वसुलीचा तगादा शेतकऱ्यांना लावतात व ज्यांनी मार्च महिन्याअखेर कर्ज भरलेले नाही त्यांना थकबाकीत टाकतात. त्यामुळे कर्जवसुलीसाठी सर्व बँकांना वर्षाअखेर म्हणजेच जून महिन्यापर्यंत मुदतवाढ दिल्यास याचा फायदा शेतकऱ्यांना होईल.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात आरेवाडी येथे महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्यातील धनगर समाजाचे आराध्य दैवत विरोबाचे मंदीर आहे. या मंदिरासाठी बनविलेल्या विकास आराखड्यास शासनाने भरीव आर्थिक तरतूद करावी, अशी मी या निमित्ताने मागणी करते. तसेच तासगांव तालुक्यातील हातनूर येथे होनाई देवीचे मंदीर असून तेथे नव्याने पर्यटन केंद्राचे काम अनेक वर्षापासून चालू असून त्यासही भरीव आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशी मागणी मी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील ग्रामीण मार्गासाठी अनेक वर्षापासून निधी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे हे रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत खराब झाले आहेत. त्याकरिता तरतूद करुन ही दुरुस्ती केल्यास ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची सोय होणार आहे. त्यामुळे विशेष निधीची तरतूद करावी, अशी मागणी मी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात विसापूर, पेड, येळावी, मणेराजूरीसह २१ गावे तसेच कवठे महंकाळ प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना पंचविस वर्षापासून

श्रीमती सुमन पाटील.....

कार्यरत आहेत. सध्या त्या योजना डबघाईस आल्या आहेत. ताकारी, आरफळ, टेंभू तसेच म्हैशाळ योजनांच्या पाण्यामुळे काही गावांनी या प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेतून बाहेर पडून स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांची मागणी केली आहे. त्यांनाही शासनाने निधी उपलब्ध करुन घ्यावा, अशी मागणी मी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, तासगांव येथे शासकीय क्रिडांगण असून सदर क्रिडांगणास स्व. आर. आर. (आबा) पाटील यांचे नाव दिल्याबद्दल मी शासनाचे विशेषतः माननीय क्रीडा मंत्री श्री. सुनिल केदार तसेच माननीय राज्यमंत्री श्रीमती अदिती तटकरे यांचे या निमित्ताने आभार मानते व या क्रिडांगणाचा विकास करण्यासाठी जो आराखडा तयार करण्यात आला त्याला निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी मागणी करते.

अध्यक्ष महोदय, पुन्हा एकदा माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे तसेच माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पास पाठींबा देते व माझे भाषण संपविते. धन्यवाद !

यानंतर श्रीमती करंदीकर..

डॉ. भारती लव्हेकर (वर्सोवा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, मी मच्छीमारांच्या बाबत या ठिकाणी बोलणार आहे. ७ जिल्ह्यांमधील मच्छीमार बांधवांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यांच्यासाठी निधी ठेवण्याची गरज होती. त्यांच्याकरिता अधिकाधिक निधी शासनाने ठेवावा, अशी मागणी आहे. जमिनीवरील शेतकरी असतात तसे हे पाण्यातील शेतकरी आहेत. आज माशांचा दुष्काळ आहे. एलईडी लाईटमुळे मच्छीमारी होत नाही. ४-५ वर्षांपासून डिझेलचा परतावा अनेक सोसायट्यांना मिळालेला नाही. वर्सोवा विधानसभे बाबत मी सांगू इच्छिते की, २७ महिन्यांचा १६२ कोटी रुपयांचा परतावा अद्याप तेथील मच्छीमारांना मिळालेला नाही. यामुळे त्यांची अवस्था वाईट झालेली आहे. माझी विनंती आहे की, आपण डिझेलचा परतावा देण्यासाठी वेगळा निधी देण्याबाबत पुन्हा एकदा विचार करावा.

अध्यक्ष महोदय, जल वाहतुकीसाठी व जेट्टीसाठी खाडीचे खोलीकरण करण्यासाठी ३३० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माझ्या वर्सोवा मतदारसंघातील वर्सोवा खाडीमध्ये गाळ ५५ लाख क्यु.मी. आहे. याबाबत मी माननीय वित्त मंत्री यांच्याकडे पत्र दिले होते. एवढा गाळ असल्यामुळे बोटींचे अनेक अपघात होतात. खाडीतील गाळ काढण्यासाठी तरतूद करावी अशी माझी विनंती आहे. माजी मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांचे मी अभिनंदन करते. त्यावेळी त्यांनी ४ कोटी रुपये मंजूर केले होते. तेव्हा गाळ काढला. मात्र गाळ एवढा आहे की, तो काढला नाही तर येथील मच्छीमारांना त्रास होतो.

अध्यक्ष महोदय, राज्यात चक्रीवादळे येतात,अनेक आपत्ती येतात. कोकण व इतर ठिकाणी धूप प्रतिबंधक बंधारा,भूमिगत विद्युत वाहिन्या, चक्री वादळ निवारा केंद्र या सारखी कामे हाती घेतली जातात व त्यासाठी चांगला निधी ठेवला आहे. मला सांगण्यास खेद होतो की, वर्सोवा मतदारसंघात धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरु होते. त्यासाठी साडे ३५ कोटी रु. माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी

डॉ. भारती लव्हेकर ....

यांच्याकडून आणले होते. २० कोटी रु. मागील मंत्रिमंडळातील माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. समुद्र धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून १० टक्के काम माननीय पालक मंत्री यांनी रोखले. मी वारंवार विनंती केली की, हे काम रोखू नका. लोकांची मागणी आहे, म्हणून हे काम आम्ही करीत आहोत. मात्र त्यांनी ती मागणी मान्य केली नाही. पर्यावरण सचिव यांनी त्यास विरोध केला होता. या बैठकीत सा.बा.विभागाचे अधिकारी होते. लोकांची मागणी असताना व गरज असताना ते काम रोखण्यात आलेले आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांनी पत्र दिले तरी देखील काही झाले नाही. हे सांगण्यास मला अतिशय खेद होतो. लोकप्रतिनिधी वारंवार मागणी करीत आहेत. माननीय केंद्रीय मंत्री श्री. गडकरी हे कोणताही पक्षाभिनिवेश न ठेवता राज्यातील रस्त्यांसाठी,वाहतुकीसाठी व इतर अनेक कामांसाठी नेहमीच मदत करत असतात. तरी देखील त्यांच्या पत्राची दखल घेतली गेली नाही, याचे मला वाईट वाटले. माझी माननीय वित्त मंत्री यांना विनंती आहे. आपण स्वत: लक्ष घालावे. केवळ १० टक्के काम राहिलेले आहे. ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी मदत करावी.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पाच्या संदर्भात आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागाबाबत बोलू इच्छिते. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थीनींकरिता मोफत सॅनिटरी पॅड डिस्पोजेबल मशीन बसवण्यात येईल असे सांगितले आहे. मी माननीय वित्त मंत्री यांचे आभार मानते. त्यांनी सॅनिटरी पॅड बाबत विचार केला. सॅनिटरी पॅड डिस्पोजेबल मशीन लावून उपयोग नाही. तेथे वेंडींग मशीन लावणे, मोफत सॅनिटरी पॅड देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

डॉ.भारती लव्हेकर …

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाच्या ४९१ वसतिगृहांमध्ये २०९११ मुली आहेत. समाजकल्याण विभागाच्या राज्यात ८४ शाळा आहेत. त्यापैकी २९ शाळा या मुलींच्या निवासी शाळा आहेत. त्यामध्ये ४५४२ मुली आहेत. शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये १० महिने प्रत्येक मुलीला महिन्याला १० सॅनिटरी पॅड्स मोफत मिळतात. परंतु, २ महिने त्यांना सॅनिटरी पॅड्स दिले जात नाहीत. कारण ते सुट्टीचे महिने असतात. मग त्या परत कपडा, दुपट्टा, गवत वापरणे अशा अस्वच्छ पयार्यांकडे जाऊ लागतात. माझी विनंती आहे की, त्या मुलींना १२ महिने सॅनिटरी पॅड्स दिले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, शासकीय अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये व समाजकल्याण विभागाच्या शाळांमध्ये मुलींना सॅनिटरी पॅडच दिले जात नाहीत. संस्थाचालकांना प्रत्येक विद्यार्थीनी मागे ९२० रुपये मिळतात. त्या ९२० रुपयांमध्ये, त्या यादीमध्ये सॅनिटरी नॅपकिनचा उल्लेखच नाही, त्यामुळे त्या मुलींना आजही सॅनिटरी पॅड्स मिळत नाहीत. आपण तेथे डिस्पोजेबल मशीन लावले तर ते कोणासाठी लावणार, हा देखील विचार करण्याचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या देशामध्ये ६० कोटी महिला आहेत. त्यापैकी साडेपस्तीस कोटी महिलांना मासिक पाळी येते. त्यापैकी फक्त १५ टक्के महिलांनाच सॅनिटरी नॅपकिन वापरण्यास मिळतात. उर्वरित महिलांना ते वापरण्यास मिळत नाहीत. कारण एक तर अवेअरनेस नाही किंवा त्या ॲफोर्ड करु शकत नाहीत.

अध्यक्ष महोदय, सर्वसाधारणपणे तेराव्या वर्षी पाळी येते. ती साधारणपणे ५० वर्षांपर्यंत जाते म्हणजे ३७ वर्षांचा काळ आपण पकडा. एका वर्षात ६० दिवस, ३७ वर्षे म्हणजे, २२२० दिवस म्हणजेच ६ वर्षे, १ महिना एवढा मोठा कालावधी असतो. यामध्ये तिचे लग्न होते, गर्भारपण होते, बाळंतपण होते, बालसंगोपन होते, पुन्हा मॅनॉपॉज येतो. एवढी मोठी स्थित्यंतरे तिच्या आयुष्यात घडत असतात. अशावेळेस मासिक पाळीचे नियोजन आपण जर शाळेपासून केले नाही तर तिला अनेक रोगांना देखील सामोर जावे लागते.

डॉ.भारती लव्हेकर …

अध्यक्ष महोदय, आज आपल्या देशामध्ये दरवर्षी २७ टक्के महिला या सर्व्हायकल कॅन्सरमुळे जातात. सर्व्हायकल कॅन्सर होण्याचे खरे कारण आपण पाहण्यास गेलो तर ...(अडथळा)... हे पहा हा महिलांचा विषय आहे. आपण संवेदनशील मनाने ऐका कारण या गोष्टी होणे गरजेचे आहे. अस्वच्छ गोष्टी वापरल्यामुळे सर्व्हायकल कॅन्सर होतो. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, आपण सर्व शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन व्यवस्थित पध्दतीने मिळतील, याची काळजी घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज शाळांमध्ये २३ टक्के मुली ड्रॉपआऊट होतात याचे कारणच असे आहे की, मासिक पाळीचे ४ दिवस त्या शाळेत येत नाहीत. एक तर शौचालये व्यवस्थित नाहीत किंवा नाहीच आहेत. तेथे त्यांना सॅनिटरी नॅपकिन देखील उपलब्ध नसतात.

अध्यक्ष महोदय, WHO च्या गाईडलाईन्स देखील आपण नीट फॉलो करीत नाही. त्या गाईडलाईन्सनुसार प्रत्येक स्त्रीचा हा मूलभूत अधिकार आहे की, तिला स्वतंत्र... (अडथळा)...

(माननीय तालिका सभाध्यक्ष बेल वाजवतात)

अध्यक्ष महोदय, मला बोलू द्या. या विषयावर कदाचित कोणी बोलणार नाही. मला बोलू द्या. मला संरक्षण द्या.

तालिका सभाध्यक्ष (श्री.कालीदास कोळंबकर) : सन्माननीय सदस्या अन्य सन्माननीय सदस्यांना देखील बोलण्याकरिता वेळ दिला पाहिजे.

डॉ.भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, मला बोलू द्या. हा विषय वेगळा आहे. तुम्हाला कदाचित ऐकायला होत नसेल. परंतु, या विषयावर आपण पुढे गेलो नाही तर अनेक मुलींना याचा त्रास होतो. तुम्ही मला बोलू द्या.

डॉ.भारती लव्हेकर …

अध्यक्ष महोदय, WHO च्या गाईडलाईन्सनुसार प्रत्येक स्त्रीला स्वतंत्र स्वच्छतागृह, पुरेशी पाण्याची व्यवस्था व सॅनिटरी नॅपकिन मिळणे गरजेचे आहे. आम्ही सभागृहात मागणी केली होती की, आमच्या आमदार निधीतून आमच्या विधानसभा क्षेत्रात सॅनिटरी व्हेंडिंग मशीन व डिस्पोजेबल मशीन शाळांमध्ये, कार्यालयांमध्ये किंवा जेथे महिलांची जास्त गर्दी असते अशा ठिकाणी बसविण्याची परवानगी द्यावी. मी माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करेन, ती परवानगी आम्हाला देण्यात आली. त्यामुळे आम्ही आमच्या निधीतून तेथे त्या मशीन्स लावू शकलो. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, हे त्यांनी सर्वांसाठी करुन द्यावे.... (अडथळा)... अध्यक्ष महोदय माझे बोलणे संपत आले आहे.

(माननीय तालिका सभाध्यक्ष बेल वाजवतात)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.रईस शेख आपण आपले भाषण सुरु करावे.

डॉ.भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय माझ्यावर अन्याय झालेला आहे, अशी भावना व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

.....

नंतर श्री.नितनवरे ...

श्री रईस शेख (भिवंडी पूर्व) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ के अर्थसंकल्प पर आपने मुझे बोलने की अनुमति प्रदान की, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

अध्यक्ष महोदय, सबसे पहले मैं सम्माननीय दादा का अभिनंदन करना चाहता हूं कि उन्होंने एक प्रोग्रेसिव बजट, एक व्हिजन वाला बजट पेश किया और महाराष्ट्र को वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी बनाने के लिए जो पंचसुत्री डेव्हलपमेंट प्लान उन्होंने पेश किया. एक और बात के लिए मैं सम्माननीय दादा को धन्यवाद दूंगा कि पावरलूम सब्सिडी के बारे में जो एक बहुत बड़ा संकट आ गया था, उस दिन हमारे धरने के बाद आपने आश्वासित किया है कि पावरलूम सब्सिडी बहाल की जाएगी. आपको याद होगा कि आपने भिवंडी के एमईसीबी के बकाया के बारे में एक बैठक ली थी. सदन में माननीय मंत्री डॉ. नितिन राऊत जी भी उपस्थित है. उस बैठक में एक अच्छा हल निकला था कि जो बकाया ब्याज है उसको १० प्रतिशत पर लाकर, उसकी ३० करोड़ रुपये की रकम शासन पे करेगी. मैं सम्माननीय दादा से निवेदन करना चाहूंगा कि भिवंडी का यह सबसे बड़ा मुद्दा है. आप हमेशा भिवंडी के विकास के लिए मुझे मदद करते है. इस विषय पर आप एक निर्णय दीजिए.

अध्यक्ष महोदय, मैं २-३ मुद्दे ही यहां पर रखने वाला हूं. हेल्थ सेक्टर सबसे जरुरी है. महाराष्ट्र ने इस बार स्वास्थ्य विभाग का अनुदान बढ़ाकर पांच प्रतिशत पर लायी है. मुझे उम्मीद है कि आने वाले बजट में नेशनल हेल्थ पॉलिसी के हिसाब से आठ प्रतिशत पर आएगा. सबसे बुनियादी मुद्दा "इम्प्लीमेंटेशन ऑफ बजेट" का है. यदि हम ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी की तरफ जाना चाहते है और सोशल इन्फ्रास्ट्रक्चर बनाना चाहते है, तो हमारा इम्प्लीमेंटेशन बहुत अच्छा होना चाहिए. मैं एक उदाहरण देना चाहूंगा कि इतना बजट होने के बाद स्वास्थ्य पर हम जो खर्चा करते है, वहां पर पीडब्ल्यूडी में हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर सेल नहीं है तो गलत निर्णय होते है. आज स्पेशलाईजेशन का जमाना है. हॉस्पिटल्स बनाने है, उसके लिए स्पेशलाईज लोग है. मेरा निवेदन है कि एक हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर सेल पीडब्ल्यूडी में बनाया जाए. सम्माननीय दादा ने एक पहल की है कि खालापुर में आयुर्वेदिक हॉस्पिटल बनाया जा रहा है.

श्री रईस शेख.....

टाटा कॅन्सर रिसर्च सेंटर और हॉस्पिटल को १० हेक्टर की जगह दी जा रही है. आज आप वर्ल्ड हेल्थ ऑर्गनाईजेशन के सारे निकष देखिए. ऐलोपेथी से हटकर हम फिर प्रिवेंटीव मेडिसीन की तरफ जा रहे है. जब आप प्रिवेंटीव मेडिसीन के बारे में बात करेंगे तो पूरे विश्व में आयुष एक नंबर पर है. आप आयुष के अलग अलग भाग देखेंगे, तो उसमें आयुर्वेद है, यूनानी है. मैं सम्माननीय दादा से निवेदन करना चाहूंगा कि हमारे भिवंडी शहर में ॲग्रीकल्चर की दस एकड़ जमीन है. यह जमीन ऐसी ही खाली पड़ी है. वहां पर कोई काम नहीं हो रहा है. यदि इस जमीन का इस्तेमाल करके, यूनानी के लिए अगर आप वहां पर एक डेडिकेटेड कल्टीवेशन के लिए युनिव्हर्सिटी बनाए, तो ये सबसे बड़ा युटीलाईजेशन होगा. आज अगर हम अपने आने वाले जनरेशन को आयुर्वेद और यूनानी में मजबूत करेंगे, तो हम प्रिवेंटीव मेडिसीन की तरफ जाएंगे.

अध्यक्ष महोदय, सम्माननीय सदस्य श्री अमिन पटेल जी ने मुस्लिम आरक्षण के बारे में बात की है. मुस्लिम आरक्षण के बारे में इसी सदन में सम्माननीय सदस्य श्री अबू आजमी जी और हमने धरना भी दिया है. आरक्षण को लेकर सरकार की जो नीति यहां पर थी, उससे मुस्लिम समाज एक तरह से बहुत नाराज है. उसके साथ नाइंसाफी हो रही है. यदि आप इस बजट को देखेंगे, तो जिन संस्थाओं को शासन ने सपोर्ट किया, चाहे सारथी हो या बार्टी हो, उससे उन समाज को न्याय मिल रहा है. आपने २५० करोड़ रुपये सारथी को दिया है. २५० करोड़ रुपये बार्टी को दिया है. मेरा आपसे निवेदन है. यदि आप चाहते है कि मुस्लिम समाज आगे बढ़े, मुस्लिम समाज का युवा आगे बढ़े, तो आपको उसी तरह की एक संस्था बनानी होगी. मौलाना आजाद जी के नाम से या डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम ह्युमन रिसोर्स इन्स्टिट्युट आप बनाईए.

अध्यक्ष महोदय, कोविड का समय है. बच्चे आज फीस के लिए हमारे कार्यालय में आकर तड़प रहे है. मैं आपको इतना डेटा दे सकता हूं कि मुस्लिम समाज पीछे है. अलग अलग समितियों ने अपना अहवाल दिया है. इस बारे में अगर आप पहल करके ये इन्स्टिट्युशनल मेकॅनिझम बनायेंगे, तो यहाँ खड़े रहकर किसी रईस शेख को आरक्षण नहीं मांगना पड़ेगा. मेरे पास डेटा तो बहुत है. सारथी और बार्टी

श्री रईस शेख.....

जैसी संस्थाओं ने उन समाजों को आगे बढ़ाया है. मेरा आपसे निवेदन है कि आप इस पर ध्यान दीजिए.

अध्यक्ष महोदय, स्कील डेव्हलपमेंट के बारे में आपने इनोव्हेशन और इन्क्युबेशन सेंटर की बात की है. यह आपके बजट का सबसे प्रोग्रेसिव मूव्ह है. आपने इसके लिए १०० करोड़ रुपये दिए है. मायनॉरिटीज को मौका मिलेगा तो वे भी आगे बढ़ सकेंगे. सम्माननीय सदस्य श्री अमिन पटेल जी ने बताया कि मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल से एक भी व्यक्ति को सात साल में आप कर्ज नहीं दे पाए. इससे ये समाज आगे कैसे बढ़ेगा ? मेरा आपसे निवेदन है कि आप इन बातों की ओर ध्यान दीजिए. आपने एक बहुत अच्छी पहल की है. क्योंकि शासन निर्णय जो होते है, वह रिसर्च पर, डेटा पर डिपेंड करते है. आपने एक निर्णय लिया कि आप इमिनेंट लोगों के नाम से एक चेअर युनिव्हर्सिटी में बनाएंगे. मेरा निवेदन है कि भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आजाद जो देश के पहले एज्युकेशन मिनिस्टर थे, उनके नाम से एक चेअर मुंबई युनिव्हर्सिटी में रखी जाए. यदि इन चीजों का बजट में समावेश होगा तो हमको न्याय मिलेगा.

अध्यक्ष महोदय, कल एक आरोप लगाया गया कि कश्मीर फाईल मुव्ही को लेकर भिवंडी शहर में हम लोगों ने पीव्हीआर सिनेमा को चलने नहीं दिया और मेरा नाम लिया गया. सम्माननीय सदस्य श्री मंगलप्रभात लोढा जी ने नाम लिया. मैं आज स्पष्ट करना चाहता हूं कि यदि भिवंडी शहर यह निश्चित करता कि कश्मीर फाईल्स मुव्ही हम देखने नहीं देंगे, तो एक भी दिन वह मुव्ही चल नहीं सकती थी. लेकिन हम लोग डेमोक्रेट है, लिबरल्स है. हम लोग डेमोक्रेसी में भरोसा करते है. मुव्ही को रोका नहीं गया. यदि इस मुव्ही के माध्यम से समाज को बांटने की कोशिश की जाती है, तो उस पर माननीय गृह मंत्री जी ने ध्यान देना चाहिए. मैं यहां बैठे सम्माननीय सदस्यों से कहना चाहता हूं कि जो नफरत आप इस समाज में, इस धरती पर बो रहे हो, वहां उसका फल आपको नहीं मिलेगा. ये छत्रपति शिवाजी महाराज जी की भूमि है. यहां पर जितनी भी नफरत बोयेंगे, यहाँ पर फुल ही निकलेंगे. यहाँ बैठे तमाम सम्माननीय

श्री रईस शेख.....

सदस्यों का मैं अभिनंदन करता हूं, शुक्रिया अदा करता हूं कि हमारे ऊपर जो जुल्म होता है तो आप खड़े होते हो, उससे मुझे उम्मीद होती है कि हिंदुस्तान बड़ा है, कॉन्स्टिट्युशन बड़ा है. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं. जय हिंद, जय महाराष्ट्र.

....यानंतर श्री तेलंग

असुधारित प्रत

श्री.अतुल बेनके (जुन्नर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, मी ज्या मतदारसंघातून निर्वाचित झालो तो मतदारसंघ छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी आहे. माझा जुन्नर तालुका हा शेती प्रधान तालुका आहे. माझ्या मतदारसंघामध्ये केंद्र सरकाचा जेएमआरटीचा प्रकल्प असल्यामुळे तेथे औद्योगिकीकरण होऊ शकत नाही. परंतु माझा मतदारसंघ पर्यटन क्षेत्रामध्ये गती घेत आहे. तसेच माझा जुन्नर तालुका बिबट प्रवणक्षेत्र आहे. महाराष्ट्रातील काही भागामध्ये बिबट आढळून येतात. परंतु जुन्नर तालुक्यामध्ये बिबटांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. वन विभागाच्या अधिकृत आकडेवारीनुसार माझ्या तालुक्यामध्ये ३५० बिबटे आहेत. प्रत्येक वाड्यात, गावात, शिवारात असे सर्वत्र बिबट प्राणी आढळून येत आहे. त्यामुळे बिबट विरुद्ध मानव असा अनेक वेळा संघर्ष पाहावयास मिळालेला आहे. मागील १० वर्षांमध्ये बिबट प्राण्यामुळे २०० लोकांचा मृत्यू झालेला आहे. ३५० पेक्षा जास्त लोक जखमी झालेले आहेत. यातील सर्वात महत्त्वाची बाब अशी आहे की, बिबट प्राणी लहान मुलांवर हल्ला करीत आहे. आपण विचार करु शकतो की, एखाद्या कुटुंबातील लहान मुलांचा मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबाची व त्या गावाची अवस्था काय होत असेल? अशा बिबट प्रवणक्षेत्रामध्ये बिबट सफारी व्हावी, यासाठी आम्ही अनेक वर्षांपासून मागणी करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांनी या अर्थसंकल्पामध्ये पुणे विभागासाठी बिबट सफारीची घोषणा केली. नैसर्गिक न्याय म्हणून जुन्नर येथे बिबट सफारी करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, जुन्नर तालुक्यातील अष्टविनायक, शिवनेरी विकास, जलसंपदा, रस्ते अशा विविध विभागामध्ये अतिशय चांगले काम या महाविकास आघाडी सरकारने केले आहे. त्यामुळे मी या सरकारचे आभार मानतो.

श्री.अतुल बेनके.....

पुणे विभागामध्ये घोषित केलेला बिबट सफारी प्रकल्प जुन्नर तालुक्यामध्ये करण्यात यावा, अशी मी ठाम मागणी करतो आणि मी माझे भाषण संपवितो. जय शिवराय.

असुधारित प्रत

मुंबईतील नायगाव विभागामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षांनी पोलीस हवालदार श्री.सुनिल जाधव यांना शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याबाबत

श्री.मिहिर कोटेचा : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील नायगाव विभागामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयाच्या बाहेर काही कार्यकर्त्यांनी दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी रात्री २ वाजून ४५ मिनिटांनी दारु पिऊन बाटल्या फोडल्या होत्या. तेव्हा स्थानिक रहिवाशांनी १०० नंबरवर कॉल करुन पोलिसांची गाडी बोलावून घेतली. काही वेळामध्ये भोईवाडा पोलीस स्टेशनचे हवालदार श्री.सुनिल जाधव तेथे पोहोचले. तेथील राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष यांनी श्री.सुनिल जाधव यांना शिवीगाळ केली. आई-बहिनीवर शिव्या देखील दिल्या आणि त्यांना धक्के देऊन परत पाठविले. त्यानंतर श्री.सुनिल जाधव यांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन डायरीमध्ये तशी नोंद देखील केली. उक्त कारवाईमध्ये कोणाचा दबाव होता हे मला माहिती परंतु त्यांच्यावर फक्त कलम १८६ अन्वये एनसी दाखल केलेली आहे. कर्तव्यावर असताना एका पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ करुन धक्काबुक्की केल्यानंतर देखील संबंधित व्यक्तीवर एफआयआर दाखल न करता फक्त एनसी दाखल करण्यात आलेली आहे. सत्ताधारी पक्षातील एका तालुकाध्यक्षांनी एका पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ करुन देखील कोणाच्या तरी दबावाखाली येऊन वरिष्ठ पोलीस अधिकारी संबंधित व्यक्तीवर एफआयआर दाखल करुन घेत नसतील तर हे मुंबई व मुंबई पोलिसांचे मोठे दुर्दैव आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी माननीय गृह मंत्री महोदयांनी संबंधितांवर कारवाईचे आदेश देण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : माननीय गृह मंत्री श्री.दिलीपराव वळसे-पाटील यांनी उक्त प्रकरणी लक्ष द्यावे.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, ठीक आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

पृ.शी. : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा
मु.शी. : सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु.....

श्री. सुभाष धोटे (राजुरा) : अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारने सादर केलेल्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी आणि माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री यांनी या अर्थसंकल्पामध्ये विकासाच्या पंचसुत्रीचा समावेश केला आहे. राज्यात १ लाख १५ हजार २२५ कोटी रुपयांची गुंतवणूक होईल व महाराष्ट्र राज्य हे देशातील एक ट्रिलीयन डॉलरचे पहिले राज्य ठरेल. त्याबाबत मी माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री आणि महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, कर्नाटक राज्य सरकार आणि महाराष्ट्र राज्य सरकारचे पाण्याबाबत वाद आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र आणि तेलंगाना सरकारचेही वाद आहेत. माझ्या तालुक्यातील १४ गावांमध्ये मराठी भाषिक लोक राहत आहेत. परंतु तेलंगाना सरकारकडून सांगण्यात येते की, हे गाव त्यांच्या राज्याच्या हद्दीत येते. सन १९५२-५३ मध्ये फाजल अली कमिशनच्या अहवालामध्ये तेव्हाच्या हद्दीत ते गाव महाराष्ट्र राज्यात दर्शविण्यात आले होते. परंतु सन १९७७-७८ मध्ये गुगल मॅप करण्यात आला तेव्हा ती गावे तेलंगाना राज्यात दर्शविण्यात आली. याबाबत माननीय महसूल मंत्र्यांनी याकडे लक्ष द्यावे. तसेच राज्याची सीमा मोजून काढावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, जिवती या तालुक्यामध्ये ८ हजार हेक्टर जमीन आहे. वन विभागाकडून सांगण्यात आले की, सदर जमीन त्या विभागाची नाही आणि महसूल विभागाकडूनही सांगण्यात आले की, ती महसूल विभागाची नाही. त्यामुळे ही जमीन महसूल विभागाने ताब्यात घ्यावी. तेथील अल्प भूधारक शेतकऱ्यांना त्या जमिनीच्या पट्ट्यांचे वाटप करावे, अशी मी विनंती करतो. भोगवटदार नंबर १ आणि भोगवटदार

श्री. सुभाष धोटे ....

नंबर २ यांची ३१ मार्च, पर्यंतची मर्यादा आहे. त्यात वाढ करुन ती दिनांक ३० जून पर्यंत करावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मुरुम आणि विटभट्टीकरिता तहसिलदाराच्या माध्यमातून परमिट दिले जात होते. आता हे परमिट देणे बंद आहे. याबाबत मी महसूल विभागाच्या कार्यालयात चौकशी केली होती. तेव्हा समजले की, दिल्ली येथील हरित लावादाने कायदा संमत केला आहे. गावखेड्यात छोटछोटे उद्योजक असतात. रोजगार हमी योजनेची कामे दिनांक ३१ मार्च पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. माननीय महसूल मंत्र्यांनी याकडे लक्ष दिले पाहिजे व छोट्या उद्योजकाना त्यांचे परमिट परत द्यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी १५ हजार ६७३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात समृद्धी महामार्गाची निर्मिती मागील सरकारच्या कार्यकाळात झाली. ते काम करण्याचा मानस या सरकारचा आहे. या महामार्गावर नागपूर, गोंदिया, भंडारा, यवतमाळ, वाशिम, अकोला, जालना हे जिल्हे आहेत. चंद्रपूर जिल्हा औद्योगिक विकासात अग्रेसर आहे. या जिल्ह्याचा यात समावेश केला नाही. त्यामुळे मी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती करतो की, या जिल्ह्याचा समावेश या महामार्गामध्ये करावा.

अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ मध्ये शासनाने विदर्भ पॅकेज जाहीर केले होते. त्यामध्ये घाटनांदूर ते अदिलाबाद या रेल्वे मार्गासाठी राज्य सरकार ५० टक्के खर्च करणार होते. यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु या अर्थसंकल्पात याकरिता कोणतीही तरतूद केली नाही. या रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षणदेखील झाले आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी या मार्गासाठी तरतूद करावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील १३९, १४०,१४२,१४३ अशी हायब्रीड ॲन्युईटीमधून सन २०१८-१९ पासून कामे सुरु झालेली आहेत. ही कामे

श्री. सुभाष धोटे .....

अतिशय संथ गतीने सुरु आहेत. मी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना विनंती करतो की, ही कामे तातडीने मार्गी लावावीत. माझ्या मतदारसंघातील जिवती तालुका दुष्काळी आणि डोंगराळ भागातील आहे. कोकण किंवा यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथे डोंगरी तालुक्याला डोंगरी भाग म्हणून जाहीर केले आहे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.सुभाष धोटे.....

त्याप्रमाणे आमच्या जिवती तालुक्यास अतिदुर्गम व डोंगरी तालुका म्हणून जाहीर करावा. त्यामुळे तेथील विद्यार्थी व शिक्षकांना न्याय मिळेल.

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक आरोग्य विभागावर बोलत आहे. माझ्या मतदारसंघामध्ये नवीन चार प्राथमिक आरोग्य केंद्रांना सन २०१४ मध्ये मंजुरी मिळाली होती. गेल्या पाच वर्षांमध्ये या प्राथमिक आरोग्य केंद्रांची कामे पूर्ण झाली परंतु हाफकिन इन्स्टिटयूटने अद्यापपर्यंत वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा न केल्याने ही प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित होऊ शकली नाहीत. त्यामुळे माझी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे की, बांधकाम पूर्ण झालेल्या सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांना लवकरात लवकर वैद्यकीय उपकरणे व मनुष्यबळ पुरवून कार्यान्वित करावे.

अध्यक्ष महोदय, आमच्या जिल्हयामध्ये १३ हजार धडक सिंचन विहिरी मंजूर झाल्या आहेत. सन २०२० मध्ये त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले. बिरसा मुंडा विहीर योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजना यांमधून या विहिरी दिलेल्या आहेत परंतु निधीच्या कमतरतेमुळे कामे पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यामुळे माझी विनंती आहे की, पुरेसा निधी देऊन या विहिरींची कामे पूर्ण करावित.

अध्यक्ष महोदय, ज्या लाभार्थ्यांना शबरी विकास योजनेंतर्गत घरकुले मंजूर झाली त्यांना केवळ पहिला हप्ता प्रदान करण्यात आला आहे. त्यांना ताबडतोब दुसरा व तिसरा हप्ता देण्यासाठी विशेष तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहती अंतर्गत गरजू लोकांना ज्या सुविधा द्यायच्या आहेत त्यासाठी देखील पुरेशी तरतूद करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद.

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.संजय शिरसाट)

श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वेळेअभावी मी केवळ काही सूचना करणार आहे. यावर्षी खरीप हंगामामध्ये वर्धा जिल्हयातील तुरीचे पीक खराब झाले. शेतकऱ्यांनी या पिकावर मोठया प्रमाणात खर्च केलेला असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले... (अडथळा...)

असुधारित प्रत

सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत महावितरणद्वारे राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या चौकशीबाबत

श्री.हिरामण खोसकर : अध्यक्ष महोदय, माझा पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. सन २०१४ ते २०१९ दरम्यान महावितरण कंपनीकडून राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा प्रकरणी राज्य शासनाने काय चौकशी केली आहे त्याची माहिती सभागृहाला द्यावी, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.
मु.शी.: सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.समीर कुणावार : अध्यक्ष महोदय, वर्धा जिल्हयातील तुरीचे पीक केवळ दोन दिवसांमध्ये पूर्णपणे वाळून गेले. याचे पंचनामे होऊन शासनाकडे अहवाल सादर झालेला आहे. त्यामुळे सरकारने तातडीने मदत करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०२० मध्ये महाराष्ट्र राज्यात अतिवृष्टी व नापिकीमुळे विदर्भ, कोकण, मराठवाडयातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. त्यापोटी सर्व ठिकाणच्या शेतकऱ्यांना सरकारकडून मदत मिळाली परंतु आमचा वर्धा जिल्हा मात्र यातून सुटलेला आहे. आमच्या जिल्हयातील कापूस आणि सोयाबिन पिकाचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले. वर्धा जिल्हयाची १७८ कोटी रुपयांची मागणी असतानाही अद्याप एकही रुपया सरकारकडून देण्यात आलेला नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, वर्धा जिल्हयाला नुकसान भरपाईपोटी तातडीने १७८ कोटी रुपये देण्यात यावेत.

अध्यक्ष महोदय, माननीय ऊर्जा मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, शेती पम्पांना जास्तीची वीज देयके देण्यात आली आहेत. ज्यांचा २ एच.पी. चा पम्प आहे त्यांना ५ एच.पी. पम्पाचे तर ज्यांचा ५ एच.पी. चा पम्प आहे त्यांना १० एच.पी. च्या पम्पाचे बिल आले आहे. त्यामुळे याची पुन्हा तपासणी करण्याची आवश्यकता आहे. मिटर न लावता, रिडिंग न घेता आकारण्यात आलेली ही बिले आहेत. त्यामुळे ४४ हजार कोटी रुपयांचा आकडा देखील खोटा व बोगस आहे. याबाबत चौकशी केल्यास हा आकडा २० हजार कोटी रुपयांपर्यंत खाली येईल. त्यामुळे माझी विनंती आहे की, यातील ३० टक्क्यांपेक्षा जास्त बोगस बिले असल्याने ती दुरुस्त करावीत.

अध्यक्ष महोदय, माझ्या हिंगणघाट नगरपालिकेमध्ये अमृत योजना मंजूर करण्यात आलेली आहे. या योजनेचे ९० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

श्री.समीर कुणावार.....

परंतु तेथे बंधाऱ्याची आवश्यकता आहे. बंधारा नसल्यामुळे १ लाख २५ हजार लोकसंख्येच्या हिंगणघाट शहराला आम्ही पाणी देऊ शकत नाहीत. त्यामुळे माझी विनंती आहे की, लवकरात लवकर तेथे बंधारा मंजूर करावा.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. समीर कुणावार...

दुसरा विषय पर्यावरण बदलाचा आहे. पर्यावरण बदलामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होत आहे. गेल्या ४ वर्षापासून कापूस पिकत नाही. कारण ते बियाणे बोगस आहे. माझी पर्यावरण मंत्री आणि कृषी मंत्र्यांना विनंती आहे की आपण एकत्रितपणे शेतकऱ्यांच्या बियाण्याबद्दल विचार करावा. अजूनही आपल्या देशात बी २ आणि बी ३ बियाण्याचाच वापर सुरू आहे. बियाणे चांगले नसल्यामुळे शेतकऱ्यांना फास त्रास होत आहे. त्यामुळे शासनाने यावर तातडीने विचार करावा. आमच्या हिंगणघाटमध्ये २०० खाटांचे रुग्णालय देण्यात यावे. हिंगणघाटमध्ये सुमारे ८०० ते ९०० लोकांची ओपीडी आहे. त्यामध्ये महिलांचे जास्त प्रमाण आहे. त्यामुळे एक महिला रुग्णालय हिंगणघाटमध्ये द्यावे, अशी मी विनंती करतो. वेळेअभावी इतर मुद्दे मी लेखी देतो. धन्यवाद.

असुधारित प्रत

श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या निमित्ताने आपल्या पदरात काय पडले या बाबतचे मुल्यमापन करुन मंत्री महोदयांकडे अधिकचे मागावे आणि त्या निमित्ताने काही तरी चांगले अपेक्षित उत्तर मिळावे म्हणून मी गेल्या दोन तीन दिवसांपासून वाट बघतो.

अध्यक्ष महोदय, पहिल्यांदा मी आपले आभार मानतो की आपण मला बोलण्याची संधी दिली. एका बाजूला कोरोनाचे संकट, २ महापूर, वेगवेगळ्या पध्दतीची नैसर्गिक आपत्ती आणि त्यानंतर विकासाला चालना देण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण बजेट सादर केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार आणि राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. उद्धवजी ठाकरे आणि संपूर्ण महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो, कौतुक करतो आणि त्यांना खूप खूप शुभेच्छा देतो.

अध्यक्ष महोदय, माननीय उपमुख्यमंत्री यांचे अभिनंदन एवढ्याकरिताच करायचे आहे की, शेतकऱ्यांच्या ५० हजार रुपयांच्या कर्जमाफीसाठी मी सातत्याने त्यांना भेटत होतो. सभागृहामध्ये विषय मांडत होतो. त्यांच्याकडून अतिशय चांगल्या पध्दतीने उत्तर मागत होतो. कधी कधी माननीय उपमुख्यमंत्री आमच्यावर चिडायचे. पैसे नाहीत आणि कुठनं आणू असेही म्हणायचे. पण आपले मनापासून अभिनंदन. कारण आपण प्रामाणिक शेतकऱ्याला अतिशय चांगल्या पध्दतीने आपण प्रोत्साहन दिले. भविष्यकाळामध्ये सुध्दा कर्जमाफी करताना ती प्रामाणिक शेतकऱ्यांनाच द्यावी. म्हणजे कर्जफेड न करणारे लोक पुन्हा ते भरायला लागतील. त्यांच्या लक्षात येईल की, आम्ही जर कर्ज भरले तरच आम्हाला मदत मिळेल, असे त्यांना वाटेल.

अध्यक्ष महोदय, मी अतिशय जबाबदारीने हे एवढ्यासाठीच बोलतो की, २००७ ची कर्जमाफी असेल, मागच्या वेळची छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी सन्मान योजना असेल आणि त्यानंतर आताच्या कर्जमाफीमध्ये प्रामाणिक शेतकऱ्यांवर जो अन्याय होत होता तो आपण दूर केला. आपण केवळ शब्द दिला नाही तर त्यासाठीची तरतूद करुन निश्चितपणे धोरण ठरवून जे काम केले त्याबद्दल तमाम संपूर्ण महाराष्ट्रातील प्रामाणिक शेतकऱ्यांच्या वतीने मी आपले अभिनंदन

श्री. प्रकाश आबिटकर...

करतो. खरं म्हणजे हे अभिनंदन करीत असताना दुसऱ्या आणखी एका गोष्टीबद्दल मी आदरणीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांचे अभिनंदन करतो. भूविकास बँकेची कर्जमाफी की जी अशक्य वाटत होती.

अध्यक्ष महोदय, सन २०१५-१६ मध्ये या सभागृहाचे कामकाज बंद पाडले होते. आम्ही सर्व कोल्हापूर, सांगली, सातारामधील आमदारांनी त्यावेळी तासभर या सभागृह बंद पाडले होते. त्यानंतर माननीय अध्यक्षांच्या दालनात तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली आणि खऱ्या अर्थाने त्या दिवशी भूविकास बँकेच्या सर्व शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबविली होती. पण निर्णय झाला नव्हता. हा निर्णय झाला नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना या सर्व गोष्टींचा फटका बसत होता. मात्र आजच्या निर्णयाने या ३५ हजार शेतकऱ्यांना आपण खूप चांगल्या पध्दतीचा दिलासा दिला आणि त्याबरोबर सर्व भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांचे सुध्दा महाविकास आघाडीचे नेते आदरणीय श्री. उद्धवजी ठाकरे आणि आदरणीय श्री. अजित पवार यांनी जे आशिर्वाद घेतले त्यातून आपल्याला पुढील सर्व कामामध्ये निश्चितपणे शुभेच्छा मिळतील. खरं म्हणजे विकासाच्या प्रक्रियेपासून कर्जमाफीच्या सर्व योजनांपासून हे सर्वच लोक दूर होते. त्यांना विकासाच्या प्रक्रियेत आणण्याचा अत्यंत चांगला निर्णय आपण घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, माझी आता तिसरी विनंती आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये २००७ चा निर्णय, कालचा निर्णय आणि भूविकास बँकेचा निर्णय... जिल्हा बँका किंवा इतर राष्ट्रीयीकृत बँका असतील की ज्यांनी पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा संस्था काढल्या. त्या पाणी पुरवठा संस्थांमधील सर्व शेतकऱ्यांच्या नावावर सुध्दा कर्जाचा बोजा असल्यामुळे त्या सर्वांना कर्जमाफीचा लाभ मिळत नाही. याचा कॉन्टम खूप कमी आहे. पुढच्या टप्प्यामध्ये याही बाबतीत विचार केला तर अनेक शेतकरी की जे मुख्य प्रवाहापासून, नाबार्डच्या कर्जापासून वंचित असतील किंवा बँकेच्या कर्जापासून वंचित असतील त्या सर्वांना न्याय देण्यासाठी धाडसी पाऊल

श्री. प्रकाश आबिटकर...

आपण टाकावे आणि लोकांना अतिशय चांगल्या पध्दतीची संधी द्यावी, अशी विनंती आजच्या या बजेटच्या निमित्ताने आपल्याला करतो.

अध्यक्ष महोदय, या बजेटवर अनेक सन्माननीय सदस्य बोलले आहेत आणि त्यामुळे मी यावर फार काही बोलायला पाहिजे अशातला भाग नाही. ज्या ज्या विभागाचे जे जे बजेट आहे ते अत्यंत चांगल्या पध्दतीने व प्रभावीपणे राबविण्यासाठी...

अध्यक्ष महादेय, मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने विनंती करतो. पूर्वी आपण आम्हाला बजेटची फार मोठी बॅग देत होतात आणि त्या बॅगमधील सर्व प्रकाशने आम्ही सर्व आमदार मंडळी वाचत नव्हतो. आता आपण आम्हाला पेन ड्राईव्ह दिला आहे. आता त्या पेन ड्राईव्हमधील सर्व माहिती घ्यायची कधी, वाचायचे कधी आणि काम कधी करायचे, हे बघितले तर हे बजेट आमचे आहे की अधिकाऱ्यांचे होते अशी शंका येते. अनेक चांगल्या योजना आहेत. पण त्या प्रत्यक्षात राबविण्यासाठी आम्हाला ज्या पध्दतीने माहिती मिळाली पाहिजे. जशी आपण आम्हाला योजनांची ही पुस्तिका तयार करुन दिली तशाच पध्दतीने त्या त्या विभागातल्या बजेटच्याा पुस्तिका छोट्या स्वरुपात वस्तुस्थिती दर्शविणाऱ्या आम्हा सर्वांना देण्याबाबतचा आदेश आजच्या बजेटच्या उत्तरावरील भाषणातून आपण करावा, अशी मी नम्रपणे आपल्याला विनंती करतो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. प्रकाश आबिटकर....

या अनुषंगाने बोलत असताना मला आणखी काही बाबींवर आपले लक्ष केंद्रीत करायचे आहे. माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार मी आपल्याला सांगू इच्छितो की, सर्व बाबींसाठी आपले अभिनंदन करीत असताना माझे आपल्याकडे एका बाबीसाठी भांडण आहे. ते म्हणजे वाचनालयाच्या अनुदानासाठी मी आपल्याकडे विनंती करीत आहे. ज्याला कोणी वाली नसेल त्याला कोणीच वाली नसेल अशी या अनुदानाची परिस्थिती होती. मागच्या सरकारमध्ये माननीय माजी मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी घोषणा केली होती. परंतु तोपर्यंत सरकार बदलले होते. त्यानंतर कोरोनाची परिस्थिती आली आणि नंतरही आम्ही सातत्याने आपल्याकडे विनंती करीत आहोत. तरी देखील आजपर्यंत त्याची तरतूद झालेली नाही. पर्वाच्या दिवशी भेटल्यानंतर मला असे अपेक्षित होते की, माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार रोक्षपणे बोलले म्हणजे जेव्हा ते त्यांच्या पद्धतीने बोलतात तेव्हा काहीतरी चांगला निर्णय होत असतो. परंतु अजूनही बजेटमध्ये त्याचा काही निर्णय दिसला नाही. मला अशी अपेक्षा आहे की, महाराष्ट्रातील तमाम वाचनालयाच्या चळवळीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असणाऱ्या निर्णयासाठी काहीतरी ठोस घोषणा करावी. माझ्या विभागातील लोकांच्या वतीने मी आपल्याला एक विनंती करतो की, खरे म्हणजे महाराष्ट्रामध्ये ९० डोंगरी तालुके आहेत. पूर्वीच्या काळात माननीय माजी मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी एक बैठक घेतली होती त्यावेळेला या बाबतीत चर्चा झाली परंतु प्रत्यक्षात काहीच कृती झाली नाही. आपणच माननीय उप मुख्यमंत्री तसेच या विभागाचे माननीय मंत्री झालात आणि खऱ्या अर्थाने १ कोटी रुपयांच्या ऐवजी २ कोटी रुपयांचा निधी दिला. परंतु निधीपेक्षा आमच्या सर्वांच्या विकासासाठी आपण सर्व विभागाबरोबर एक बैठक घ्यावी. त्या बैठकीच्या माध्यमातून आपण जसे आदिवासी, कोकण आणि विदर्भ भागासाठी काम केले जाते तशीच आमची अशी अवस्था आहे की, तिथे प्रचंड पाऊस पडतो. लॅन्ड स्लायडिंग होते. यामुळे तिथे काही विकासाचा संबंधच नाही. उद्योग विभागाच्या योजना तसेच कृषी विभागाची कोपरासारखी योजना आमच्या भागात कशी राबविता येईल. अशा वेगवेगळया क्षेत्रातील योजना आमच्या भागात राबविण्यासाठी जे जे काही करता येईल ते करण्याच्या दृष्टीकोनातून

श्री. प्रकाश आबिटकर....

डोंगरी विभागाच्या योजना चांगल्या पद्धतीने राबविण्यासाठी आपण एक बैठक घ्यावी आणि तशा पद्धतीचे आदेश द्यावेत अशी मी विनंती करतो. सर्वात शेवटी मी सर्वात महत्त्वाचा विषय मांडतो. महाऊर्जा, बार्टी किंवा सारथी अशा सर्व संस्थांना आपण शासन या नात्याने पैसे देतो. तर या पैशाचा योगय विनियोग होण्याच्या दृष्टीकोनातून आपण नेमके काय करतो ? आपण दिलेल्या पैशानंतर नेमके तिथे कोणत्या पद्धतीने काम चालते हे बघण्यासाठी मी पर्वाच्या दिवशी सारथीच्या कार्यालयामध्ये गेलो तेव्हा तिथे पाटया टाकण्यासाठी बसलेले सर्व अधिकारी बघितल्यानंतर, नवीन मिळेपर्यंत सोयीचे पोस्टिंग मिळण्यासाठीचे सर्व अधिकारी बघितले. क्षणभर एका बाजूला ५७ मोर्चे आणि कोपर्डीच्या प्रकरणातील आमची महिला भगिनी आणि त्यानंतरचा सर्व घटनाक्रम बघितल्यानंतर काल सुद्धा खासदार छत्रपती संभाजी राजे यांनी केलेल्या आंदोलनानंतर २५० कोटीच नव्हे तर २५०० कोटी रुपये आपण उपलब्ध करुन देवूया. पण ते समाजातील शेवटच्या घटकापर्यत पोहोचण्यासाठी योग्य पद्धतीच्या योजना, योग्य पद्धतीचे मॉनिटरींग, योग्य पद्धतीच्या सूचना आणि व्हिजन असले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने आपण आमच्या समाजाला सुद्धा न्याय देऊ शकता. त्यादृष्टीने केवळ अधिकाऱ्यांचेच पॅनल नव्हे तर तिथे लोकप्रतिनिधींचे पॅनल असले पाहिजे. तिथे योग्य सूचना आणि दिशा देणारे काम असले पाहिजे. या सर्व बाबी करण्यासाठी आपण योग्य प्रकारे आदेश द्यावेत, अशी मी आपल्याला विनंती करतो. तसेच अत्यंत चांगल्या प्रकारचा अर्थसंकल्प मांडल्यांनतर अभिनंदन करताना आम्ही ज्या ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत त्यांना पुढच्या टप्प्यात न्याय द्यावा, अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

श्री कैलास गोरंटयाल (जालना) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ के अर्थसंकल्प पर बोलने के लिए आपने मुझे बोलने के लिए अवसर प्रदान किया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

अध्यक्ष महोदय, मैं सम्माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित पवार जी को धन्यवाद देना चाहता हूं. उन्होंने एक ट्रिलियन डॉलर की संकल्पना इस राज्य के लिए की है. मेरे जालना जिले में ट्रॉमा केअर सेंटर दिया है और इसके साथ मेंटल हॉस्पिटल भी दिया है.

मैं आपको एक शेर सुनाना चाहता हूं.

"इस बिगड़े हुए दिमागों में खुशियों के है लच्छे,

हम पागल ही सही, हमें पागल ही रहने दो."

अध्यक्ष महोदय, हमारी मांग मेडिकल कॉलेज की थी और हमको मेंटल हॉस्पिटल दिया गया. हमने सन २०२० में कोशिश की थी कि जालना शहर को मेडिकल कॉलेज मिलना चाहिए. समिति आयी, जगह फाईनल हुई, डीएमईआर कार्यालय से यहाँ के ऑफिस में प्रपोजल आया. लेकिन आज तक हमारे यहाँ मेडिकल कॉलेज नहीं आया. यह एक तरह से जालना जिले के साथ अन्याय हो रहा है. परभणी के मेडिकल कॉलेज का कोई प्रस्ताव नहीं था. लेकिन आपने उसको मंजूर किया. मेरी यह प्रमुख मांग है कि जालना शहर के लिए आप मेडिकल कॉलेज दीजिए.

अध्यक्ष महोदय, माननीय सदस्य श्री सुधीर मुनगंटीवार जी ने वाईन और बीअर के बारे में कहा कि महाराष्ट्र सरकार क्या कर रही है ? मैं उनसे पूछना चाहता हूं कि मध्यप्रदेश में क्या हो रहा है ? मध्यप्रदेश में नगर ठेका है. यदि एक कॉलोनी में दारु देना है तो कॉलोनी में जितने लोग दारु मांगते है, उतने लोगों को दारु दी जाती है. वहां होम परमिट है. मध्यप्रदेश में सरकार एक घर में १२ बोतल रखने का परमिट दे रही है. मैं आपको एक शेर सुनाता हूं.

श्री कैलास गोरंटयाल.....

"हम आह भी करते है तो हो जाते हैं बदनाम,

वो कत्ल भी करते है तो चर्चा नहीं होती."

हंगामा है क्यों बरपा थोड़ीसी जो पी जी है,

चोरी तो नहीं की है, डाका तो नहीं डाला है."

आपने मुझे बोलने का मौका दिया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

पृ.शी : राज्यातील शेतकऱ्यांची वीज जोडणी कापण्यात येणे
मु.शी राज्यातील शेतकऱ्यांची वीज जोडणी कापण्यात येणे
या संबंधी माननीय उर्जा मंत्र्यांचे निवेदन.

डॉ. नितीन राऊत (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ४७ अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, काल मी केलेल्या निवेदनामध्ये काही भाग नमूद करण्याकरिता मी या ठिकाणी निवेदन करीत आहे. दिवसा वीज पुरवठा करण्याबाबत अनेकांनी मागणी केली होती. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. जास्त भार असलेल्या विजेची मागणी कमी होईल. वीज वहनातील गळती कमी होईल व शेतकऱ्यांना आपल्या पडीक जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प टाकून उत्पन्नाची संधी मिळणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती व जमातीमधील ग्राहकांना त्वरीत घरगुती वीज जोडणी केली जाणास असून या करिता केवळ ५०० रुपये भरून त्यांना वीज जोडणी मिळणार आहे. आता पर्यंत हजारो लोकांनी या योजनेचा लाभ घेतला असून या योजनेचा कालावधी वाढवण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपणास कल्पना आहे की, चंद्रपूर येथील औष्णिक वीज प्रकल्पात अनेक दिवसांपासून वाघांची संख्या वाढली असल्याने ते प्रकल्पात येतात. येथे वाघ व बिबटे यांचा वावर होत असल्याने कामगारांवर हल्ले होतात. यामुळे दोन कामगारांना आपली जीव गमवावा लागला. म्हणून मी स्वत: तेथे भेट दिली. तेथे गेल्यानंतर सदर प्रकरणाची गंभीरपणे दखल घेऊन तेथील फॉरेस्ट इन्स्टिटयूटला या संबंधी अहवाल सादर करण्याची सूचना केली आहे. तो सादर झाल्यानंतर पूर्णपेण कारवाई करु.

अध्यक्ष महोदय, कोव्हिडच्या प्रादुर्भावाच्या दरम्यान अनेक रुग्णालयांमध्ये आगी लागल्या होत्या. त्या संबंधी निरीक्षण करुन संभाव्य धोका टाळण्यासाठी मुख्य विद्युत निरीक्षकांनी सूचवलेल्या मार्गदर्शक सूचनांची नियमावली प्रसिध्द करण्यात आली आहे. ईज ऑफ डुईंग बिझनेस या शासन धोरणांतर्गत संपूर्णपणे संगणकीय पद्धतीने ब्लॉक चेनचा अंगीकार करुन लिफ्टचे परवाने देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. राज्यातील तार तंत्री व वीज तंत्री या विषयात सुमारे १७ हजार ५०० उमेदवारांना नि:शुल्क तारतंत्री परवाने देण्याचा उपक्रम राबवला आहे.

डॉ. नितीन राऊत....

या उमेदवारांना कौशल्य विकास उपक्रमांतर्गत लिफ्ट टेक्निशियनचे प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी देण्यात आली आहे. अपारंपरिक ऊर्जेचे धोरण २०२० मधील आहे. यामध्ये बदल होऊन नवीन धोरण आपल्या समोर आणले जाईल. या मधून चांगले फायदे होतील.

अध्यक्ष महोदय, काही सदस्यांनी विचारले की, काल आपण घोषणा केली. मात्र कनिष्ठ पातळीपर्यंत हे ऑर्डर्स पोहचल्या नाहीत. मी सांगू इच्छितो की, काल मी निवेदन केल्या नंतर जॉईंट एम.डी, आर.डी व सी.ई यांची बैठक दुपारी १ वाजून ५८ वाजता झाली. रिकव्हरी कंटीन्यू राहील मात्र "without any disconnection and ..... it convincing and motivating ..consumers." असे राहील. पॉवर लुमची सबसिडी बाबत तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या. परवा सन्माननीय सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. पॉवर लुमची सबसिडी वगळून बिले भरण्याबाबत तोंडी सूचना देण्यात आल्या आहेत. लेखी सूचना २० मिनिटात निर्गमित करण्यात येणार आहेत. तसेच या संबंधी सर्क्युलर देखील काढण्यात आले आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत महावितरणद्वारे राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या चौकशीबाबत

श्री.हिरामण खोसकर : अध्यक्ष महोदय, सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत महावितरणद्वारे राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची काय चौकशी केली आहे, याबाबत सभागृहाला खुलासा मिळावा.

.....

असुधारित प्रत

स्कॅमच्या चौकशीबाबत

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, दि. ९.११.२०२० रोजी मुख्यमंत्री माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांच्याकडे एका स्कॅमबद्दलच्या प्रकरणाची चौकशी देण्यात आली होती. त्यामध्ये ३५०० कोटीच्या पॉवर पर्चेसमध्ये अफरातफर, अनियमितता झाल्याची माहिती आहे. त्याबद्दलची चौकशी माझ्या खात्यातर्फे व गृह खात्यातर्फे सुरु आहे. इन्फ्राच्या कामांमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात अनियमितता लक्षात आली असल्यामुळे ९८५५ कोटी रुपयांच्या कामाची चौकशी देखील सुरु आहे.

.....

असुधारित प्रत

पृ. शी. : मौजे मगरवाडी (ता.पंढरपूर, जि. सोलापूर) येथील शेतकरी सुरज राम जाधव याने विष प्राशन करुन दि. २ मार्च रोजी आत्महत्या केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसिध्द झाल्याबाबत

मु. शी. : मौजे मगरवाडी (ता.पंढरपूर, जि. सोलापूर) येथील शेतकरी सुरज राम जाधव याने विष प्राशन करुन दि. २ मार्च रोजी आत्महत्या केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसिध्द झाल्याबाबत या विषयावर सर्वश्री अभिमन्यू पवार, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, राम कदम, रवि राणा, समाधान अवताडे, वि.स.स., यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना

डॉ. नितीन राऊत (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय सर्वश्री अभिमन्यू पवार, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, राम कदम, रवि राणा, समाधान अवताडे, वि.स.स., यांनी "मौजे मगरवाडी (ता.पंढरपूर, जि. सोलापूर) येथील शेतकरी सुरज राम जाधव याने विष प्राशन करुन दि. २ मार्च रोजी आत्महत्या केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसिध्द झाल्याबाबत" या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मी पुढील निवेदन करीत आहे :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

.....

नंतर श्री.शिंदे ...

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, राज्याच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेस माननीय विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवात केली होती व त्यांच्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.रविंद्र वायकर, भास्कर जाधव, सुधीर मुनगंटीवार, प्रकाश सोळंके, सुरेश वरपुडकर, गणेश नाईक, हरीभाऊ बागडे, रोहित पवार, नाना पटोले, रत्नाकर गुट्टे, बबनराव लोणीकर, अबु आझमी, जयकुमार गोरे, दिलीप बनकर, ॲड.आशिष जयस्वाल, ॲड.राहूल कुल, सर्वश्री दीपक केसकर, राणाजगजितसिंह पाटील, अमीन पटेल, राजेश पवार, अशोक पवार, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, सुमन पाटील, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री चिमणराव पाटील, रईस शेख, अतुल बेणके, सुभाष धोटे, समीर कुणावार, प्रकाश आबिटकर, कैलास गोरंट्याल यांनी सहभाग घेतला आहे. सुमारे ३२ सन्माननीय सदस्य यांनी साडे सात तासांपेक्षा अधिक वेळ अर्थसंकल्पावर चर्चा केली आहे. मी सर्व सन्माननीय सदस्य यांचे सुरुवातीस मनापासून आभार मानतो व धन्यवाद देतो. त्यांनी केलेल्या योग्य सूचनांचा अवश्य विचार करण्यात येईल, असा विश्वास मी त्यांना देतो.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर ५ वर्षे मुख्यमंत्री राहिलेले माननीय विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस व ५ वर्षे वित्त मंत्री पदावर राहिलेले श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी आपले मत मांडतांना सांगितले की, हा अर्थसकंल्प फसवा आहे. मी त्यांना संत तुकाराम महाराजांचा एक अभंग सांगू इच्छितो की,

"सत्य आम्हा मनी, नव्हे गबळाचे धनी |

देतो तीक्ष्ण उत्तरे, पुढे व्हावयासी बरे ||"

अध्यक्ष महोदय, मी राजकारण करणार नाही. मला अनेक सन्माननीय सदस्य अनेक वर्षांपासून ओळखतात. मी सभागृहाचा सदस्य म्हणून अनेक वर्षे काम करीत आहे. मी काम करताना भेदभाव न करता न्याय देण्याचा व मदत करण्याचा प्रयत्न प्रत्येक सन्माननीय सदस्यांसाठी करतो. सर्वांची १०० टक्के कामे होतात असा माझा दावा नाही. माझ्याकडे कोणीही काम घेऊन आले तर शक्य तेवढे लक्ष देऊन मी मार्ग काढत असतो.

श्री.अजित पवार...

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने हा अर्थसंकल्प फसवा आहे, याला काही अर्थ नाही, असे चर्चेच्या वेळी सांगितले आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार व सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य यांनी लेखी पत्राद्वारे अर्थसंकल्पाचे कौतूक केले आहे, ती पत्रे माझ्याकडे आहेत. विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांना विरोध करावा लागतो, ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी देखील या राज्याची जबाबदारी ५ वर्षे सांभाळेली आहे. त्यांना माहिती आहे की, संपूर्ण जगावर, देशावर, राज्यावर कोरोनाचे सावट होते. मागील २ वर्षे कशी गेली हे आपण सर्वांनी अनुभवले आहे. विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य म्हणतात की, कोरोना काळात सरकारने चांगले काम केले. त्यांनी डॉक्टर, नर्सेस पॅरामेडीकल स्टाफ यांचे कौतुक व अभिनंदन केले व काहींनी टीका टिप्पणी केली आहे. दोन्ही बाजूने विरोधी पक्षाकडून बोलण्यात येते. कोविड काळात सरकारने चांगले काम केले नसेल तर कौतुक करण्याचे कारण नाही. आजच्या उत्तराच्या निमित्ताने राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, ज्या चीन देशातून कोरोना वाढीस लागला आज त्या देशातील १५ पेक्षा अधिक महत्त्वाच्या शहरांमध्ये लॉक डॉऊन करण्यात आला आहे. कोरोनाला आपण सहज घेऊ नये, ही बाब आपण गांभीर्याने घेतली पाहिजे. चीमधील १.५ कोटी लोकसंख्या असणारे शहरही लॉक डाऊन करण्यात आले आहे. हा आजार चौथ्या लाटेच्या स्वरुपात पुन्हा आपल्याकडे येऊ नये, अशी आपणा सर्वांची इच्छा आहे. कोविड काळात केंद्र सरकारपासून नगरपालिका, महानगरपालिका यांनी आपआपल्या परीने काम केले आहे.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.अजित पवार.....

राज्य शासनाने देखील जास्ती जास्त लसीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अजून देखील काहीजण लसीकरणाबाबत म्हणावा तसा प्रतिसाद देत नाहीत. अनेकजण कोरोनाला गांभीर्याने घेत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आपण लोकप्रतिनिधी म्हणून त्यांना समजावून सांगण्याची नितांत गरज आहे.

अध्यक्ष महोदय, पंचसूत्रीवर आधारित असलेला अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे. अर्थसंकल्प सादर करीत असताना मागील तीन वर्षामध्ये आलेली महसुली तूट कशी कमी करता येईल, याचा विचार करण्याचा प्रयत्न केला. परंतु महसुली तूट कमी करीत असताना सर्वसामान्य जनतेवर कराचा बोजा न टाकता, विकासाला खिळ बसू न देता या सरकारचा गाडा माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मागील वर्षी ३ लाख ६८ हजार ९८७ कोटी रुपयांचा महसूल गोळा झाला होता. परंतु यावर्षी ९.३३ टक्क्यांनी वाढ करुन ४ लाख ३ हजार ४२७ कोटी रुपये महसूल गोळा होईल, अशी अपेक्षा ठेवलेली आहे. सन २०२१-२२ मध्ये २ लाख ८५ हजार ५३४ कोटी रुपये इतका अंदाजित असलेला महसूल होता. तो आता सन २०२२-२३ मध्ये ३ लाख ८ हजार १३ कोटी रुपये इतका अंदाजित आहे. तसेच कर महसुलामध्ये देखील ७.९१ टक्के म्हणजे जवळपास ८ टक्के वाढ अपेक्षित धरलेली आहे. महसुली खर्चामध्ये देखील १२.८१ टक्के वाढ अपेक्षित धरलेली आहे. तूटीमध्ये राज्याचे स्थूल उत्पन्न ३५ लाख ८१ हजार ५१६ कोटी रुपये आहे. महसूल तूट राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या ०.६८ टक्के इतकी आहे. सन २०२१-२२ मध्ये महसुली तूट ०.९६ टक्के इतकी होती.

अध्यक्ष महोदय, राजकोषीय तुटीचे स्थूल उत्पन्नाचे प्रमाण अंदाजित २.५० टक्के इतके आहे. सन २०२१-२२ मध्ये ते साधारण २.७९ टक्के इतके होते. राजकोषीय तूट स्थूल उत्पन्नाच्या ३ टक्क्यापेक्षा जास्त असता कामा नये, असा प्रयत्न अर्थसंकल्प सादर करीत असाताना केलेला आहे.

श्री.अजित पवार.....

अध्यक्ष महोदय, वरील आकडेवारीमध्ये बदल होत असतात, ही बाब आपणा सर्वांना माहिती आहे. यावीर्षी सरकारला अनेक प्रसंगाला सामोरे जावे लागेल. जीएसटीची नुकसानभरपाई केवळ पाच वर्षे मिळणार होती. परंतु यावर्षी त्यास पाच वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे यानंतर जीएसटीची नुकसानभरपाई कोणत्याही राज्यांना मिळणार नाही. आम्ही अनेक राज्याचे अर्थ मंत्री मिळून जीएसटी कौन्सिलकडे विनंती करुन याबाबत गांभीर्याने विचार करण्याची मागणी करीत आहोत. परंतु यामध्ये काय निर्णय होईल, हे आता सांगता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर चर्चा करताना काही सन्माननीय सदस्यांनी राज्यावरील कर्जाबाबत चर्चा केलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, सन २०२०-२१ मध्ये ६५ हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. परंतु सन २०२१-२२ च्या शेवटी सदर कर्ज ९० हजार कोटी रुपये इतके झालेले आहे. सदर कर्जामध्ये वाढ होण्याची कारणे आपणा सर्वांना माहिती आहेत. मागील काळामध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये कोरोनाचे संकट आले. तसेच शेतीचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. चक्रीवादळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस अशा प्रकारची अनेक संकटे आली होती. आता एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मुंबईचे तापमान ४० डिग्री सेल्सियस झाले आहे. तरी देखील राज्यातील काही भागामध्ये पाऊस पडत आहे. अशा प्रकारची परिस्थिती आपण कधीही अनुभवलेली नाही. परंतु अशी परिस्थिती ग्लोबल वॉर्निंगच्या निमित्ताने अनुभवावी लागत आहे. अशा प्रकारच्या संकटावर मात करुन राज्याला पुढे कसे घेऊन जाता येईल, यासाठी कोणत्याही राज्यकर्त्यांना प्रयत्न करावा लागतो. अशा प्रकारच्या संकटामुळे कर्जामधील १४ हजार कोटी रुपये खर्च करावे लागले.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेल्या धान्याला दोन पैसे मिळाले पाहिजे. ज्यावेळी शेतकऱ्यांच्या धान्याला आधारभूत किंमत मिळत नाही, तेव्हा सरकारला हस्तक्षेप करावा लागतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. अजित पवार....

त्यामध्ये जवळपास ७ हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. तसेच एसटी महामंडळाकरिता २ हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. अशा प्रकारे जवळपास २३ हजार कोटी रुपये आकस्मिक खर्चाकरिता केले आहेत.

अध्यक्ष महोदय, एफआरबीएमच्या कायद्यानुसार जीएसडीपी मध्ये ३० लाख कोटी रुपयांच्या ३ टक्के म्हणजेच ९० हजार कोटी रुपये घेता येतात. कोविड काळात केंद्र सरकारने एक निर्णय घेतला होता. सर्व राज्यांची आणि केंद्र सरकारचीही आर्थिक परिस्थिती बिकट होत होती. त्यावेळेस ३ टक्क्यांपेक्षा अधिक १ टक्का कर्ज वाढवून म्हणजेच चार टक्के कर्ज घेण्यास परवानगी दिली होती. त्यानुसार राज्य सरकारला १ लाख २० हजार कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज घेता येत होते. मात्र राज्य सरकारने ९० हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. मला एक गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे. राज्य सरकारने ३ टक्के कर्ज घेतले आहे. राज्य सरकारच्या तुलनेत केंद्र सरकारने अधिक कर्ज घेतले आहे. त्यांच्या जीडीपीचे प्रमाण ६.५ टक्के होते. राज्य सरकार ३ टक्क्यांपर्यंत कर्ज घेत असताना केंद्र सरकारला ६.५ टक्क्यांपर्यंत कर्जासाठी जावे लागले. यात केंद्र सरकारला दोष देण्याचे कारण नाही. कारण तेव्हा परिस्थिती तशी होती. परंतु सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना सांगितले की, या अर्थसंकल्पात केंद्र सरकारच्या योजनांचा समावेश आहे.

अध्यक्ष महोदय, वेड घेऊन पेडगावला जायचे, असे त्यांनी ठरविले होते किंवा कसे, हे समजत नव्हते. अभ्यास कमी असेल आणि केवळ टीका करावयाची म्हणून कोणत्याही प्रकारची टीका करु नये. भाषण करीत असताना वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. देशातील कोणत्याही राज्याचे, गुजरात राज्याचेही माननीय अर्थमंत्री अर्थसंकल्प सादर करीत असताना केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या योजना एकत्र करुन अर्थसंकल्प सादर करीत असतात. ही बाब सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे आम्ही वेगळे असे काही केले नाही. अनेक योजनांमध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा हिस्सा ६०/४०, ५०/५०, ७५/२५ टक्के असतो. काही योजना केंद्र सरकार राज्य सरकारला देत असते. तीन किंवा पाच वर्षानंतर केंद्र सरकारकडून

श्री. अजित पवार....

सांगण्यात येते की, राज्याने ती योजना सुरु ठेवावी. अशा वेळेस सुरु असलेली योजना राज्य सरकारला बंद करता येत नाही. त्या योजना बंद केल्या तर लोक म्हणतील की, केंद्र सरकारचा निधी मिळेपर्यंत ही योजना सुरु ठेवली आणि आता ती बंद पाडली आहे. त्यामुळे ही अडचण असते. राज्याच्या हिताच्या दृष्टीने आर्थिक भार सोसून सर्वच राज्य सरकारला अशा योजना सुरु ठेवाव्या लागतात.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारचा अर्थसंकल्प सादर करीत असताना आम्ही सर्वांनी मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली एक गोष्ट ठरविली होती. सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून करण्याचे आम्ही ठरविलेले आहे. आज अनेकांनी इंडस्ट्रीज, सुशिक्षित बेरोजगारी याबाबतचा उल्लेख केला आहे. काही सन्माननीय सदस्यांनी मनुष्यबळ विकासासंदर्भात बोलताना सांगितले की, याकरिता नवीन विभागाची स्थापना करावी. परंतु केवळ नवीन खाते सुरु करुन प्रश्न सुटणार नाहीत. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जैस्वाल यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. सर्वांनीच त्यांच्या वेगवेगळ्या कल्पना मांडल्या आहेत. मी अनेक सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्यांची नोंद घेतलेली आहे. मी माझे सहकारी, अधिकारी यांच्यासोबत काम करतो. तेव्हा ज्या सूचना राज्याच्या वाटचालीकरिता हिताच्या आहेत त्यांचाही अंतर्भाव करीत असतो.

अध्यक्ष महोदय, मी दहा वर्षापूर्वीची आकडेवारी वाचून दाखविणार नाही. परंतु वर्षभरात आर्थिक स्थितीला बगल देऊन महसुली तुटीचे आकडे फसवे असून अर्थसंकल्पात दाखविण्यात आलेली महसुली तूट व प्रत्यक्ष महसुली तूट यामध्ये कित्येक पटीने वाढ होत आहे, अशा प्रकारे आरोप करण्यात आले आहेत. मी सांगू इच्छितो की, सन २०१९-२० मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी वजा ४.२९ इतकी होती.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.अजित पवार.....

सन २०१९-२० मध्ये ती ०.६३ टक्के होती. सन २०२०-२१ मध्ये ती १.५२ टक्क्यांवर गेली. सन २०२०-२१ हा कोरोना महामारीचा काळ असल्यामुळे तुटीच्या टक्केवारीमध्ये वाढ झाली. सन २०२१-२२ च्या सुधारित अंदाजानुसार ०.९६ टक्के एवढी येत असून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये ०.६८ टक्के अपेक्षित आहे. आर्थिक शिस्त लावण्याच्या दृष्टीकोनातूनच सरकारचा हा प्रयत्न सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस हे आज दिल्लीला गेलेले असल्यामुळे सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. परंतु त्यांनी सांगितले की, अर्थसंकल्पातील एवढे लाख कोटी रुपये शिवसेनेला, तेवढे लाख कोटी रुपये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला, अमूक लाख कोटी रुपये काँग्रेस पक्षाला देण्यात आले आहेत. खरे तर, त्यांच्याकडून मला अशी अपेक्षा नव्हती.

अध्यक्ष महोदय, स्व.अटल बिहारी वाजपेयी यांचे एन.डी.ए. सरकार २१ पक्षांनी मिळून स्थापन केलेले होते. त्यांनी सर्वांना सोबत घेऊन अतिशय चांगल्या पध्दतीने सरकार चालविले. स्व.अटल बिहारी वाजपेयी यांच्याबद्दल सर्वांनाच आदर आहे व त्याबद्दल दुमत असण्याचे काहीही कारण नाही. परंतु आघाडी सरकारमध्ये एखाद्या पक्षाकडे अर्थखाते आहे म्हणजे सर्व पैसे त्या पक्षाचे नसतात. उदाहरण द्यायचे झाले तर सन २०२२-२३ मध्ये खर्चासाठी १ लाख ४३ हजार ६०० कोटी ७८ लाख रुपये दाखविले आहेत. हे पैसे मी कोणालाही देऊ शकत नाही. हे पैसे वेतन, निवृत्तीवेतन, इत्यादी बाबींसाठी आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी काल अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतना बद्दलचा मुद्दा मांडला. त्यामुळे मी जाणिवपूर्वक छत्तीसगड, राजस्थान आणि मध्य प्रदेश सरकारने घेतलेले निर्णय पाहिले. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज रोजी आपण निवृत्तीवेतनावर ४५ हजार ५११ कोटी रुपये खर्च करीत आहोत. तसेच आपण जी वेगवेगळी कर्जे घेत असतो त्यावरील व्याज ४२ हजार ५२६ कोटी रुपये एवढे आहे. पूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी ५१ हजार ९०० कोटी रुपये

श्री.अजित पवार.....

तरतूद करण्यात आली आहे. हे सर्व मिळून १ लाख ४१ हजार २८८ कोटी होतात. हा सर्व खर्च देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नावाने सांगण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना मी विचारु इच्छितो की, असे असते का ? मान्य आहे की, सरकार आणण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहात परंतु असे काहीतरी सांगून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करु नये... (अडथळा...) म्हणजे आपण याच्यामध्ये देखील काडी टाकून दिली. आपण गमतीचा भाग सोडून देऊ परंतु शिवसेना पक्षाच्या काही सन्माननीय सदस्य व कार्यकर्त्यांनी वृत्तपत्रामध्ये अशी बातमी वाचली तर त्यांना वाटेल की, नेमके काय चालले आहे ? माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना काही कळते की नाही, दिसते की नाही, असे त्यांना वाटेल. काँग्रेसचे कार्यकर्ते असतील तर त्यांना वाटेल की, असे होत असताना आपले माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात काय करीत आहेत ? त्यामुळे मी सांगू इच्छितो की, असे काहीही नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांना देखील माहिती आहे की, अर्थसंकल्प अंतिम करतेवेळी माननीय मुख्यमंत्र्यांची त्यावर स्वाक्षरी असते व संपूर्ण मंत्रिमंडळ त्याला मान्यता देत असते. कोणतेही सरकार चालवायचे असेल, टिकवायचे असेल व पुढे जायचे असेल तर भेदभाव करुन चालणार नाही. भेदभाव केल्यास चार दिवस देखील सरकार चालणार नाही. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस किंवा काँग्रेस यापैकी कोणताही पक्ष भेदभाव करीत नाही. माझी विनंती आहे की, विरोधी पक्षाने देखील असे करु नये.

अध्यक्ष महोदय, महसूल खाते हे राज्याला कर मिळवून देणारे खाते आहे. त्यामुळे त्या विभागावर जास्त खर्च होत नाही. माझ्याकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग आहे. त्या विभागातून केवळ उत्पन्नच मिळते. त्या तुलनेत केवळ वेतनावर थोडासा खर्च करावा लागतो.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. अजित पवार...

जीएसटीच्या माध्यमातून आपण काही लाख कोटी रुपयांचे उत्पन्न घेतो. खर्च अत्यंत थोडासा म्हणजे पगारावर असतो. काही खाती ही आपल्या राज्याला उत्पन्न देणारी असतात आणि काही खाती खर्च करणार असतात. त्यामुळे तो खर्च मोजायचा नसतो. त्यामध्ये सामाजिक न्याय, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, आदिवासी विकास, ओबीसी, अल्पसंख्याक हे विभाग असतील. पण त्या त्या घटकाला न्याय देण्यासाठी ही खाती निर्माण करण्यात आली आहेत. त्यामध्ये सामाजिक समता पाळली पाहिजे. कुठेही भेदभाव होता कामा नये अशा प्रकारचा प्रयत्न आमचा आहे. त्यामुळे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, अमुक येथे ठराविक लोकांना जास्त पैसे दिले जातात किंवा कोणाला कमी दिले जातात आणि ठराविक जण खर्च करतात, असे काहीही नाही. ही देखील बाब मला सर्वांच्या लक्षात आणून द्यायची आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी असेही सांगण्यात आले आहे की, ३१ मार्च रोजी अर्थसंकल्पाच्या सुमारे २० टक्के निधी खर्च करण्यात येतो आणि हे आर्थिक शिस्तीचे लक्षण नाही. त्यांचे हे म्हणणे बरोबर आहे. परंतु आपल्या सर्वांना माहिती आहे की, आपण कर्ज काढून काही पेमेंट करीत असतो. साधारणपणे असे बघतो की, आता कर्ज काढून त्यांना निधी दिल्याशिवाय गत्यंतर नाही. अशा वेळी ते जितके उशिरा काढता येईल तेवढे व्याजाचे बर्डन कमी होईल, असा हेतू त्या मागील असतो. परंतु ज्या ज्या वेळी खरोखरच तो निधी तेथे दिला पाहिजे असे वाटते, त्यावेळी निश्चितपणे वित्त विभागाने किंवा सरकारने तो पैसा देण्याचा प्रयत्न केला आहे. मागील ३१ मार्च २०२१ रोजी १२९४३ कोटी म्हणजे साधारण ०.४३ टक्के निधी खर्च केला, त्यामध्ये २० टक्के खर्च एका दिवसात झाला, अशी जी आकडेवारी सांगितली ती चुकीच्या आकडेवारीवर आधारित आहे. त्याउलट २०१५-१६ ला ४.९६ टक्के, २०१६-१७ ला ५.२८ टक्के, २०१७-१८ ला ३.९० टक्के अशा पध्दतीने खर्च झाला आहे. मला त्यामध्ये भेदभाव दाखवायचा नाही. पण

श्री. अजित पवार...

साधारणपणे अशी परिस्थिती असते. त्यामुळे यामध्ये दुसरा कोणता हेतू साध्य करण्याचा प्रश्न येत नाही.

अध्यक्ष महोदय, २०१९-२० पासून भांडवली खर्चाचे प्रमाण तसेच विकास खर्चाचे प्रमाण कमी झाले असून ती चिंतेची बाब आहे, अशा प्रकारे सांगण्यात आले. परंतु मला असे सांगावयाचे आहे की, हे कोविड महामारीच्या प्रतिबंधासाठी लादलेल्या प्रतिबंधामुळे राज्याच्या महसूलामध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली. तथापि, बांधिल खर्चामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. आपण सर्वांनी हे बघितले आहे. सभागृहाने हे लक्षात घ्यावे की, लॉकडाऊनमध्ये राज्यांचा विचार करायचा असेल तर जम्मू काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत करायचा झाला तर सर्वात जास्त फटका महाराष्ट्राला बसला. कारण महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, नागपूर या महत्त्वाच्या शहरांमध्ये सेवाधारीत व्यवसाय की ज्याला आपण ६० टक्के इकॉनॉमी सर्व्हीस सेक्टर म्हणतो त्या सेक्टरमधून येत असतात. ते सर्व बंद होते. ट्रायडेन्टसारखे हॉटेल ५ ते ६ हजार रुपयांना मिळत होते. ज्याची आता किंमत १० ते १२ हजार आहे. त्यामुळे महसूल जमा कमी झाली ही वस्तुस्थिती आहे. तो टॅक्स एकदम कमी झाल्याने त्याचा फटका राज्याला बसला आहे. आता ती परिस्थिती पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न आम्ही सर्वजण करीत आहोत. एकंदरीतच भांडवली खर्चात जी घट झाली आहे... सन २०२१-२२ मध्ये भांडवली खर्च १०० टक्के वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून भांडवली खर्चात भरीव वाढ करण्याचे काम सुरू आहे. या वर्षी आम्ही ६० हजार कोटी भांडवली खर्च करणार आहोत आणि निवडणूक वर्षामध्ये आपण साधारणपणे ३६५९४ कोटी इतका खर्च केला होता. म्हणजे दुपटीला थोडं कमी खर्च केला होता. आपल्या या मताशी सहमत आहे की, आपण भांडवली खर्चावर जास्त लक्ष दिले पाहिजे. त्याकरिता आम्ही पंचसूत्री कार्यक्रम दिला. त्यामध्ये दळणवळण या गोष्टीला अनन्यसाधारण महत्त्व देण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री. अजित पवार...

अध्यक्ष महोदय, बजेटमधले आकडे आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये ताळमेळ नाही. प्रसिध्द केलेली आकडेवारी आरबीआयने प्रमाणित केली आहे. एकूण खर्च ३४८३९८ कोटी इतका होता. परंतु बिमच्या प्रणालीनुसार २९५७२२ कोटी इतका खर्च दिसून येतो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. अजित पवार....

हे खरे कारण आहे की, बिम्स प्रणालीच्या आकडेवारीत आरबीआयमार्फत केले जाणारे व्याजाचे प्रदान आणि मुद्दलाची परतफेड यांचा समावेश नाही. त्या अनुषंगाने सुमारे ५२ हजार ६७६ कोटी रुपये इतका खर्च झालेला आहे. त्यामध्ये निधीतील ६६ टक्के रक्कम पगार आणि निवृत्ती वेतनावर खर्च होते असे सभागृहात सांगण्यात आले. परंतु सन २०१६-१७ सालच्या सरकारच्या तुलनेत सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या वर्षी ही टक्केवारी कमी झालेली आपल्याला पाहायला मिळेल. कारण सन २०१६-१७ मध्ये हे प्रमाण ५९.७८ टक्के होते तेच आता सन २०२१-२२ साली ५५.८१ टक्क्यांवर आले आहे. ५८.२६ टक्के असा आम्ही आमचा अंदाज वर्तवला आहे. अशा प्रकारे आम्हालाही लक्षात येते की, एकूण निधीपैकी आपला कमी टक्के निधी पगार आणि निवृत्ती वेतनावर खर्च होईल. तसेच विकासावर जास्त खर्च करण्याचा आमचा प्रयत्न आहे. बिम्स प्रणालातील आकडेवारीत आरबीआयमार्फत केले जाणारे व्याजाचे प्रदान व मुद्दलाची परतफेड यांचा समावेश नाही. कारण अर्थसंकल्पिय तरतुदीच्या केवळ ४९ टक्केच खर्च करण्यात आलेला आहे, असे या प्रणालीद्वारे सिद्ध होते हा आरोप करण्यात आला. परंतु या अनुषंगाने ५२ हजार ६७६ कोटी रुपये इतका खर्च झालेला असून एकूण खर्च ३ लाख ७८ हजार ३९८ इतका आहे. तथापि, बिम्स प्रणालीनुसार २ लाख ९५ हजार ७२२ रुपये एवढा खर्च दिसून येतो. त्यामुळे आपल्याला वाटते की, हा खर्च कमी झालेला आहे परंतु असे काही नाही.

अध्यक्ष महोदय, दुसरी एक बाब मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यायची आहे की, कोविडच्या काळात महसूल जमा होण्याचे प्रमाण कमी झाले आहे. वस्तु व सेवा कर संकलनामध्ये महाराष्ट्र राज्याचे -१०.३ टक्के वाढ, आयर्न केंद्राची - ५.६७ टक्के वाढ आहे. इतर राज्यांची वस्तु व सेवा कराची वसुली महाराष्ट्र राज्यापेक्षा जास्त आहे. अशा पद्धतीने माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस किंवा सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्यापैकी एकाने तो आरोप केला आहे. वास्तविक मी मघाशीच सांगितले की, आर्थिक सेवा क्षेत्रातून जास्तीचा पैसा

श्री. अजित पवार....

येत असतो. मला एक बाब सभागृहाच्या लक्षात आणून द्यायची आहे की, टाळेबंदी शिथिल झाल्यानंतर यावर्षी कर संकलनासाठी आवश्यक त्या विविध उपाययोजना राबविल्यामुळे राज्याला कर संकलनामध्ये सन २०२१-२२ मध्ये ३३ टक्के वाढ नोंदविलेली आहे. त्या तुलनेत देशाची वाढ २९ टक्के झाली आहे. याचाच अर्थ ४ टक्क्यांनी कमी झालेली आहे. त्यामुळे जवळपास ३ हजार कोटी रुपयांची कमी नुकसान भरपाई या वर्षी राज्याने केंद्राकडे मागितलेली आहे. तसेच विविध उपाययोजनेमध्ये देशाच्या वस्तु व सेवा कराच्या एकूण कर संकलनात महाराष्ट्र राज्याचा सन २०२०-२१ मधील वाटा १४.५४ वरुन आता वधारलेला असून सन २०२१-२२ मध्ये १४.७० टक्क्यावर गेलेला आहे. वस्तुस्थितीवरुन असे दिसते की, वस्तु व सेवा कर वसुली करण्यामागे राज्य शासनाने आवश्यक त्या उपाययोजना राबविलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, या उत्तरानंतर मला एक विधेयक सादर करायचे आहे. आज त्या विधेयकाचे पुन:स्थापन आहे. परंतु ते चर्चेला आल्यानंतर त्या मागची भूमिका मी निश्चितपणे सभागृहाच्या लक्षात आणून देईल.

अध्यक्ष महोदय, आपल्या मार्फत मला राज्याला एक बाब सांगायची आहे की, महाविकास आघाडी सरकारने नागरिकांच्या जीवाला प्राधान्य दिले त्यामुळे कोरोनामध्ये काही निर्बंध घातले होते. आता अर्थव्यवस्था पूर्णपणे पूर्वपदावर येण्यासाठी शासन सर्व प्रयत्न करीत आहे. काही सन्माननीय सदस्यांनी अशी सुद्धा टीका केली की, आपण खूप काळ हे सर्व निर्बंध लावले यामुळे अनेकांचा रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला.

अध्यक्ष महोदय, दुसरी एक बाब अशी सांगण्यात आली की, जिल्हा वार्षिक योजनेसाठी काही ठराविक शहरांना निधी वाढवून दिला. या माध्यमातून मला सभागृहाच्या एक बाब लक्षात आणून द्यायची आहे की, कोणीही अर्थमंत्री असले तरी देखील त्यांना काही सूत्र असतात. दोन ते तीन टक्क्यांपर्यंत रक्कम कमी जास्त करता येते. परंतु जिल्ह्याच्या एकूण सर्वसाधारण लोकसंख्येला ३० टक्के , जिल्ह्याची

श्री. अजित पवार....

ग्रामीण लोकसंख्येला २० टक्के, जिल्ह्याच्या क्षेत्रफळाला ३० टक्के, जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाला २० टक्के अशा प्रमाणात निधीची वाटप केले जाते.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार....

हा निधी देत असताना असे लक्षात आले आहे की, महाराष्ट्राची लोकसंख्या १२ कोटी धरली तर मुंबई परिसर ज्याला एमएमआर म्हटले जाते, तेथील अंदाजे लोकसंख्या २ कोटी आहे. आपल्या एकंदरित राज्याच्या लोकसंख्येच्या साडे १६ टक्के लोकसंख्या येथे आहे. त्याचा हिशोब काढला तर त्यांना खूप मोठी रक्कम द्यावी लागेल. मागील काळात या प्रमाणात निधी दिला जात नव्हता. आता नागरीकरण मोठया प्रमाणात झाले आहे. ज्या शहरांमध्ये लोकसंख्या जास्त आहे असे औरंगाबाद शहर, नागपूर, नाशिक , पुणे पिंपरी चिंचवड, मुंबई, ठाणे इ. शहरे आहेत. मुंबई व मुंबई उपनगरला १९९ कोटी रुपये व ठाण्याकरिता १४३ कोटी रुपये एवढी निधीमध्ये वाढ झालेली आहे. जिल्हा वार्षिक योजनेत माननीय पालक मंत्री सर्व आमदारांना तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष या सर्व टीमला एकत्र घेऊन बसतात व निधीचे वाटप करतात. या पूर्वी एवढया मोठया मुंबईमध्ये कमी रक्कम दिली जात होती. आता ही रक्कम वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे खरे तर कौतुक केले पाहिजे. आता या रक्कमा पूर्वीच्या तुलनेत वाढल्या आहेत. १३ हजार ३४० कोटी रुपये ३६ तालुक्यांना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली या ४ जिल्ह्यांकरिता २५ टक्क्यांचा अधिक नियतव्यय दिला आहे.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या भागातील परिस्थिती लक्षात घेता मानव विकास निर्देशांक व इतर बाबींचा विचार करता निधी दिला पाहिजे. या करिता सध्या आपल्याकडे सन २०११ ची जनगणना आहे. सन २०२१ ची जनगणना नाही. सन २०२१ ची जनगणना आपल्याकडे आता असती तर अजून थोडा निधी वाढला असता. मुंबईकरांना एवढया मोठया लोकसंख्येकरिता निधी दिला जात आहे. यामुळे मोठया प्रमाणात लोकांना मदत होत असते.

अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, वस्तू व सेवा कराची नुकसान भरपाई आता २६ हजार ४७८ कोटी रुपये आहे. तसेच केंद्र शासनाकडून साधारणपणे साडे २६ कोटी रुपये येणे आहे. दि. १ जुलै पासून ही योजना बंद करण्याचे केंद्र

श्री. अजित पवार....

शासनाचे धोरण आहे. ' वन नेशन वन टॅक्स.' स्वत:च्या ताकदीवर राज्यांना पुढे जावे लागणार आहे. सर्वांची अशी भावना आहे की, राज्यातून कर जेवढया मोठया प्रमाणात गोळा होतो, त्या प्रमाणात हिस्सा मिळाला पाहिजे. खरे तर अशी भूमिका पहिल्या पासूनच आपली आहे.

अध्यक्ष महोदय, कोस्टल रोडच्या संबंधी आरोप करण्यात आला होता. इनोवेव्ह टेक या कंपनीला ८३ ते ८५ कोटी रुपयाचे काम दिले. कामाची चौकशी केली असता या कामाचे स्वरुप, कामाची रक्कम, काम केव्हा दिले, टेंडर प्रक्रिया पार पाडण्यात आली काय या बाबी तपासण्यात आल्या. वास्तविक मुंबई किंनारी रस्ता ज्याला कोस्टल रोड म्हटले जाते पॅकेज ४ करिता Yooshin Engineering Corporation & Tec cuatro यांना संयुक्त भागीदारीमध्ये प्रकल्प सल्लागार नियुक्त केले आहे. सदर कामाची कंत्राटी किंमत ८५ कोटी रुपये होते. यामध्ये असे नमूद करण्यात येते की, महानगरपालिकेमध्ये इनोवेव्ह टेक कंपनीस कोणतेही कंत्राट प्रदान करण्यात आले नाही. वास्तविक काही वेळेस बोलत असताना, जबाबदार व्यक्तींनी आरोप करताना बारकाईने माहिती घेऊन सांगितले तर जास्त बरे होईल. मी आता काही सांगितले तर चॅनेलला तेच सुरु राहते. अजित पवार यांनी असे सांगितले अशी बातमी दिली जाते. यामुळे बोलताना अधिक माहिती घेऊन, चुकीचे वक्तव्य केले जाणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. अध्यक्ष महोदय, मी आपल्याला उदाहरण सांगतो. महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या संबंधी येथे उल्लेख केला गेला व पेनड्राईव्ह दिला गेला. यामध्ये डॉ.मुदस्सिर लांबे यांचे सदस्यांच्या नियुक्तीबाबत संभाषण दाखवण्यात आले. माझ्याही बघण्यात ते आले. एक लक्ष किंवा जास्त उत्पन्न असलेल्या वक्फ संस्थांचे मुतवल्ली या संवर्गातून निवडणुकीद्वारे दोन सदस्यांची नियुक्ती वक्फ बोर्डाच्या सदस्यपदी करण्यात येते.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.अजित पवार …

त्या सदस्यांची संख्या साधारणपणे १२ आहे. या वक्फ बोर्डाची १ लाख एकर इतकी जमीन आहे. त्यातून काही सदस्य निवडले जातात. विहित क्षेत्रातील १२ मुस्लीम सदस्य नेमण्याची तरतूद आहे. सद्य:स्थितीत ११ सदस्य आहेत.

अध्यक्ष महोदय, ही निवडणूक दि. ३१.८.२०१९ रोजी झाली. त्यावेळेस तर माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांचे सरकार नव्हते. आम्ही कोणी मंत्रिमंडळात देखील नव्हतो. त्यावेळेस माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांचे व अर्थमंत्री माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे सरकार होते. ...(अडथळा)... शिवसेना होती परंतु, त्यांना किती अधिकार होता, ते आपल्यालाही माहीत आहे.

अध्यक्ष महोदय, सदर निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई यांना निवडणूक निर्णय अधिकारी घोषित करण्यात आले होते. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीला, डॉ.लांबेला दि.३१.८.२०१९ रोजी ते प्रदान केले. दि.१३.९.२०१९ रोजी अधिसूचना काढली. एवढे सगळे असताना धडधडीत सांगण्यात आले. सगळ्यांना असे दाखवले की, या सरकारच्या काळात ... हा दाऊद काही तरी ... आता त्या दाऊदला तर ... पाठीमागच्या काळात माननीय श्री.शरद पवार हे मुख्यमंत्री असताना, त्यांचे दाऊदशी संबंध आहेत, असे काय काय सांगून त्यांची एवढी बदनामी केली की, न सांगितलेले बरे.... ती गोष्ट वेगळी.

अध्यक्ष महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, यामध्ये कुठलेही तथ्य नाही. कुठे तरी कोणावर तरी आरोप करावयाचा असेल तर त्यांनी चूक केली असेल तर जरुर आरोप करावा. कारण कोणालाच चुकीची कामे करण्याकरिता जनतेने प्रतिनिधित्व दिलेले नाही, ही गोष्ट आम्हाला मान्यच आहे. त्यामध्ये दुमत असण्याचे काहीच कारण नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली व त्यांच्या भावंडांच्या ७२५ व्या समाधी महोत्सवाकरिता काही तरतूद करण्याबाबत सांगितले होते. आमच्याकडून ते चुकून राहून गेले होते. त्याबाबत लक्षात आणून दिले....

श्री.अजित पवार …

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे असे आपण नेहमीच म्हणतो. वारकरी संप्रदायातील ही भावंडे आहेत. त्यातील संत निवृत्तीनाथ महाराज यांची पालखी त्र्यंबकेश्वर येथून निघते. संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी आळंदी येथून, संत सोपानदेव महाराज यांची पालखी सासवड येथून व संत मुक्ताई यांची पालखी मुक्ताईनगर येथून निघते. या समस्त संत परंपरेबाबत केवळ आम्हालाच नाही तर महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला नितांत श्रध्दा आहे. मी जाहीर करतो की, त्यांच्या ७२५ व्या समाधी वर्ष महोत्सवाच्या निमित्ताने .... माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या बाबतीत आपल्याला आठवत असेल, स्वर्गीय विलासराव देशमुख असताना आपण त्यांच्या बरोबर होतो. त्यांनी पंढरपूर, देहू, आळंदी व भंडारा डोंगर येथील ४०१ कोटी रुपयांचा कार्यक्रम जाहीर केला होता. ते काम तर चाललेलेच आहे. राहिलेल्या त्र्यंबकेश्वर, सासवड, मुक्ताई नगर, जळगाव येथे या ७२५ व्या समाधी वर्षाच्या महोत्सवाच्या निमित्ताने या संतांच्या समाधीस्थळाच्या विकासासाठी तसेच, येणाऱ्या आषाढी महोत्सवाच्या निमित्ताने होणाऱ्या पालखी सोहळ्याच्या सजावटीचा किंवा आवश्यक जो काही खर्च करावा लागेल, जो काही निधी द्यावा लागेल तो राज्य सरकार १०० टक्के देईल. त्याबद्दल मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, बोगस बियाण्यांच्या बाबतीत देखील सांगण्यात आले. खरे तर माननीय श्री.दादाजी भुसे येथे आहेत. बोगस बियाणे असू द्या, बोगस खत असू द्या किंवा पीक विम्याच्या संदर्भातील विषय असू द्या कृषी मंत्री या नात्याने त्यांचे याकडे बारकाईने लक्ष आहे. वेळ पडेल त्यावेळेस ते मुख्यमंत्री महोदयांना सांगतात. मुख्यमंत्री महोदय, स्वत: त्याबाबत पत्रव्यवहार करतात. एकदा तर मुख्यमंत्री महोदयांसमवेत मी, माननीय श्री.बाळासाहेब थोरात तसेच तत्कालीन मुख्य सचिव, श्री.सीताराम कुंटे आम्ही स्वत: पंतप्रधान महोदयांना भेटलो होतो. बीड जिल्ह्याच्या धर्तीवर आपण जो पीक विम्याचा कार्यक्रम आणलेला आहे, तशा पध्दतीने आम्हाला राज्यामध्ये सगळीकडेच करुन द्या, अशा प्रकारची मागणी केली होती.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.अजित पवार...

त्यानंतर कृषि मंत्री महोदय केंद्रीय मंत्री महोदयांना भेटले आहेत. अधिवेशन संपल्यानंतर विरोधी पक्ष नेता व दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य यांच्या समवेत ते चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, आपण अनेक वेळा १० हजार कोटी रुपयांचा पीक विमा घेतो. त्यातून शेतकऱ्यांना ४ किंवा ३.५ हजार कोटी रुपये विमा मिळतो. पीक विमा कंपन्यामधील बहुतेक कंपन्या केंद्र सरकारच्या अख्त्यारीमध्ये येतात. गुजरात राज्यानेही विमा उतविणे बंद करुन पर्यायी व्यवस्था केली आहे. शेतकरी, राज्य सरकार व केंद्र सरकारने विम्यामध्ये एवढी मोठी रक्कम गुंतवूनही शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. यामाध्यमातून विमा कंपन्यांना मोठे करण्याचे काही कारण नाही. यासंदर्भात आम्ही सूतोवाच केले आहे. यामध्ये बदल करण्याच्या संदर्भात अभ्यास करुन माहे जूनपर्यंत निर्णय घेण्यात येईल. बळीराजाच्या हिताच्या बाबी अंमलात आणण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, बोगस बियाणांमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी महाबिज व खाजगी कंपन्यांच्या माध्यमातून ५,६२६ शेतकऱ्यांना ६,२७८ क्वींटल बियाणे व ९,३७८ शेतकऱ्यांना सुमारे ७ कोटी रुपये अशा पद्धतीने सुमारे १५ हजार शेतकऱ्यांना मदत केली होती. राज्यातील सीमा भागातील शेतकरी बाजूच्या राज्यात नवीन बियाणे विक्रीस आले तर ते घेऊन येतात व त्याचा वापर करतात. कृषि विभाग व त्यांचे अधिकारी कोणते बियाणे कधी, कसे लावावे, याची माहिती सतत देत असतात. ते बारकाईने लक्ष देऊन शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करीत असतात.

अध्यक्ष महोदय, सरकारवर आरोप करण्यात आला की, सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये कर्ज देणाऱ्या सावकारांमध्ये २० टक्के वाढ व सावकारी कर्जाच्या रकमेत ४२ टक्के वाढ झाली आहे. यासंदर्भात आम्ही खोलवर अभ्यास केला. कोविड काळामध्ये अनेक लोकांच्या नोकऱ्या गेल्या होत्या व त्यांच्या इतर

श्री.अजित पवार...

अडचणी होत्या. त्यावेळी त्यांना केंद्र शासनाने मोफत धान्य दिले ते त्यांच्यापर्यंत राज्य सरकारने पोहोचविण्याचे काम केले. त्यांना राज्य शासनानेही आणखी काही मदत केली आहे. लोकांनी मीठ, मीरची व इतर बाबींसाठी खावटी कर्ज घेतले होते. त्या कालावधीत व्यापारी बँका बंद असल्याने अल्प भूधारक शेतकरी व लहान फेरीवाले यांना कर्ज देण्यास बँका नाखूश असतात. मात्र, परवानाधारक मोजक्या कागदपत्रावर विना विलंब कर्ज देत असल्याने अशा गरजू व्यक्ती परवानाधारक सावकाराकडून कर्ज घेतात. अशी परिस्थिती होती. यापुढे याची पुनरावृत्ती होणार नाही, याची निश्चितपणे खबरदारी घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, प्रधान मंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन संच बसविलेल्या शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत पुरक अनुदान देण्याकरिता शासनाने आता २०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. हा निधी लाभार्थींच्या बँक खात्यात वर्ग करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. त्यामानाने रक्कम कमी गेली असली तरी सर्व कागदपत्रे आल्यानंतर त्यामध्ये वाढ झाल्याचे निश्चितपणे दिसेल.

अध्यक्ष महोदय, सभागृहाने एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, एखादे नवीन धोरण आणले त्या वर्षात त्याचा सर्व निधी खर्च होत नाही. त्याची गाडी रुळावर येण्यासाठी वर्ष सहा महिन्यांचा कालवधी लागतो. त्या लगतच्या वर्षापासून त्या धोरणासाठीचा निधी खर्च होण्यास सुरुवात होते.

अध्यक्ष महोदय, आता सभागृहामध्ये माननीय मंत्री श्री.अशोकराव चव्हाण उपस्थित नाहीत. नागपूर प्रशासकीय इमारतीला निधी दिला नाही, अशी खंत व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भातील प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याकरिता निधी उपलब्ध आहे. माननीय मंत्री डॉ.नितीन राऊत सांगतील त्यावेळी उक्त प्रकरणी निधी देण्याची तयारी आहे. तो मिळाल्यानंतर लवकरात लवकर काम सुरु करण्यात यावे.

यानंतर श्री.तेलंग...

श्री. अजित पवार.....

अध्यक्ष महोदय, नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना विलंबाने मदत केली, अशी काही सन्माननीय सदस्यांनी टीका केली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, नुकसान झाल्यापासून ९० दिवसांच्या आत संबंधित पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा केलेले आहेत. निसर्ग चक्रीवादळ आल्यानंतर काही दिवसातच म्हणजे दिनांक १६ जून २०२१, दिनांक १८ जून २०२१, दिनांक ४ ऑगस्ट २०१९ दिनांक १९ ऑगस्ट २०२१ असे शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. शेतकरी व प्रकल्पग्रस्तांच्या मागणीप्रमाणे शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला आहे. मागील सरकार पेक्षा या सरकारने शेतकरी व प्रकल्पग्रस्तांना अधिक मदत केलेली आहे.

(विरोधी पक्षातील एक सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात)

आपण उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, जिल्हाधिकारी, वर्धा यांनी सदर प्रस्ताव विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर तो प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी मदत व पुनर्वसन विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. या संदर्भातील एक समिती माझ्या अध्यक्षतेखाली आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मी त्या प्रस्तावास मान्यता देतो. अशा अडचणीच्या काळामध्ये उक्त प्रस्तावास मान्यता देण्यासाठी हे सरकार कधीही टाळाटाळ करीत नाही. आपण खाली बसून बोलला आहात, परंतु मी त्या बाबतची नोंद घेतलेली आहे. वर्धा जिल्ह्यातील आणखी काही कामे असतील तर त्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत, त्यासंदर्भात देखील उचित कार्यवाही केली जाईल.

अध्यक्ष महोदय, कोरोनामुळे मृत्यू झालेल्या संख्ये पेक्षा अधिक अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच सदर पैसे बँक खात्यामध्ये जमा झाल्याचे संदेश प्राप्त झाले परंतु प्रत्यक्षात खात्यामध्ये पैसे जमा झालेले नाहीत, अशा प्रकारची तक्रार करण्यात आलेले आहे. परंतु मी याबाबत सांगू इच्छितो की, असे कोठेही झालेले नाही. ज्यांनी कागदपत्राची पूर्तता केलेली आहे, त्यांच्या बँक खात्यामध्ये तात्काळ पैसे जमा करण्यात आलेले आहेत. काही अर्जदाराचे बँक खात्याचे तपशील बरोबर

श्री. अजित पवार.....

नसल्यामुळे त्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा झालेले नाहीत. त्यामुळे आधार क्रमांकाच्या आधारे सदर पैसे देण्याची कार्यवाही केली जात आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे की, मदत व पुनर्वसन विभागामार्फत मदत करण्यात आलेली आकडेवारी सन २००३ पासूनची दिली आहे. त्यामुळे मी संबंधित अधिकाऱ्यांना पुन्हा याबाबतची माहिती घेण्याची सूचना केली होती. परंतु त्यांनी पूर्वी नमूद केलेली आकडेवारी बरोबर असल्याचे सांगितले आहे. म्हणजे माहे डिसेंबर २०१९ पासून आज पर्यंत २१ हजार ९९३ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. परंतु ही आकडेवारी २००३ पासूनची असल्याचे माननीय विरोधी पक्ष नेता यांनी धादांत खोटे सांगितले. मी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले होते की, या बाबतची अचूक माहिती मला देण्यात यावी. आपण दिलेल्या माहितीच्या आधारे मी सभागृहांमध्ये माहिती देतो. आपण चुकीची माहिती दिली आणि ती चुकीचीच माहिती सभागृहाला दिली तर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार माझ्याविरुद्ध विशेषाधिकाराची सुचना मांडतील. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी ठामपणे सांगितले की, या सरकारने मागील दोन वर्षांमध्ये २२ हजार कोटी रुपयांचे वाटप केले आहे.

अध्यक्ष महोदय, आजच एक बातमी मिळालेली आहे की, माननीय उच्च न्यायालयाने देखील कोरोना काळामध्ये केलेल्या कामासंदर्भात व केलेल्या मदतीबाबत कौतुक केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, आय. सी. एम. आर. पोर्टवरील नोंदीनुसार महाराष्ट्र राज्यांनी सर्वात जास्त मदत केलेली आहे. मी कोणत्याही राज्याची तुलना करीत नाही. दुसरे राज्य चुकले म्हणून आपण स्वतः पाठ थोपटून घेण्याची आवश्यकता नाही. कोरोनामध्ये तुमच्या-माझ्या व आपल्या मित्र मंडळीच्या परिवारातील अनेक जण आपल्याला सोडून गेले आहेत. राज्य शासनाने ५० हजार रुपयांची मदत केल्यामुळे गेलेली व्यक्ती परत येणार नाही. परंतु त्यांच्या कुटुंबियांना फूल नाही तर फुलाची पाकळी देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केलेला आहे.

श्री. अजित पवार.....

कोरोना काळामध्ये महाराष्ट्राने सर्वात चांगले काम केल्याचे जगाने देखील मान्य केलेले आहे. धारावी झोपडपट्टीमध्ये कोरोनाचा शिरकाव झाल्यानंतर कोरोना आटोक्यात येणार नाही, असे अनेक तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले होते. परंतु मुख्यमंत्री महोदयापासून खालच्या अधिकाऱ्यांपर्यंत असे सर्वांनी अगदी मनापासून काम केल्यामुळे धारावी झोपडपट्टीमधील कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने कमी झाली.

अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या संग्रहालयाकरिता फक्त १२ कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली, असा आरोप करण्यात आला. आता सन्माननीय सदस्य श्री. शिवेंद्रराजे भोसले सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सातारा येथे कोरोना रुग्णांसाठी जागा उपलब्ध नव्हती. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयाची इमारत उपलब्ध होती. त्यामुळे जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्या नवीन इमारतीमध्ये जम्बो कोविड सेंटर उभारून तेथे कोरोना रुग्णाची व्यवस्था केली होती. म्हणून सदर कार्यवाहीस थोडा उशीर झालेला आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांना देखील चांगलेच वाटले असेल की, माझ्या संग्रहालयामध्ये वस्तू ठेवण्यापेक्षा महाराष्ट्रातील माणसांचे जीव वाचवण्याचे काम केले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय कोविड रुग्णासाठी वापरले याचा आम्हाला देखील अभिमान आहे. उक्त संग्रहालय सुरू करण्यास थोडा उशीर झाला. परंतु लोकांचे जीव वाचवण्यासाठी या सरकारने प्राधान्य दिलेले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. अजित पवार.....

अध्यक्ष महोदय, 'द काश्मिर फाईल्स' हा चित्रपट करमणूक करमुक्त करण्याबाबत काही सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे निवेदन दिले आहे. याबाबतच्या पत्राची एक प्रत माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी दिली आहे. त्यावर सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार, सन्माननीय सदस्य सर्वश्री. मंगलप्रभात लोढा, रणधीर सावरकर, बबनराव लोणीकर अशा अनेकांची स्वाक्षरी आहे. काल याबाबत सभागृहात दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांकडून घोषणा, प्रतिघोषणा दिल्या जात होत्या. सभागृहाने लक्षात घेतले पाहिजे, की मागील काळात या सरकारने मिशन मंगल, सुपर ३०, तानाजी आणि पाणिपत या चार चित्रपटांकरिता जीएसटी अंतर्गत करमणूक सेवांना कर सवलतीचा निर्णय घेतला होता. जीएसटीमध्ये ५० टक्के सीजीएसटी असतो आणि ५० टक्के एसजीएसटी असतो. याची माहिती सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांना आहे. कालच माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनीही संसदेमध्ये याबाबतचे सुतोवाच केले आहे. राज्य सरकार एसजीएसटीचा निर्णय घेत असते. केंद्र सरकार सीजीएसटीचा निर्णय घेत असते. त्यामुळे मला असे वाटते की, केंद्र सरकारनेच हा निर्णय घेतला तर संपूर्ण देशालाच तो लागू होईल. त्यामुळे 'द काश्मिर फाईल्स' हा चित्रपट केवळ महाराष्ट्रासाठी लागू, असे होईल. जम्मू आणि काश्मिरपासून ते कन्याकुमारीपर्यंत सर्वच राज्यांना तो लागू झाला पाहिजे. (....अडथळा....)

अध्यक्ष महोदय, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याचे मुख्यमंत्री महोदयांनी पहिल्याच बैठकीत जाहीर केले होते. परंतु कोरोना परिस्थिती लक्षात घेता हा निर्णय राज्य सरकारला घेता आला नाही. आता हा निर्णय घेतला आहे. त्याचे समाधान शेतकऱ्यांमध्ये दिसून येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आबिटकर यांनी भुविकास बँक आणि इतर मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, या विषयाबाबत राज्य सरकारने चांगला निर्णय घेतला आहे.

श्री. अजित पवार.....

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प सादर करीत असताना मी सांगितले होते की, डीपीडीसीच्या निधीतून पाच टक्के निधी शाळांकरिता देण्याचा निर्णय घेतला आहे. मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, मराठी आणि ऊर्दू शाळांना यातील निधी खर्च करता येणार आहेत. त्यामुळे ऊर्दू शाळा अधिक चांगल्या प्रकारे करता येतील. थोर १० व्यक्तींनी शिक्षण घेतलेल्या शाळांना १ कोटी रुपयांचा निधी देण्याचे जाहीर केला आहे. त्यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवही होळकर माध्यमिक शाळा, चौंढी ता. जामखेड, जि. अहमदनगर यांचाही समावेश आहे. शिक्षण महर्षी, कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांची पूण्यभूमी पापळ, ता. नांदगाव येथील शाळेचा समावेश यात करण्यात येत आहे. तसेच वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी शिक्षण घेतलेली जिल्हा परिषद शाळा, पिंपळगाव यांचाही समावेश यात करण्यात येत आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बर्हिगमन करतात.)

यानंतर श्री. चौधरी.....

श्री.अजित पवार.....

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने सर्वप्रथम कर्जमाफी केली. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही आता ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होऊ नयेत म्हणून शून्य टक्के व्याजदराने त्यांना कर्जपुरवठा करण्याचा निर्णय आपण घेतला. त्यासाठी सुमारे एक हजार कोटी रुपयांचा भार सरकारने उचलला आहे. भू-विकास बँकेच्या संदर्भातील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला प्रश्न देखील निकाली काढण्यात आला व त्या शेतकऱ्यांचा देखील ७/१२ कोरा करुन देण्यात आला.

अध्यक्ष महोदय, सरकारच्या मागे एवढा व्याप असतानाही राज्यातील कुठल्याही नागरिकावर कोणताही नवीन कर आकारलेला नाही. त्याउलट गॅसवरील कर १३.५ टक्क्यांवरुन ३ टक्क्यांपर्यंत खाली आणला आहे. त्यामुळे सरकारचा सुमारे १ हजार कोटी रुपये महसूल कमी होणार आहे. सोने-चांदीचा बहुतेक व्यवसाय गुजरात राज्याकडे वळला होता. त्यामुळे सोने-चांदीच्या मुद्रांक शुल्कावर देखील आपण सवलत दिली. यामुळे १०० कोटी रुपये महसूल कमी होणार आहे. परंतु असे असले तरीही हा व्यवसाय आपल्या राज्यात वळण्यास मदत होईल.

अध्यक्ष महोदय, राज्य कर विभागाकडून अभय योजना आणली जाणार आहे. त्यासंदर्भातील विधेयक आपण याच अधिवेशनात सभागृहामध्ये मंजुरीसाठी आणणार आहोत. सोप्या आणि सुटसुटीत अभय योजनेमुळे थकीत रकमेचा कायदेशीर तिढा सुटेल व भविष्यातील वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये आपला व्यापारी वर्ग यशस्वी होईल. महाराष्ट्र हे कायमच व्यापारी क्षेत्रात प्रथम क्रमांकावर राहील व भविष्यात १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचे आपले स्वप्न लवकरच साकार होईल याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

अध्यक्ष महोदय, मुद्रांक शुल्कासंबंधीची अभय योजना देखील आम्ही आणली आहे.

श्री.अजित पवार.....

त्या माध्यमातून आपण सुमारे १ हजार ५०० कोटी रुपये दंड माफ करणार आहोत. यामुळे राज्याच्या महसुलात हानी होणार आहे परंतु कोविडच्या संकटात आपण जनहितासाठी जाणिवपूर्वक हा निर्णय घेतलेला आहे. कुठलाही कर न वाढविता आपण या सर्व बाबी करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, माननीय खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित तयार केलेली मालिका महाराष्ट्रभर लोकांनी पाहिली. स्वराज्यरक्षक संभाजी महाराजांचे शौर्य, इतिहास, कार्य या मालिकेच्या माध्यमातून लोकांसमोर आले. त्यामुळे सदर मालिका दुरदर्शन-सहयाद्री वाहिनीवर दाखविण्यात यावी अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी केली आहे. त्याबद्दल देखील राज्य सरकार निश्चितपणे निर्णय घेत असून सदर मालिका दुरदर्शन-सहयाद्री वाहिनीवर दाखविण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस आणि सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार हे आम्ही सरकारमध्ये असताना आमच्यावर सातत्याने आरोप करतात की, आम्ही विदर्भ मराठवाडयावर अन्याय करतो. परंतु वास्तविक पाहता तसे कधीही झालेले नाही. आम्हाला तशा प्रकारची शिकवणही नाही. हे संपूर्ण राज्य आपणा सर्वांचे आहे. वैधानिक विकास मंडळे बंद करुन विदर्भ-मराठवाडयावर अन्याय केला असे सांगितले जाते. परंतु सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षांकरिता विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी दिलेल्या निधीची टक्केवारी मी सांगतो. विदर्भाला निधी देण्याबाबत माननीय राज्यपालांनी ठरवून दिलेल्या सुत्राप्रमाणे २३.३ टक्के निधी दिला पाहिजे. प्रत्यक्षात सन २०२१-२२ मध्ये आपण २६ टक्के तर २०२२-२३ मध्ये २६.०४ टक्के निधी दिला आहे. म्हणजे ३ टक्के निधी जास्तीचा दिला आहे. तरीही कारण नसताना बदनामी केली जाते. मी विदर्भवासियांना सांगू इच्छितो की, उलट आताचा विरोधी पक्ष सत्तेत असताना तुम्हाला पुरेसा निधी देत नाही. आम्ही जास्त निधी देत आहोत. एक गोष्ट खरी आहे की, नागपूर येथे अधिवेशन घ्यायचे आमच्याकडून राहिले आहे.

श्री.अजित पवार.....

परंतु कोरोनाचे सावट दूर झाल्यानंतर ती कमतरता देखील दूर करुन विदर्भवासियांचा अधिवेशनाच्या संदर्भातील हक्क हे सरकार मान्य करेल.

अध्यक्ष महोदय, राज्यपालांच्या सुत्रानुसार मराठवाडयासाठी १८.७५ टक्के निधी दिला पाहिजे. त्यानुसार सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये आपण अनुक्रमे १८.६२ व १८.६६ टक्के निधी दिला आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, उलट उर्वरित महाराष्ट्र व कोकणावर अन्याय झाला आहे. राज्यपालांच्या सुत्रानुसार या भागाला ५८.२३ टक्के निधी दिला पाहिजे परंतु सन २०२१-२२ मध्ये ५५.३८ टक्के तर सन २०२२-२३ मध्ये ५५.२९ टक्के निधी देण्यात आला. त्यामुळे विदर्भ-मराठवाडा यांना करण्यात आलेल्या निधी वाटपाचे प्रमाण पाहता वैधानिक विकास मंडळे बंद करुन विदर्भ-मराठवाडयावर शासन अन्याय करीत आहे, हे धादांत खोटे व चुकीचे आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. अजित पवार...

उलट शासन विदर्भावर जास्त लक्ष देते हे या आकडेवारीवरुन आपल्या सर्वांच्या लक्षात येईल.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापले मुद्दे मांडले आहेत. त्या सर्वांच्या मुद्यांवर मी बोलू शकलो नाही. कारण वेळ देखील कमी आहे. पण मी एक गोष्ट या सभागृहाला सांगू इच्छितो की, आमदारांचा स्थानिक विकास निधी ४ कोटी रुपये इतका होता. यंदाच्या वर्षात मी तो ५ कोटी रुपये जाहीर करतो. खासदारांना केंद्र सरकारने ५ कोटी रुपये निधी देण्यासाठी का-कू केली. आता माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखालील महाविकास आघाडीच्या सरकारने एक एका आमदाराला ५-५ कोटी रुपयांचा निधी पुढील वर्षापासून आपण देणार आहोत.

अध्यक्ष महोदय, आमदारांच्या ड्रायव्हरला १५ हजार रुपये पगार आहे. तो आता २० हजार रुपये करण्याबद्दल मी निर्णय जाहीर करतो. त्यांच्या स्वीय सहायकांना २५ हजार रुपये इतका आता पगार आहे तो मी आता ३० हजार रुपये करण्याबद्दल जाहीर करतो.

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वाहनाबद्दल मागणी करीत असतात.)

आता आपण इलेक्ट्रीक कारची वाट बघू. इलेक्ट्रीक कार किती रकमेला येते ते पाहून नंतर ठरवू.

अध्यक्ष महोदय, समोर आता कोणीच सन्माननीय सदस्य नसल्यामुळे जास्त काही बोलत नाही. आता जो अर्थसंकल्प थोडीशी आर्थिक ओढाताण असताना देखील सादर केला आहे. कोणावरही टीका टिप्पणी न करता हे राज्य विकासाकडे निघाले आहे. अर्थसंकल्पामध्ये जाहीर केलेल्या घोषणा आणि घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी हे महाविकास आघाडीचे सरकार संपूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करेल. जबाबदार विरोधी पक्ष म्हणून जे आता बाहेर गेले आहेत त्या सर्वांची चांगल्या निर्णयांसाठी साथ आणि सहकार्य मिळेल असा प्रकारचा विश्वास मी व्यक्त

श्री. अजित पवार...

करतो आणि पुन्हा एकदा सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो व सर्वांना धन्यवाद देतो. जयहिंद, जय महाराष्ट्र !

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात येत असतात.)

तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट) : आता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा....

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला अनुसरुन माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी जे उत्तर दिले आहे ते समाधानकारक आहे. राज्याला पुढे नेणारे आहे. शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन म्हणून देण्याचे त्यांनी जे मान्य केले आहे त्याबद्दल खाली जनतेमध्ये कन्फ्यूजन आहे. त्यामुळे त्याबद्दल स्पष्टता यावी. दुसरे म्हणजे धान उत्पादकांना देण्यात येणाऱ्या बोनसबद्दल खुलासा केला तर सर्वांचे समाधान होईल.

ॲड श्री. आशिष जयस्वाल : अध्यक्ष महोदय, मागील अधिवेशनात अनेक सन्माननीय सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर बोनसची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात टाकू अशा प्रकारचे आश्वासन माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिले होते. दोन वर्षे नागपूरला अधिवेशन झाले नाही. वारंवार विदर्भातील शेतकऱ्यांचे फोन येत आहेत. हे पहिले वर्ष आहे की या वर्षी शेतकऱ्याला बोनस मिळाले नाही. आज सभागृहात बजेट सादर झाल्यानंतर लोक त्याबद्दल विचारणा करीत आहेत. आताच उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मी विदर्भाच्या शेतकऱ्यांना न्याय देईल. माझी विनंती आहे की, धानाच्या बोनसच्या संदर्भात शासनाने जो निर्णय केला आहे की, थेट त्यांच्या खात्यात पैसे टाकले जातील त्याबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी समाधान करावे.

ॲड माणिकराव कोकाटे : अध्यक्ष महोदय, अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी माननीय उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या या विधानसभेच्या परिसरामध्ये जो पुतळा आहे तो अत्यंत छोटा आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

ॲड. माणिकराव कोकाटे....

कारण तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या आसनापेक्षाही छोटा दिसतो आणि इतर पुतळे मोठे दिसतात. त्यासाठी माननीय वित्त मंत्र्यांना माझी विनंती आहे की, तो अश्वरुढ ३१ फुटाचा मोठा पुतळा इथे बसविण्यात यावा आणि त्याला आपण मान्यता द्यावी. दुसरे असे की, मंत्रालयातून विधानभवनमध्ये येण्यासाठीचा रस्ता बऱ्याच सन्माननीय सदस्यांना रिस्क घेऊन क्रॉस करावा लागतो. त्यासाठी आपण त्याला वरच्या बाजुने स्कायवॉक देऊन सन्माननीय सदस्यांना आणि त्यांच्या पी.ए.ना प्रशासकीय इमारतीमध्ये जाण्यासाठी सोय करावी.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. माणिकराव कोकाटे यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबद्दल सरकारच्या वतीने मी एवढेच सांगतो की, विधीमंडळाच्या आवारातील सर्व भाग हा माननीय विधानपरिषद सभापती यांच्या अंतर्गत येतो. तरी देखील मी आणि माननीय संसदीय मंत्री ॲड. अनिल परब आम्ही माननीय विधानपरिषद सभापतींशी चर्चा करताना त्यांना विनंती केली की, माननीय मुख्यमंत्र्यांची अशी एक सूचना आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा विधीमंडळाच्या इमारतीला छोटा वाटतो तो शोभत नाही. त्यामुळे आपण तिथे मोठा पुतळा बसवावा. त्याला माननीय विधानपरिषद सभापतींनी मान्यता दिली. अर्थात मी त्यांच्या संमतीने हे जाहीर करतो. कारण तो माझा अधिकार नसून त्यांचाच अधिकार आहे. यासाठी ज्या निधीची गरज लागेल त्याची पुर्तता निश्चितपणे केली जाईल. त्यासाठी कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही.

तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट) : माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार मी आपल्याला सांगू इच्छितो की, आमदार निवासाचे काम सुद्धा ठप्प आहे.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. माणिकराव कोकाटे यांनी स्कायवॉकच्या बाबतीतील दुसरा मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत काही दिवसांपूर्वीच बैठक झाली. यासाठी आपण सबवे करुन आरसीसी वॉल करीत आहोत. तो सबवे तिकडून येऊन विधानभवनला जोडला जातो. त्यामुळे तो एकदम

श्री. अजित पवार...

सुरक्षित राहिल. याबाबत काहींनी सुचविले की, रात्रीच्या वेळी तिथे चुकीचे प्रकार होतील तर त्यासाठी आपण दोन गेट करीत आहोत. साधारणपणे सकाळपासून संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत पोलीस बंदोबस्त ठेवून लाईटची व्यवस्था करुन त्यांनी आम्हाला त्याचे सादरीकरण केलेले आहे. माननीय विधानपरिषद सभापती आणि माननीय विधानसभा उपाध्यक्ष यांनी सुद्धा ते सादरीकरण पाहिलेले असून बहुतेकांनी ते मान्य देखील केलेले आहे.

अध्यक्ष महोदय सन्माननीय सदस्य श्री. समीर कुणावार यांनी आमदार निवास पुनर्बांधणीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, परवाच्या दिवशी माननीय विधानपरिषद सभापतींच्या समोर बैठक झाली. आता त्याचा सीएसआर आणि इतर सर्व परवानग्या जवळपास मिळालेल्या आहेत. एजन्सी देखील अंतिम केली जाईल. ते काम लांबले आहे ही, बाब खरी आहे. या संदर्भात माननीय विधानपरिषद सभापती आणि माननीय विधानसभा उपाध्यक्ष यांच्याशी चर्चा करुन त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांना नियमित कर्ज पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन रक्कम देण्याबद्दल दिनांक ६ मार्च, २०२० रोजीच्या भाषणात असे म्हटले होते की, सन २०१७-१८, सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० या वर्षीच्या घेतलेल्या पीक कर्जाची दिनांक ३० जून, २०२० पर्यंत पूर्णत: नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना सन २०१८-१९ या वर्षात घेतलेल्या पीक कर्जाच्या रकमेवर ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येईल. सन २०१८-१९ या वर्षात घेतलेल्या व त्याची पूर्णत: परतफेड केलेल्या पीक कर्जाची रक्कम ५० हजार रुपयांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी सन २०१८-१९ या वर्षात प्रत्यक्ष घेतलेल्या पीक कर्जाच्या रकमे इतकी प्रोत्साहनपर रक्कम लाभ म्हणून देण्यात येईल. अशी घोषणा केलेली होती. तेच सूत्र आता आपण जरी जाहीर केलेले असले तरी देखील २० लाख शेतकरी बांधवांना त्याचा फायदा होणार आहे. त्यासाठी सन २०२२-२३ मध्ये साधारणत:१० हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित धरला आहे.

श्री. अजित पवार....

दिनांक ३० जून, २०२० पर्यंत पूर्णत: कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळेल.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी आमदार निधी वाढवला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांना एवढीच विनंती आहे की, त्यांच्या भाषणामध्ये काही स्पष्टता यावी यासाठी मी काही प्रश्न उपस्थित केले होते ते मी लेखी स्वरुपातही दिले आहेत. पहिला मुद्दा हा धानाच्या बोनसचा होता. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले तसेच सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जैस्वाल यांनी विषय मांडला. याचे उत्तर यावे, अशी अपेक्षा आहे. वैधानिक विकास मंडळ आपण रद्द केले याच्या खर्चाचा तपशील द्यावा, हा दुसरा मुद्दा होता. तसेच माझा तिसरा मुद्दा असा होता की, लोकसंख्येच्या अनुपातामध्ये मराठवाडा आणि विदर्भाला ३९ टक्के नोकऱ्या होत्या. या नोकऱ्यांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्याचे आरक्षण होते.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. सुधीर मुनगंटीवार ...

अध्यक्ष महोदय, आता ते वैधानिक विकास मंडळामधून निघून गेले आहे. आम्ही आधीच विकासामध्ये बरेच मागे आहोत. आमची मुले जर मंत्रालयात आली नाहीत तर आमची एकही फाईल कधीही निघणार नाही. आम्हाला दि. १ मे १९९४ नंतर आरक्षण प्राप्त झाले. ते आरक्षण राहणार आहे काय ? नागपूर अधिवेशन आमच्या हक्काचे होते. सन १९५३ च्या करारानुसार ते निश्चित करण्यात आले होते. हे कधी होणार आहे ?

अध्यक्ष महोदय, ' पावनखिंड ' व ' द काश्मिर फाईल्स ' या दोन चित्रपटांना कर सवलत देणे आवश्यक आहे. मी अर्थमंत्री असताना एसजीएसटी माफ केला होता. आपल्याकडून आमची अपेक्षा आहे. या करिता ९२ आमदारांनी सह्या करुन निवेदन दिले आहे. हा राजकारणाचा विषय असू शकत नाही.आपण असे सांगा की, आम्हाला ' पावनखिंड' व ' द काश्मिर फाईल ' या चित्रपटाकरिता करामध्ये सवलत द्यायची नाही. ठीक आहे. आम्हाला ते मान्य आहे. मात्र आपल्याकडून हे अपेक्षित नाही. या मुद्यांवर माननीय अर्थमंत्री यांनी सुस्पष्टता आणावी. वैधानिक विकास मंडळाचा खर्चाचा तपशील संबंधी मी सांगू इच्छितो की, या करिता एकही रुपया दिलेला नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात नोकरी या संबंधी मंत्री महोदयांनी खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. दिलीप मोहिते –पाटील : अध्यक्ष महोदय, आमदार निवास मधील काम सुरु असल्यामुळे गेल्या दोन वर्षांपेक्षा अधिक काळापासून आम्ही सर्व जण हॉटेलमध्ये राहत आहोत. आम्हाला १ लाख रु. देण्याचे कबूल केले. प्रत्यक्षात ७० हजार रुपये आमच्या हातात मिळतात. हा कर कशाकरिता आम्हाला भरायला लावतात हे आम्हाला समजत नाही. हे उत्पन्नाचे साधन नाही. यापेक्षा जास्त खर्च

श्री. दिलीप मोहिते –पाटील ....

आम्हाला करावा लागतो. हा डोंगरी विकासाचा निधी आहे. या बाबत खुलासा करावा. किती लाख रुपयांची गाडी सदस्यांनी घेतली तर त्यावरील व्याज माफ होणार आहे, हे शासनाने सांगावे, धन्यवाद.

तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट) : अर्थसंकल्पावरील शेवटच्या दिवसाची चर्चा आता समाप्त झाली आहे.

.....

असुधारित प्रत

पृ.शी. : कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक

L. A. BILL NO. IX OF 2022

(A BILL TO PROVIDE FOR SETTLEMENT OF ARREARS OF TAX, INTEREST, PENALTY OR LATE FEE WHICH WERE LEVIED, PAYABLE OR IMPOSED, RESPECTIVELY, UNDER 5 VARIOUS ACTS ADMINISTERED BY THE GOODS AND SERVICES TAX DEPARTMENT AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. अजित पवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ९ - वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विविध अधिनियमांखाली जो आकारण्यात आला होता, प्रदेय होता किंवा लादण्यात आला होता अशा अनुक्रमे कर, व्याज,शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, ते महाराष्ट्र कर, व्याज,शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२२ पुर:स्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष : : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि क्रमांक ९ मांडतो.

तालिका सभाध्यक्ष : विधेयक मांडण्यात आले आहे.

.....

असुधारित प्रत

पृ. शी. : अनुदानाकरिता मागण्या

मु. शी. : सन २०२२ -२०२३ च्या अनुदानाकरिता मागण्या :

१) गृह विभाग

२) नगरविकास विभाग

३) गृह निर्माण विभाग

४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

तालिका सभाध्यक्ष : **:** आता १) गृह विभाग, २) नगरविकास विभाग, ३) गृह निर्माण विभाग, ४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक बी-१, बी-२, बी-३, बी-४, बी-५, बी-६, बी-७, बी-८, बी-९, बी-१०, बी-११, बी-१२, एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, क्यु-२, क्यु-३, क्यु-४, क्यु-६, यू-२, यू-३, यू-४, यू-५ चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलले मागण्यासंबंधीचे जोडपत्र छापावे)

(पुढील भाग नवीन पृष्ठावर घ्यावा)

असुधारित प्रत

तालिका सभाध्यक्ष : आता१) गृह विभाग, २) नगरविकास विभाग,३) गृह निर्माण विभाग, ४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग या विभागाच्या मागण्या चर्चेला घेण्यात येतील. विभागांच्या मागण्यांचा तपशील सदस्यांना टपालखणाद्वारे (पिजन होल) वितरित करण्यात आला आहे. कपात सूचना देण्याची मुदत गुरुवार, दि १७ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत निश्चित करण्यात आली असल्याने मान्य कपात सूचनांची यादी सदस्यांना स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल.

या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आता चर्चेला सुरुवात होईल.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गृह विभाग, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग अशा ४ विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर आज या सदनामध्ये चर्चा होणार आहे. आपण आम्हाला चर्चा करण्याकरिता अर्धा वेळ दिलेला आहे. आमच्या पक्षातर्फे बोलू इच्छिणाऱ्या सन्माननीय सदस्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे मी जास्त वेळ बोलणार नाही. मी गृह व पर्यावरण व वातावरणीय बदल या दोनच विभागांवर बोलणार आहे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. आमची अशी कल्पना होती की, पर्यावरण विभागाचे मंत्री महोदय देखील सभागृहात थांबतील. परंतु, ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्या विभागाचे राज्यमंत्री महोदय देखील मला दिसत नाहीत... (अडथळा)... बरोबर आहे, तुम्हाला पर्यावरणापासून ते पर्यटनापर्यंत सर्वांचीच उत्तरे देता येतात. आम्हाला तुमच्या इंटेलिजन्सवर काही म्हणावयाचे नाही. परंतु, आमची अपेक्षा होती. आपल्याला योग्य वाटले तर आपण पर्यावरण मंत्री महोदयांना सभागृहात बोलवावे, म्हणजे ही चर्चा ते स्वत: ऐकतील व उत्तर देताना देखील ते उपयोगी होईल.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करताना आमचे मत आम्ही मांडत आहोत. मी मत याकरिता म्हणत आहे कारण कोणत्या मागण्यांना समर्थन द्यावे आणि समर्थन देण्यासारखा कारभार असावा अशी महाराष्ट्रातील जनतेची अपेक्षा आहे. परंतु, प्रत्यक्षात मी केवळ चार प्रकरणे येथे मांडणार आहे. ही चारही प्रकरणे अतिशय गंभीर आहेत. ही प्रकरणे गंभीर असल्यामुळे अशी जर आपली स्थिती असेल आणि अशा पध्दतीने राज्य सरकार जर कारभार करीत असेल तर या अनुदानाच्या मागण्यांना आम्ही समर्थन कसे देणार?

ॲड.आशिष शेलार....

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे एक यादी आहे, ती मी माननीय गृह मंत्री यांच्याकडे पाठवेन. महाराष्ट्रातील विविध राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांच्या बँकेत झालेल्या फ्रॉडमुळे पोलीस कारवाई करण्यासाठी राज्य सरकारकडे परवानगी मागितली आहे.... सीबीआयला पत्र लिहिले आहे. सीबीआयने राज्य सरकारची परवानगी मागितली आहे. माननीय गृह मंत्री अन्य केसेसमध्ये आपण एक वेळेस बाजूला ठेवू, त्या केसेसमध्ये कदाचित तुमचे-आमचे म्हणणे वेगळे असेल. परंतु, कुठलेही सरकार ज्यावेळेस सरकार म्हणून काम करते त्यावेळेस नागरिकांच्या मालमत्ता व जिवाची सुरक्षा या दोन्हीला आपल्याला प्राथमिकता द्यावी लागते.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील नागरिक मेहनतीने कमविलेला पैसा विविध बँकामध्ये ठेवतात. ज्यावेळेस बँकेच्या हे लक्षात येते की, यामध्ये फ्रॉड झाला आहे, त्यावेळेस बँक त्या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी किंवा एफआयआर दाखल करण्यासाठी सीबीआयला विनंती करतात. सीबीआय दिल्ली स्पेशल पोलीस एस्टॅब्लिशेंट ॲक्टच्या सेक्शन ६ अंतर्गत या सर्व प्रकरणामध्ये दि.८ डिसेंबर, २०२० पासून महाराष्ट्र सरकारकडे विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, एकूण १२ प्रकरणे आहेत. मी ती सर्व प्रकरणे वाचेन. बँक ऑफ बरोडा यांनी दि. ११ जानेवारी, २०२१ रोजी विनंती केली आहे की, आमच्याकडे ७३९ कोटी रुपयांचा फ्रॉड झाला आहे. तो फ्रॉड इएमआय ट्रान्समिशन लिमिटेड कंपनीने केला आहे. आम्हाला कारवाई करु द्या. परंतु, महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली नाही. पंजाब नॅशनल बँक यांनी दि. ८ डिसेंबर, २०२० रोजी परवानगी मागितली होती. महाराष्ट्रातील सामान्य लोकांच्या ११०७ कोटी रुपयांचा फ्रॉड तेथे झाला. परंतु, महाराष्ट्र सरकार त्यावर कारवाई करण्यास परवानगी देण्यास तयार नाही. स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी दि.३० मार्च, २०२१ रोजी विनंती केली.

नंतर श्री.शिंदे ..

ॲड.आशिष शेलार...

बँकेतील जनतेच्या पैशांचा ४४३ कोटी रुपयांचा फ्रॉड झाला आहे. दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी युनियन बँक ऑफ इंडिया मधील जनतेच्या ४४८ कोटी रुपयांचा फ्रॉड झाल्याने कळवून कारवाई करण्यासाठी परवानगी मागितली आहे. त्यानंतर दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी युनियन बँक ऑफ इंडिया मधील जनतेच्या ४४८ कोटी रुपयांच्या फ्रॉड प्रकरणी सिक्कीम फेरो कंपनीच्या विरुद्ध कारवाई करण्यासाठी परवानगी देण्याची मागणी केली आहे. दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी यस बँकेतील ९८७ कोटी रुपयांच्या फ्रॉड प्रकरणी आयएलएफएस कंपनी विरोधात कारवाई करण्याची परवानगी मागणी केली आहे. दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी यस बँकेतील ५६९.४० कोटी रुपयांचा फ्रॉड प्रकरणी आयएलएफएस ट्रान्सपोर्ट कंपनीवर कारवाई करण्यासाठी परवानगी मागितली आहे. दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी यस बँकेतील ५२९.५ कोटी रुपयांचा फ्रॉड प्रकरणी आयएलएफएस मेरीटाईम कंपनीवर कारवाई करण्यासाठी परवानगी मागितली आहे. दिनांक २ मार्च, २०२१ रोजी स्टेट बँक ऑफ इंडीयामधील ६२४ कोटी रुपये फ्रॉड प्रकरणी श्री.अजय पीटर केळकर यांचेविरुध्द कारवाई करण्यास परवानगी मागितली आहे. तसेच श्री.अजय केरकर, डीजीएम, स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी १,९८७ कोटी फ्रॉड प्रकरणी कारवाई करण्यास कळविले त्यासंदर्भात कारवाई करण्याची परवानगी मागितली आहे. दिनांक ३१ मे, २०२१ रोजी ४,०३७ कोटी रुपयांच्या फ्रॉड प्रकरणी कारवाई करण्यास परवानगी मागितली आहे. दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी यस बँकेतील १,३५३ कोटी रुपये फ्रॉड प्रकरणी कारवाईची परवागनी मागितली आहे. दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी यस बँकेतील २२५ कोटी रुपये फ्रॉड प्रकरणी कारवाई करण्याची परवानगी मागितली आहे. यासर्व प्रकरणी गृह विभागाने कारवाई करण्यास अद्याप परवानगी दिली नाही.

ॲड.आशिष शेलार...

अध्यक्ष महोदय, राज्यातील विविध बँकामध्ये नागरिकांचे १२ प्रकरणांत सुमारे १३,०४३.५७ कोटी रुपये जवळपास बुडाले आहेत. स्वत:बँका फ्रॉड झाला असल्याचे सीबीआयला सांगत आहेत. सीबीआय कारवाई करण्यास तयार आहे. परंतु राज्य शासनाचा गृह विभाग त्यास परवानगी देण्यास तयार नाही. त्यांना सरकार पाठीशी का घालत आहे. या बँकेतील पैसा राज्यातील सामान्य जनतेचा आहे, त्यांना सुरक्षा देण्याकरिता सीबीआय कारवाई करण्याची परवानगी मागत असेल तर गृह विभाग परवानगी का देत नाही ?

अध्यक्ष महोदय, सामान्य नागरिकांच्या मेहनतीच्या १३ हजार कोटी रुपयांचा फ्रॉड करण्यात आला आहे, त्यासंदर्भात सरकारला अद्याप पाझर फुटत नाही. केवळ राजकीय स्वार्थापोटी सामान्य नागरिकांच्या पैशांच्या संदर्भात दुर्लक्ष करण्यात येत आहे. किंबहुना फ्रॉड करणाऱ्यांच्या उपयोगी भूमिका घेण्यात येत आहे. या मागील कारण काय, यामागे कोणी बोलवता धनी आहे काय ? याचे गृह मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मी पर्यावरण विभागातील काही विषयांवर बोलणार आहे. मुंबईकरांवर अन्याय झाला आहे, त्यांच्या पैशांचा अपव्यवहार झाला आहे. एका स्कॅमस्टर बरोबर आर्थिक व्यवहार करण्याचा प्रयत्न महानगरपालिकेच्या माध्यमातून व पर्यावरण विभागाच्या कृपेने सुरु आहे, असे चित्र उभे आहे. हा स्कॅमस्टर आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुन्हेगार आहे. त्याच्या बाबतीत वेळीच निर्णय घेतला नाही तर त्याने केलेल्या घोटाळ्यांना, स्कॅमला आपण समर्थन देत आहात, असा समज होईल.

यानंतर श्री.तेलंग...

ॲड.आशिष शेलार.....

महाराष्ट्र सरकारने वाजतगाजत एका कंपनीशी MOU केला. त्यावेळी उद्योग मंत्री महोदयासह अन्य एक मंत्री उपस्थित होते. आता सदर दोन्ही मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत.

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांवर आरोप करणार नाही. आरोप करावयाचे असते तर मी आपणास थेट नोटीस दिली असती. आपण देखील या गोष्टीच्या सत्येतेमध्ये जाऊन तातडीने निर्णय कराल, अशी मला आशा आहे. कारण सदर प्रकरण येथेच थांबेल, असे वाटत नाही. या प्रकरणाचे धागेदोरे आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत जाणार आहेत. आपण याबाबत योग्य तो निर्णय घेतला नाही तर शेवटी केंद्रीय तपास यंत्रणेला हस्तक्षेप करावा लागेल. परंतु मला असे वाटते की, आपणासह मला देखील महाराष्ट्राची बदनामी करावयाची नाही. त्यामुळे उक्त प्रकरणाकडे मंत्री महोदय विशेष लक्ष देतील, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी महाराष्ट्र सरकार आणि Causis E-Mobility या कंपनीशी MOU झाला. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मिहिर कोटेचा यांनी देखील या विषयावर बोलण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या बीईएसटीने इलेक्ट्रिकल व्हेईकल्ससाठी २०० बसेसचे टेंडर काढले. आज मी टेंडरसंदर्भात काहीही बोलणार नाही. सदर टेंडर rig कसे झाले, एकाच व्यक्तीने तीन टेंडर कसे भरले, escalated cost कशी होती, ती कॉस्ट जगातील इतर कॉस्टशी व्यवहारीक आहे की नाही, हे पाहिले काय, ती बस मुंबईतील रस्त्यांने चालण्यासाठी योग्य आहे काय, यापैकी मी कोणत्याही विषयावर बोलणार नाही.

अध्यक्ष महोदय, त्यादरम्यान आणि त्यानंतर महाराष्ट्र सरकारचे एक शिष्टमंडळ Glasgow, Scotland येथे Climate Change Conference साठी गेले होते. अशा प्रकारच्या कार्यक्रमासाठी जाणे आवश्यक आहे. परंतु त्यानंतर २०० बसेस ऐवजी ९०० बसेस घेण्याचा निर्णय बीईएसटीने घेतला. आपण एकाच वेळी ७०० बसेसची वाढ केली. ९०० बसेस खरेदी करण्याठी सामान्य मुंबईकराच्या

ॲड.आशिष शेलार.....

करातील २ हजार ८०० कोटी रुपये Causis E-Mobility या कंपनीला देण्याचा निर्णय घेण्यात आला.

अध्यक्ष महोदय, ९०० बसेस खरेदी करुन देखील त्यांचे समाधान झाले नाही. दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी बीईएसटीने असे सांगितले की, २०० बसेस खरेदी करण्याचे टेंटर काढलेले आहे. आता आम्ही ९०० बसेस खरेदी करणार आहोत. परंतु आता आम्हाला १४०० बसेस खरेदी करावयाच्या आहेत. याबाबतची प्रक्रिया पूर्ण केली की नाही, याबाबत देखील मी आज बोलणार नाही. माझा महत्त्वाचा विषय पुढे आहे.

अध्यक्ष महोदय, Causis E-Mobility ही कंपनी काय आहे, हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. या कंपनीचे प्रतिनिधी Mr. Tumuluri हे मंत्री महोदयांना माहिती असतील. त्यांना माहिती नसतील तर त्यांचे फोटो माझ्याकडे आहेत. आपण त्यांच्याबाबत नंतर चर्चा करु. Mr. Tumuluri यांना European Union, Malta, Vancouver यांनी "He is the biggest fraud" म्हणून घोषित केले. ज्यांना 'defaulter' आणि 'fraud' म्हणून घोषित केले अशा Mr. Tumuluri यांच्या कंपनीसोबत राज्य शासनाने MOU केलेला आहे. Mr. Tumuluri यांच्या कंपनीकडून बीईएसटीने २०० बसेसवरुन ९०० व ९०० वरुन १४०० बसेस खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. Mr. Tumuluri हे सदर कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. हे मूळ कॅनेडियन नागरिक आहेत.

अध्यक्ष महोदय, Mr. Tumuluri यांच्यावर कॅनेडाच्या माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये फ्रॉड केल्याचे असंख्य गुन्हे आहेत. अशा व्यक्तीबरोबर राज्य शासनाने १४०० बसेस खरेदी करण्याचा व्यवहार केलेला आहे. माझ्याजवळ एक अहवाल आहे, त्या अहवालाची एक प्रत अध्यक्ष महोदयांना सादर करणार आहे.

अध्यक्ष महोदय, Mr. Tumuluri यांनी Malta देशामध्ये १८ हजार कोटी रुपयांचा फ्रॉड केलेला आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

ॲड. आशिष शेलार...

ज्यांनी १८ हजार कोटी रुपयांचा फ्रॉड केला आहे, त्या Mr. Tumuluri यांना राज्यातील पर्यावरण विभाग आणि बीईएसटी रेड कार्पेट देत आहे. याबाबतचा रिपोर्ट मी आपणाकडे देईन. तसेच Mr. Tumuluri यांच्याबाबत कॅनडा सरकारने काय म्हटले आहे, ते मी वाचून दाखवितो. "Citing Supreme Court documents, it has been said that Mr. Tumuluri had failed in his obligation to pay VAT to the Canadian authorities, that he had deleted the company's accounting record.....". याचा अर्थ त्याने कॅनडा देशातून अकाऊंटिंग रेकॉर्डही पूसून टाकले आहेत. त्याचेही कागदपत्रे मी आपणाकडे देईन. अशा प्रकारे कॅनडातून पळालेल्या या व्यक्तीसोबत राज्य सरकारने MOU केले आहे. तसेच त्यांना बीईएसटीचे काम दिले आहे. माझ्याकडे Supreme Court of British Columbia यांचे पिटीशन आहे. Mr. Tumuluri यांनी Vancouver येथे कर चोरी, जागा चोरी केली आहे. तसेच तेथील नियम पायदळी तुडवून हजारो कोटी रुपये पळविलेले आहेत. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय फ्रॉड त्यांनी केला आहे. त्याचीही कागदपत्रे मी आपणाकडे सादर करणार आहे. अशा या व्यक्तीसोबत पर्यावरण विभागाने MOU केला आहे.

अध्यक्ष महोदय, Mr. Tumuluri कोण आहेत, त्यांच्या कंपन्या कशा चालतात, त्यांच्या कंपन्यामध्ये पैसे कोठून येतात, यामागे बेनामी होल्डर कोण आहेत, त्यांचे फंडर कोण आहेत, याची माहिती मी घेतली आहे. खरे तर याचा due diligence राज्य सरकारने करावयास हवा होता. परंतु तो केला किंवा नाही, हे मला माहिती नाही. हा due diligence मुद्दाम केला नाही, का तो करावयाचा नव्हता, याची मला कल्पना नाही. मी माननीय पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांना सांगू इच्छितो की, या सर्व गोष्टींना थांबविण्याची हीच वेळ आहे. कारण अशा स्कॅमस्टर सोबत व्यवहार करावा, अशी त्यांची इच्छा नसेल, असे मला वाटते. ज्यांनी Malta देशामध्ये १८ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला, ज्यांनी Vancouver मध्ये पैसे लपविले आहेत, ज्याला British Columbia ने, कॅनडियन सरकारने ब्लॅक लिस्ट

ॲड. आशिष शेलार...

केले आहे तेथून तो भगोडा म्हणून पळाला आहे. तो व्यक्ती Glasgow येथे कोणाला भेटला आहे, याबाबत मी अधिक भाष्य करु इच्छित नाही. या व्यक्तीच्या कंपनीचे फंडर हे शौकत अली अब्दुल गफुर हे आहेत. [***]

अध्यक्ष महोदय, Panama Leaks चे पेपर ऑनसाईट आहेत. त्यावर जगाभरातून चौकशी होत आहे. शौकत अली अब्दुल गफुर हे Mr. Tumuluri यांचे कंपनीतील फंडर आहेत. त्यांच्यासोबत महाराष्ट्र राज्य सरकार करार करीत आहे. शौकत अली हे पाकिस्तानी एजन्ट असून ते Libya मध्ये काम करीत आहेत. त्यांनी Mr. Tumuluri यांच्या कंपनीमध्ये गुंतवणूक केलेली आहे. असे असताना राज्य सरकार या कपंनीसोबत व्यवहार करीत आहे.

अध्यक्ष महोदय, या शौकत अली हे Arms Deal आणि हवालाचे काम करीत असतात. अशा आर्थिक व्यवहार असलेल्या कंपनीसोबत राज्य सरकार करार करीत आहे आणि बीईएसटी २,८०० कोटी रुपयांचे काम त्यांना देत आहे. शौकत अली यांचा श्री. परवेझ मुर्शरफ यांच्यासोबत फोटो आहे. तो मी दाखविण्यासाठी आणला आहे. तसेच Glasgow येथील फोटोही आहेत. परंतु मंत्री महोदयांनी व्यवहारात्मक उत्तर दिले तर मी व्यक्तीगत फोटोसुद्धा राज्य सरकारकडे देईन. परंतु यांना लपविण्याची वेळ आणली तर ही बाब सार्वजनिक करण्याची वेळ येईल. त्यांचे दुसरे फंडर हे अझद अली शौकत आहेत. ते दुबईस्थित पाकिस्तानी नागरिक आहेत. ते सिक्रेट डीलमधील हवाला करण्याचे काम करीत असतात. यांची Panama Leaks मध्ये नावे आहेत. राज्य सरकारच्या पर्यावरण विभाग आणि उद्योग विभागाला Mr. Tumuluri यांच्या VGF आणि Causis E-Mobility या कंपनीसोबत का करार करावा लागत आहे ?

[***] आदेशानुसार विलोपित मजकूर

यानंतर श्री. चौधरी...

ॲड.आशिष शेलार.....

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अशी काय मजबुरी होती की आपण त्याचा due diligence घेतला नाही ? Due diligence न करता Glasgow च्या दरम्यान २०० बसेस, नंतर ९०० आणि Glasgow नंतर १४०० असे एकूण २८०० कोटी रुपयांचे काम याच कंपनीला देण्यामागचे कारण काय आहे ? ज्या कंपनीमध्ये Arms Dealer असलेला पाकिस्तानी नागरिक आणि लिबियामध्ये एजंट म्हणून काम करणाऱ्या शौकत अलीचे फंडिंग आहे अशाच कंपनीसोबत व्यवहार करण्याची गरज काय आहे, असा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या भाषणाचा सामना वृत्तपत्रामध्ये आलेला वृत्तांत माझ्या हातात आहे. सामना वृत्तपत्रातील असल्यामुळे ते अधिकृत असेल असे मानायला काही हरकत नाही. मुंबई वातावरण कृती आराखडा अहवालाचे लोकार्पण कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, "विकास हा मुळावर उठणारा नव्हे तर शाश्वत असावा. विकास करण्याच्या घाईमध्ये माणसाने अनेक गोष्टी गमावल्या आहेत. पर्यावरण बदल हा त्याचाच दुष्परिणाम आहे. त्याची जाणीव झाल्यानंतर देखील सुधारणेला नेमकी कोणी सुरुवात करायची याची जगभरात द्विधा मन:स्थिती आहे. असे असताना महापालिकेने मुंबई वातावरणीय कृती आराखडयातून सर्वांसमोर आदर्श घालून दिला आहे."

अध्यक्ष महोदय, ही कल्पना अतिशय चांगली आहे व त्याला आमचा विरोध नाही. Mumbai Climate Action Plan-2022 म्हणजेच मुंबई वातावरण कृती आराखडा-२०२२ अन्वये आपण सन २०५० पर्यंतचे उद्दिष्ट ठरविले आहे. माननीय मुख्यमंत्री म्हणत आहेत की, पर्यावरणीय बदलावर आपण आवश्यक त्या गतीने काम करीत नाहीत. अशीच स्थिती मी मांडत असलेल्या प्रकरणात आहे. माहुल येथील नागरिक श्री.चारुदत्त कोळी, श्री.दर्याराम माहुलकर, श्री.मोहन म्हात्रे, श्री.दत्ताराम कोळी... हे सर्व मुंबईकर व मराठी लोक आहेत. ते राहत असलेल्या माहुलच्या आजुबाजूच्या कंपन्यांचा त्यांना होत असलेला त्रास, या कंपन्यांमधून निघणारा विषारी वायू व त्यामुळे होणारा परिणाम या विरोधात या नागरिकांनी

ॲड.आशिष शेलार.....

संघर्ष सुरु केला आहे. त्यांनी राष्ट्रीय हरित लवादामध्ये व न्यायालयामध्ये दावे दाखल केले आहेत. या माध्यमातून त्यांनी मुंबईसह स्वत:च्या आरोग्याची देखील चिंता करण्यास सुरुवात केली आहे. दिनांक १४ ऑगस्ट, २०२० रोजी राष्ट्रीय हरित लवादाने आदेश दिले की, "स्थानिक परिस्थिती जवळजवळ गॅस चेंबर असल्यासारखी आहे." ही बाब मंत्री महोदयांना देखील माहिती आहे. मुंबईतील नागरिकांना आपण कृती आराखडा देत असताना माहुलच्या नागरिकांच्या समस्येवर देखील तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. हे खाते माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांच्याकडे आहे व ते अतिशय गतिमान मंत्री आहेत. दिनांक १४ ऑगस्ट, २०२० रोजी राष्ट्रीय हरित लवादाने निर्णय देऊन चार कंपन्यांना २८६ कोटी रुपयांचा दंड आकारला. त्यामध्ये HPCL, BPCL यांच्याव्यतिरिक्त Aegis Logistics Ltd. (ALL) आणि Sea Lord Containers Ltd. (SLCL) यांचा समावेश आहे. या दोन कंपन्यांना १४२.२ कोटी रुपये कॉम्पेन्सेशन देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा मुंबईच्या पर्यावरणाचा विषय आहे. सन २०५० पर्यंत १/३ मुंबई पाण्याखाली जाऊ शकते असा अंदाज असताना मंत्री महोदयांनी गतिमानतेने काम करण्याची आवश्यकता आहे. आमचा त्यांच्यावर भरोसा होता कारण त्यांनी त्यांच्या विभागाच्या बैठकीनंतर दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी ट्विट केले होते की, "I also took a detailed review of Mahul issue. This week I have sought a joint meeting with all concerned authorities to decide further action for all those in high risk areas, and also steps to ensure that pollution control norms are followed in any case.".

यानंतर श्री.धुमाळे.....

ॲड आशिष शेलार...

अध्यक्ष महोदय, एन.जी.टी.चा अहवाल दिनांक १४ तारखेला आला आणि हा अहवाल आल्यानंतर १९ तारखेला मंत्री महोदय सरकारच्या वतीने असे म्हणाले की, "This afternoon, I met with the Environment Department and MPCB to follow up on the commitments from various Departments of the Government on climate change action. We also discuss the NGT order on Mahul and the role of our Department in terms of following it up.". पुन्हा २३ ऑक्टोबरला ते असे म्हणाले की, "Held a review meeting with officials from Environment Department, MPCB, Mumbai Police Traffic Department and companies operating in Mahul.....".

अध्यक्ष महोदय, आमची अशी कल्पना होती की, या कंपनीच्या लोकांसमवेत बैठक झाल्यानंतर हे १४२ कोटी सरकार भरुन घेईल. पण प्रत्यक्षात असे झाले की, सरकारसमवेत बैठक घेतली आणि त्या बैठकीचा बहाणा घेतला. एका बाजूला यांना बैठकीमध्ये गुंतवत बसले आणि दुसऱ्या बाजूला सुप्रीम कोर्टात गेले. सुप्रीम कोर्टात जाण्यापासून आपण कोणालाही थांबवू शकत नाही. त्यांनी कोर्टामध्ये जाऊन 'स्टे' घेतला. माझा सवाल आहे की, ज्यावेळी माहूल गावचा नागरिक गॅस चेंबरमध्ये जगतो आहे आणि ज्यावेळी त्याच्या मृत्यूचे कारण तेथून निघणाऱ्या या ALL आणि SLCL या कंपन्यांच्या गॅसमुळे होत आहे त्यावेळी ते तातडीने सुप्रीम कोर्टात जाऊ शकतील ही कल्पना करुन कॅव्हीएट दाखल करणे अपेक्षित होते. पण शासनाने ते केले नाही. मी आरोप करणार नाही की आपण त्यांना सुप्रीम कोर्टात जायला दिले. पण आपण कॅव्हीएट दाखल केले नाही. त्यामुळे त्यांना मुभा मिळाली. एवढेच नाही तर जेव्हा एन.जी.टी.समोर केस सुरू होती त्या काळामध्ये सुध्दा राज्य सरकारच्या एमपीसीबीने या सर्व विषयात आमच्या माहूलवासियांना

न्याय मिळाला पाहिजे म्हणून प्रत्यक्षात अभ्यास करण्यासाठी 'निरी' अंतर्गत एक समिती बनविली

ॲड आशिष शेलार...

होती. त्या निरीच्या समितीने असा अहवाल दिला की, जर आपल्याला Mitigation Plan करायचा असेल तर या चारही कंपन्यांना १४००० कोटी रुपयांचा दंड आकारला पाहिजे. सरकारच्या लेखी 'निरी'चा हा रिपोर्ट होता. म्हणून माझा सवाल आहे की, आपण हा अहवाल एनजीटीसमोर का सादर केला नाही.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, जेव्हा 'निरी' असे म्हणते की, आपण या विदेशी कंपन्यांकडून १४००० कोटी रुपयांचा दंड वसूल केला पाहिजे तेव्हा १४२ कोटी रुपयांवर मांडवली करायची होती काय, अशी शंका निर्माण होते. त्यामागचे कारण दुसरे आहे. तिसरा मुद्दा असा आहे की, आपण सुप्रीम कोर्टासमोर कॅव्हीएट का दाखल केले नाही आणि माहूलच्या नागरिकांना धूळ खात त्या गॅस चेंबरमध्ये आजही सोडले आहे. मग आपण कसले Climate Action Plan करीत आहात? हे निवडणुका समोर आल्यानंतर मोती साबण काढण्याचा प्रकार आहे. म्हणजे दिवाळीच्या पहिल्या आंघोळीला मोती साबण बाहेर काढतात तसे.

अध्यक्ष महोदय, प्रत्यक्षात ज्या ठिकाणी केस सुरू आहे आणि १४ हजार कोटी रुपये वसूल करा असे निरी सांगते, एमपीसीबी सांगते. त्यानंतर १४२ कोटी रुपयांची ऑर्डर आली त्यानुसारही आपण वसुली केली नाही. त्याच काळामध्ये एक भयंकर गोष्ट अशी घडली की ज्यावेळी अशाच रहिवाशी भागामध्ये असलेल्या आस्थापनांमुळे प्रदुषण होते म्हणून कारवाई करा, जशी केस या माहूलच्या प्रकरणात झाली तशीच केस डोंबिवलीच्या प्रकरणात झाली. तेथील स्थानिक आमदार सन्माननीय सदस्य श्री रविंद्र चव्हाण या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यावेळी सर्व मराठी लोक किंवा भारतीय नागरिकांच्या सुमारे १५६ फॅक्टऱ्या त्या ठिकाणी प्रदुषण होते म्हणून तातडीने एमआयडीसीमधून बदलून त्यांना पाताळगंगाला हलविण्यात

आले होते. म्हणजे मुंबईतील, महाराष्ट्रातील मराठी माणसाला त्याच्या १५६ फॅक्टऱ्या प्रदुषणाच्या नावावर हलविण्यास सांगता. पण या ALL आणि SLCL या

अॅड आशिष शेलार...

कंपन्या काय आपल्या जावई आहेत. या विदेशी कंपन्या आहेत. त्यांच्याकडून आपण दंडाची रक्कम वसूल केली नाही आणि त्यांना अधिकचा दंड आकारला नाही. त्याशिवाय आपण त्या स्थलांतरित करण्याचेही आदेश दिले नाहीत. मग आपण कोणत्या बैठका घेतल्या आणि आता कोणता Action Plan करणार आहात? त्यामुळे या मल्टीनॅशनल कंपन्यांना केवळ आणि केवळ मदत व्हावी म्हणून सरकारने ही भूमिका घेतली की काय अशी दाट शक्यता निर्माण होते. म्हणून मंत्री महोदयांनी यावर उत्तर द्यावे, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार.....

अध्यक्ष महोदय, आता मी माझा शेवटचा मुद्दा मांडणार आहे. माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी भाषण करताना एका वाक्यावर खूप भर दिला आणि सांगितले की, "आम्ही जंगल वाढवले. तसेच या काळात आम्ही पर्यावरणाला वाचविण्याची भूमिका घेतली." सन्माननीय सदस्य श्री. रोहित पवार यांनी इंडियन स्टेट फॉरेस्टच्या अहवालाचा दाखला दिला होता. माझ्या हातात देखील "India State of Forest Report, 2021 याची कॉपी आहे. हा अहवाल असे सांगतो की, महाराष्ट्रामध्ये बांबुचे जंगल सन २०१९ मध्ये १५ हजार ४०८ एवढे स्क्वेअर किलोमीटर होते. सन २०२१ मध्ये म्हणजे दोन वर्षामध्ये १३ हजार ५२६ स्क्वेअर किलोमीटर झाले आहे. याचा अर्थ दोन वर्षामध्ये आपला जंगल वाढविण्याचा एवढा प्रताप होता की, दोन वर्षामध्ये बांबुचे जंगल १ हजार ८८२ स्क्वेअर किलोमीटर गायब झाले, नष्ट झाले, व्यपगत झाले, ते उडून गेले. त्या बांबुची किंमत जवळपास १ हजार कोटी रुपये असेल. त्याची स्मगलिंग झाली की काय अशी आमच्या मनात शंका निर्माण होते. १ हजार कोटी रुपयांच्या स्मगलिंगच्या बाबतीत सरकार कानाडोळा करीत आहे की काय, पर्यावरण विभाग लक्ष देते नाही की काय, असे आमचे प्रश्न आहे. या पद्धतीने सरकार चालणार असेल म्हणजे जिथे लोकांचे बँकेतील पैसे १३ हजार कोटी रुपये गेले तरी देखील आम्ही परवानगी देणार नाही.१ हजार ८८२ स्क्वेअर किलोमीटरचे जंगल गेले, स्मगलिंग झाले तरी आम्ही लक्ष देणार नाही. माहुल येथील लोकांसाठी १४ हजार कोटी रुपयांचे फाईन घ्या असे सांगितल्यानंतर सुद्धा आम्ही कंपन्यांना मदत करु. मुंबईकरांबरोबर राहणार नाही आणि मुंबईतील इलेक्ट्रीक बसेस घेताना आम्ही त्यांच्याशी व्यवहार करु. पाकिस्तानी एजेंट म्हणून जे लिबियामध्ये काम करतात त्यांचा आर्थिक निधी असलेल्या कंपनीशी करु. अशा पद्धतीने राज्य शासनाचा व्यवहार सुरु आहे त्याचा मी निषेध करतो आणि अनुदानाच्या मागण्यांना विरोध करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी सीबीआयच्या परवानग्यांच्या संदर्भातील विषय सभागृहामध्ये उपस्थित

श्री. दिलीप वळसे-पाटील....

केला आहे. या संदर्भात काल संसदेमध्ये चर्चा झाली. कालच मला माननीय श्री. शरद पवार यांचा फोन आला होता की, महाराष्ट्र शासन यासाठी परवानगी का देत नाही. त्यानंतर आम्ही त्याच्या संदर्भात सर्व माहिती घेतली. किती प्रकरणामध्ये परवानगी दिली, किती प्रकरणे सीआयडीकडे प्रलंबित आहेत, किती प्रकरणे डीजी ऑफिसकडे प्रलंबित आहेत याची माहिती मी माझ्या उत्तरामध्ये सांगतो. या सर्व प्रकरणामध्ये ताबडतोब परवानगी दिली जाईल.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील पुरवणी मागण्यांवरील गृह निर्माण विभाग, नगर विकास विभाग व पर्यावरण विभागाच्या संदर्भात मी चर्चा करण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पात पोलीस कर्मचारी वर्ग व पोलीस दलाचे आधुनिकीकरण या करिता तरतूद केलेली आहे. माझ्या मतदारसंघात जोगेश्वरी पोलीस स्टेशन, मेघवाडी पोलीस स्टेशन व आरे पोलीस स्टेशन या तीन पोलीस स्टेशनचा भाग येतो. जोगेश्वरी हा दंगलग्रस्त भाग आहे. सन १९७४, १९८४, १९७९ व सन१९९२ मध्ये येथे दंगल झाली होती. येथे जोगेश्वरी व मेघवाडी हे दोन पोलीस स्टेशन झाले आहेत. या तिन्ही पोलीस स्टेशनची दुर्दशा झालेली आहे. जोगेश्वरी पोलीस स्टेशन दर वर्षी पाण्यामध्ये जाते. ते भाड्याच्या जागेत आहे. अशा पोलीस स्टेशनचे काम व्हावे, या करिता अनेक वर्षे म्हणजे जवळजवळ १०-१२ वर्षांपासून पाठपुरावा केला जात आहे. मात्र अद्याप या संबंधी निर्णय झालेला नाही. मेघवाडी पोलीस स्टेशन हे दंगलग्रस्त व संवेदनशील भागात असल्यामुळे, तेथे भूमापन क्र. ३ पैकी २ हजार १८ चौ. मी. जागा देण्यात आली. मेघवाडी पोलीस स्टेशन करिता जोगेश्वरी हायवे जवळ जागा देण्यात आली. या पोलीस स्टेशनच्या कामाकरिता अर्थसंकल्पात २-३ वर्षात २ कोटी रुपयांचा निधी मिळाला. मात्र अद्याप मेघवाडी पोलीस स्टेशनचे काम झाले नाही. तेथे २२ घरे व एक देऊळ देखील शिफ्ट करण्यात आले. शासनाने प्रयत्न केल्यानंतर २२ घरांना घरकुल देण्यात आले. येथील मंदिराचे दुसऱ्या ठिकाणी बांधकाम केले. मात्र मेघवाडी पोलीस स्टेशन अद्याप बांधले नाही. या करिता निधी उपलब्ध आहे, जागा मिळालेली आहे, लोकांचे स्थलांतर केले आहे मात्र तरी देखील हे काम पूर्ण होत नसेल तर हे अतिशय दुर्दैव आहे.

अध्यक्ष महोदय, सन १९६० नंतर आरे पोलीस स्टेशनची स्थापना पदुमच्या जागेत झाली. आरे पोलीस स्टेशनमध्ये पावसाळयात आपण बसूही शकत नाही. तेथे सर्व प्राणी येतात. मुख्यमंत्री यांच्या दालनात या संबंधी बैठक घेतली तेव्हा पदुम

श्री. रविंद्र वायकर ....

विभागाची ५ एकर जागा गृह विभागाला देण्याचे कबूल झाले होते. पदुम विभागाने जागा हस्तांतरित केली मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या तिन्ही पोलीस स्टेशनचा विकास व्हावा, तेथे आवश्यक ते मनुष्यबळ असावे, तसेच त्यांना लागणाऱ्या बाबींची पूर्तता अर्थसंकल्पातून व्हावी, अशी मी या माध्यमातून मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरावर आतंकवादी यांनी हल्ला केला, तेव्हा नॅशनल सिकयुरिटी गार्ड, योध्दे, जवान दिल्लीवरून बोलवावे लागले. या धर्तीवर मुंबई शहरात फोर्स १ ची स्थापना करण्यात आली. या नंतर त्यांना मुंबई विद्यापीठाच्या बाजुला थोडीशी जागा दिली. या संबंधी अतिरिक्त आयुक्त यांच्या बाबत चर्चा केली गेली. आरे कॉलनीतील ९८ एकरची जागा फोर्स १ करिता दिली आहे. त्यांचे काम सुरु झाले. तेथे वसाहती देखील झाल्या. मात्र या फोर्स १ च्या बाजुला केल्टी पाडा १, केल्टी पाडा२, चाफ्याचा पाडा हे तीन पाडे आहेत. या पाड्यांचे स्थलांतर करण्यासाठी फोर्स १ ने आपली जागा या लोकांना देऊ केली. या संबंधी अनेक बैठका झाल्या मात्र अद्याप त्यांचे स्थलांतर केलेले नाही. तेथे बाजुलाच वस्ती असल्यामुळे फोर्स १ ला कवायती, फायरिंग या बाबी करता येत नाहीत. या तिन्ही पाड्यांचे स्थलांतर करावे, असे शासनाने निर्देश दिलेले आहेत. ही बाब म्हाडाच्या माध्यमातून झाली पाहिजे. या करिता सर्व्हे करुन लोकांचे स्थलांतर करणे आवश्यक होते. या आदिवासी लोकांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होऊ नये, या दृष्टीने त्यांना नोकरीत सामावून घ्यावे. हे लोक जर शेती करीत असतील तर त्यांना तेवढी जागा द्यावी, अशी त्यांची मागणी होती.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.रविंद्र वायकर ...

या मागणीचा विचार करुन फोर्स वनसाठी त्या ठिकाणी ती जागा दिली तर, फोर्स वनला त्याचा उपयोग होईल. राज्याच्या दृष्टीने, देशाच्या दृष्टीने फोर्स वन कार्यान्वित होणे हे अत्यंत गरजेचे आहे. फोर्स वनच्या जवानांचे प्रात्यक्षिक आम्ही पाहतो. इंग्रजी सिनेमामध्ये आपण ज्या पध्दतीने पाहतो, त्या पध्दतीने हे फोर्स वन काम करीत आहे. त्यांच्या राहण्याची सोय होणे देखील गरजेचे आहे. आपले जवळजवळ ५०० ते ५५० जवान तेथे आहेत. तेथे फक्त १८५ लोकांना तेथे घरकुल दिले आहे. त्यांना २४ तास अटेन्टीव्ह राहणे गरजेचे असते. ते दुसरीकडे राहत असतील तर त्यांची जेथे आवश्यकता आहे तेथे पोहोचण्यास त्यांना उशीर झाला तर ते बरोबर होणार नाही. त्यामुळे त्यांच्या घरकुलांच्या विषयावर देखील निर्णय करणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत देखील गृह विभागाकरिता अर्थसंकल्पामध्ये प्रामुख्याने तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, बल गट म्हणून आपल्याकडे एसआरपीएफ कॅम्प आहे. त्या ठिकाणी देखील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झालेली आहे. ज्यावेळेस एसआरपीएफमध्ये भरती असते त्यावेळेस बाहेरचे हजारोंच्या संख्येने उमेदवार मुलाखतीकरिता येतात. परंतु, त्या लोकांना रस्त्यावर झोपावे लागते. कारण त्यांना राहण्याकरिता सोय नसते. ते गावागावातून आलेले असतात. त्यांच्या राहण्याची, एकत्र उठण्या-बसण्याची सोय करणे गरजेचे आहे. एसआरपीएफ भरतीसाठी आलेल्या उमेदवारांना रस्त्यावर किंवा अन्य ठिकाणी राहण्यास लागणे, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. याबाबतीत देखील आपण गृह विभागाच्या माध्यमातून विचार करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या येथे म्हाडा कॉलनीमध्ये पोलीस वसाहती आहेत. त्या वसाहतींची अवस्था देखील दुर्दशा झालेली आहे. तेथे जर आपल्या माध्यमातून रिडेव्हलपमेंट केले तर, ४ एफएसआय मिळेल. ४ एफएसआय मिळत असताना मागच्या सरकारमध्ये आम्ही असताना त्यावेळेस देखील पोलिसांनी हक्काचे घरकुल मिळण्याबाबत मागणी केली होती.

श्री.रविंद्र वायकर ...

अध्यक्ष महोदय, यावर अनेक बैठका झाल्या होत्या. ज्यांची सेवा २५ वर्षांच्यावर झालेली असेल अशा पोलीस शिपाई किंवा अधिकाऱ्यांना त्यांचे हक्काचे घरकुल त्याची कन्स्ट्रक्शन कॉस्ट घेऊन त्यांना देण्यात यावे. कारण ४ एफएसआय मिळत असेल तर १ एफएसआय बांधकामामध्ये जाईल, १ एफएसआयमध्ये आपण कन्स्ट्रक्शन कॉस्ट घेऊन घरकुल दिले तर त्यांना सुविधा होईल व २ एफएसआय पोलीस विभागासाठी घरकुल बांधण्यासाठी उपयुक्त होऊ शकेल. मी याबाबत आपल्याला विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मला हे सांगावयाचे आहे की, अनेक गार्डन्स आहेत. अनेक कन्सट्रक्टीव्ह गोष्टी नगरविकास विभागाच्या माध्यमातून करावयाच्या आहेत. मी याबाबत एक विनंती केली होती की, मुंबई शहरामध्ये अनेकवेळा अनधिकृत बांधकामे होतात. ही अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी पोलीस विभागाची नेहमी आवश्यकता भासते. ज्यावेळेस वॉर्डमधील इमारत विभागाचा इंजिनिअर किंवा ए.ई. पोलीस स्टेशनला त्याबाबत पत्र देतो, ते पत्र कमिशनर ऑफिसला जाते.

अध्यक्ष महोदय, कमिशनर ऑफिसमधून मान्यता मिळाल्यानंतर त्याला संरक्षण दिले जाते. परंतु, जोपर्यंत पोलीस मिळत नाहीत तोपर्यंत इमारत विभागाचे कर्मचारी अनधिकृत बांधकाम तोडू शकत नाहीत. त्यामुळे मुंबई शहरामध्ये देखील अनधिकृत बांधकामे वाढत चालली आहेत. याकरिता मी अशी विनंती केली होती की, पोलीस दलातील जी काही क्षमता असेल ती किंवा ४०० जवान मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये घ्यावेत. ते पोलीस दलाच्या सेवेतच असतील परंतु, त्यांचे वेतन मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून द्यावे. इस्टर्न सबअर्बन, वेस्टर्न सबअर्बन व सीटी असे १००-१०० पोलीस त्या महानगरपालिकेच्या अखत्यारीमध्ये त्या त्या विभागाला दिले व १०० पोलीस हे हॉकर्स व बाकीच्या गोष्टींकरिता वापरले तर, या ४०० पोलिसांचा उपयोग मुंबईमध्ये होणाऱ्या अनधिकृत बांधकामाच्या विरुध्द चांगल्या पध्दतीने होऊ शकतो.

श्री.रविंद्र वायकर ...

अध्यक्ष महोदय, कधी कधी एखादे बांधकाम झालेले असते, ते जर एक आठवड्यामध्ये तोडले गेले नाही तर तो कोर्टामध्ये जातो. कोर्टातून स्टे दिला जातो व ते बांधकाम कालांतराने पक्के होते, अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे त्या गोष्टीचा विचार देखील गृह विभाग व नगरविकास विभागाच्या माध्यमातून व्हावा. हा एकत्रित विषय आहे कारण मुंबई महानगरपालिका नगरविकास विभागाच्या अखत्यारित येते व पोलीस हे गृह खात्याच्या अखत्यारित येतात.

अध्यक्ष महोदय, राजेश्वर रागीनवार स्मशानभूमीच्या आत जवळजवळ ८२ रुम्स होत्या. जेथे प्रेतांचे दहन केले जाते, ज्याला आपण फ्युनरल प्रेअर म्हणतो ती केली जाते तेथे ८० ते ८२ रुम्स होत्या. त्यातील ४० रुम्स शिफ्ट करण्यात आल्या. अजून ४२ रुम त्या ठिकाणी आहेत. त्या ४२ रुम्स देखील शिफ्ट केल्या तर तेथील जागा स्मशानासाठी उपयोगी ठरेल.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.रविंद्र वायकर...

त्या स्मशानभूमी येथील लहान मुलांना दफन करण्याची जागा अत्यंत लहान असल्याने त्यासाठी ४२ खोल्यांचे स्थलांतर करणे गरजेचे आहे. सदरहू स्मशानभूमी येथे लाकडाचा वापर करुन अंत्यविधी करण्यात येतो त्याऐवजी विद्युत किंवा गॅस दाहिनी उपलब्ध करुन दिल्यास पर्यावरणास फायदा होईल. या दृष्टीकोनातून पर्यावरण मंत्री महोदयांनी कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, डीपी रोडवर अनेक झोपडपट्ट्या आहेत. त्यांचा विकास करणे ही महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी एसआरए व नगर विकास विभागाच्या माध्यमातून बैठका घेऊन निर्णय घेतला तर डीपी रोडचा विकास करण्यास मदत होईल.

अध्यक्ष महोदय, माननीय न्यायालयाने आदेश दिले होते की, जोगेश्वरी गुंफेपासून ५०० मीटर क्षेत्रात कोणतेही बांधकाम करता येणार नाही, त्यानंतर ३०० मीटर क्षेत्राची मर्यादा घालण्यात आली. त्यानंतर पुरातन वास्तूच्या जतनाच्या अनुषंगाने पीआयएल क्र. २४४५/२०१० दाखल करण्यात आली होती. या प्रकरणीच्या निर्णयामध्ये २५ मीटर क्षेत्रात बांधकामास प्रतिबंध घालण्यात आला होता व १०० मीटर क्षेत्रात खाजगी बांधकामास प्रतिबंध घालण्यात आला होता. जोगेश्वरी गुंफा येथील अर्ध्यापेक्षा अधिक झोपडपट्टीचे स्थलांतर करण्यात येईल, असे शपथपत्र मुंबई महानगरपालिकेने न्यायालयात सादर केले. त्यानंतर माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार ८० ते ९० टक्के झोपडपट्टीचे स्थलांतर करण्यात आले आहे. सदरहू ठिकाणी नगर विकास विभागाच्या माध्यमातून शिल्पग्रामच्या धर्तीवर एक उद्यान विकसीत करावे व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक गृहनिर्माण प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत व त्यानुषंगाने अनेक विकासक जेलमध्ये गेले आहेत. माझ्या विभागातील बांद्रा प्लॉट व कुलाबा प्लॉट येथे ५० हजार मुस्लीम वस्ती आहे. तिचा पुनर्विकास करण्याचे काम ओमकार डेव्हलपर्स या विकासकाने हाती घेतले होते. त्याने तेथील २ हजार घरे

श्री.रविंद्र वायकर...

तोडली आहेत व त्या लोकांना सुमारे ३-४ वर्षांपासून भाड्याची रक्कम मिळत नाही. तेथील लोक बेघर झाले आहेत व विकासक जेलमध्ये आहे. त्यामुळे उक्त भागातील गांधी नगर, हरी नगर, रॉयल पाम येथील लोकांच्या पुनर्विकास प्रकल्पासाठीचा प्रयत्न करण्यात यावेत, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आरे कॉलनीमध्ये अनेक दिवसांपासून आगी लागण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचा शोध पोलीस व पर्यावरण विभागाच्या माध्यमातून घेतला तर त्यामागील कारण समोर येईल. सदरहू ठिकाणी अनधिकृत बांधकाम करण्यासाठी आग लावण्याचे प्रकार घडत आहेत. युनिट क्र.१९ मधून उच्च दाबाची वीज वाहिनी केबल गेली आहे. त्याखाली अनेक घरे आहेत त्यांना काही बाधा होऊ नये. याकरिता त्या भागातील झाडे तोडण्यात आली आहेत. सदरहू भागातील लोकांचे स्थलांतर करणे किंवा त्यांना घरकुल उपलब्ध करुन देणे अतिशय महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविलेल्या विभागांच्या मागण्यांना माझा पाठिंबा आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्य यांना बोलावयाचे असल्याने मी माझे भाषण पूर्ण करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सीबीआयने फ्रॉड प्रकरणी करावयाच्या कारवाई संदर्भात परवानग्या देण्याची कार्यवाही आजही राज्य सरकारकडे प्रलंबित आहे. यासंदर्भात त्यांनी लेखाजोखा मांडला आहे. त्याचे गृह मंत्री महोदयांनी लगेच उत्तर दिले, याबद्दल मला चांगले वाटले.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.अतुल भातखळकर.....

अध्यक्ष महोदय, गृह विभाग हा कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. असे असताना या विभागाच्या बाबतीत अशा प्रकारच्या घटना का घडत आहेत? सरकार ज्या दिशाने पावले टाकत आहे, ज्याप्रमाणे कृती करीत आहे, त्यावरून या सरकारचा हेतू काय आहे, हे स्पष्ट दिसत आहे. गृह विभागासंदर्भात सर्वसामान्य माणसांमध्ये शंका निर्माण व्हावी, असे राज्याचे गृह विभाग काम करीत आहे. दुर्देवाने अशा प्रकारची स्थिती या राज्यामध्ये निर्माण झालेली आहे. राज्याला एक चांगले गृहमंत्री लाभले होते. परंतु त्यांच्यावर तत्कालीन पोलिस आयुक्त, मुंबई यांनी अनेक आरोप केले. त्यानंतर काही जणांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. उक्त याचिकेवर निर्णय देताना माननीय मुंबई उच्च न्यायालयाने श्री.अनिल देशमुख यांची सीबीआयमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले. खरे पाहता राज्य शासनाने माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या चौकशी आदेशाचे स्वागत करावयास पाहिजे होते. सदर चौकशीस माननीय श्री.अनिल देशमुख यांनी विरोध केला, हे आम्ही समजू शकतो. परंतु माननीय श्री.अनिल देशमुख यांची सीबीआयमार्फत चौकशी करण्यात येऊ नये, यासाठी राज्य शासनाने माननीय उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये असे केव्हाही घडले नव्हते. पण ते या महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये घडले आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारने या सर्व कार्यवाहीसाठी सरकारी वकिलाची नेमणूक न करता विशेष वकिलाची नेमणूक केली. करदात्यांच्या पैशाची उधळपट्टी करून भ्रष्टाचारी मंत्री महोदयांना वाचवण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत होते. भ्रष्टाचाराची चौकशी करु नका, राज्य शासन कसे काय म्हणू शकते? राज्य शासनाचे सल्लागार कोण आहेत, हे मला कळत नाही. माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांनी दिलेल्या चौकशी आदेशाविरोधात राज्य शासनाने माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. उक्त याचिकेवर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने न्यायनिर्णयामध्ये असे नमूद केले आहे की,

श्री.अतुल भातखळकर.....

"The court was so convinced with the SC order that the opposite party did not have to argue the case." असे म्हटले आहे. उक्त प्रकरणी युक्तिवाद करण्याची देखील गरज नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे. मागील अडीच वर्षांमध्ये राज्य शासनाने अशा प्रकारे अनेक पराक्रम केलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने संविधानामध्ये तरतूद नसलेल्या प्रभारी पोलीस महासंचालक पदावर श्री.संजय पांडे यांची नियुक्ती केली. प्रत्येक राज्याचे पोलीस महासंचालक हे राजकीय हस्तक्षेपाशिवाय नियुक्त झाले पाहिजे, असे सन २००५ मध्येच माननीय सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले होते.

अध्यक्ष महोदय, राज्याचे पोलीस महासंचालक पद रिक्त होण्यापूर्वी राज्य शासनाने पात्र अधिकाऱ्यांच्या नावाची यादी केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठविणे आवश्यक असते. त्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोग पात्र अधिकाऱ्यांचा गोपनीय अहवाल पाहून त्यापैकी तीन नावांची शिफारस संबंधित राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्याकडे करतात. त्यानंतर मुख्यमंत्री महोदय शिफारस केलेल्या तीन व्यक्तींपैकी एका व्यक्तीची राज्याचे पोलीस महासंचालक म्हणून नियुक्त करतात. हा निर्णय माननीय सर्वोच्च न्यायालयाचा आहे. म्हणजे तो कायदा आहे.

अध्यक्ष महोदय, जेव्हा श्री.सुबोध जयस्वाय केंद्र सरकारच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीवर गेल्यानंतर राज्य शासनाने पात्र १०-१५ अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठविले. त्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाने बैठक घेऊन त्यापैकी तीन नावांची शिफारस केली. सदर शिफारस पत्रावर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सदस्यांसह तत्कालीन राज्याचे मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे यांची देखील स्वाक्षरी होती. कारण सदर बैठकीस ते देखील उपस्थित असणे अपेक्षित असते. परंतु केंद्रीय लोकसेवा आयोगाने शिफारस केलेले तिन्ही व्यक्ती राज्य शासनास पसंत नव्हते. कारण त्यांना त्यांच्या मनासारखा पोलीस महासंचालक नियुक्त करायचा होता.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. अतुल भातखळकर.....

म्हणून श्री. संजय पांडे यांना ॲक्टींग डीजी म्हणून नियुक्त केले. ॲक्टींग डीजी हे असंवैधानिक आहे. परंतु त्यावर कोणी बोलण्यास तयार नव्हते. शेवटी माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. ॲक्टींग डीजी ही संकल्पना नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकाला विरोधातील ही गोष्ट आहे. माननीय उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्यानंतर राज्य सरकारने आधीच्या प्रकरणासारखाच याही प्रकरणाचा प्रतिवाद केला होता. मी माननीय न्यायालयातील सर्व रिपोर्ट वाचून दाखविणार नाही. परंतु या राज्य सरकारला माननीय न्यायालयाने जेवढ्या चपराक मारल्या आहेत, तेवढ्या महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात कोणत्याही राज्य सरकारला मिळाल्या नसतील. परंतु याचा उपयोग होत नाही. आदरणीय श्री. शदर पवार हे एकदा म्हणाले होते की, "शहाण्याला शब्दाचा मार पुरेसा असतो.' ही बाब खरी आहे. परंतु हे जर शहाणे नसतील तर माननीय उच्च न्यायालयाने कितीही स्ट्रिक्चर्स दिले तरीही काही फरक पडत नाही. राज्य सरकार या प्रकरणात प्रतिवादी झाले आहे. घटनाबाह्य निर्णयाचे राज्य सरकारने समर्थन केले व सांगितले की, युपीएससीचा निर्णय राज्य सरकारला मान्य नाही. त्यामुळे आम्ही युपीएससीला पुन्हा एक पत्र लिहून पाठविणार आहोत. माननीय उच्च न्यायालयाने सांगितले की, युपीएससीच्या निर्णयावर तत्कालीन मुख्य सचिव श्री. सिताराम कुंटे यांची सही आहे. त्या निर्णयावर त्यांनी सही केलेली आहे. परंतु इकडे आल्यावर एक आठवड्यानंतर युपीएससीला पत्र लिहिण्यात आले होते. त्यावर सरकारने युक्तीवाद केला होता. श्री. संजय पांडे हे त्या प्रकरणात प्रतिवादी होते. घटनाबाह्य असलेल्या याही प्रकरणात विशेष वकील नियुक्त केले होते. माननीय उच्च न्यायालयाने शेवटी सांगितले की, "It seems that Sanjay Pande is your blue eyed boy." हे निरीक्षण माननीय उच्च न्यायालयाच्या न्यामुर्तीचे आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "... and there is tangible quid pro quo.." 'मी तुम्हाला ॲक्टींग डीजी करतो. त्याबदल्यात आम्ही जसे म्हणतो तसे तुम्ही वागावे.' युपीएससी ने श्री. संजय पांडे यांचे नाव न घेण्याचे कारण होते की, त्यांच्या काही शेऱ्यांमध्ये "Very Good" असा शेरा नव्हता. राज्य सरकार श्री. संजय पांडे यांचे वकील झाले होते. ते असे म्हणाले

श्री. अतुल भातखळकर.....

की, 'त्यांचे शेरे चांगले होण्याकरिता अर्ज केला आहे.' त्यावर माननीय उच्च न्यायालयाने सांगितले की, या प्रकरणातील फाईल न्यायालयासमोर सादर कराव्यात. याचे कारण न्यायालयास माहित होते की, शेरे चांगले करा, हे नाकारण्याचे काम तत्कालीन गृह सचिव श्री. सिताराम कुंटे यांनीच केले होते. श्री. कुंटे हेच आता न्यायालयात सरकारची बाजू मांडत होते. शेरे चांगले करण्यासंदर्भातील फाईल देण्यात याव्यात, हे न्यायालयाने सांगितले होते. त्यानंतर पुढच्या तारखेस राज्य सरकारने माननीय उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करुन सांगितले की, काही हरकत नाही. आपण म्हणत आहात तसे युपीएससीच्या लिस्टमधील तिघांपैकी एकास मी पोलीस महासंचालक पदावर नियुक्त करतो. ॲक्टींग पोलीस महासंचालकांना काढून टाकले जाईल.

अध्यक्ष महोदय, हे राज्य सरकार आहे का ही सर्कस आहे. बाहेरच्या तमाशामुळे लोकांची करमणूक होते. परंतु या तमाशामुळे लोकांचे जीव जात आहेत. ॲक्टींग डीजी असतो काय ? श्री. सिताराम कुंटे यांनी कशा पद्धतीने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहेत ? या सर्व बदल्यांच्या प्रकरणाची चौकशी ई.डी. आणि सीबीआय करीत आहे. त्यांना श्री. कुंटे यांनी जबाब देऊन सांगितले आहे की, तत्कालीन गृहमंत्री श्री. अनिल देशमुख हे माझ्याकडे बदल्यांची यादी देत असत आणि त्या याद्या.....

अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी द्यावी. मी आमच्या पक्षातून भाषण करणारा दुसरा सदस्य आहे. मला अजून नगर विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलावयाचे आहे.

तालिका सभाध्यक्ष : मी आपणास सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार हे ३२ मिनिटे बोलले आहेत. आपली दहा मिनिटांची वेळ संपलेली आहे. तरीही मी आपणास बोलण्यासाठी दहा मिनिटे वाढवून दिली आहेत, याची मी आपणास जाणीव करुन दिली आहे.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, आपण मला जाणीव करुन दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. तो आपला अधिकार आहे.

अध्यक्ष महोदय, श्री.सीताराम कुंटे यांनी लिहून दिले की, "श्री.अनिल देशमुख हे माझ्याकडे बदल्यांच्या याद्या द्यायचे व त्या याद्या मी तत्कालीन गृहमंत्र्यांकडे द्यायचो." आय.ए.एस., आय.पी.एस. अधिकाऱ्यांना घटनेने संरक्षण दिलेले आहे. ते यासाठी आहे की, राजकारणी किंवा सत्ताधाऱ्यांनी दबाव आणला तरीही कायद्याच्या व घटनेच्या विरोधात त्यांनी काम करु नये. परंतु हे सांगत आहेत की, गृहमंत्र्यांनी माझ्याकडे बदल्यांची यादी दिली. सन २००५ च्या प्रकाश सिंग विरुध्द युनियन ऑफ इंडिया या प्रकरणावरील निकालामध्ये 'बदल्या कशा करायच्या' हे सर्वोच्च न्यायालयाने आखून दिले आहे. असे असतानाही एक आय.ए.एस. अधिकारी अशा प्रकारचे निवेदन करीत आहेत ही गंभीर बाब आहे.

अध्यक्ष महोदय, एवढेच नव्हे तर श्रीमती रश्मी शुक्ला यांच्यावर देखील काही आरोप झाले. प्रेस स्टेटमेंट काढून सांगण्यात आले की, त्यांनी चुकीचे फोन टॅपिंग केले. मी त्याच्या खोलावर जात नाही. आपण त्या प्रकरणाची जरुर चौकशी करावी. आम्हाला काहीही अडचण नाही. जे असेल त्याची चौकशी करावी. परंतु सरकारने काढलेल्या प्रेस स्टेटमेंटमध्ये श्री.सीताराम कुंटे यांनी मुख्य सचिव म्हणून म्हटले आहे की, "त्यांनी मी परवानगी न दिलेल्या फोनचे टॅपिंग केले. परंतु त्या माझ्याकडे नंतर रडत-रडत आल्या व मी त्यांना माफ केले." कायद्याने कोणाला माफ करण्याचा अधिकार आहे का ? परंतु श्री.कुंटे यांना हे माहिती होते की, अतिरिक्त मुख्य सचिव, गृह असताना त्यांनीच फोन टॅपिंगसाठी लेखी परवानगी दिली होती. नंतर राजकीय दबावापोटी त्यांना चुकीचे स्टेटमेंट द्यावे लागले. जे आय.ए.एस. अधिकारी घटना आणि कायद्यांचे उल्लंघन करुन राज्यातील सत्ताधीशांसमोर नम्र होतात ते आता आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांचे सल्लागार आहेत. मुख्य सचिव म्हणून निवृत्त होताना त्यांना मुदतवाढ मिळावी म्हणून जीव काढला गेला, दोन-तीन वेळा दिल्लीला फोन करण्यात आले. परंतु मुदतवाढ न मिळाल्यामुळे ते आता माननीय मुख्यमंत्र्यांचे सल्लागार आहेत. या चर्चेच्या निमित्ताने माझी मागणी आहे की,

श्री.अतुल भातखळकर.....

श्री.सीताराम कुंटे यांना तात्काळ त्या पदावरुन काढले पाहिजे व त्यांच्या या सर्व भूमिकेची चौकशी झाली पाहिजे. असे अनेक विषय आहेत. सध्या कार्यरत पोलीस महासंचालकांचा देखील विषय आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याची गुन्हेगारीच्या संदर्भातील काय स्थिती आहे त्याच्या जास्त खोलात मी जाणार नाही. परंतु मी मघाशी टी.व्ही. वर बातमी पाहिली की, पुण्यामधील शिवसेनेच्या एका नेत्याने महिलेवर बलात्कार केला असा त्यांच्यावर आरोप लागला होता. परंतु आता ती महिला गायब आहे. महाराष्ट्रामध्ये दुसरी पुजा चव्हाण होणार आहे, अशी परिस्थिती आहे. वीस-बावीस वर्षांच्या मुलीचा गर्भपात करुन तिला यवतमाळपासून पुण्यापर्यंत आणण्यात आले. त्यामध्ये त्या मुलीचा जीव गेला. याचे रेकॉर्डिंग देखील पोलिसांकडे आहे. त्यामध्ये कोणत्या तत्कालीन मंत्र्यांचा आवाज आहे हे देखील पोलिसांना कळाले आहे परंतु अद्यापपर्यंत सदर माजी मंत्र्याच्या विरोधात एफ.आय.आर. दाखल केलेला नाही. ही राज्याची स्थिती आहे. एका बाजूला काही मंत्री बायका लपवत आहेत तर काही मंत्री प्रॉपर्टया लपवत आहेत. प्रतिज्ञापत्रामध्ये सांगून देखील त्यांच्यावर कारवाई होत नाही. मी टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रातील अलीकडची एक बातमी वाचून दाखवितो. "12 Thefts, 2 Rapes a day, City crime up by 27%." परंतु दुर्दैव हे आहे की, कुंपणच शेत खात आहे. त्यांच्यावर कारवाई होत नाही. एका सत्ताधारी पक्षाच्या युवक काँग्रेसच्या अध्यक्षाविरोधात एका तरुणीने बलात्काराची तक्रार केली. पिडित महिला देखील मुस्लिम होती. परंतु साधा एफ.आय.आर. देखील नोंदविण्यात आला नाही. उलट सत्ताधारी पक्षाच्या कार्यालयामध्ये येऊन त्या पदाधिकाऱ्याने पत्रकार परिषद घेतली. असे असेल तर निर्भया प्रकरणानंतर कशासाठी ३५४ चा कायदा केला आहे, असा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्यातील कायदा व सुव्यवस्था अत्यंत खालच्या स्तरावर पोहचली आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. अतुल भातखळकर...

अध्यक्ष महोदय, ही दुसरी बातमी आहे. त्यात असे नमूद केले आहे की, SC on CCTV at police station, State defying" हे मी म्हणत नाही तर मुंबईचे माननीय उच्च न्यायालय म्हणते. सन २०२० मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय दिला की, राज्यातल्या, देशातल्या सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविले पाहिजेत. आपण अडीच वर्षात काय केले ? माननीय उच्च न्यायालयाचे मत ऐका. मा. उच्च न्यायालयाने या संदर्भातील आदेशात असे नमूद केले आहे की, "Whenever we ask for cctv footage it is never given. The purpose of the Supreme Court passing the order is loss. It is done intentionally." हे ठरवून केले जाते की पोलीस ठाण्यांमध्ये गृह विभागाकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जात नाहीत, असे माननीय उच्च न्यायालय म्हणते. त्यामुळे या राज्यातील कायदा व सुव्यवस्था अत्यंत खालच्या पातळीवर गेली आहे. माझी गृहमंत्री महोदयांना विनंती आहे की... व्यक्तीश: मला त्यांच्याबद्दल आदर आहे. अत्यंत सज्जन आणि प्रामाणिक म्हणून मला ते परिचित आहेत. म्हणून आपण या सर्वांच्या वर उठून हे ॲक्टींग डी.जी. नावाचे प्रकरण आपल्या प्रभावामुळे घडले की आपले जे वरचे प्रमुख आहेत त्यांच्यामुळे घडले. कारण आता त्यांच्या रिटायरमेंटला ३-४ महिने शिल्लक असताना आपण लगेच त्यांना सी.पी. केले. आमची त्याला हरकत नाही. कारण आपला तो अधिकार आहे.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभागाच्या मागण्या सुध्दा या ठिकाणी चर्चेला घेतल्या आहेत. नगरविकास विभागावर आधीच्या अनेक वक्त्यांनी भाषणे केली आहेत.

(संबंधित मंत्री सभागृहात नसल्याने विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य तशी मागणी करतात.)

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : इतर मंत्री महोदय त्याबाबत नोंद घेत आहेत.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, पर्यावरणाच्या नावाखाली मुंबई शहरातल्या विकासाचा बट्ट्याबोळ आणि त्या नावाखाली मुंबई महापालिका विकण्याचे एक मोठे षड्यंत्र आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या हातात एक वृत्तपत्रीय कात्रण आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, मुंबई शहराचा पुढच्या ५० वर्षाचा पाणी प्रश्न सोडविणारा "गारगाई धरण" नावाचा प्रकल्प रद्द. कारण काय तर आम्हाला त्या ठिकाणची झाडे तोडावी लागतील. श्री. माधवराव चितळे यांचे नाव या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांना माहिती असेल. ते फार मोठे जलतज्ज्ञ आहेत. जगातले सर्वोच्च पुरस्कार या व्यक्तीला मिळाले आहेत. आपल्या राज्याचे ते सचिव होते. त्यांना जेव्हा या प्रश्नावर त्यांचे मत विचारले तेव्हा त्यांनी एका वाक्यात सांगितले की, "गारगाई धरण प्रकल्प रद्द करणे, हा शुध्द वेडेपणा आहे." पण त्यासाठी कारण काय सांगितले तर झाडे तोडली जातात.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेचे वैशिष्ट्य असे आहे की, प्रकल्प कधीही होवो. पण आधी त्यावर सल्लागार नेमा, एवढे एकमेव धोरण आहे. त्यानंतर आरेमध्ये कारशेडचे काम थांबविले. हे का केले तर आरेमध्ये पर्यावरणाचा ऱ्हास होता कामा नये. मी याला बालहट्ट वगैरे मी म्हणणार नाही.

अध्यक्ष महोदय, आता मी पुढच्या बातमीची माहिती देतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "आरेमधील त्या झाडांची अखेर कत्तल". ही कत्तल कोणी केली तर त्या ठिकाणी कार डेपोचे काम करणारे लोक आहेत त्यांनी या झाडांची कत्तल केली.

(सत्तारुढ पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : होय. दोन्ही बाजूला समान वेळ देण्यात येईल.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, दुसरे म्हणजे ज्या आरे कॉलनीमध्ये मेट्रोची कारशेड न करण्याचा निर्णय घेऊन मुंबई शहराच्या एकात्मिक प्रकल्पाचा बट्ट्याबोळ या सरकारने आपल्या अहंकारापायी केला त्या आरेमध्येच आर.टी.ओ.चे ऑफिस निर्माण करण्याची सूचना आता दिली आहे. म्हणजे तेथे आरटीओचे ऑफिस चालते. पण मेट्रोची कारशेड चालत नाही. मी परवा एका प्रश्नाच्या उत्तरामध्ये वाचले की आता तेथील आमदारांच्या मागणीवरुन आरे कॉलनीमध्ये वृध्दाश्रम सुध्दा उभा राहण्यासाठी परवानगी देणार.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर....

पण पूर्ण शहराच्या हिताचा आरे कारशेडचा प्रकल्प मात्र करणार नाही. मुंबई महानगरपालिकेमध्ये काय सुरु आहे याबाबतची अजून एक बातमी अशी आहे की, " वाहनतळ प्राधिकरणासाठी आणखी एक वर्ष प्रतिक्षा." हे सर्वजण मुंबई शहराचे प्रश्न सोडवणार आहेत.

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर मी आपल्याला सांगतो की, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार हे ३२ मिनिटे बोलले आणि आपले बोलणे सुरु होऊन २० मिनिटे झालेली आहेत. मग आपल्या पक्षाचा वेळ शिल्लक राहणार नाही. त्यामुळे इतर सन्माननीय सदस्यांनी बोलण्याची संधी मागितली तर त्यांना ती संधी मिळणार नाही. त्यामुळे आपण जरा वेळेची मर्यादा पाळावी. आता मी आपल्याला २ मिनिटांचा वेळ देतो. तेवढया वेळात आपण आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, कृपया मला ५ मिनिटांचा वेळ देण्यात यावा कारण मी जेन्युयन प्रश्न मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराची ट्राफिक सोडविण्यासाठी दोन मार्ग होते. एक म्हणजे मेट्रो. त्याचा आपण बट्याबोळ केला आहे. सन २०३४ च्या डीपीमध्ये वाहनतळाची आणि त्याच्या प्राधिकरणाची एक संकल्पना आणली. परंतु साधे प्राधिकरण आणि त्याची सिस्टिम उभी करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडे वेळ नाही. आताच्या सरकारच्या कालखंडात या प्राधिकरणाला जवळपास १२ ते १३ महिने पूर्ण वेळ व्यक्ती नव्हती. भूमिगत वाहनतळाचे काय धोरण आहे हे मुंबई महानगरपालिकेकडे नाही. इस्टेट डिपार्टमेंट म्हणते ते रोड करेल आणि रोड म्हणते इस्टेट डिपार्टमेंट करेल. त्यामुळे मुंबई शहराच्या दोन्ही प्रश्नांचा बट्याबोळ केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला कमी वेळ देत आहात त्यामुळे मी शेवटच्या मुद्याकडे जात आहे. मघाशी मुंबई वातावरणीय बदल २०२० चा उल्लेख झाला.

श्री. अतुल भातखळकर....

यामध्ये देशाच्या माननीय पंतप्रधानांनी सन २०७० चे उद्दिष्ट ठेवलेले आहे. ही चांगली बाब आहे. मुंबई महानगरपालिकेने हेच उद्दिष्ट सन २०५० पर्यंत ठेवले आहे. जी बाब पूर्ण देशाला सन २०७० साली जमेल त्याच्याऐवजी आम्ही २० वर्ष आधी करीत आहोत. परंतु स्थिती काय आहे तर पर्यावरणातील बदल. असे करीत असताना मुंबई शहरातील मुलभूत प्रश्न अजून सुटत नाहीत. एचटीपी, सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्ट, २५ वर्ष सत्ता आहे तरी देखील १.२५ मुंबईकरांचा मैला आणि सांडपाणी हे ट्रिटमेंटशिवाय समुद्रात दिले जाते. त्यांचे एचटीपीची टेंडर काढले. त्याची स्थिती अशी आहे की, पहिले टेंडर २६ हजार कोटी रुपयांचे आले. परंतु पुणे महानगरपालिकेने १/३ पेक्षा कमी किमतीमध्ये काढले. शेवटी लोक सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले तेव्हा न्यायालयाने एका हेअरिंगसाठी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना बोलावून घेतले आणि सांगितले की, तुम्ही स्वत: आमच्यासमोर उभे राहा. मग ते टेंडर कॅन्सल करुन...एवढेच नाही तर देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, आपण एचटीपीचे जे टेंडर काढणार आहात ते आम्ही मॉनिटर करु. कारण आमचा तुमच्यावर विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे नगर विकास आणि मुंबई शहराच्या विकासाच्या नावाखाली मुंबई शहराची वाट तर लावलीच आहे परंतु मुंबई विकण्याचा डाव आहे. प्रतिक्षा नगरच्या बस डेपोसाठी १ रुपया दिला आणि आणिक नगरचा बसडेपो, खाजगी बसवाल्यांना १ रुपया दिला. यासाठी ठराव पास केला जात आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी बसचे सांगितले त्यामुळे मराठीच्या नावाखाली.. पोयसर नदीच्या रुंदीकरणामध्ये आमच्या मतदारसंघातील लोकांना माहूल आणि त्याच्याही पुढे विस्थापित केले जात आहे. हे धोरण बदलले पाहिजे. ज्या ठिकाणी लोक आहेत तिथेच त्यांना राहायला मिळाले पाहिजे. तरच या नद्यांचा पुनर्विकास होईल. त्यामुळे या सर्व मुंबई शहराचा बट्याबोळ केलेला आहे. अध्यक्ष महोदय, मी

फार डिटेलमध्ये जात नाही. पण एवढेच सांगतो की, मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्षांवर आयकर विभागाने रेड टाकली त्याचे रिपोर्ट माझ्याकडे

श्री. अतुल भातखळकर....

आहेत. ते मी आता वाचून दाखवत नाही. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेमध्ये सुरु असणारा भ्रष्टाचाराची उच्च न्यायालयाच्या न्यायधिशामार्फत स्वतंत्र चौकशी करावी, अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

माहितीच्या मुद्दयाबाबत

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, पूरे महाराष्ट्र के सरकारी मेडिकल कॉलेज के टीचर्स और डॉक्टर्स हड़ताल पर है. सम्माननीय मंत्री श्री अमित देखमुख जी की ओर से डॉक्टरों से मुलाकात और चर्चा हुई थी. ऐसा आश्वासन दिया गया था कि ८० प्रतिशत मांगे पूरी हो जाएगी. लेकिन अभी तक शायद उनको जानकारी नहीं मिली है या उनकी मांगे पूरी नहीं हुई है. वे सभी हड़ताल पर बैठे है. मेरा निवेदन है कि सरकार ने इसकी नोंद लेनी चाहिए और उस काम को जल्द से जल्द करना चाहिए, ताकि वे हड़ताल खत्म कर सके. सम्माननीय मंत्री महोदय इस बारे में कुछ जानकारी देंगे तो अच्छा होगा.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अबु आजमी यांनी या ठिकाणी एक मुद्दा मांडला आहे. या संबंधी काल संचालक, सचिव व मी स्वत: या सर्व आंदोलकांशी चर्चा केली. त्यांच्या मागण्या आम्ही तत्वत: मान्य केलेल्या आहेत. काही मागण्यांबाबत माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांची एक बैठक घडवून आणायची आहे. या नंतर निर्णय होईल. त्यांचा एक मुद्दा असून त्या संबंधी प्रशासकीय बाबीमध्ये चर्चा होत आहे. या बाबत मार्ग निघेल. राज्य शासन सकारात्मक आहे. मी त्यांना आवाहन करु इच्छितो की, त्यांनी हे आंदोलन मागे घ्यावे. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे हे आंदोलन सुरु आहे. यामुळे त्यांचे नुकसान होत आहे. आता परिक्षा होत आहेत, यामुळे सदनाच्या माध्यमातून या सर्वांनी आंदोलन मागे घ्यावे, माघार घ्यावी, असे मी त्यांना आवाहन करतो

पृ.शी : अनुदानाकरिता मागण्या

मु.शी : सन २०२२-२३ च्या अनुदानाकरिता मागण्या :

१) गृह विभाग
२) नगरविकास विभाग
३) गृह निर्माण विभाग
४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. रोहित पवार (कर्जत – जामखेड) : सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाच्या संबंधी मी या ठिकाणी बोलू इच्छितो. या ठिकाणी माननीय मंत्री उपस्थित आहेत. मी शासनाला सांगू इच्छितो. राज्यातील एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टीने नगर जिल्हा हा सर्वात मोठा जिल्हा असून त्याचे क्षेत्रफळ १७ हजार ४१३ चौ.कि.मी आहे. या जिल्ह्यात पोलिसांची संख्या केवळ ३२०० आहे. येथे साधारणपणे १४१६ लोकांमागे एक पोलीस शिपाई किंवा अधिकारी आहे. इतर जिल्ह्यांची तुलना केली तर आपणास दिसून येईल की, जळगाव जिल्ह्याचे क्षेत्रफळ साडे ११ हजार चौ.कि.मी. असताना येथे ३५०० पोलीस आहेत. मला कोणत्याही जिल्ह्यातील पोलिसांची संख्या कमी करा असे म्हणायचे नाही. नगर हा मोठा जिल्हा असून येथील क्राईम रेट देखील जास्त आहे. मंत्री महोदयांना मी विनंती करतो. आता जी पोलीस भरती केली जाणार आहे, त्यात नगर जिल्ह्यासाठी अधिकाधिक पोलीस बळ आपण दिले तर तेथील लोकांना त्याचा फायदा नक्कीच होईल. नगर जिल्ह्यामध्ये अतिशय मध्यभागी पोलिसांची जागा आहे. तेथे पोलिसांना

श्री. रोहित पवार....

राहण्याची व्यवस्था केली तर त्यांना फायदा होऊ शकतो. पोलीस वसाहतीच्या बाबत शासनाने विचार करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपल्या राज्यात वाहतूक पोलीस, पोलीस सर्व ठिकाणी उपस्थित असतात. रात्री कितीही वाजले तरी आपल्या सर्वांसाठी ते डयुटी करतात. दिवाळी असो किंवा कोणताही सण असो, पुढे मागे काहीही न बघता आपले पोलीस अहोरात्र लोकांची सेवा करीत असतात. मी अनेक पोलिसांशी चर्चा केली असता त्यांनी असे सांगितले की, आमची हक्काची सुट्टी अबाधित राहिली पाहिजे. याचा फायदा आम्हाला व आमच्या कुटुंबीयांना होईल. पूर्वी सेवेत असलेल्या पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकरिता शासनाकडून बँकेशी टाय अप करुन एक योजना सुरु केलेली होती.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.रोहित पवार ...

त्यामध्ये पोलीस सेवेत असताना तो एखाद्या घरासाठी लोन घेत होता. तो ग्रामीण भागातील असेल तर तेथे एखादे घर बांधायचे असेल तर तो बांधू शकत होता. शहरी भागातील असेल तर एखादा फ्लॅट त्या ठिकाणी घेत होता. त्यात सरकारकडून काही प्रमाणात सहकार्य होत होते. त्यामुळे या बाबतीत देखील एक सकारात्मक विचार राज्य सरकारकडून व्हावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, पोलिसांच्या मुलांकरिता शिक्षण कर्जाकरिता आपल्याला काही मदत करता येईल का, याबाबतीत एक विचार सरकारकडून व्हावा. नगर जिल्ह्यातील एस.पी. श्री.मनोज पाटील यांच्या पुढाकाराने नगर जिल्ह्यामध्ये ई टपाल सेवा कार्यान्वित केली गेली आहे. ती जर महाराष्ट्रामध्ये स्वीकारली गेली तर त्याचा फायदा नक्कीच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांना होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, माझ्या कर्जत जामखेडमध्ये कर्जत नगरपंचायत व जामखेड नगरपरिषद आहे. मधल्या काळात असा निर्णय घेतला होता की, एखाद्या तालुक्यामध्ये जर कुठलीही नगरपंचायत, नगरपरिषद नसेल तर तेथील जे प्रमुख तालुक्याचे ठिकाण आहे त्याचे रुपांतर लगेच नगरपरिषद नाही तर नगरपंचायतीमध्ये व्हावे. त्यामध्ये असे झाले की, पूर्वी जी ग्रामपंचायत होती तेथे जे गायरान होते म्हणजे त्या परिसराला गायरान असे नाव आहे. तेथे अनेक लोक ३० ते ४० वर्षे झाली राहत आहेत. त्यांचा वास्तव्याचा ३० वर्षांचा कालावधी आहे. तसे पाहिले तर, ते त्यांच्या मालकीचेच आहे. तरी देखील त्या जागेला गायरान हे नाव असल्यामुळे त्या ठिकाणी घरकुल देता येत नाही.

अध्यक्ष महोदय, म ी विनंतीपूर्वक सांगतो की, माझ्या मतदारसंघात आम्ही या संदर्भात पाठपुरावा करीतच आहोत. परंतु, त्यासाठी महसूल व नगरविकास या २ विभागांनी मिळून एक योजना आणली व जेथे अशा काही अडचणी असतील त्या सोडविण्यासाठी त्या योजनेमध्ये विचार केला गेला तर त्या ठिकाणी असलेल्या

श्री.रोहित पवार ...

सामान्य लोकांना त्याचा नक्कीच फायदा होऊ शकेल. त्या योजनेंतर्गत येत्या काळामध्ये आपल्याला त्या लोकांना त्या ठिकाणी नक्कीच घरकुल देता येईल.

अध्यक्ष महोदय, एक शेवटचा पण महत्वाचा विषय मला मांडावयाचा आहे. खरे तर हा विषय कोणत्या विभागाच्या अंतर्गत येईल हे आज सांगता येणार नाही. शहरी रोजगार हमी योजना येत्या काळामध्ये आपल्या महाराष्ट्रामध्ये आणण्यासाठी विचार व्हावा. राजस्थानमध्ये याबाबतीत विचार केला गेला होता. काही प्रमाणात तेथे सुरुवात देखील झाली. महाराष्ट्रामध्ये देखील अप्रत्यक्षपणे... आताच्या या अर्थसंकल्पामध्ये संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना आणली गेली आहे. या योजनेंतर्गत असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी २५० कोटी रुपये बिज भांडवल उपलब्ध .... ही अतिशय स्वागत करण्यासारखी योजना आहे. परंतु, असंघटित क्षेत्रातील इतरही लोक आहेत. त्यामध्ये शहरी भागामध्ये ४५ टक्क्यांपेक्षा जास्त लोक राहतात. आपण पाहिले तर, असंघटित क्षेत्रामध्ये मेजॉरिटीने लोक काम करीत असतात. आपण एकूण आत्महत्या पाहिल्या तर, महाराष्ट्रात किंवा देशामध्ये होणाऱ्या आत्महत्यांपैकी २५ टक्के आत्महत्या या शहरामध्ये रोजंदारीने काम करणाऱ्या लोकांच्या होत असतात. त्यामुळे येत्या काळामध्ये आपल्याला जर शहरी रोजगार हमी योजना आणता आली तर Intergeneration poverty cycle म्हणजे एखाद्या गरीब कुटुंबातील व्यक्ती त्याला शिक्षण न घेता आल्यामुळे किंवा आर्थिक अडचणीत असल्यामुळे पुढे त्याला कुठल्याही प्रकारचे कौशल्य, शिक्षण मग ते प्राथमिक असो माध्यमिक असो असे कुठलेही शिक्षण न मिळाल्यामुळे आई-वडील जो व्यवसाय करतात त्याच व्यवसायामध्ये त्यांची पुढची पिढी अडकून राहते. त्यामुळे त्यांची प्रगती होत नाही.

अध्यक्ष महोदय, त्या पिढीला जर आपल्याला त्यातून बाहेर काढावयाचे असेल तर, येत्या काळामध्ये शहरी रोजगार हमी योजनेचा विचार करावा लागेल. तो विचार झाल्यानंतर तो डिमांड ड्रिव्हन असल्यामुळे ज्या व्यक्तीला या योजनेमध्ये यायचे आहे त्यांनी नोंदणी करणे महत्वाचे आहे. त्यामुळे पुढे राज्यावर कुठलीही

श्री.रोहित पवार ...

आपत्ती आली तर शहरी भागात राहणाऱ्या अशा नोंदणी केलेल्या लोकांना मदत करण्यासाठी आपल्याला फायदा होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, पर्यावरण व वातावरण विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, एअर पोल्यूशनच्या बाबतीत मुंबई शहर हे भारतामध्ये पहिल्या नाही तर दुसऱ्या क्रमाकांवर आहे. त्या बाबतीत एक दीर्घकालीन धोरण असणे तितकेच महत्वाचे आहे. इलेक्ट्रिक व्हेईकलच्या बाबतीत सरकारने चांगला निर्णय केला. त्याचे स्वागतच केले पाहिजे. परंतु, आपण पाहिले तर शहरी भागामध्ये जे एअर पोल्यूशन वाढते त्याचे मुख्य कारण ट्रॅफिक आहे. ट्रॅफिक कमी करण्यासाठी जर आपल्याला त्या त्या नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये गुगल बेस्ड ट्रॅफिक कंट्रोल सिस्टीम लावता आली तर त्याचा फायदा नक्कीच होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, मांडण्यासारखे अनेक विषय आहेत. मात्र अनेक सन्मानीय सदस्यांना देखील बोलावयाचे असल्याने मी जास्त बोलून जास्त वेळ घेणार नाही. मी ज्या काही छोट्या परंतु, महत्वाच्या मागण्या केल्या आहेत, त्याबाबत सरकार सकारात्मक असेल अशी अपेक्षा करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याकरिता आपले आभार व्यक्त करतो व थांबतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

.....

नंतर श्री.नितनवरे ...

श्री झीशान सिद्दीकी (वांद्रे पूर्व) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ के अर्थसंकल्प में की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं गृह विभाग, नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग और पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग के बारे में बोलना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, मैं मुंबई की सड़कों के बारे में बात करना चाहूंगा. हम सभी को पता है कि आज मुंबई में सड़कों की स्थिति कैसी है और सड़कों में कितने गढ्ढ़े है. यह एक इकॉनॉमिक ऑफेन्स ही नहीं, तो इसको एक क्रिमिनल ऑफेन्स भी कहा जाएगा. क्योंकि हर सुबह जब हम उठते है, तो हम देखते है कि कई एक्सिडेंट हो रहे है, कई लोगों की जान खराब सड़कों के कारण जा रही है. इसका ब्लेम मैं कॉन्ट्रैक्टर पर डालना चाहूंगा. जो कॉन्ट्रैक्टर्स है, कॉन्ट्रैक्टर का जो कार्टेल महानगरपालिका में बना है, उसके कारण नये कॉन्ट्रैक्टर्स को इसमें आने को नहीं मिलता है. ये जो कॉन्ट्रैक्टर्स है, वे ब्लैकलिस्ट होकर, अलग अलग कंपनी खोलकर, फिर से आ जाते है और फिर बुरा काम करते है.

अध्यक्ष महोदय, मुंबई की हर एक सड़क के बारे में मैं सुझाव देना चाहूंगा. मेरे मतदार क्षेत्र वांद्रे पूर्व में सड़कों की हालत बहुत खराब है. मैं चाहता हूं कि हरेक सड़क पर कोअर-सॅम्पलिंग हो जाए, जो कि सर्टीफाईड लैब के द्वारा होनी चाहिए. ये जो सॅम्पल के कोअर लिए जाएंगे, वह कोई भी एजेन्सी नहीं, मगर रेप्युटेड एजेन्सी, जैसे कि आईआईटी और व्हीजेटीआय से हो. उसके बाद पता चलेगा कि सड़कों पर कितना डांबर है और मटेरियल कैसा है. डांबर की जो क्वाँटीटी इस्तेमाल होती है वह काफी हद तक कम होती है. मेरे मतदार क्षेत्र में सड़कों के जो काम हो रहे है, उसके बारे में मैंने महानगरपालिका के आयुक्त साहब को भी कई बार लिखा है. जो भ्रष्टाचार मेरे मतदार क्षेत्र वांद्रे पूर्व में हो रहा है, उसके बारे में भी मैंने आयुक्त साहब को कई बार लिखित रुप में पत्र दिया है. लेकिन मुझे इसका कभी भी सही जवाब नहीं मिला है. मैं जिस विभाग के बारे में शिकायत करता हूं, तो वे उसी विभाग से कहते है कि इसके बारे में आप कार्रवाई कीजिए. तो कार्रवाई कौन करेगा और अपने आप पर कार्रवाई

श्री झीशान सिद्दीकी.....

कैसे करेगा ? इसलिए मेरी यही विनती रहेगी कि एच पूर्व वॉर्ड में जो भ्रष्टाचार है, उस ओर ध्यान दिया जाए.

अध्यक्ष महोदय, मेरे मतदार क्षेत्र में व्ही.एन. देसाई अस्पताल है, जिसमें मरम्मत की बहुत जरुरत है, वहां पर विकास करने की बहुत जरुरत है. यदि आप अस्पताल में जाकर देखेंगे तो पता चलेगा कि वहां पर डॉक्टर्स की बहुत कमी है, स्पेशियालिस्ट डॉक्टर्स की कमी है. वहां एक मेटरनिटी वॉर्ड होता था, लेकिन अब वह इस्तेमाल में नहीं है. मेरे मतदार क्षेत्र वांद्रे पूर्व में महानगरपालिका का व्ही.एन. देसाई यह एक ही अस्पताल है. लेकिन वहां भी आईसीयू एक प्राईव्हेट कंपनी लोगों से ज्यादा पैसे लेकर चला रही है. मैंने इस बारे में आयुक्त साहब के साथ चर्चा भी की है. मैंने उनसे एक सडन विजिट करने के लिए विनती की है. इस अस्पताल की स्थिति बहुत खराब है. इसके कारण वांद्रे पूर्व के लोगों को बहुत कठिनाई का सामना करना पड़ रहा है.

अध्यक्ष महोदय, मेरे मतदार क्षेत्र में बीकेसी का एरिया आता है. बीकेसी के स्मार्ट पार्कींग का उद्घाटन सम्माननीय मुख्यमंत्री जी ने किया. हमारे पालक मंत्री सम्माननीय श्री आदित्य ठाकरे जी भी वहां उपस्थित थे और मैं भी था. उसका उद्घाटन तो हो गया, लेकिन आप बीकेसी में जाकर स्मार्ट पार्कींग देखेंगे, तो पार्कींग के बारे में कुछ स्मार्ट नहीं है. ऐसा दिखायी देगा. मेरे पास कुछ तस्वीरें है जो मैं आपको देना चाहूंगा. स्मार्ट पार्कींग तो दूर की बात है, उसकी कंडिशन इतनी बुरी है कि नॉर्मल गाड़ियां भी वहां पार्क नहीं हो पाती है. इसलिए किस कंपनी को इस स्मार्ट पार्कींग का कॉन्ट्रैक्ट दिया गया है, उस पर ध्यान देना चाहिए.

.....यानंतर श्री तेलंग

श्री झीशान सिद्दीकी.....

अध्यक्ष महोदय, मेरे मतदार क्षेत्र में जब भी मैं कोई काम करने की कोशिश करता हूं, जब मैं एनओसी मांगता हूं, तो एमएमआरडीए का यह कहना है कि एअरपोर्ट से लेकर माहिम तक एक लक्ष्य ॲडव्हरटाईजमेंट नामक प्राईव्हेट कंपनी है, जो पूरा काम करेगी और उसके रिटर्न में वह ॲडव्हरटाईजमेंट करेगी. आज तक लक्ष्य ॲडव्हरटाईजमेंट कंपनी ने ब्युटिफिकेशन का कुछ भी काम हाईवे पर नहीं किया है. मैं वहां की जनता का प्रतिनिधी होने के बाद भी मुझे काम करने नहीं दिया जा रहा है और लक्ष्य ॲडव्हरटाईजमेंट कंपनी की सारी होर्डींग उधर लग चुकी है. लेकिन उन्होंने ब्युटीफिकेशन का कोई काम नहीं किया है. यह बहुत दुर्भाग्यपूर्ण बात है. लक्ष्य ॲडव्हरटाईजमेंट कंपनी अपने ॲडव्हरटाईज के बोर्ड से करोड़ों रुपये कमाती है. यही चीज सरकार खुद कर सकती थी. मैं खुद अपना फंड उसमें इस्तेमाल करना चाहता था. मगर लक्ष्य ॲडव्हरटाईजमेंट कंपनी को यह कॉन्ट्रैक्ट दिया गया है, लेकिन ब्युटिफिकेशन का काम नहीं हुआ है. हमारे पालक मंत्री सम्माननीय श्री आदित्य ठाकरे जी सदन में उपस्थित है. मैं उनसे विनती करना चाहूंगा कि इस ओर ध्यान दीजिए कि ये काम ॲडव्हरटाईजमेंट कंपनी को क्यों दिया गया है ? अब तक यदि ब्युटिफिकेशन का कोई काम नहीं हुआ है, तो उनको ॲडव्हरटाईजमेंट करने के लिए क्यों दिया जा रहा है ?

अध्यक्ष महोदय, मेरे मतदार क्षेत्र के बीकेसी इलाके में एक साइकिल ट्रैक का भी उद्घाटन हुआ था. सम्माननीय मंत्री श्री आदित्य ठाकरे जी का यह ड्रीम प्रोजेक्ट था. मेरे पास साइकिल ट्रैक की कुछ तस्वीरे है. साइकिल ट्रैक का जब उद्घाटन होता है, तो तब बहुत ही छोटासा स्ट्रेच का उद्घाटन होता है. साइकिल ट्रैक पर साइकिल चलाना तो छोड़ दीजिए, वहां पर इंसान पैदल भी नहीं चल सकता है. एमएमआरडीए के माध्यम से बीकेसी में जो साइकिल ट्रैक का काम हो रहा है, वह काम किस कॉन्ट्रैक्टर को दिया गया है? उस पर कार्रवाई होनी चाहिए. क्योंकि जो साइकिल इन्थुजियास्ट है वो उस ट्रैक पर साइकिल नहीं चला पा रहे है. जो कार्टेल कॉन्ट्रैक्टर्स का बना है, उस टेंडर में ट्रान्सपरंसी होनी चाहिए. क्योंकि इसी के कारण बड़ी बड़ी

श्री झीशान सिद्दीकी.....

कंपनियां जैसे लार्सन ॲण्ड टुब्रो, शापुरजी और पालनजी कंपनियां नहीं आ रही है. क्योंकि गलत तरीके से कॉन्ट्रैक्ट मिल रहे है और इसमें कार्टेल बना हुआ है, उसी कॉन्ट्रैक्टर को काम मिला है. मैं विनती करना चाहूंगा कि इस बारे में एमएमआरडीए का एक श्वेत पत्रिका इश्यू होनी चाहिए. उसमें बताया जाना चाहिए कि एमएमआरडीए के माध्यम से कितनी होर्डींग लगी है, कितना रेवेन्यू मिल रहा है, उनके कितने मार्शल्स है जो कि एमएमआरडीए के माध्यम से बीकेसी में जा रहे है.

अध्यक्ष महोदय, मैं विधायक के तौर पर चुनकर आने के पर भी मुझे ६-६ महीने एमएमआरडीए से एनओसी नहीं मिलती है. मगर जो लक्ष्य ॲडव्हरटाईज नामक कंपनी है, जो बिना ब्युटिफिकेशन के काम करती है, वह अपना ॲडव्हरटाईजमेंट का काम कर रही है. तो यह ऐसा क्यों हो रहा है ? एमएमआरडीए ने बीकेसी में एक कोविड सेंटर भी बनाया था, बाद में उसने वह बीएमसी को हॅण्डओव्हर किया था. कोविड सेंटर बहुत ही अच्छा बनाया गया था. मगर उस कोविड सेंटर पर काफी आरोप लगे है. इन आरोपों को बंद करने के लिए हमें एक श्वेत पत्रिका कोविड सेंटर के बारे में बनाना बहुत जरुरी है.

अध्यक्ष महोदय, यदि आप मेरे मतदार क्षेत्र में देखेंगे, तो एक तरफ बीकेसी जरुर है, जो अच्छा दिखता है. मगर उसके पीछे तीन बंगला, डावरी नगर, बेहराम नगर, ज्ञानेश्वर नगर, नौपाडा, शांतिलाल कम्पाऊंड आदि एरिया भी है. जिसमें सिवरलाईन की कमी है. सिवरलाईन की मिसिंग लिंक्स है. मैं चाहता हूं कि इसका भी विकास हो और यहाँ पर सिवरलाईन जल्द से जल्द डाली जाए जिससे लोगों को आसानी हो सके.

....यानंतर श्री कुलकर्णी

श्री झीशान सिद्दीकी.....

अध्यक्ष महोदय, हम हर साल मीठी नदी और नाला सफाई की बात करते है. हर साल बरसात में बारिश के कारण मीठी नदी का पानी बाहर बहता है, जिससे महाराष्ट्र नगर और अन्य इलाकों में पानी भर जाता है, ५००-६०० घर डूबने की स्थिति में आ जाते है.करोड़ों रुपया खर्च करने के बाद भी मीठी नदी का कचरा साफ नहीं हो रहा है. जितना कचरा, जितनी गाद मीठी नदी से निकलता है, यदि आप उसकी ऑफिशियल डिटेल्स में देखेंगे, तो पता चलेगा कि मुंबई में गाद का एक पहाड़ बन जाएगा, जिसे मैं देख नहीं सकता. इसलिए मेरा यही सजेशन रहेगा कि वहां पर कौनसी ट्रक जाती है ...(व्यवधान)... अध्यक्ष महोदय, मैं अपने पक्ष की ओर से बोलने वाला पहला वक्ता हूं. मुझे और भी मुद्दों पर अपनी बात कहनी है. मुझे बोलने के लिए समय दीजिए.

अध्यक्ष महोदय, जो गाद मीठी नदी से निकल रही है वह गाद यदि ॲच्युअल में इतनी निकल रही है, तो उससे एक पहाड़ बन जाना चाहिए जिसको मैं देख नहीं सकता. जो ट्रक इस गाद को निकालती है उसके नंबर प्लेट और फोटोग्राफ सरकार ने मांगना चाहिए और सारा डेटा एक्सेल शीट में होना चाहिए. आज माननीय मुख्यमंत्री महोदय सदन में नहीं है, लेकिन मैं उनसे एक निवेदन करना चाहूंगा कि उन्होंने कोविड के काल में बहुत अच्छा काम किया. कोविड के काल में सम्माननीय मुख्यमंत्री श्री उध्दव ठाकरे जी जब मुंबई और महाराष्ट्र के लोगों को संबोधित करते थे, तो मुंबई और महाराष्ट्र के लोगों ने उनकी बात सुनकर लोग घर में बैठे रहे. लेकिन इसके कारण लोगों को नुकसान का बहुत सामना करना पड़ा. लोगों की रोजी-रोटी चली गई. तकरीबन ९० हजार करोड़ रुपये महानगरपालिका का फिक्स डिपॉजिट है. उस पर यदि उनको पांच प्रतिशत भी ब्याज मिलता है, तो वह साल का तकरीबन साढ़े चार हजार करोड़ रुपये होता है और मुंबई का जो असेसमेंट टैक्स है, वह ५ से ६ हजार करोड़ रुपये होता है, ऐसा मैं मानता हूं. माननीय मुख्यमंत्री महोदय से मेरी यह विनती है कि कम से कम एक साल का असेसमेंट टैक्स उन्होंने माफ करना चाहिए.

तालिका सभाध्यक्ष : सभागृहाची वेळ सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री झीशान सिद्दीकी : अध्यक्ष महोदय, मैं अपने पक्ष की ओर से बोलने वाला पहला वक्ता हूं. मुझे बोलने के लिए आप वक्त दीजिए. जैसा कि मैं कह रहा था कि महानगरपालिका एक साल में ब्याज के तौर पर साढ़े चार हजार करोड़ रुपये कमाती है. यदि हम मुंबईकर को हमारी बात सुनने के लिए एक तोहफा देना चाहते है, तो हमें उनका असेसमेंट टैक्स माफ करना चाहिए. हमने यह सोचना चाहिए कि हमने एक साल टैक्स नहीं कमाया है और इस साल के अंत में, दिसम्बर में तकरीबन १३ हजार करोड़ रुपये बिल्डिंग प्रपोजल के लिए बीएमसी के लिए आए है. इसलिए सम्माननीय मुख्यमंत्री साहब के लिए यह बड़ी बात नहीं होनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं एसआरए के बारे में करना चाहूंगा. झोपड़पट्टी में रहने वाले हमारे जो भाई-बहन होते है, वे पांच साल तक जमीन खरीदी बिक्री का व्यवहार नहीं कर सकते. इस बारे में कोई स्पष्टता नहीं है कि कब से पांच साल तक जमीन खरीदी बिक्री का व्यवहार नहीं कर सकते. कई बार ऐसा होता है कि विकासक २०-२५ सालों तक प्रोजेक्ट को अटकाकर रखता है. मेरे मतदार क्षेत्र में भी ऐसा ही हुआ है. जो झोपड़पट्टीवासी है, उसे यदि अपनी जगह बेचनी है तो वह बेच नहीं पाता है. १५-२० सालों में बहुत चेंजेस होते है. लेकिन वह खरीदी बिक्री नहीं कर सकता है. मेरी मांग है कि जब विकासक उसको पजेशन देता है, तो उसके बाद पांच साल का समय गिना जाना चाहिए. मेरे मतदार क्षेत्र में एसआरए के ऐसे कई प्रोजेक्ट्स है. जैसे बेहराम नगर, भारत नगर, शिवशक्ति, गोलीबार, संजय नगर, जय शिवशाही, महाराष्ट्र नगर, आंबेडकर नगर है और एक ऐसा बिल्डर है जिनका नाम मैं हमेशा सदन में लेता हूं. शिवालिक बिल्डर है. मुझे पता नहीं है कि इस बिल्डर का नाम मुझे लेना चाहिए या नहीं. क्योंकि इसे कौन प्रोटेक्ट कर रहा है? यह बात मुझे पता नहीं है. इस सदन में मैंने इस बारे में जितनी भी बार आवाज उठायी है, उसके बारे में मुझे कोई जवाब नहीं मिल रहा है. इससे गोलीबार इलाके के रहिवासियों को कठिनाईयों का सामना करना पड़

श्री झीशान सिद्दीकी.....

रहा है. मगर वह विकासक चुनाव के पहले जरुर आता है. चेक्स देता है और फिर गायब हो जाता है. पता नहीं कि उसे कौन प्रोटेक्ट कर रहा है.

अध्यक्ष महोदय, मुंबई में तकरीबन ६० प्रतिशत स्लम है. मेरे मतदार क्षेत्र वांद्रे पूर्व में तो इससे भी ज्यादा स्लम है. एक तरफ तो हमारी सरकारी वसाहत है. उनके मालिकाना हक के लिए मैं लड़ रहा हूं. दूसरी तरफ झोपड़पट्टी में रहने वाले हमारे भाई-बहन है. इसलिए हमें यु.डी. के फंड की ज्यादा से ज्यादा जरुरत है. मेरी विनती है कि कोविड के समय में बहुत अच्छा काम हुआ. लेकिन बहुतसी ऊंगलियां भी उठी है. अलग अलग तरह के आरोप लगे है. कोविड सेंटर को लेकर, पीपीई कीट को लेकर, ऑक्सीजन मास्क को लेकर आरोप लगे है. मैं चाहता हूं कि जो लोग इस तरह के आरोप लगा रहे है, उनका मुंह बंद करने के लिए कोविड के दौरान हुए काम और बाकी सब कुछ एक व्हाईट पेपर पर लाना चाहिए. पर्सनली तौर पर हमने भी बहुत अनाज बाटा है. पीपीई कीट खरीदे है, मास्क खरीदे है. लेकिन कुछ लोग कहते है कि वह मास्क उस समय बीएमसी पांच गुना ज्यादा भाव पर खरीद रही थी. इसका जवाब देने के लिए एक व्हाईट पेपर निकालना बहुत जरुरी है. हम सभी के एमएलए फंड से कुछ प्रतिशत हिस्सा कोविड रिलिफ फंड के लिए गया था. मैंने भी अपने मतदार क्षेत्र के लिए ॲम्ब्युलंस मांगी थी. मगर दो साल हो गए, कोविड खत्म होने को आया, लेकिन ॲम्ब्युलंस नहीं आयी. कुछ लोग कहते है कि ॲम्ब्युलंस में महानगरपालिका को कमिशन नहीं मिलता है. इसका जवाब मुझे पता नहीं है.

अध्यक्ष महोदय, मैं चाहता हूं कि एसआरए की रिहॅब की सारी बिल्डिंग का स्ट्रक्चरल ऑडिट होना चाहिए और एक पॅरामीटर होना चाहिए, ताकि सेल बिल्डिंग की क्वॉलिटी यदि अच्छी होती है और रिहॅब वालों को जो बिल्डिंग मिलती है, उसकी क्वॉलिटी अच्छी नहीं होती है, तो इस बारे में कोई गाईडलाईन होनी चाहिए. रिहॅब में झोपड़पट्टीवासियों को जो एक घर मिलता है उसका भी पॅरामीटर होना चाहिए, उसकी भी क्वॉलिटी चेक होनी चाहिए.

श्री झीशान सिद्दीकी.....

अध्यक्ष महोदय, मैं मेट्रो के बारे में बताना चाहूंगा. मुंबई शहर में अंडरग्राऊंड मेट्रो है. लेकिन मुंबई उपनगर जिले में एलिवेटेड मेट्रो है. मुंबई शहर से १० विधायक है और मुंबई उपनगर से २६ विधायक है. इसी सदन में मेरे पिताजी सम्माननीय सदस्य श्री बाबा सिद्दीकी जी ने भी यह मुद्दा उठाया था और कहा था कि मुंबई उपनगर में भी अंडरग्राऊंड मेट्रो की जरुरत है. तब माननीय पृथ्वीराज चव्हाण जी ने इस पर स्टे भी दिया था. फिर भी मुंबई उपनगर जिले को सौतेले व्यवहार का ट्रीटमेंट मिल रहा है. उसके कारण ट्राफिक और कन्जेशन हो रहा है. मेरी मांग है कि ट्राफिक और कन्जेशन के बारे में कुछ सोचा जाए. मुझे विश्वास है कि सम्माननीय मंत्री महोदय मेरे द्वारा उपस्थित किए गए मुद्दों पर गौर करेंगे और कुछ सुझाव देंगे. आपने मुझे बोलने का मौका दिया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भीम, अल्लाह हाफिज.

...यानंतर श्री चौधरी

श्री.गणेश नाईक (ऐरोली) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये गर्दी वाढली, ठाणे जिल्हयामध्ये औद्योगिकीकरण सुरु झाले आणि भविष्यकाळात मुंबईमध्ये आणखी जास्त गर्दी होऊ नये म्हणून सन १९९५ मध्ये नवी मुंबईची स्थापना करण्यात आली. ठाणे जिल्हयातील ठाणे तालुक्यातील ठाणे-बेलापूर पट्टा, उरण तालुक्याचा अर्धा भाग आणि पनवेल तालुक्याचा अर्धा भाग अशा एकूण ९५ गावांमध्ये नवी मुंबई वसली. त्यावेळी मूळ गावठाणांच्या बाहेर स्थानिक शेतकरी, नागरिकांच्या भावी पिढयांसाठी एक्स्टेंडेड गावठाणे निर्माण होणे गरजेचे होते. परंतु दुर्दैवाने विविध कालखंडामध्ये ते होऊ शकले नाही. परिणामी, लोकांनी गरजेपोटी आपापली घरे बांधली.

अध्यक्ष महोदय, सन २०१० साली यासंदर्भात निर्णय होऊन २०१३ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली. अंतिमत: दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी नगरविकास मंत्री माननीय श्री.एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. परंतु त्यामध्ये अनेक बाबींची स्पष्टता आली नाही. शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे की, "सदर जागा भाडेतत्त्वावर दिल्या जातील." आमच्या मूळ मालकीच्या जागा शासनाला दिलेल्या असताना आम्ही त्या शासनाकडून भाडेतत्त्वावर का घ्याव्यात याबाबत माननीय नगरविकास मंत्र्यांनी स्पष्टता द्यावी. ७/१२ उताऱ्यावर आम्ही मालक असताना सिडकोने आमच्या जागा घेतल्या आणि आता आम्हालाच भाडेकरुसारखी वागणूक देण्याची भूमिका घेत असाल तर ते कदापि सहन केले जाणार नाही, हे मी नम्रपणे सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, या शासन निर्णयातील अजून बऱ्याच गोष्टींची स्पष्टता आलेली नाही. मूळ गावठाणापासून २५० मीटरपर्यंतच्या व त्यापुढील बांधकामांचा एक मुद्दा आहे. २५० मीटरपर्यंतच्या घरांना ३० टक्कयांप्रमाणे व त्यापुढील ५०० मीटरपर्यंतच्या घरांना ६० रिझर्व्ह प्राईसच्या टक्क्यांप्रमाणे दर लावला जाईल असे सांगण्यात आले आहे. परंतु एखाद्याचे शेत मूळ गावठाणापासून जवळ असेल म्हणून त्याने तेथे घर बांधले असेल तर त्याउलट एखाद्याचे शेत ५०० मीटर अंतरावर

श्री.गणेश नाईक.....

असल्याने त्याने तेथे घर बांधले असेल. राज्य शासनाला पुनर्वसनाच्या धर्तीवर जमिनी देणाऱ्या लोकांचे अस्तित्त्व टिकविण्यासाठी भूमिका घ्यायची असेल तर काही शेतकऱ्यांना ३० टक्के व काही शेतकऱ्यांना ६० टक्के किंमत ही गोष्ट मनाला पचत नाही. त्यामुळे माननीय नगरविकास मंत्र्यांनी याबाबत अधिक स्पष्टता आणावी.

अध्यक्ष महोदय, ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये असताना मूळ गावठाणात कमर्शिअल बांधकामे करण्यात आली होती. तेथील निवासी घरे व व्यापारी बांधकामे याबाबत भूमिका स्पष्ट करण्याची गरज आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. गणेश नाईक...

गरजेपोटी बांधलेल्या घरांमध्ये सुध्दा मूळ शेतकऱ्यांकडून काही जागा विकत घेतल्या. त्यांचे भूसंपादन झाले होते. पण तरी सुध्दा काही लोकांनी अज्ञानापोटी बाहेरच्या लोकांना जागा दिल्या आणि त्या लोकांनी तेथे घरे बांधली आहेत. आता प्रश्न असा आहे की, प्रकल्पग्रस्त लोकांबरोबर जे लोक ४०-४० वर्षापासून तेथे राहत आहेत त्या लोकांच्या अस्तित्त्वाचा देखील प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत सुध्दा स्पष्टता येणे गरजेचे आहे. म्हणून याबाबत एक पुस्तिका निर्माण केली पाहिजे. उदाहरण द्यायचे झाले तर एखाद्या गावाचा मूळ नकाशा घेतला पाहिजे. त्या पुस्तिकेमध्ये मूळ गावठाण, आणि त्या मूळ गावठाणापासून १५० ते ५०० मिटरपर्यंत राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने कोणती भूमिका घेतली याची स्पष्टता येणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, मधल्या काळात नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी Unified D.C.R. जाहीर केला. मी विनम्रपणे सांगतो की, ज्या शहरामध्ये एफएसआयची वाढ होणार असेल आणि त्या शहराचा Impact Assessment Report जर तयार झालेला नसेल आणि अंदाजाने म्हणजे "आले राजाजींच्या मना, तेथे कोणाचे चालेना", अशा प्रकारचा लहरी कारभार असेल तर तेथे राहणाऱ्या नागरिकांचे नागरिकशास्त्र आणि त्यांचे आरोग्य सांभाळले जाईल, याची शाश्वती देता येत नाही. बऱ्याच लोकांना Impact Assessment Report माहिती असेल. परंतु माझ्या मनात त्याबद्दल असे आहे की, एकूण असलेले क्षेत्रफळ, त्यामध्ये असलेले रस्ते, त्या रस्त्यांच्या अनुषंगाने असलेली मैदाने, बाग बगीचे, हॉस्पिटल, शाळा, बाजारांच्या जागा, खुल्या जागा, पोलीस ठाण्याची जागा, फायरब्रिगेडची जागा या सर्वांचा विचार करुन नागरिकांना सुरळीतपणे तेथे वावर करता यावा, अशा प्रकारची नगराची रचना असणे अपेक्षित आहे. त्यामध्ये एफएसआय १, दीड, दोन, अडीच, तीन यापैकी किती असावा, याचा विचार झाला पाहिजे.

श्री. गणेश नाईक...

अध्यक्ष महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ज्यावेळी २६ जुलैला मुंबई संपूर्ण पाण्याने भरली होती त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख यांनी असे सूचविले होते की, या शहरामधून एलिव्हेटेड रोड निर्माण झाले पाहिजेत. त्यानंतर "फ्री-वे" या रोडची निर्मिती झाली. आज आपण अनेक ठिकाणी ब्रिजेस बांधलेले बघतो. मेट्रो रेल्वेचे आणि मोनो रेल्वेची कामे सुरू असल्याचे पाहतो. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, आजच्या क्षणी एखाद्या दिवशी अपघात घडला तर ट्राफिक जाम होते. आपण भविष्याच्या दृष्टीने जो साडे चार इतका एफएसआय वाढविला आहे त्या अनुषंगाने वाढणारी वस्ती जर लक्षात घेतली तर असा एक दिवस असेल की तेथे गाडी न नेता चालत जाऊन ४-५ कि.मी.चे अंतर गाठावे लागेल. त्यावेळी सायकल जाण्याची सुध्दा सोय नसेल. म्हणून मी नगरविकास मंत्री महोदयांना सांगतो की, आपण Unified D.C.R. नुसार जो एफएसआय वाढविला आहे त्या अनुषंगाने होणाऱ्या भविष्यकाळातील धोक्यांना आपण कशा पध्दतीने सामना करणार आहात, याची स्पष्ट कल्पना देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, नवी मुंबईमध्ये काही मूळ गावे आहेत. आता तेथे औद्योगिकरण झाले आहे. उद्योगधंद्यामध्ये काम करणाऱ्या लोकांनी तेथे बांधकाम करुन झोपडपट्ट्या बांधल्या. आज पनवेल, उरण, नवी मुंबईमध्ये मूळ गावठाण, झोपडपट्ट्या आणि अद्ययावत बांधलेली कॉलनी अशा ३ प्रकारच्या स्वरुपात तेथे रचना झाली आहे. माझे म्हणणे असे आहे की, नुसता गावठाणांचाच विचार करु नका तर झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांना ती जागा मालकी हक्काने द्यावी. आता सिडकोचा कारभार पूरे झाला. किती वर्षे 'सिडको' राहणार आहे. जीवनाच्या अंतापर्यंत 'सिडको' राहणार असेल तर त्या लोकांनी कायम 'सिडकोचे' भाडेकरु म्हणून किती वर्षे रहायचे ?

श्री. गणेश नाईक...

अध्यक्ष महोदय, मी फक्त गावठाणातील गावकऱ्यांसाठीच बोलत नाही तर ज्यांनी सिडकोच्या माध्यमातून घरे घेतली आणि बांधली आहेत त्या लोकांसाठी सुध्दा बोलत आहे. त्यांना स्वत:च्या मालकीची जी जागा आहे ती त्यांच्या नावाची आहे, हा आनंद मिळायला नको काय ? आता त्या ठिकाणी 'कोस्टल रोड' बांधण्यास सुरूवात केली आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. गणेश नाईक....

घनसोली नंतर ऐरोली येथे तो रस्ता थांबलेला आहे. तो रस्ता ३०० कोटी रुपयांचा असून यासाठी १५० कोटी रुपये महापालिका आणि १५० कोटी रुपये सिडको खर्च करणार आहे. सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना मी पत्र दिले आहे आणि फोन वर देखील बोललो आहे. याबाबत त्यांनी देखील मला एक पत्र दिले की, तुम्ही काम करा त्यानंतर आम्ही ते पैसे देऊ. दोन वर्षापासून तिथे प्रशासनाचा कारभार सुरु झालेला आहे. तिथे अनावश्यक असलेली १०० ते १५० कोटी रुपयांची कामे निघतात. तसेच तिथे गरज नसतानाही टेंडर निघतात. मग आपण ते टेंडर न काढता त्यातील १५० कोटी रुपये रस्त्यासाठी वापरले असते तर निश्चितपणे घनसोली-ऐरोली रस्ता झाला पूर्ण असता. प्रशासकीय यंत्रणेबद्दल किंवा आयुक्तांबद्दल माझी तक्रार नाही. परंतु आयुक्तांना मंत्रालयातील मंत्री स्तरावरुन किंवा प्रशासकीय स्तरावरुन फोन जातात त्यामुळे तिथे अनावश्यक कामे निघतात. राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक अध्यक्षांनी माननीय आयुक्तांची भेट घेतली. उपाध्यक्ष श्री. नितीन चव्हाण यांनी ४५ कोटी रुपयांची कामे झाली असे सांगितले. त्यानंतरही त्याचे टेंडर निघत आहेत. ते टेंडर कोणाच्या आदेशाने निघाले आहेत याची माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी चौकशी करावी. तसेच आपण आपल्या उत्तरामध्ये या बाबीची चौकशी करण्यात येईल असा उल्लेख करावा.

अध्यक्ष महोदय, ऐरोली मध्ये ६ कोटी रुपयांची स्मशानभूमी दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. ज्या कंत्राटदाराची पात्रता नाही अशा कंत्राटदाराला ते काम देण्यात आले आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : सन्माननीय सदस्य मी आपल्याला सांगू इच्छितो की, आता आपल्या पक्षाचा फक्त १० मिनिटांचा कालावधी राहिलेला आहे त्यामुळे आपण वेळेचे नियोजन करावे.

श्री. गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, आपण थोडी वेळ वाढवून द्यावी, अशी माझी विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : अशा प्रकारे वेळ वाढवता येत नाही. सत्ताधारी पक्षाचा निम्मा वेळ पूर्ण झाला पाहिजे नंतरच वेळ वाढवता येऊ शकते.

श्री. गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, ठीक आहे मी वेळेच्या आत माझे भाषण पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

अध्यक्ष महोदय, नवी मुंबई शहर हे खूप शहर सुंदर आहे. परंतु त्या शहराच्या अर्थकारणाची वाट लावण्याचे काम सुरु झालेले आहे. हे आरोप मी केलेले नाहीत तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एका उपाध्यक्षांनी सांगितले आणि त्यांनी नोटीस दिलेली आहे की, जर या बाबींची चौकशी झाली नाही तर आम्ही आंदोलन करु. विरोधी पक्षातील एखादा माणूस खोटे आरोप करु शकेल. पण सत्ताधारी, आघाडी पक्षातील एखादा माणूस आरोप करतो तेव्हा त्याला ग्रॅव्हिटी येते. आता या शहरात जी चांगली कामे सुरु आहेत ती भविष्यकाळात तशीच सुरु राहण्यासाठी आम्हाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. कारण हे शहर आमचे एकट्यांचे नाही तर सर्वांचेच आहे. नवी मुंबई शहरात दगडाच्या खाणी आहेत. त्या माननीय कै. बाळासाहेब ठाकरे यांनी एकदा पर्यावरणाच्या कारणावरुन बंद केल्या होत्या. पण पुन्हा त्या खाणी सुरु झाल्या आहेत. कारण तेथील दगड सिडकोच्या विकासासाठी कामी यावेत यासाठी सिडकोमध्ये ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांना त्या दगडाच्या खाणी देण्यात आल्या आहेत. सिडको फक्त एजन्सी होती. प्रकल्पग्रस्त लोकांनी त्या जमिनीची मूळ किंमत सिडकोच्या मार्फत भरलेली आहे. याची आपल्याला कल्पना आहे काय ? ज्यांनी ही मूळ किंमत फॉरेस्टला भरली असेल तर तो त्याचा मालक होतो. त्यामुळे दगडाच्या खाणी बंद झाल्या असल्या तरी सुद्धा त्याचा वापर बदलून उद्योग करण्यासाठी त्या मिळाल्या पाहिजेत अशी माझी मागणी आहे. या बाबत आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी चर्चा करुन विधी व न्याय विभागाचा सल्ला घ्यावा व त्या खाणी शेतकऱ्यांच्या नावावर करण्याची प्रकिया सुरु करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी पर्यावरणाच्या विषयावर बोलणार होतो परंतु आता वेळ कमी असल्यामुळे मी थांबतो. नवी मुंबई मध्ये स्मशानभुमीच्या दुरुस्तीचे अयोग्य

श्री. गणेश नाईक....

कंत्राटदाराला दिलेले टेंडर आणि त्यानंतर झालेली प्रक्रिया आणि सिडकोने दिलेली रक्कम याबाबत स्पष्टता द्यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. रमेश कोरगावकर (भांडूप पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरी अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभाग मागणी क्र. एफ-२,बाबत मी बोलू इच्छितो. महानगरपालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकासाकरिता निधी दिलेला आहे. भांडूप पश्चिम मतदारसंघ डोंगर पायथ्याशी वसलेला असून येथे दाटीवाटीने वसलेली झोपडपट्टी आहे. येथे पावसाळ्यात अनेकदा भूस्खलन होऊन झोपडपट्टयांची पडझड होते व जीवितहानी होते. जीवित हानी टाळण्याकरिता पूर्वी बांधण्यात आलेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या संरक्षण भिंती बहुतांशी तांत्रिकदृष्टया कमकुवत झाल्या आहेत. त्यांच्या दुरुस्तीचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील छत्रपती शिवाजी महाराज तलावामध्ये गणेशमूर्ती, दुर्गामाता मूर्ती यांचे विसर्जन केले जाते तसेच तेथे अनेक धार्मिक कार्यक्रम केले जातात. येथे स्थानिक नागरिक, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आपला वेळ घालवण्याकरिता रोज येतात. हा परिसर आकर्षक व देखणा होण्याकरिता तलाव परिसराचे सौंदर्यीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सदनात अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये मला बोलता आले नाही. आता या ठिकाणी माननीय वित्त मंत्री उपस्थित आहेत. हा प्रश्न सर्व आमदारांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने शहरी व ग्रामीण भागात विविध नागरी सुविधांचे काम पार पाडण्याकरिता वेगवेगळया विभागांमार्फत विधानसभा व विधानपरिषद सदस्यांना निधी दिला जातो. सदर निधी नियोजन विभागाच्या पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या मार्फत आमदारांच्या क्षेत्रात विविध विकास कामे पार पाडण्याकरिता दिला जातो. या कामाकरिता ई टेंडरिंग करण्यात येते. यासाठी विविध मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून निविदा भरल्या जातात. ठेकेदार २०

श्री. रमेश कोरगावकर .....

ते ४० टक्के अशा कमी दराने कामे करतात. यामुळे २० ते ४० टक्क्याच्या निधीचा वापर न होता तो पुन्हा शासनाकडे जमा होतो. आमदारांचा निधी आता ५ कोटी रुपये झाला आहे. रक्कम २० टक्के कमी केली तर आमचा १ कोटी रुपयांचा निधी वाया जातो. मुंबई महापालिकेत असा निधी जो कामाच्या कमी दराने जात असेल तो नगरसेवकांना पुन्हा नवीन कामासाठी वापरता येतो. महापालिकेत अशा प्रकारची कामे कमी दराने करणाऱ्या ठेकेदारांना पुन्हा नवीन कामे सूचवून कमी केलेल्या निधीमध्ये काम करता येते. कमी दराने काम केल्यामुळे शिल्लक राहिलेला निधी शासनाकडे परत जातो. हा निधी आम्हाला परत देऊन दुसरी कामे करण्याकरिता देण्यात यावा असे धोरण शासनाने तयार करावे व निधीची उपलब्धता करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, मुंबई महापालिका क्षेत्रातील अनेक इमारती जुन्या झाल्या असून इमारतीला तडे गेलेले आहेत. येथे लिकेजची समस्या निर्माण होतात. यामुळे इमारतींचे आयुष्य कमी होते. अशा इमारतींच्या छतावर पत्र्याचे शेड बांधण्यासाठी परवानगी द्यावी जेणेकरुन छताची कार्यक्षमता वाढेल. यामुळे या इमारतींना आणखी आयुष्य मिळेल. या इमारतींचा कमर्शियल वापर होणार नाही या करिता नियमाचे पालन करावे. या छताला ४ फुटाचीच उंची देण्यात यावी. भांडूप मतदारसंघामध्ये बाजीप्रभू मैदान,धोंडू पाटील मैदान येथे ज्येष्ठ नागरिकांकरिता कट्टा बसवणे, लहान मुलांकरिता खेळाचे साहित्य बसवणे, जॉगिंग ट्रॅक इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी मी विनंती करते.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.रमेश कोरगावकर ...

अध्यक्ष महोदय, गृह विभागाच्या पुरवणी मागणी क्रमांक बी-६ वर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, मी प्रतिनिधित्व करीत असलेल्या भांडूप पश्चिम विधानसभा क्षेत्रात भांडूप पोलीस स्टेशन व त्या अंतर्गत एकता पोलीस चौकी, प्रतापनगर खिंडीपाडा चौकी, खिंडीपाडा उषानगर पोलीस चौकी, व्हिलेज रोड बिट कार्यरत आहेत. सदर पोलीस स्टेशन व त्या अंतर्गत येणाऱ्या बिटमध्ये कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होत असून भांडूप पोलीस स्टेशन व त्या अंतर्गत येणाऱ्या बिटचे अत्याधुनीकीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाचाच एक विषय मला मांडावयाचा आहे. गुन्ह्यामध्ये बळी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई मिळण्याबाबतचा हा विषय आहे. एखाद्या गुन्ह्यातील आरोपीला जन्मठेप झाल्यास किंवा शिक्षा भोगत असताना त्याचा मृत्यू झाल्यास किंवा एखाद्या अपघातात मृत्यू झाल्यास सदर गुन्हेगारांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहासाठी शासनामार्फत आर्थिक सहाय्य केले जाते. परंतु, सदर आर्थिक सहाय्य वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबियांची कुचंबणा होते. बळी पडलेल्या गुन्हेगारांच्या कुटुंबियांकडे अनेक जाचक कागदपत्रांची मागणी करण्यात येते. त्यामुळे त्यांना वारंवार पोलीस स्टेशनच्या फेऱ्या माराव्या लागतात. काही कुटुंबांना हे आर्थिक सहाय्य मिळत देखील नाही. त्यामुळे शासनाने बळी पडलेल्या गुन्हेगारांच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्यामध्ये सुसूत्रता आणावी व कुटुंबाची होणारी कुचंबणा थांबवावी. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. आपण मला सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे बोलणे मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

.....

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपले मुद्दे थोडक्यात मांडावेत. सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल. त्यानंतर मंत्री महोदयांची उत्तरे होतील.

.....

श्री.यशवंत माने (मोहोळ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्याकरिता व पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी पर्यावरण व वातावरणीय विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये राज्यातील गौण खनिज म्हणजेच मुरुम, दगड, माती व उत्खननाबाबतचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुरुम, दगड, माती यासाठी जिल्हा प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या परवानग्यांवर राष्ट्रीय हरित लवादाने बेकायदेशीर ठरवत बंधने घातलेली आहेत. मुरुम, दगड, माती उत्खनन करण्यासाठी पर्यावरण विभागाची मंजुरी बंधनकारक असल्याचे आदेशात नमूद केले आहे. त्यामुळे राज्यातील मुख्यत: सोलापूर जिल्ह्यातील गौण खनिज उत्खननावर प्रतिकुल परिणाम झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील मुख्यत: मुरुम व दगड उत्खनन या माध्यमातून करोडो रुपयांचा महसूल शासनाला मिळतो.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण केवळ मुद्दे मांडावेत.

श्री.यशवंत माने : अध्यक्ष महोदय, मागच्या महिन्यापासून तो बंद झालेला आहे. माझ्या सांगण्याचा उद्देश हा आहे की, सोलापूर जिल्ह्यामध्ये किंवा महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र शासनाची, केंद्र सरकारची कामे मोठ्या प्रमाणावर सुरु आहेत परंतु, तात्पुरता परवाना सध्या बंद केलेला आहे. तहसीलदारांना ५०० ब्रासला, प्रांत अधिकाऱ्यांना २००० ब्रास व जिल्हाधिकाऱ्यांना १ लाख ब्रासची परवानगी देण्याचा अधिकार आहे. परंतु, प्रत्येक परवान्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेणे गरजेचे आहे असे लवादाने जाहीर केल्यामुळे शासनातील सर्व कामे सध्या ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाकडील मुख्यमंत्री ग्राम सडक योजना असेल, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना असेल, एडीबीचे काम असेल, बजेटचे काम असेल, लेखाशीर्ष २५१५, ३०५४ खालील कामे अशा सर्व कामांकरिता मुरुम, दगडाची आवश्यकता असते. शासनाने याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन पूर्वीप्रमाणेच

तहसीलदारांना ५०० ब्रासला, प्रांत अधिकाऱ्यांना २००० ब्रास व जिल्हाधिकाऱ्यांना १ लाख ब्रासपर्यंत परवानगी देण्याची गरज आहे, एवढीच विनंती मी करतो.

श्री.यशवंत माने ...

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री व अर्थ मंत्री माननीय श्री.अजित पवार यांचे मी मनापासून आभार मानतो. आमदार निधी २ कोटी रुपये होता तो सन २०२० मध्ये ३ कोटी, सन २०२१ मध्ये ४ कोटी व सन २०२२ मध्ये ५ कोटी केला, त्याबद्दल मी सभागृहाच्यावतीने त्यांचे मनापासून आभार मानतो व माझे दोन शब्द संपवतो.

.....

नंतर श्री.नितनवरे ...

असुधारित प्रत

श्री अबू आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ के अर्थसंकल्प में की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं गृह विभाग के बारे में बोलना चाहता हूं. बजट में गृह विभाग के लिए ३३,०३६ करोड़ रुपये, मुंबई पुलिस के लिए ४,२०० करोड़ रुपये, डिस्ट्रीक्ट पुलिस फोर्स के लिए १६,१२५ करोड़ रुपये, रेल्वे पुलिस, जीआरपी के लिए ५२९ करोड़ रुपये, हार्बर पुलिस के लिए १९० करोड़ रुपये, एटीएस के लिए ९५ करोड़ रुपये, इन्टेलिजन्स के लिए ३३७ करोड़ रुपये, ॲन्टी करप्शन के लिए १७० करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. इससे ऐसा लगता है कि यहां कि पुलिस सब ठीकठाक करना चाहती है. यही इस बजट से यह जाहिर होता है. मगर पुलिस और जनता के बीच जो दूरी है वह किसी तरह से खत्म होनी चाहिए. पुलिस का डर आम जनता से खत्म होना चाहिए. पुलिस विभाग में करप्शन बढ़ता जा रहा है. मैं यह नहीं कह रहा हूं कि सारे पुलिस वाले करप्ट है.

अध्यक्ष महोदय, पुलिस विभाग में कुछ ऐसे लोग है जो करप्ट है, जिसके कारण पुलिस विभाग का नाम खराब हो रहा है. ॲन्टी करप्शन विभाग के लिए ११७ करोड़ रुपये दिए गए . ॲन्टी करप्शन विभाग में जब किसी पुलिस वाले को भेजा जाता है तो वह यह समझता कि यह मेरी साईड ब्रांच है. इसलिए ॲन्टी करप्शन विभाग के बारे में ऐसा कुछ किया जाए ताकि वहां पुलिस वाले खुशी से जाए. अगर इस विभाग में श्री परमवीर जैसे लोगों को भेज देंगे, जो करप्ट ही होंगे, तो आप करप्शन को कैसे रोकेंगे? वहां किसी को भेजने से पहले कम से कम यह पता लगाना चाहिए कि कौनसा अधिकारी ॲन्टी करप्शन के खिलाफ है. इस ओर ध्यान देना बहुत जरुरी है.

अध्यक्ष महोदय, यहाँ पर ऐसा दिखायी देता है कि २० हजार से ज्यादा रकम खर्च हो रही है. लेकिन प्रजा नामक एक एनजीओ है. उसकी रिपोर्ट ऐसी है कि इन्वेस्टीगेशन के जो पेंडींग केसेस है उसकी संख्या सन २०२० में ९६,०६७ थी और ट्रायल के लिए पेंडींग केसेस २४,९०७ थे. इससे पता चलता है कि मुंबई शहर में पेंडींग केसेस और ट्रायल इन्वेस्टीगेशन के कई केसेस बढ़े हुए है. मेरा ऐसा मानना है

श्री अबू आजमी.....

कि जब तक आरोपी को सजा नहीं होगी तब तक इनका हौसला बढ़ता रहेगा. सरकार ने दो कानून अच्छे बनाए है. एक तो पास्को कानून बनाया है और दूसरा कानून शक्ति विधेयक के बारे में बनाया है. यह कानून अच्छा है, लेकिन फास्ट ट्रैक कोर्ट और एक साल में सजा होने के बारे में सरकार ने जो कहा था, उस पर बिल्कुल अमल नहीं हो रहा है. ३-४ सालों तक केसेस चल रहे है. आरोपी को जल्द से जल्द सजा होनी चाहिए. हमारे यहाँ जो जेल है वह ओव्हर क्राऊडेड है. अंडर ट्रायल कैदियों की भरमार है. मैं चाहता हूं कि पेंडींग केसेस का निपटारा जल्द से जल्द होना चाहिए और जो अंडर ट्रायल है वह जल्द से जल्द छूट सके. क्राईम ज्यादा बढ़ने की सबसे बड़ी वजह ड्रग्ज है. ड्रग्ज के बारे में सरकार ने कुछ निश्चित करना चाहिए. सरकार ने पुलिस विभाग को ऐसा आदेश देना चाहिए कि मुंबई को ड्रग्ज फ्री करना है. इससे किसी की क्या मजाल होगी कि ड्रग्ज की बिक्री हो सके. मैं सम्माननीय दादा से कहना चाहता हूं कि ड्रग्ज को लेकर मुंबई में एक बहुत बड़ी समस्या खड़ी हो गई है. ड्रग्ज के कारण क्राईम बढ़ रहा है, लूट मच रही है, लैंगिक गुनाह हो रहे है. इस बारे में कहीं न कहीं रोक लगनी चाहिए. जिस तरह ॲन्टी नार्कोटिक्स सेल में एक ही डीसीपी है. जिस तरह से इकॉनॉमिक ऑफेन्स के लिए सेपरेट सेल है, उसी तरह से ज्वाईंट कमिश्नर के अंडर में हर पुलिस स्टेशन में इस तरह का सेल बनाया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, एनपीआर के लिए १ करोड़ ३० लाख रुपये की प्रोव्हिजन की गई है. पिछले साल ८४ लाख रुपये और उसके पहले ५० लाख रुपये की प्रोव्हिजन की गई थी. ये सेंट्रल स्पॉन्सर्ड स्कीम है, तो फिर हर साल बजट में प्रोव्हिजन क्यों किया जा रहा है? आबादी का एक बहुत बड़ा हिस्सा एनपीआर, सीएए... एनसीआर एनपीआर के खिलाफ है जो शक की नजर से इस कानून को देखता है. इसके पीछे दूसरा खेल खेला जा रहा है. हम इसकी पूरी मुखालिफत करते है. एनपीआर के लिए फंड दिया जा रहा है. जिन लोगों पर शक है, उनको बुलाकर शक दूर किया जाए. उसके बाद ही इसको लागू किया जाए.

श्री अबू आजमी.....

अध्यक्ष महोदय, पूरे मुंबई की सड़कों पर जब कोविड के समय में बड़े बड़े शेड्स बनाए गए थे, तो पुलिस वहां पर बैठती थी. अब वह शेड्स वहां से हट जानी चाहिए. अब भी वहां पर शेड्स को लेकर आधी सड़क रोककर रखी गई है. मेरा कहना है कि शेड्स को हटाया जाना चाहिए. जहां पर नाकाबंदी होती है उसकी व्हिडियो शुटींग होनी चाहिए. लोगों की शिकायत है कि एक समुदाय को ज्यादा परेशान किया जा रहा है. लोगों की शक्ल और पहनावा देखकर लोगों को परेशान किया जा रहा है, ऐसी लोगों की शिकायत है.

अध्यक्ष महोदय, मैं नगर विकास विभाग के बारे में यह कहना चाहता हूं कि इस विभाग के लिए ४४,३०६ करोड़ रुपये का बजट है. महानगरपालिका को नगर विकास विभाग की ओर से बहुत फंड दिया जाता है. बेसिक ॲमिनिटीज के लिए पैसा दिया जा रहा है. मेरा कहना है कि मानखुर्द-शिवाजीनगर बिल्कुल गया-गुजरा इलाका है. सारी मुंबई का कचरा वहां पर आता है. मेडिकल के सारे डिस्पोजल का कचरा वहां पर आता है और वहीं पर सब जलाया जाता है. वहां पर जो डम्पींग ग्राऊंड है उसको खत्म किया जाए. एसएमएस कंपनी को खत्म किया जाए. सड़कों को अच्छी तरह से बनाया जाए. आज अस्पतालों में दवाई नहीं मिलती है. लोगों को बाहर से दवाई लाने के लिए कहा जाता है. अस्पतालों में सही दवाई मिलनी चाहिए. सफाई के बारे में ऐसा इंतजाम करना चाहिए कि जो लेबर दिए जाते है, उसमें नगरसेवक और अधिकारी मिलकर पैसा खा जाते है. ५० लेबर की जगह पर ५ लेबर से काम करवाया जाता है. इसकी जांच होनी चाहिए. इसमें भ्रष्टाचार होता है. मेरे इलाके में अच्छी तरह से सफाई का काम होना चाहिए. मुझे उम्मीद है कि इस ओर ध्यान दिया जाएगा.

अध्यक्ष महोदय, आपने मुझसे पहले कहा है कि एमएमआरडीए के बारे में आप कमिश्नर से कहेंगे. एमएमआरडीए के कमिश्नर और महानगरपालिका के आयुक्त की एक संयुक्त बैठक आपकी अध्यक्षता में करवा दीजिए. इससे कई समस्याएं हल

श्री अबू आजमी.....

हो जाएगी. आपने मुझे बोलने के लिए समय दिया उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

...यानंतर श्री तेलंग

असुधारित प्रत

पृ.शी. : श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. तथा विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांच्या विरुद्ध दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत

मु.शी. : श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. तथा विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांच्या विरुद्ध दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत या संबंधी माननीय सहकार मंत्र्यांचे निवेदन

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा नियम ४७ अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

पृ. शी. : अनुदानाकरिता मागण्या

मु. शी. : सन २०२२-२०२३ अनुदानाकरिता मागण्या :

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.विक्रमसिंह सावंत (जत) अध्यक्ष महोदय, २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मागील १५ दिवसांपासून जत तालुक्यातील गुन्हेगारीच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. उमदी येथे दोन व्यक्तींची हत्या करण्यात आलेली आहे. त्याच बरोबर चोरीचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सोसायटी निवडणुकीमधील हार-पराजय लक्षात घेऊन काही लोकांकडून धाब्याला आग लावण्यात आलेली आहे. जत आणि उमदी येथील पोलीस निवास्थानासाठी गृह विभागाने विशेष निधीची तरतूद करावी, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. विक्रमसिंह सावंत .....

अध्यक्ष महोदय, जवळपास ७९ कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या मागणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. उमदी येथील निवासस्थान हे सन १९६७-६८ मध्ये बांधलेले आहेत. तसेच जत येथील पोलीस निवासस्थाने ही संस्थान काळातील घोड्याच्या पागांमध्ये बांधले आहेत. पोलीस स्टेशनच्या निवासस्थानाकरिता तरतूद करावी, अशी मी या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागासंदर्भात मी बोलणार आहे. माझ्या मतदारसंघात जत नगरपरिषद आहे. या नगरपरिषदेमध्ये ६० ते ६५ हजार लोकसंख्या आहे. येथील पाणी पुरवठा योजनेला जवळपास ३० ते ३५ वर्षे झालेले आहेत. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, या नगरपरिषदेमध्ये नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर व्हावी. त्याचप्रमाणे डंपिंग यार्डचा ४ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्याचाही या पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने विचार करावा, अशी विनंती करतो. जत नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीकरिता चार कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा.

अध्यक्ष महोदय, पर्यावरण आणि वातावरणातील बदल आपण लक्षात घेतला पाहिजे. माझा मतदारसंघ कायमस्वरुपी दुष्काळी आणि आवर्षणग्रस्त भाग आहे. येथे वनीकरणाची जवळपास ११ हजार ३६३ हेक्टर जमीन आहे. या जमिनीवर वृक्ष लागवड करावी. जेणेकरुन वातावरणातील बदल रोखण्यासाठी मदत होईल.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवर आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

धन्यवाद !

श्री. कालिदास कोळंबकर (वडाळा) : अध्यक्ष महोदय, गृह विभाग, नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी आणि त्यावर माझे मत मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात जवळपास १९ हजार ६३२ इमारती सेसमधील आहेत. या इमारती अतिशय नादुरुस्त अवस्थेत आहेत. त्या इमारतींचा मालक या इमारती विकसित करण्यासाठी नो ऑप्शन देण्यास तयार नसतो. आमदारांच्या एका समितीने एक नियम केला आहे. एखाद्या इमारतीचा मालक ऐकत नसेल तर म्हाडा आणि सोसायटीने एकत्र येऊन विकास करावा. मालक जाणुनबुजून विकास करीत नाहीत. अशा परिस्थितीत आमदार समितीने तयार केलेले निवेदन माननीय राष्ट्रपतींकडे पाठविलेले आहे. त्यावर त्यांची स्वाक्षरी झाली तर भविष्यातील मुंबई शहराचा प्रश्न निकाली निघेल.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये ५३ गिरण्या आहेत. या गिरण्यांच्या चाळीचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे.

यानंतर श्री. चौधरी.....

श्री.कालिदास कोळंबकर.....

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये एकूण ५३ गिरण्या आहेत. या गिरणी कामगारांच्या चाळी १०० वर्षे जुन्या झाल्या आहेत. गिरण्यांच्या मोकळया भूखंडावर विकास करण्यास शासनाने परवानगी दिली परंतु चाळींना मात्र १०० वर्षे होऊनही परवानगी मिळत नाही. माझी विनंती आहे की, ती कामे थांबवा. ती कामे थांबविली तरच गिरणी कामगारांच्या घरांच्या कामांना गती मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा व अत्यंत महत्त्वाचा मुद्दा बी.डी.डी. चाळींचा आहे. माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांच्या मतदारसंघामध्ये देखील बी.डी.डी. चाळी आहेत. या चाळी पोलिसांच्या आहेत. आता त्यांना शिफ्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे. परंतु असे करताना त्यांना हमीपत्र दिले पाहिजे, अशी माझी विनंती आहे. कारण त्यांना शिफ्ट करुन उद्या परत तेथे घर दिले नाही तर त्यांनी काय करायचे ? त्यामुळे गृहनिर्माण विभागाने याबाबत कार्यवाही करावी, ही विनंती... (अडथळा...) माननीय मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास कामाला गती दिली आहे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, एस.आर.ए. मधील घरे विकण्यासाठी पूर्वी १० वर्षांची अट होती आता ती ५ वर्षे केली आहे... (अडथळा...) अडीच वर्षांचा केला असेल परंतु अद्याप त्याबाबतचे आदेश पारित झालेले नाहीत. मंत्री महोदयांना विनंती आहे की, याबाबत लवकरात लवकर आदेश पारित करावेत.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या सफाई विभागात सुमारे ४० हजार कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना हक्काची घरे देण्याबाबत कायदा पारित करण्यात आला आहे. असे असतानाही या कर्मचाऱ्यांना अद्याप घरे देण्यात आलेली नाहीत. या कर्मचाऱ्यांनी कोरोना काळात दोन वर्षे रस्त्यावर उतरुन काम केले नसते तर मुंबई शहराची भयानक स्थिती होऊन जनतेचीही प्रचंड गैरसोय झाली असती. शासन निर्णय निर्गमित होऊन देखील या कर्मचाऱ्यांना हक्काची घरे मिळत नसतील तर माझा प्रश्न आहे की, सदर शासन निर्णय कशासाठी निर्गमित केला आहे ?

श्री.कालिदास कोळंबकर.....

सदर शासन निर्णयानुसार मुंबई महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना हक्काची घरे द्यावीत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरातील अत्यंत महत्त्वाच्या मुद्दयांवर मी या निमित्ताने चर्चा केली आहे. माननीय अर्थमंत्री, माननीय नगरविकास मंत्री यांनी माझ्या प्रश्नांच्या अनुषंगाने मला न्याय द्यावा एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत

डॉ.राहुल पाटील (परभणी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी व त्यांना समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आमचे युवा नेते, राज्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री माननीय श्री.आदित्य ठाकरे यांच्या विभागाचे मी सर्वप्रथम अभिनंदन करतो. कारण पर्यावरण व वातावरणीय बदल या विभागाला त्यांनी आंतरराष्ट्रीय किर्ती मिळवून दिली आहे. विविध विकासकामांच्या माध्यमातून केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरामध्ये आणि जगभरामध्ये या विभागाच्या कामाची छाप पडली आहे. त्यातूनच महाराष्ट्र राज्याला एक पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे. संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेने या विभागाच्या कामाची दखल घेऊन स्कॉटलँड येथे सन्मानित केले आहे. या विभागाने राज्यभर वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

डॉ. राहुल पाटील...

मग त्यामध्ये इलेक्ट्रीक व्हेईकल असेल, माझी वसुंधरा असेल, हेरिटेज ट्री असतील किंवा प्लॅस्टीक बंदी असेल. आज आपण पाहतो की, या विभागाला फार महत्त्व आलेले आहे. मनुष्याला जिवंत रहायचे असेल तर ज्या प्रकारे आज कार्बन निर्माण होत आहे त्या कार्बन इमिशनसाठी आपल्याला मोठ्या प्रमाणात काम करावे लागेल. म्हणून मी म्हणतो की, कार्बनचे क्रेडीट आपण ज्याप्रकारे औद्योगिकरणाला देतो तशाप्रकारे कार्बन क्रेडीटचे धोरण शेतकऱ्यांसाठी सुध्दा आपण राबविले पाहिजे आणि त्यामध्ये बांबूची लागवड, आंबा लागवड, चिंच लागवड अशा विविध प्रकारच्या झाडांच्या माध्यमातून शेतकऱ्याला कार्बन क्रेडीट देऊ शकलो तर त्यातून मोठ्या प्रमाणात 'अर्थक्रांती' ग्रामीण भागामध्ये निर्माण होईल. ज्या प्रकारे कार्बन निर्माण होतो तो वातावरणातील कार्बन दूर करण्याच्या दृष्टीकोनातून एक चांगला निर्णय होऊ शकतो. इलेक्ट्रीक व्हेईकल्स किंवा इलेक्ट्रीक बायसिकल यांना प्रमोट करण्यासंदर्भात चांगल्या प्रकारचे अनुदान शासनाने दिले पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, अपारंपारिक उर्जेच्या बाबतीत सुध्दा शासनाने एक नवीन धोरण जाहीर करावे. त्यासाठी शासनाने चांगल्या प्रकारचे अनुदान द्यावे. सोलरच्या माध्यमातून आपल्याकडे मोठ्या प्रमाणात ऊर्जा निर्माण होऊ शकते. त्यासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ आपण स्थापन करुन शकलो तर त्याबाबत आपल्या देशातील आणि राज्यातील विद्यार्थ्यांना त्यातून चांगला लाभ होईल. आपण जर बघितले तर सोलरचे पॅनेल्स आज चायनामधून येतात, कोरियामधून येतात. त्यांची निर्मिती आपल्याकडे झाली आणि त्यासाठी चांगले टेक्निशिएन आपण निर्माण करु शकलो तर निश्चितपणे रोजगार निर्मिती सुध्दा होईल. ज्याप्रमाणे वातावरणात बदल होत आहे त्या दृष्टीने सुध्दा याचा उपयोग होईल.

अध्यक्ष महोदय, बायो डायव्हर्सिटी असेल किंवा आपण पाहता की, औद्योगिकरण वाढत असल्यामुळे कार्बनचे प्रमाण वाढत आहे. या वातावरणातील

डॉ. राहुल पाटील...

कार्बनचे प्रमाण कमी करायचे असेल तर आपल्याला अपारंपारिक उर्जेशिवाय दुसरा पर्याय नाही, एवढेच मी या निमित्ताने सांगतो.

अध्यक्ष महोदय, जे केमिकल फर्टिलायझर्स आहेत त्यांच्यावरही आपल्याला थोडे बंधन आणावे लागेल. ऑरगॅनिक फर्टिलायझर असेल, बायो-फर्टिलायझर असेल त्यांनाही आपल्याला प्रोत्साहन द्यावे लागेल. आपल्याला मोठ्या प्रमाणात सोलर पार्क निर्माण करावे लागतील, एवढेच या निमित्ताने सांगतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या नगरविकास विभागाच्या बाबतीत काही मागण्या आहेत. आपण पाहतो की, आता नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. आज ५० टक्के शहरीकरण होत आहे. त्यामुळे शहरांवर मोठ्या प्रमाणात लोड येत आहे. या ठिकाणी आमचे माननीय नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आमच्या परभणी महानगरपालिकेतील भुयारी गटारे असतील किंवा नाट्यगृहांसाठी आपण १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा. आमच्या जिल्ह्यातील प्रशासकीय इमारत किंवा समांतर पाणी पुरवठा योजना असेल... आता हद्द वाढल्यानंतर परभणी शहराच्या लगतचे कारेगांव, वांगी ही गावे शहरात समाविष्ट होतील आणि त्यामुळे तेथील लोक पाण्याची मागणी करीत आहेत. या शहरातून पाणी पुरवठा करावा अशी मागणी करीत असल्यामुळे ही हद्दवाढ व्हावी, अशी माझी विनंती आहे. या निमित्ताने समांतर पाणी पुरवठा योजना मंजूर करावी, अशीही माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आज शहरीकरण झालेले असल्याने सर्वात मोठा प्रश्न कचऱ्याचा निर्माण झाला आहे. म्हणून बायो-मायनिंग योजनेला शासनाने मोठ्या प्रमाणात अनुदान दिले पाहिजे. येणाऱ्या काळात पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून घनकचऱ्याचा एक प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे प्लॅस्टीक आणि कचरा यांच्यापासून आपण चांगल्या प्रकारचे पॉलिथीन किंवा त्यापासून मोठ्या प्रमाणात आपण ऑईल काढू शकतो. तसेच ग्रॅन्यूअल्स निर्माण करु शकतो, जेणेकरुन

डॉ. राहुल पाटील...

आपल्याला प्लॅस्टीक रोड निर्माण करता येईल. म्हणून माननीय नगरविकास मंत्र्यांनी त्यासाठी अनुदान जाहीर करावे.

अध्यक्ष महोदय, परभणी जिल्ह्यातील जवळपास ३३ वैद्यकीय पदांना नियमित करण्यासंबंधीचा प्रस्ताव नगरविकास मंत्री महोदयांकडे आलेला आहे. त्यावर त्यांनी सकारात्मक निर्णय घ्यावा. परभणीला अर्बन पब्लिक हेल्थ सेंटर खूप मोठ्या प्रमाणात म्हणजे ४ आहेत. पण तेथे पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत. म्हणून तेथे एखादे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माझी तिसरी मागणी गृह विभागाच्या बाबतीत आहे. मी गृह विभागाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो की या विभागाच्या माध्यमातून आता ७ हजार पोलीस भरती प्रक्रिया आता सुरू केली आहे. पोलिसांवर बराच ताण आहे. आज आपण पाहतो की, १ लाख लोकसंख्येमागे फक्त १६९ पोलीस उपलब्ध आहेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असंशोधित प्रत

डॉ. राहुल पाटील....

परभणी जिल्ह्यात जवळपास २०० रिक्त जागा आहेत. त्यामुळे शासनाने जी पोलीस भरती प्रक्रिया काढलेली आहे त्या बाबत मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. आपण पाहिले असेल की, आता मोठ्या प्रमाणावर टेक्नॉलॉजी अपग्रेड होत आहे. सायबर क्राईम, फायनान्शियल फ्रॉड किंवा पेपरलेस करन्सी यांना जर थांबवायचे असेल तर शासनाने प्रत्येक जिल्ह्यासाठी सॉफ्टवेअर इंजिनियर उपलब्ध करुन दिले पाहिजेत. तसेच स्किल ट्रेनिंगच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय दर्जाची एखादी शाळा किंवा संस्था शासनाने काढली पाहिजे. यानंतर चोरीचे तसेच गुन्ह्याचे प्रमाण बदलले आहे आणि सायबर क्राईम मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यामुळे शासनाने याची सुद्धा दखल घ्यावी, एवढेच मी या निमित्ताने सांगतो.

अध्यक्ष महोदय, परभणी जिल्ह्याची एमआयडीसी पोलीस स्टेशनसाठी खूप दिवसांपासूनची मागणी आहे. पण आजपर्यंत हे पोलीस स्टेशन झाले नाही. त्यामुळे शासनाने या बाबतीत सुद्धा सकारात्मक निर्णय घ्यावा. परभणी जिल्ह्यात पोलीस हाऊसिंगची जवळपास ५०० घरे आहेत. त्यापैकी २५० घरे तरी निर्माण करावीत कारण त्याला ५० वर्षे झाले आहेत. त्यामुळे ते पाडण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. परभणी जिल्ह्यासाठी हाऊसिंग योजना मंजूर करावी, यासाठी मी माननीय मंत्र्यांना मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण विभागाच्या विषयावर बोलत असताना मी एवढेच सांगू इच्छितो की, प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये अनेक त्रुटी दिसून येतात. रमाई आवास योजनेप्रमाणेच प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये जागेची रजिस्ट्री मागवली जाते. पण रमाई आवास योजनमध्ये जागेचे नोटराईज डॉक्युमेंट असले तरी देखील ग्राह्य धरले जाते. त्यामुळे माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, रमाई आवास योजनेसाठी जे नियम आहेत तेच नियम प्रधानमंत्री आवास योजनेला लावण्यात यावेत. प्रधानमंत्री आवास योजनेला २.५० लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. परंतु

डॉ. राहुल पाटील....

आज स्टीलचे भाव ५० रुपयांवरुन ९० रुपये झालेले आहेत. त्यामुळे या निमित्ताने अनुदानात वाढ करण्यात यावी, एवढेच मी सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प मांडलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि या पुरवणी मागण्यांना माझे समर्थन जाहीर करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

असुधारित प्रत

ॲड. अशोक पवार (शिरुर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आणि पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे. मी वेळेचे भान ठेवून माझे मुद्दे थोडक्यात मांडतो. शिरुर तालुक्यामध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी उप विभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे कार्यालय मंजूर केलेले आहे. त्याचबरोबर ऊरळी कांचन येथे पोलीस स्टेशन मंजूर केलेले आहे. ते लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे, अशी मी विनंती करतो. त्याचबरोबर शिरुर तालुक्यातील टाकळी हाजी गावामध्ये एका पोलीस स्टेशनची मागणी आहे. तिथे पोलीस स्टेशन मंजूर करण्यात यावे, अशी मी विनंती करतो. नगर विकास विभागामध्ये अनेक साखर कारखांन्यामध्ये १००० पर्यंत कामगार आणि अधिकारी असतात. त्या ठिकाणी कॉलनी उभी करायची असते. परंतु त्यासाठी लवकर परवानग्या मिळत नाहीत. खरे म्हणजे, कारखाना आणि तेथील कर्मचारी,अधिकारी तिथेच असल्यामुळे त्यांची गरज लागते. तर हा लालफितीतील कारभार कुठेतरी थांबवला पाहिजे आणि त्या उद्योगातील कामगारांना.... माझ्यासमोर काही कारखान्यांची उदाहरणे आहेत. एका वर्षापासून नगर विकास विभागाकडे फाईल पडून आहे परंतु ती फाईल फक्त फिरत आहे आणि त्याला परवानग्या मिळत नाहीत त्यामुळे या संदर्भात न्याय मिळावा अशी माझी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे जिल्ह्यात जे पीएमआरडीएचे काम सुरु आहे. त्याबाबत आमचे काही ऑब्जेक्शन होते त्यासाठी सुनावण्या सुरु आहेत. परंतु काही ठिकाणी निवासी झोन द्यायला पाहिजे होते तिथे इंडस्ट्रियल झोन टाकले आणि जिथे इंडस्ट्रियल झोन होते तिथे निवासी झोन टाकले.

यानंतर श्रीमती करंदीकर...

ॲड. अशोक पवार.....

यामध्ये सुधारणा व्हावी. आमच्या परिसरात सणसवाडी हे एक गाव आहे. येथे औद्योगिक झोन आरक्षित केला आहे. तो काढावा, यामध्ये सुधारणा व्हावी.माझ्या मतदारसंघात वाघोली हे मोठे गाव असून ते नगरपालिकेत नुकतेच समाविष्ट झाले आहे. या गावाची लोकसंख्या २ लाखाहून अधिक आहे. घनकचरा, सांडपाणी, आरोग्याच्या सुविधा, रस्ते विकास या करिता निधीची गरज आहे. या कामाकरिता निधी दिला तर वाघोली गावात चांगले काम करता येईल. या करिता परवानगी मिळावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शिक्रापूर येथे नदीच्या पात्रात एका व्यक्तीने पाच मजली इमारत बांधली. या बाबत आम्ही पाठपुरावा केली की, ही इमारत बेकायदेशीर, धोक्याची आहे. मात्र त्यास नगरविकास विभागाकडून स्टे दिला जातो. कोणी तरी अधिकारी यास जबाबदार आहे. असे असताना शासनाकडून गरिबांच्या झोपड्या का पाडल्या जातात, सामान्यांची एक गुंठ्याची घरे का पाडली जातात ? या घरांना देखील आपण हात लावता कामा नये. या संबंधी नगर विकास विभागाने तशा सूचना दिल्या पाहिजेत. आपण चुकीच्या गोष्टींना पांघरुण घालू नये. गरिबांनाही न्याय देण्याची भूमिका या विभागाने घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, कालच्या बजेटमध्ये माननीय वित्त मंत्री यांनी इंद्रायणी मेडीसिटीचे काम दिले आहे. हे काम चांगल्या एजन्सीकडून करावे. हे काम पीएमआरडीने केले तरी चालू शकते. एसआरए योजना पूर्वी केवळ पुणे-मुंबईमध्ये होती. आता या योजनेचा विस्तार सरकारने केला आहे. माझ्या मतदारसंघात लोणी काळभोर, उरळी-कांचन, कदम-वाघ वस्ती, थेऊर ही गावे मोठी आहेत. ही गावे पुण्याच्या शहरालगत आहेत. एसआरए योजना या ठिकाणी राबवावी. ग्रामीण भागात निश्चितपणे या योजनेचा उपयोग होईल. आज या भागातही जागेची टंचाई आहे. जागेचा भाव चौ.फू या प्रमाणे आहे. या गावांमध्ये झोपडपट्टया बऱ्याच आहेत. त्यांना टॉवर उभे करुन दिले तर त्याचा फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, पीएमआरडीए च्या वतीने कचऱ्याकरिता बॅटरी ऑपरेटर घंटा गाडी दिल्या तर चांगले काम होईल. माननीय वित्त मंत्री यांनी वाघोली पर्यंत मेट्रो सुरु करु, असे सांगितले आहे. परवा पुणे येथे माननीय पंतप्रधान आले होते. त्या सभेत ही चर्चा झाली. दादांना विनंती आहे की, ही मेट्रो वाघोली पर्यंत आली तर त्याचा फायदा होईल. वाघोलीत काही खाण कामगार आहेत. त्यांची राहण्याची व्यवस्था नाही. त्यांचा एसआरए योजनेत समावेश करावा.

अध्यक्ष महोदय, अनेक विषयांबाबत शासनाने भरीव काम केलेले आहे. माननीय अर्थ मंत्री यांनी बरीच मदत केली. त्यांनी २ कोटी रुपयांचा आमदार निधी ५ कोटी रुपयांपर्यत नेला आहे. विरोधी पक्षातील आमदारांना २ हजार कोटी रुपये जादा मिळणार आहे. केवळ २ कोटी रुपयांवरुन ३ कोटी रुपये, ४ कोटी व आज ५ कोटी दिले आहेत. पुढील २ वर्षात विरोधी पक्षाच्या आमदारांना २ हजार कोटी रुपये जास्त मिळणार आहेत. माननीय वित्त मंत्री यांनी कोणामध्येही भेद केला नाही. सर्वांना समान न्याय दिला, या बद्दल मनापासून मी त्यांचे अभिनंदन करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री.अमित साटम (अंधेरी –पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मांगण्यांवर गृह विभाग,नगर विकास व पर्यावरण या विभागांवर चर्चा करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वेळ कमी असल्याने थोडक्यात एक –एक मुद्दा प्रत्येक विभागावर मी मांडतो. गृह विभागावर मी बोलू इच्छितो. आज या विभागाची अवस्था काय आहे या बाबत आजच्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये बातमी आली आहे.

तालिका सभाध्यक्ष : वेळ कमी असल्याने थोडक्यात विषय मांडावा.

श्री. अमित साटम : अध्यक्ष महोदय, विषय मांडण्याकरिता पार्श्वभूमी सांगावी लागेल. दक्षिण मुंबईचे डीसीपी सौरभ त्रिपाठी फरार आहेत. अंगडियांकडून खंडणीच्या मागणीच्या केसमध्ये ते फरार आहेत.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.अमित साटम ...

वाझे जेलमध्ये गेला परंतु, पोलीस खात्यातील, गृह खात्यातील व या सरकारची वाझेगिरी काही अजूनपर्यंत संपलेली नाही. [***]

अध्यक्ष महोदय, [***] मुंबईच्या कायदा, सुव्यवस्था, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून... सन १९९२-१९९३ मध्ये, सन २००५ मध्ये, सन २००६ मध्ये बॉम्बस्फोट झाले, २००८ मध्ये हमला झाला. [***]. अध्यक्ष महोदय, आपण मला मागणी करण्यास सांगत होता, ही माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा नगरविकास खात्याच्या माध्यमातून मी आश्रय योजनेचा संदर्भ देऊ इच्छितो. आश्रय योजनेमध्ये सफाई खात्यातील जे कर्मचारी आहेत त्यांच्या म्युनिसिपल हाऊसिंग कॉलनी आहेत. त्यांचे डिमॉलिश करुन तेथे

असुधारित प्रत

*** आदेशानुसार विलोपित मजकूर.

श्री.अमित साटम ...

नव्या प्रकारचे रिडेव्हलपमेंट करण्याचा हा मुद्दा आहे. ज्या सफाई कर्मचाऱ्यांनी कोविडच्या काळात आपल्या स्वत:च्या व आपल्या कुटुंबाच्या जिवाची पर्वा न करता रस्त्यावर उतरुन काम केले, ज्यांच्या कामाच्या आधारावर आज मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त हे इकडेतिकडे जाऊन ज्या काही फुशारक्या मारतात, त्या सफाई कर्मचाऱ्यांना आता नोकरीवरुन काढून टाकण्यात येत आहे. त्यांना सस्पेंड करण्यात येत आहे. कारण सप्टेंबर, २०१९ मध्ये आश्रय योजनेचे टेंडर काढले. फेब्रुवारी, २०२० मध्ये ते टेंडर रद्द केले. कोविडच्या काळात जेव्हा वर्तमानपत्राचे वितरण बंद होते. वर्तमानपत्र बंद होते, आपण ई वर्तमानपत्र वाचत होतो त्यावेळेस वर्तमानपत्रात जाहिरात देऊन या निविदा मागविल्या व सिंगल बिडर येऊन देखील शायोना कार्पोरेशन नावाच्या एका कंपनीशी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री.वेलारासू जे मुंबई महानगरपालिकेमध्ये विरप्पन गँग चालवितात... विरप्पन गँग चालवितात ते श्री.वेलारासू व मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री.इक्बालसिंह चहल त्यांनी त्यांच्याशी संगनमत करुन या सिंगल बिडर असलेल्या कंपनीला हे काम दिले. आता त्या ठिकाणी आपली घरे खाली करा अन्यथा तुम्हाला कामावरुन काढून टाकू अशा प्रकारच्या केवळ धमक्याच दिल्या नाहीत तर त्यांना कामावरुन सस्पेंड केले.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील ४५ सफाई कामगारांना कामावरुन सस्पेंड केलेले आहे. या संपूर्ण आश्रय योजनेमध्ये १८०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. माननीय राज्यपाल यांच्याकडे तक्रार झालेली आहे. माननीय राज्यपाल यांनी ती तक्रार लोकायुक्तांकडे दिलेली आहे. त्याची अजूनपर्यंत सुनावणी झालेली नाही तरी देखील त्या ठिकाणी जबरदस्तीने त्यांना नोकरीवरुन काढून टाकण्याची धमकी देऊन, त्यांची घरे खाली करण्याचे काम सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, माझी आपल्या मार्फत या सरकारला व नगरविकास खात्याला विनंती आहे की, या कामावरुन सस्पेंड केलेल्या सफाई कर्मचाऱ्यांना

श्री.अमित साटम ...

ज्यांनी कोविडच्या काळात आपल्या या शहराला सुरक्षित ठेवले, साफसफाई केली त्यांना त्वरित कामावर घेण्यात यावे. अशा प्रकारची कोणतीही जोरजबरदस्ती न करता ही आश्रय योजना राबवू नये. लोकायुक्तांच्या ...

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : सन्माननीय सदस्य आपण आपल्या भाषणाचा समारोप करावा.

श्री.अमित साटम : अध्यक्ष महोदय, मी शेवटचा विषय मांडतो. अजून पर्यावरण विभागावरील बोलणे बाकी आहे. मुख्य मुद्दा तर पर्यावरणाचा आहे.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपल्याला बोलण्याकरिता दिलेला वेळ संपलेला आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)...

सन्माननीय सदस्य यांनी आपले भाषण एक मिनिटांमध्ये पूर्ण करावे.

श्री.अमित साटम : अध्यक्ष महोदय, Mumbai Climate Action Plan या उपक्रमाचे पर्यावरण विभाग आणि मुंबई महानगरपालिकेने मोठ्या थाटामध्ये रविवारी घोषित केला. यामध्ये पहिला मुद्दा waste management चा आहे. मुंबई शहरातील १० मेट्रीक टन कचरा रोज डम्पींग ग्राऊंड येथे जातो, त्यावर कोणतीही प्रक्रिया देण्यात येत नाही, त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.अबु आझमी यांनी त्यांच्या भाषणात सांगितले आहे. मुंबईवर शिवसेना पक्षाने २५ वर्षे राज्य करुन सुद्धा मुंबईच्या कचऱ्याची विल्हेवाट लावली नाही आणि Mumbai Climate Action Plan बाबत सांगत आहेत.

अध्यक्ष महोदय, मला माझे भाषण वेळे अभावी नाईलाजास्तव पूर्ण करावे लागत आहे. धन्यवाद !

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण आपले भाषण लेखी स्वरुपात पटलावर ठेवावे. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू व सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम यांनी त्यांच्या आसनावर बसावे.

असुधारित प्रत

श्री.लहु कानडे (श्रीरामपूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. मी गृह विभागृ नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी गृह विभागाच्या मागण्यांवर सुरुवातीला बोलणार आहे. गृह मंत्री महोदयांनी अनेक नवीन पोलीस स्टेशनला मान्यता दिली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माझ्या मतदारसंघामध्ये राहुरी तालुक्यातील देवळाली नगरपरिषद व ३२ गावांचा समावेश आहे. देवळाली प्रवरा, तालुका राहुरी येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याची दीर्घ कालावधीपासूनची मागणी आहे. ती अद्याप मंजूर झाली नाही, ती मान्य करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघातील काही गावे राहता तालुक्यातील पोलीस स्टेशनला जोडण्यात आलेली आहेत. सभागृहामध्ये यापूर्वी मी याप्रकरणी मागणी केली आहे व अनेक वेळा पत्र दिले आहे. लोणी पोलीस स्टेशनला जोडण्यात आलेली श्रीरामपूर तालुक्यातील गावे श्रीरामपूर पोलीस स्टेशनला जोडण्यात यावीत, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मी आता नगरविकास विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. माझ्या तालुक्यातील एक महत्त्वाची बाब निदर्शनास आणून देऊ इच्छित आहे. अहमदनगर जिल्हा आकाराने सर्वात मोठा जिल्हा आहे. या जिल्ह्यात अहमदनगर व श्रीरामपूर येथे टाऊन प्लॅनिंगची दोन कार्यालये आहेत. श्रीरामपूर येथील कार्यालये आर्बिट्रेशन व टी.पी.साठी निर्माण करण्यात आले आहे. आता तेथील काम जवळपास पूर्ण झाले आहे. नगरविकास विभागास आम्ही एक प्रस्ताव पाठविला आहे.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.लहु कानडे.....

तेथील सहाय्यक आयुक्त, नगर रचनाकार यांचे कार्यालय अहमदनगर जिल्ह्यातील उत्तर तालुक्यांचे स्वतंत्र कार्यालय म्हणून त्यास नगरविका विभागाने मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी आता गृहनिर्माण विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. श्रीरामपूर येथे म्हाडाने १४९८ सदनिका बांधलेल्या आहेत. परंतु त्या सदनिकांची किमत ही अन्य विकासकाने बांधलेल्या सदनिकापेक्षा जास्त असल्यामुळे त्या सदनिका मागील सहा-सात वर्षांपासून पडून आहेत. गरिबांना माफक दरामध्ये घरे मिळावीत म्हणून शासनाने सदर योजना आखली होती. सदर सदनिका आशाच पडून राहिल्या तर त्या खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोरोना काळामध्ये सदर सदनिकांच्या किंमती कमी करण्याबाबत म्हाडा संचालक बोर्डासमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाचा शासनाने विचार करुन तेथील सदनिकांचे किंमती कमी कराव्यात, अशी मी विनंती करतो. सदर सदनिकांच्या किंमती कमी केल्या तरच गरिबांच्या घराची योजना प्रत्यक्षात लोकांच्या उपयोगाची होऊ शकेल, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये प्रवरा, गोदावरी, मुळा अशा तीन नद्या वाहतात. या तिन्ही नद्यांमध्ये कारखान्याचे दूषित पाणी मिसळून नदीमधील अनेक मासे मृत पावलेले आहेत. सदर तिन्ही नद्यांच्या आजूबाजूंच्या गावामध्ये अंडर ग्राउंड वॉटरमधून केमिकल मिश्रित पाणी येत असल्यामुळे अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदर नद्यांच्या काठावर सिवरेज-ट्रिटमेंट प्लँट अशा प्रकारचे केमिकलचे कारखाने आहेत. त्यामुळे याकडे पर्यावरण विभागाने देखील लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या सर्व बाबींकडे नगरविकास व पर्यावरण विभागाने विशेष लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो आणि मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

श्री.अजय चौधरी (शिवडी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी प्रथम गृहनिर्माण विभागावर बोलणार आहे. मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या १८८ इमारतींच्या पुनर्विकासाचे कोणतेही धोरण अस्तित्त्वात नव्हते. परंतु माननीय गृहनिर्माण मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड, माननीय नगरविकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे व माननीय पर्यावरण मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांनी अतिशय मेहनत घेऊन सदर धोरण अमलात आणले आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, मुंबई ते शिवडी उन्नत मार्गाचे काम सुरु आहे. या मार्गाचा बहुतांश भाग माझ्या मतदारसंघातून जातो. त्यामुळे तेथील एक हजार लोक बाधित होत आहेत. बाधित झालेल्या लोकांचे पुनर्वसन त्याच भागामध्ये करणे आवश्यक आहे. त्यामुळे याबाबत माननीय नगरविकास मंत्री महोदयांनी विशेष लक्ष घालून सदर काम तातडीने करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, म्हाडा ले-आऊटमध्ये मुंबई महानरगपालिका नागरी सुविधा उपलब्ध करुन देईल, असा काही महिन्यांपूर्वी ठराव घेण्यात आला होता. तरी देखील मुंबई महानगरपालिका म्हाडा ले-आऊटमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन देऊ इच्छित नाही. माझ्या अभ्युदय नगरमध्ये तीन लाख लिटर पाण्याची टाकी बांधायची आहे. त्यासाठी मागील तीन वर्षांपासून प्रयत्न करीत आहे. परंतु महानगरपालिका म्हडाकडे बोट दाखवित आहे आणि म्हाडा महानगरपालिकेकडे बोट दाखवित आहे. त्यामुळे याबाबत ताडीने निर्णय घेऊन सदर कामास निधी उपलब्ध देण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये ५६ म्हाडा वसाहती आहेत. मुद्रांक शुल्कामुळे या ५६ म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाचे काम प्रलंबित आहे. मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर एक हजार मुद्रांक शुल्क आकारुन विकासाची परवानगी दिली जाते.

श्री.अजय चौधरी.....

त्याच पद्धतीने म्हाडा वसाहतींना देखील एक हाजार मुद्रांक शुल्क आकारुन पुनर्विकास करण्यास परवानगी द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये अभ्युदय नगर म्हाडा वसाहत आहे. या वसाहतीमध्ये ४८ इमारती आहेत. या इमारतींमध्ये ३ हजार ४२० भाडेकरु वास्तव्य करतात. त्यांच्या पुनर्विकासाचा प्रकल्प मागील २० वर्षांपासून रखडलेला आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. अजय चौधरी....

या लोकांनी स्वयं विकासाकरिता धोरण जाहीर केले. परंतु म्हाडाने परस्पर जाहीर करुन सांगितले की, म्हाडाकडून या इमारतींचा विकास केला जाईल. त्यामुळे आज लोक संभ्रमात आहेत. लोकांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता, चर्चा न करता हा निर्णय घेण्यात आला आहे. मी विचारु इच्छितो की, हा निर्णय संपूर्ण ५६ म्हाडा वसाहतींकरिता घेतलेला आहे का केवळ अभ्युदय नगर येथील वसाहतींकरिता घेण्यात आला आहे ? अभ्युदय नगर येथील लोकांना विश्वासात घेऊन म्हाडाने निर्णय घ्यावा. अशी मी यानिमित्ताने मागणी करतो. अभ्युदय नगर येथील आरोग्य केंद्र म्हाडाने बांधून ते मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात द्यावे, असे सन्माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार अर्थमंत्री असताना जाहीर झाले होते. परंतु त्याबाबतचा निर्णय अद्यापपर्यंत झालेला नाही. याचा निर्णय घेणे आवश्यक आहे. पानवाला चाळ इमारत मागील दहा वर्षापासून बंद आहे. माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत की, सदर इमारत म्हाडाने ताब्यात घ्यावी, तेथील लोकांना ट्रांझिट कॅम्प उपलब्ध करुन द्यावेत आणि ती इमारत म्हाडाने अधिकृत करुन तेथील लोकांना राहण्यास घरे द्यावीत. परंतु तो ही निर्णय अद्यापपर्यंत घेतला नाही.

अध्यक्ष महोदय, परळ येथील डीआयटी चाळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० वर्षे वास्तव्य केले होते. त्यांचे ऐतिहासिक स्मारक करण्याचा निर्णय गृहनिर्माण मंत्री महोदयांनी जाहीर केला आहे. परंतु अद्यापपर्यंत याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. मी यानिमित्ताने मागणी करतो की, तेथे असलेल्या सर्व इमारतींचा क्लस्टर डेव्हलपमेंट करावे आणि ऐतिहासिक स्मारक तेथे उभारावे.

अध्यक्ष महोदय, मी गृह विभागासंदर्भात एक मागणी करणार आहे. राज्य सरकारने निर्भया पथक नेमले आणि शक्ती कायदा संमत केला आहे. या कायद्याची अंमलबजावणी ज्या महिला पोलिसांच्या माध्यमातून केली जाणार आहे, त्यांची आज काय अवस्था आहे ? त्यांना आज १२-१२ तास डयुटी करावी लागत आहे. रस्त्यावर ड्युटी करीत असताना त्यांच्याकरिता कोठेही प्रसाधनगृहाची व्यवस्था

केलेली नसते. मी हा विषय सातत्याने मांडत आहे. मी ज्या ज्या वेळेस पोलीस स्टेशनला जातो तेव्हा हा विषय तेथील महिला पोलीस मला सांगत असतात. मी याद्वारे मागणी करतो की, या महिला पोलिसांकरिता प्रसाधनगृहाची व्यवस्था जेथे त्यांचा बंदोबस्त किंवा ड्युटी असते तेथे करावी. आता बायोटॉयलेट आलेले आहेत. तसेच पोलिस विभागाच्या वाहनांमध्ये व्हॅनिटी व्हॅनसारखी पर्यायी व्यवस्था करावी, अशी विनंती करतो.

धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री. रविंद्र चव्हाण (डोंबिवली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील गृह विभागाबाबत मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागावर कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र पोलिसांची तुलना स्कॉटलँड पोलिसांसोबत केली जाते. परंतु मला खेदाने सांगावे लागत आहे की, भारतीय जनता पक्षाच्या एका श्री. मनोज कटके या कार्यकर्त्यावर १७ दिवसांपूर्वी भ्याड हल्ला झाला होता. या हल्ल्याचा आजही तपास लागलेला नाही. मी माननीय वित्त मंत्री महोदयांना विनंती करतो की, गृह विभागाला पुरणवी मागण्यांद्वारे अनुदान देऊ नये. याचे कारण असे की, गृह विभागाकडून या प्रकरणाकडे लक्ष दिले जात नाही.

अध्यक्ष महोदय, या सभागृहाच्या प्रथा आणि परंपरा नष्ट झालेल्या आहेत. मागील पुरवणी मागण्यांची सर्व उत्तरे माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित पवार यांनी दिलेली आहेत. परंतु नगर विकास विभागाचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. या विभागाच्या मागण्यांचे एकही उत्तर आजतागायत देण्यात आलेले नाही. त्यामुळे मी मागील अधिवेशनामध्ये नगर विकास विभागासंदर्भात ज्या ज्या मागण्या केल्या होत्या, त्या प्रलंबित आहेत. मी नगर विकास मंत्री महोदयांना विनंती करतो की, मागील अधिवेशनातील माझे भाषण आज ग्राह्य धरावे आणि त्या मागण्यांची उत्तरे मला लेखी स्वरुपात कळवावी.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

डॉ. किरण लहामटे (अकोले) :अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आणि माझे मत मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्व प्रथम गृह विभागाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करु इच्छितो. घारगाव आणि अकोले येथील पोलीस स्टेशनची इमारत अतिशय खराबअवस्थेत आहेत. त्या इमारतींच्या नवीन बांधकामासाठी मंजुरी द्यावी. तसेच तेथे पोलीस वसाहत मंजूर करावी, अशी मी विनंती करतो. समशेरपूर आणि कोतूळ येथे पोलीस स्टेशनची इमारत व पोलीस वसाहत निर्माण करावी. राजूर पोलीस स्टेशन हे राज्यातील पाहिल्या पाच पोलीस स्टेशनमधील आहे. ते आदर्श पोलीस स्टेशन आहे. तेथे कमी प्रमाणात पोलीस कर्मचारी, अधिकारी आहेत. त्यामुळे मी विनंती करतो की, तेथे अधिक प्रमाणात पोलीस कर्मचारी, अधिकारी यांची पदे मंजूर करुन द्यावीत.

असुधारित प्रत

यानंतर श्री. चौधरी....

डॉ.किरण लहामटे.....

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये अकोले नगरपंचायत आहे. तेथील शाहुनगर भागात झोपडपट्टी वसलेली आहे. माझी या निमित्ताने विनंती आहे की, सदर झोपडपट्टी कायम करावी व तेथील जागा रहिवाशांच्या नावावर करावी. तसेच तेथे जागा अपुरी पडत असल्यामुळे गृहनिर्माण विभागाने एखादी योजना तयार करुन तेथील लोकांना दोन-तीन मजल्यांची घरे बांधून द्यावीत.

अध्यक्ष महोदय, माझा पुढील मुद्दा पर्यावरण व वातावरणीय बदल आणि नगरविकास विभागाशी संबंधित आहे. माझ्या मतदारसंघातून जाणाऱ्या प्रवरा नदीमध्ये गटारीचे पाणी मिसळून ती प्रदुषित झाली आहे. त्यामुळे नगरपंचायतीमध्ये एस.टी.पी. प्लांट बसविण्यासाठी निधी मंजूर करावा, ही माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

श्री.दिलीप लांडे (चांदिवली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील साकीनाका पोलीस स्टेशन अतिशय धोकादायक स्थितीमध्ये आहे. आपले संरक्षण करणाऱ्या पोलिसांचाच जीव धोक्यात आहे. त्यामुळे सदर इमारतीची माननीय गृह मंत्र्यांनी पाहणी करुन सदर पोलीस स्टेशनसाठी तातडीने नवीन इमारत मंजूर करावी, ही विनंती. या पोलीस स्टेशनच्या शेजारीच म्हाडाच्या जागेवर पोलीस वसाहत असून ती देखील अतिशय धोकादायक स्थितीमध्ये आहे. या वसाहतीतील काही इमारती मोकळया केल्या आहेत. परंतु उर्वरित इमारतींमध्ये राहणारे पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांवर टांगती तलवार आहे. तेथे कधीही जीवितहानी होऊन शासनाला त्या लोकांची प्रेते उलण्याची वेळ येऊ शकते, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे याबाबत देखील योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

अध्यक्ष महोदय, घाटकोपर आणि साकीनाका या पोलीस स्टेशन हद्दींमध्ये मोठया प्रमाणात अंमली पदार्थांची विक्री केली जाते. त्यामुळे तरुण पिढी बरबाद होत आहे.

अध्यक्ष महोदय, पवई येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे काही दलित समाजाच्या कार्यकर्त्यांवर राजकीय दृष्टीकोनातून काही केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. सदर केसेस मागे घेण्यात याव्यात, ही माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, विनोबा भावे पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी देखील पुरेशी जागा नाही. या पोलीस स्टेशनच्या शेजारीच महानगरपालिकेची रिझर्व्ह जागा आहे. सदर जागा ताब्यात घेऊन तेथे पोलिसांची व्यवस्था करावी, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कोहिनूर हॉस्पिटलच्या शेजारी ६५० खाटांचे हॉस्पिटल अर्धवट पडून आहे. ते शासनाने ताब्यात घ्यावे, ही विनंती आहे...(अडथळा...)

श्री.दिलीप लांडे.....

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये माननीय उप मुख्यमंत्री, आमच्या जिल्हयाचे माननीय पालकमंत्री व माननीय नगरविकास मंत्री देखील उपस्थित आहेत. सभागृहामध्ये शेवटचे भाषण करण्याची वेळ माझ्यावर आलेली आहे. पुढील अधिवेशनावेळी भाषण करण्यासाठी मी असेन किंवा नसेन अशी परिस्थिती आहे. कारण एमएमआरडीए ने ज्या लोकांसाठी घरे बांधलेली आहेत त्या लोकांना अद्याप घरांचा ताबा देण्यात आलेला नाही. ते लोक पावसाळयात वाहून जातील. परंतु ते लोक वाहून जाण्यापूर्वी मी स्वत: वाहून जाणार आहे, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. त्यामुळे शासनाने माझ्या अंत्यविधीसाठी या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी, अशी माझी मागणी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे. गृह विभाग, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभागावर मी बोलणार आहे.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभागाने ५०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांना कर माफ केला आहे. त्याच धर्तीवर मुंबईतील कोळीवाडे व गावठाणामध्ये राहणाऱ्या लोकांचा ॲसेसमेंट कर माफ करावा अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्रीमती मनिषा चौधरी....

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये झोपडपट्टीत आणि गावठाणात राहणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाण्याचे ग्रुप कनेक्शन हवे असेल तर त्यांना १९६२ पूर्वीचा पुरावा मागतात. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करु इच्छिते की, गावठाण आणि कोळीवाड्यात राहणाऱ्या लोकांना सन २०११ चा पुरावा ग्राह्य धरुन त्यांना पाण्याचे कनेक्शन देण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघात आता खासकरुन दहिसर नदीचे काम सुरू आहे. या प्रकल्पाचे काम सन २०१६ पासून सुरू आहे. या प्रकल्पाच्या डीपीआरमध्ये समाविष्ट असलेला एस.टी.पी. प्लॅन्ट अद्याप उभारलेला नाही. त्या एस.टी.पी. प्लॅन्टचे लवकरात लवकर टेंडर काढून तो प्रकल्प सुरू करण्यात यावा. आज आपण ३५० कोटी रुपये खर्च करुन दहिसर नदीचे पुनर्वसन आपण करीत आहोत. पण मिरा रोडची जी बाऊंडरी आहे... या ठिकाणी माननीय पर्यावरण मंत्री आणि पालकमंत्री उपस्थित आहेत. मिरा रोडचे सांडपाणी कोणताही एस.टी.पी. प्लॅन्ट न करता थेट आमच्या दहिसर नदीमध्ये येते. याबाबत आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेला एस.टी.पी. प्लॅन्ट उभारुन नंतर ते सांडपाणी या नदीमध्ये सोडावे, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी माननीय नगरविकास मंत्री उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करते की, या दहिसर नदीचे पुनर्वसन करीत असताना माझ्या भागात ७० टक्के काम झाले आहे आणि ३० टक्के काम जे साईनाथ नगर आणि शांतीनगर येथील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करुन करायचे आहे. माझ्या मतदार संघामध्ये स.नं. ३१९ आणि स.नं.३७४ या आरक्षित भूखंडावर पुनर्वसन करण्यासाठी एमएमआरडीएचे टेंडर निघाले होते. परंतु आपण त्याला स्थगिती दिली होती. एमएमआरडीए तेथे ४ हजार पी.ए.पी.ची घरे बनविणार असून त्यापैकी ५० टक्के मुंबई महापालिकेला देणार आहे. त्यामुळे एमएमआरडीएचे ते टेंडर तातडीने काढावे.

श्री. संजय जगताप (पुरंदर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या पुरंदर विधानसभा मतदार संघामध्ये गृह विभागाशी संबंधित विषयावर मी बोलणार आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीचे जे पोलीस ठाणे आहे त्याचे अपग्रेडशन करावे, अशी मागणी मी आदरणीय गृहमंत्री महोदयांना करीत आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे महानगरपालिकेमध्ये जी ३३ गावे नव्याने समाविष्ट झाली आहेत त्यापैकी १५ गावे ही माझ्या मतदार संघातील आहेत. त्या भागामध्ये कोंढवा, उंद्री, पिसोळ या भागामध्ये नवीन पोलीस ठाणे व्हावे, अशी मागणी मी गृह विभागाला करीत आहे. तसेच ग्राम सुरक्षा यंत्रणा ही अतिशय प्रभावी योजना असून मागील दीड वर्षाच्या कालावधीत त्या यंत्रणेच्या माध्यमातून अनेक चोऱ्या किंवा अनेक आकस्मिक घटनांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना त्याची मदत झाली आहे. यामुळे बरेच गुन्हे उघडकीस होण्यास मदत झाली आहे. गृह विभागाच्या माध्यमातून या ग्राम सुरक्षा यंत्रणेचे दरवर्षी नूतनीकरण झाले पाहिजे. जेणेकरुन त्याचा ग्रामीण आणि शहरी भागामध्ये कार्यक्षमतेने वापर होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, नगरविकास विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मला नगरविकास मंत्री महोदयांना मागणी करावीशी वाटते की, जेजुरी आणि सासवड या दोन्ही नगरपालिका माझ्या मतदार संघामध्ये येतात. त्या दोन्ही ठिकाणी 'क' आणि 'ड' वर्गातील कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा बॅकलॉग मोठ्या प्रमाणात आहे. मला असे समजले की, नोकर भरतीच्या बाबतीत 'स्टे' असल्यामुळे कोणत्याही प्रकारची नोकर भरती होत नाही. आज जेजुरीसारख्या नगरपालिकेमध्ये मुख्याधिकारी यांच्यासह केवळ ८ कर्मचारी कायम स्वरुपी आहेत. आता तर तेथे मुख्याधिकारी सुध्दा नाहीत. अशा परिस्थितीत एखादी स्थानिक स्वराज्य संस्था चालविणे खूप अवघड आहे. म्हणून त्या बाबतीत एखादा निर्णय लवकरात लवकर नगरविकास विभागाकडून घेतला जावा. तसेच पुणे शहरामध्ये सन २०१८ आणि सन २०२१ मध्ये ज्या नवीन गावांचा समावेश झाला आहे त्या गावांना मोठ्या प्रमाणात अर्बन एरियाचा टॅक्स

श्री. संजय जगताप...

लागला आहे. त्या टॅक्समध्ये खूप मोठ्या प्रमाणात तफावत आहे. एका बाजूला हा टॅक्स लावत असताना दुसऱ्या बाजूला तेथील सर्वसामान्य नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा दिलेल्या नाहीत. रस्ते किंवा पाणी या मूलभूत सुविधा त्यांना उपलब्ध झालेल्या नाहीत. ३ महिन्यांपूर्वी आदरणीय नगरविकास मंत्र्यांसमवेत व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठक झाली होती आणि नगरविकास मंत्री महोदयांनी पुणे महानगरपालिकेला स्पष्टपणे निर्देश दिले होते की, हे टॅक्स कमी करावे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. संजय जगताप....

...(अडथळा)... फुरसुंगी परिसरामध्ये पुण्याचे डंपिंग यार्ड झालेले आहे. तेथील जवळपास १.५ लाख लोकसंख्येकडे आरोग्याच्या बाबतीत कोणीही लक्ष देत नाही. पर्यावरण आणि वातावणीय बदल असे केवळ म्हटले जाते. परंतु त्याची पायमल्ली केली जाते. तिथे नवीन कचऱ्याच्या प्रक्रिया प्रकल्पांना परवानगी दिली जाते. त्यासाठी त्वरीत एखादी समिती नेमून तेथील वातावरण बदल आणि दूषित पाण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात यावा, अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री. हिरामण खोसकर (इगतपुरी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. सुरुवातीला मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे अभिनंदन करतो आणि आभार मानतो. त्यांनी त्र्यंबकेश्वर निवृत्तीनाथाच्या मंदिराला अर्थसंकल्पात तरतूद केली आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागाच्या बाबतीत बोलताना मी सांगू इच्छितो की, त्र्यंबकेश्वर किंवा इगतपूरी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. परंतु तिथे सोयी-सुविधा नसल्यामुळे वारकऱ्यांची कुचंबना होत आहे. त्यामुळे माननीय नगर विकास मंत्र्यांना माझी विनंती आहे की, येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये त्र्यंबकेश्वर नगरीला जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा. गोदावरी ही नदी त्र्यंबकेश्वरमधून जाते. तसेच तिथे गौतमी गोदावरी नावाचे मोठे धरण आहे. त्या माध्यमातून आजुबाजुच्या गावांना पिण्याचे पाणी मिळते. परंतु हे पाणी दूषित होते. माननीय पर्यावरण मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. या दूषित पाण्याच्या बाबतीत त्यांनी उपायोजना करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, इगतपूरी शहरामध्ये जंक्शन स्टेशन आहे....

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण): सन्माननीय सदस्य श्री. हिरामण खोसकर आपण आपले भाषण लवकर संपवावे. कारण यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर घेण्यात येईल.

श्री. हिरामण खोसकर : माझ्या मतदारसंघामध्ये आरचूर आणि इगतपूरी पोलीस स्टेशन निर्लेखित झालेले आहेत. गेल्या दोन वर्षापासून मी वारंवार याचा पाठपुरावा करीत आहे. माननीय गृह मंत्र्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी या दोन्ही पोलीस स्टेशनला निधी उपलब्ध करुन द्यावा. तसेच पर्यावरणाच्या बाबतीत बोलताना मी सांगू इच्छितो की, इगतपूरी येथे मोठ्या घानीचे प्रदूषण होत आहे. प्लास्टिक किंवा घान कचरा याचे प्रदूषण थांबण्यासाठी तिथे भूमिगत गटारी झाल्या तर नगर विकास आणि पर्यावरण विभागाच्या माध्यमातून तेथील लोकांना चांगल्या

श्री. हिरामण खोसकर....

प्रकारच्या सोयी-सुविधा मिळतील. अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि भाषण संपवितो. धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील (गृह(शहरे) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पिय पुरवणी मागण्या मंजूर करीत असताना सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार पासून सन्माननीय सदस्य श्री. संजय जगताप पर्यंत अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी काही विषय मांडले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी बँक फ्रॉडच्या संदर्भात सीबीआयला केसेस देण्यासंदर्भातील प्रस्ताव प्रलंबित असल्याची माहिती दिली. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, काही प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे. माननीय गृह मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण राहिलेल्या प्रस्तावांना देखील मान्यता देण्याची भूमिका आपण घेत आहोत. अँटिलियासारखे एनआयएकडे गेल्यानंतर त्याचे काहीच होऊ नये, एवढीच अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर यांनी अनेक प्रश्न मांडलेले आहेत. पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासंदर्भात सन २०२० सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. महाराष्ट्र शासन हे देशातील पहिल्या पाच मधील राज्य आहे की, त्यांनी हा निर्णय घेतलेला आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय देत असताना सीबीआय, एनआयए आणि एनसीबी या ठिकाणी देखील सीसीटीव्ही बसवावेत असा सुतोवाच केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर यांनी उच्च न्यायालयाचे म्हणणे वाचून दाखवले. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय हे काय म्हणाले हे वाचून दाखवणे मला गरजेचे आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील....

मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशात असे नमूद केले आहे की, "It is setting an impression that the center is dragging its feet in the matter. This concerns the right of citizens and we are not accepting the excuses." सर्वोच्च न्यायालयाने देखील सीबीआय व एनसीबीने सीसीटीव्ही का कार्यरत केले नाहीत हा प्रश्न केला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अशोक पवार यांना सांगू इच्छितो की, शिरुर डीवायएसपी कार्यालयाचे काम सुरु आहे. डीपीडीसी कार्यालयाकरिता ६० टक्के निधी दिला आहे. उरळी कांचन येथे पदे निर्मिती करुन नवीन पोलीस स्टेशन कार्यान्वित करण्यात आले आहे. अनेक मतदारसंघात पोलीस स्टेशनचे नुतनीकरण करण्याची तसेच नवीन पोली सस्टेशनची मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. त्याचा आराखडा चांगल्या प्रकारे करण्याची भूमिका गृह विभागाची आहे. 'आझादी का अमृत महोत्सव' या मधून ७५ नवीन पोलीस स्टेशन तयार करण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी फोर्स १ बाबत सांगितले आहे. जोगेश्वरीमधील काही भागात आदिवासी पाडे आहेत. आदिवासी विकास विभागाकडून सेन्सस करणे व त्या लोकांचे स्थलांतर करुन त्यांचे पुनर्वसन करणे हे काम सध्या सुरु आहे. या करिता योग्य ती कार्यवाही निश्चितपणे केली जाईल. डीजीपी संबंधी मघाशी सांगितले की, उच्च न्यायालयात ॲक्टींग डीजीपी.. मला वाटते पश्चिम बंगालमध्ये श्री. मालवीय यांना ॲक्टींग डीजीपी नेमले आहेत. ते कोणाचे नातू आहेत ते मी सांगणार नाही. एखाद्या उच्च अधिकाऱ्याबाबत सदनात बोलणे योग्य होणार नाही. [***] आपण विधानमंडळाचे सदस्य असताना कोणतेही पुरावे नसताना एखाद्या अधिकाऱ्यावर आरोप करुन त्याला आरोपीच्या कोठडीत ठेवणे योग्य होणार नाही, असे माझे वैयक्तिक मत आहे. हे रेकॉर्डवर येणे संयुक्तिक होणार नाही.
श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील....

[***] सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी एखाद्या ज्येष्ठ अधिकाऱ्याबद्दल बोलणे संयुक्तिक नाही. (अडथळा)

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम सावंत, राहुल पाटील यांनी त्यांच्या मतदारसंघातील पोलीस स्टेशन, घर बांधणीचे विषय मांडले. राज्य शासनाने पोलिसांच्या घा बांधणीकरिता ५-५० घरे कशी उपलब्ध करुन देता येतील, या करिता ॲक्शन प्लान तयार केला असून त्याची अंमलबजावणी भविष्यात केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की, डोंबिवलीमध्ये काही घटना घडली आहे....

श्री. रविंद्र चव्हाण (बसून) : अध्यक्ष महोदय, १५ दिवस झाले, उपोषण झाले, पोलीस स्टेशनच्या..... हद्दीमध्ये जाण्याकरिता देखील मज्जाव घालण्यात आला. आरोपी सापडत नाही. वारंवार मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, या संबंधी सन्माननीय सदस्यांच्या मागणीप्रमाणे त्वरित तपास करण्याच्या सूचना देण्यात येतील. पदभरती बाबत मी उत्तर दिलेले आहे. राहिलेल्या सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना लेखी उत्तरे देण्यात येतील, अशी मी ग्वाही देतो.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ या वर्षाकरिता गृह विभागाशी संबंधित मागणी क्र. बी १, बी ३, ३०५५ , ००१६ व ००२५, ब ४, २०५२ व २०७५,सर्वसाधारण सेवा बी ५,बी ६, बी ९, बी १०, ४०५५ पोलीस या वरील भांडवली खर्च व ४०७० इतर प्रशासनिक सेवा भांडवली खर्च व बी ११ अंतर्गत २७ हजार १११ कोटी ५९ लाख ६८ हजार इतक्या खर्चाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांना मंजुरी देण्याची मी आपल्या मार्फत सदनास विनंती करीत आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) : दोन्ही बाजूचे जे चुकीचे असेल ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

**** आदेशानुसार विलोपित मजकूर

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण खात्याच्या अनुदानाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य सर्वश्री रविंद्र वायकर, झ ीशान सिद्दिकी, काल ीदास कोळंबकर, हेमंत पाटील, लहू कानडे, अजय चौधरी, अतुल बेनके, गणेश नाईक, रमेश कोरगावकर यांनी भाषण केले.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गणेश नाईक यांना मी सांगू इच्छितो की, एसआरएची योजना एमएमआरला लावलेली आहे. अर्थातच नवी मुंबई त्यामध्ये येते. त्यामुळे तेथे योजना लावली जाईल. तसेच, पनवेलबाबत आपण बोलला आहात. पनवेल देखील एमएमआरमध्ये येते. त्यामुळे सर्व झोपडपट्टयांना मालक घोषित करुन त्यांना झोपड्या ....

श्री.गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, माझे असे म्हणणे आहे की, या गोष्टी शासनामार्फत व्हाव्यात.

डॉ.जितेंद्र आव्हाड : होय शासनामार्फतच होणार. सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांनी म्हाडाला जुन्या इमारतीसाठी २५० कोटी रुपये द्यावेत अशी मागणी ... (अडथळा)...

काही सन्माननीय सदस्य : मंत्री महोदय, जे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत त्यांच्या प्रश्नांची उत्तरे आपण देऊ नका.

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, वित्त विभागाने उपकराच्या रक्कमेत वाढ करुन निधी उपलब्ध करुन द्यावा असे आम्ही कळविलेले आहे. त्या बाबत तपासून कारवाई करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांनी काही मुद्दे मांडले. डी.पी. रोड वरील झोपडपट्टी विकास एसआरए व बीएमसीच्या माध्यमातून करण्याबाबत, एसआरएमध्ये असलेल्या.... डी.पी. रोड वरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन एसआरए मार्फत करण्यात येते. डी.पी रोड बांधून बीएमसीला हस्तांतरित करण्यात येतो. रखडलेल्या पुनर्वसन प्राधिकरणामध्ये ओपन टेंडर JV

with MHADA free hold land व Amnesty scheme जी आपली सर्वात महत्वाकांक्षी स्कीम आहे, असे प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहेत.

डॉ.जितेंद्र आव्हाड ...

अध्यक्ष महोदय, ओमकार बिल्डर्स याबाबत मी काय बोलावे. ओमकार बिल्डर्स हे सध्या आतमध्ये आहेत. ते आर्थिक डबघाईला गेलेले आहेत. त्यामुळे मी त्यावर काही बोलत नाही. सन्माननीय सदस्य श्री.झीशान सिद्दीकी यांना मी सांगू इच्छितो, मंत्रिमंडळ उप समितीमध्ये १० वर्षांचा निर्णय होता तो अडीच वर्षे करण्यात आला आहे. झोपडी तोडल्यापासून अडीच वर्षात त्याला ती झोपडी विकता येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी यांनी जे सांगितले त्यामध्ये मला एक महत्वाची गोष्ट सांगावयाची आहे ती म्हणजे ....(अडथळा)... देतो तुम्हाला. बीडीडी चाळ तुमचीच आहे. सन्माननीय सदस्य श्री.कालीदास कोळंबकर यांनी एमबीआरआरबी संदर्भात चर्चा केली. मुंबई शहरामध्ये १९ हजार जुन्या इमारती आहेत. त्याला मालक आहेत. त्यामध्ये राहणाऱ्यांना विकास हवा आहे. मालकांना कसेही करुन त्या इमारती पडायला हव्या आहेत, अशी त्यांची मानसिकता आहे. त्यावर एक आमदार समिती नेमली गेली. त्या आमदार समितीमध्ये.... एकमताने या सभागृहाने ठराव केला.

अध्यक्ष महोदय, [***] ..(अडथळा)...

*** शब्द मागे घेण्यात आले (विलोपित मजकूर).

नंतर श्री.शिंदे ...

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तराला माझी हरकत आहे व त्यांना विनंती आहे. [****] सदरहू वक्तव्याचा भाग वगळण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. आपल्या इतर वक्तव्यास माझी हरकत नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, ठीक आहे. तो भाग वगळण्यात यावा. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार आपण केंद्रीय गृह मंत्री महोदय यांच्या दिल्लीच्या वर्तुळातील खूप निकटवर्ती आहात. या कायद्यास मान्यता मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे. हा मुंबईच्या संदर्भातील जुना कायदा असून यामधील सुरधारणेमुळे १९ हजार इमारतींचा फायदा होणार आहे, त्यांच्या पुनर्विकासास गती मिळणार आहे व त्या लोकांचे आशीर्वाद सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना लाभतील. त्यामुळे त्यांनी याप्रकरणी लक्ष घालावे व हा तिढा कायमचा सोडवावा.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी यांनी अभ्युदय नगर येथील ले-आऊटचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी ले-आऊटच्या बाजूने आहे. कारण सन १९५०-६० या कालावधीत ले-आऊट तयार करण्यात आले होते. त्यावेळी स्ट्रॉमवॉटर ड्रेन, सिव्हरेज, गार्डन, प्ले ग्राऊंड, पार्कींग या सुविधांचे नियोजन तत्कालीन वसाहतीला पुरतील या दृष्टीकोनातून केले होते. आता नवीन इमारती उभारताना एक एक इमारत उभारत गेल्यास रस्त्याची रुंदी, नाल्यांचा आकार, सिव्हरेज यामध्ये वाढ करता येणार नाही. आपण केवळ सिमेंट काँक्रीटची जंगले तयार करावी, यास माझा गृहनिर्माण मंत्री या नात्याने विरोध आहोत. या विषयाच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्री यांचेशी चर्चा केली आहे. या ५६ ले-आऊटकरिता १ हजार रुपये स्टॅम्प ड्युटी ज्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या कोणत्याही विकास कामांना द्यावी लागते त्याप्रमाणे आकारण्यात यावी. सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी यांनी माझे शब्द लिहून ठेवावेत की, ज्या दिवशी आपण हा निर्णय जाहीर कराल

**** विलोपित मजकूर (शब्द मागे घेण्यात आले.)

श्री.जितेंद्र आव्हाड...

त्यानंतरच्या ५६ दिवसांमध्ये ५६ ले-आऊट कामाला लागतील. ही जबाबदारी मी सन्माननीय सदस्य सर्वश्री.अजय चौधरी, सुनिल प्रभू, व मुंबईतील इतर सर्व सन्माननीय सदस्य यांनी मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुन यासंदर्भात निर्णय दिल्यानंतर मी कामाला लागेन.

अध्यक्ष महोदय, एसव्हीपी किंवा इतर कोणतेही नगर असो, या पुढे सिंगल इमारतीला म्हाडा परवानगी देणार नाही. कारण भविष्यातील धोका फार गंभीर आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी यांनी अभ्युदय नगर येथील आरोग्य केंद्राच्या संदर्भात माझी भेट घ्यावी, त्यावेळी १५ मिनिटांत निर्णय घेऊन विषय संपवू.

अध्यक्ष महोदय, पानवाल्यांचा पुनर्विकासाचा एक मुद्दा आहे. तो ही आपण बसून संपवू या... (अडथळा)... मी सन्माननीय सदस्य यांना सांगू इच्छितो की, ते हमीपत्र नसून प्रत्येकाच्या घरात आमच्या विभागाचे ॲग्रीमेंट जातात. ते ॲग्रीमेंट आम्ही त्यांना पर्यायी घर देण्याच्या संदर्भातील आहेत. ते घर सोडण्यापूर्वी त्यांचेशी करारनामा करणार, त्यामध्ये पर्यायी घर देण्यात येईल, याची कबुली देण्यात येईल. त्यासर्व २,२०० पोलीस कर्मचारी व चाळीतील मूळ रहिवाशी यांचेशी ॲग्रीमेंट करुन ट्रन्झीट कॅम्प येथे स्थलांतरीत करण्यात येईल. ज्या दिवशी त्यांच्या इमारती पूर्ण उभारण्यात येतील त्यावेळी त्या सर्वांना तेथे स्थलांतरीत करण्यात येईल. त्यामुळे यासंदर्भात कोणतीही शंका नसावी. सदरहू ॲग्रीमेंटमध्ये त्यांची व आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी असते.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने गृहनिर्माण विभागाकरिता सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी मागणी क्रमांक क्यू-१ ते क्यू-६ अंतर्गत प्रस्तावित कार्यक्रमांसाठी रुपये ९,१७६ कोटी रुपये व अनिवार्य खर्चासाठी

श्री.जितेंद्र आव्हाड...

१६३ कोटी ६८ लाख ६१ हजार रुपये अशा एकूण ९,३३९ कोटी ६८ लाख ६१ हजार रुपये इतक्या रकमेच्या अंतरसंकल्पीय मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करीत आहे. मी सभागृहाला आपल्यामार्फत विनंती करतो की, सदर मागण्यांना मंजुरी द्यावी.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने राज्य उत्पादन शुल्क विभागाकरिता सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी मागणी क्रमांक बी-२ अंतर्गत एकूण २१३ कोटी, २८ लक्ष ८२ हजार रुपये इतक्या रकमेची मागणी सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करीत आहे. मी सभागृहाला आपल्यामार्फत विनंती करतो की, सदर मागण्यांना मंजुरी द्यावी.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.एकनाथ शिंदे (नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील नगरविकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. उक्त चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री रविंद्र वायकर, अतुल भातखळकर, रोहित पवार, झीशान सिद्दिकी, गणेश नाईक, रमेश बोरगावकर, अबु आजमी, विक्रमसिंह सावंत, राहुल पाटील, अशोक पवार, अमित साटम, लहु कानडे, अजय चौधरी, रविंद्र चव्हाण, दिलीप लांडे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री संजय जगताप व हिरामण खोसकर वरील सर्व सन्माननीय सदस्यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी बेस्टचा मुद्दा मांडलेला आहे. उक्त कामासाठी केंद्र सरकारने देखील निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच जीसीसीच्या माध्यमातून..... तसेच सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांनी देखील काही मुद्दे मांडलेले आहेत. तसेच श्री.अजय चौधरी यांनी शिवडी मतदारसंघामधील पुनर्विकासाच्या कामामध्ये विस्थापितांचे पुनर्वसन तेथेच करावे, अशी विनंती केली आहे. उक्त प्रकरणी कारवाई करण्याचे महानगरपालिका आयुक्तांना सुचना दिल्या जातील. सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांनी गावठाण मधील ५०० चौरस फुटांच्या घरांचा मालमत्ता कर माफ करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. गावठाण आणि कोळीवाड्यामधील ५०० चौरस फुटांच्या घरांना मालमत्ता कर माफीचा निर्णय लागू केलेला आहे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मुंबई व ठाणे येथे गावठाण आणि कोळीवाडे यांची घरे आहेत, हे आपणास देखील माहिती आहे. परंतु ती जुनी घरे आहेत. गावठाण व कोळीवाडा येथील घरांचे क्षेत्र ५०० पेक्षा जास्त झाले तर त्यांना मालमत्ता कर भरावा लागेल. सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांचा मुद्दा असा आहे की, शासनाने सिमांकन केलेल्या कोळीवाड्यामधील घरे मोठी आहेत. त्यामुळे या घरांचे मालमत्ता कर माफ करण्याबाबत विचार करावा. आवश्यक असेल तर याबाबत समिती घटित करावी, अशी त्यांची मागणी होती.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेने ५०० चौरस फुटापर्यंतचा मालमत्ता कर माफ केलेला आहे. कोळीवाडे आहेत किंवा भूमिपुत्र आहेत म्हणून याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल. यासंदर्भात मी महानगरपालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करुन समिती घटित करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राहुल पाटील यांनी समांतर पाणी पुरवठ्यासंदर्भात प्रश्न विचारलेले आहेत. सिवरेज सिस्टिमबाबत नगरविकास विभागाकडे मागणी केलेली आहे. परभणी महानगरपालिकेमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मुद्द उपस्थित करण्यात आलेला आहे. याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल. नाट्यगृहाचे काम पूर्ण करण्यासंदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. सदर कामास निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी व्यवस्था केली जाईल. ि

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांनी देखील काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. परंतु मी त्यांच्या सर्व सुचनांची नोंद घेतलेली आहे व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.कालिदास कोळंबकर यांनी सफाई कामगारांचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. गिरणी चाळीच्या पुनर्विकासामध्ये काही अडचणी आहेत. त्या सर्व अडचणी दूर करुन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. आपण सफाई कर्मचाऱ्यांचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. जवळपास २९ हजार सफाई कामगार आहेत. सेवा निवास्थानाचे काम टप्प्या-टप्प्याने सुरु केलेले आहे. २९ हजार कर्मचाऱ्यांसाठी फक्त ५ हजार घरे उपलब्ध आहेत. त्यामुळे १२ हजार घरांच्या कामाचा टप्पा सुरु केलेला आहे. उक्त कामाचे कार्यारंभ आदेश देखील देण्यात आलेले आहेत.

(सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. एकनाथ शिंदे .....

सन्माननीय सदस्य श्री. कालिदास कोळंबकर यांना सांगू इच्छितो की, सुरुवातीला सेवा निवासस्थानांचे काम पूर्ण करावे लागेल. कारण अनेकदा कर्मचाऱ्यांचे नातेवाईक, पत्नी, भाऊ, पुतण्या, मुलगा हे कामाला लागत असतात. तो कर्मचारी ज्याचे नाव सांगेल किंवा त्याची जबाबदारी जो कोणी घेईल त्याला नोकरी देण्याची तरतूद आहे. त्यामुळे तो कर्मचारी घरापासून वंचित राहणार नाही. मी सांगू इच्छितो की, शासनाने सर्विस क्वार्टरचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये १२ हजार घरे बांधण्यात येणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गणेश नाईक यांनीही काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांनी सिडकोमधील स्मशानभुमीचा विषय उपस्थित केला आहे.

श्री. गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, माझा मुद्दा असा होता की, अपात्र कंत्राटदाराला स्मशानभुमीचे काम देण्यात आले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे तक्रार केली आहे. नगर अभियंता यांनी परस्पर या गोष्टी केल्या आहेत. त्याची चौकशी करुन ते कंत्राट रद्द केले पाहिजे.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि कंत्राटदार अपात्र असेल तर त्या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द होईल. (...अडथळा....) प्रकल्पग्रस्तांची घरे रेग्युलराईज करण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे. ३० टक्के आणि ६० टक्क्यांचाही विषय उपस्थित करण्यात आला आहे. सिडकोच्या २०० मीटरपर्यंत रेडीरेकनरच्या राखीव दराच्या ३० टक्के आणि ५०० स्क्वेअर मीटरपर्यंत ६० टक्के आहे.

श्री. गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, पिढी वाढल्यामुळे लोकांनी त्यांची घरे वाढविली आहेत. ज्यांचे घरे २०० स्क्वेअर मीटर, २५०, ५०० स्क्वेअर मीटर होते त्यांनी घरे बांधलेली आहेत. ज्यावेळेस सर्वांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे तेव्हा रिझर्व्ह प्राईसच्या ३० टक्के, ६० टक्के असा फरक करणे योग्य होणार नाही. सर्वांना समान दर आकारावे लागतील.तसेच व्यावसायिक बाबीसंदर्भातही स्पष्टता नाही. गावठाणातील घरे व दुकाने याबाबत स्पष्टता नाही. मी मांडलेल्या सर्व मुद्यांबाबत एक

श्री. गणेश नाईक ....

पत्र आपणाकडे देईन. त्या पत्राच्या अनुषंगाने नगर विकास विभागाचे सचिव, जिल्हाधिकारी, ठाणे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे ते पाठवावे. लोकांमध्ये आज गैरसमज आहेत. शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयात स्पष्टता नाही. लोकांमध्ये ही स्पष्टता आली पाहिजे. याकरिता मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आपण मला लेखी स्वरुपात दिली तर मी ती जनतेसमोर प्रदर्शित करीन.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते योग्य आहे. मागील अनेक वर्षापासून गावठाणामध्ये घरे बांधलेली आहेत. कालांतराने कुटुंब वाढल्यामुळे तेथील घरे वाढत गेली आहेत. याबाबत विभागाने निर्णय घेतला आहे. तेथील लोकांच्या डोक्यावरील टांगती तलवार दूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन्माननीय सदस्य श्री. गणेश नाईक यांनी त्यांच्या मुद्यांबाबत माझ्याकडे एक पत्र द्यावे. त्याबाबत मी आपणासोबत एक बैठक आयोजित करतो आणि संबंधित विभागांसोबत चर्चा करुन यात स्पष्टता येण्यासाठी कार्यवाही केली जाईल. तेथील भूमिपुत्रांचा फायदा आपणास करावयाचा आहे. या विषयाबाबत सरकार सकारात्मक आहे. घणसोली रस्त्याबाबत सिडकोने ५० टक्के पैसे देण्याचे मान्य केले आहे.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे स्लम एरियात सन २००० मधील पुरावा ग्राह्य धरला जातो. आता लोकांच्या पिढ्या वाढलेल्या आहेत. ते तेथे घरे बांधतात. परंतु महानगरपालिकेकडून गावठाण आणि कोळीवाडा येथे सन १९६२ चा पुरावा मागितला जातो. तेथील लोकांना पाणी नळ जोडणी घ्यावयाची असेल तरीही सन १९६२ चा पुरावा मागितला जातो. झोपडपट्टीभागामध्ये ज्याप्रमाणे सन २००० चा पुरावा ग्राह्य धरला जातो त्याचप्रमाणे गावठाण आणि कोळीवाड्याकरिता सन २००० चा पुरावा मान्य करावा.

यानंतर श्री. चौधरी...

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा तपासून घेण्यात येईल. तसेच आपल्यासह संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन यातून मार्ग काढू.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गणेश नाईक यांनी दगड खाणींचा एक मुद्दा मांडला होता. त्यांनी सांगितले की, भुमिपुत्रांनी वन विभागाकडे सिडकोच्या माध्यमातून पैसे भरले आहेत. ही देखील बाब तपासून घेण्यात येईल व भुमिपुत्रांना त्यांच्या अधिकाराप्रमाणे मालकी हक्क देण्यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल...(अडथळा...) ठीक आहे, आपण मला यासंदर्भात पत्र द्यावे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.रविंद्र चव्हाण यांनी मागील वर्षी उपस्थित केलेलेच मुद्दे या ठिकाणी मांडत असल्याचे सांगितले. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण मागील वर्षी उपस्थित केलेल्या मुद्दयांची माहिती माझ्याकडे आहे. त्याबाबत आपणास सविस्तर लेखी उत्तरे दिली जातील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.झीशान सिद्दिकी यांनी मेट्रो रेल्वेसह अनेक मुद्दे उपस्थित केले. त्यांच्या देखील सर्व मुद्दयांची नोंद घेण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप लांडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, माननीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आणि मी स्वत: एमएमआरडीए आयुक्तांना सूचना केल्या आहेत. त्यानुसार आपल्या परिसरातील नागरिकांना घरे व घरांच्या दुरुस्तीचे पैसे मिळतील.

ॲड.आशिष शेलार (खाली बसून) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप लांडे यांनी मघाशी सभागृहामध्येच सांगितले की, मी जलसमाधी घेणार आहे. त्यातूनच त्यांची उद्विग्नता दिसून येते. त्यामुळे माझी विनंती आहे की, मंत्री महोदयांनी त्यांना असे न करण्याबाबत विनंती करावी.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य तळमळीतून बोलत होते की, त्यांच्या भागातील लोक पावसाच्या पाण्यामुळे वाहून गेले तर मी तसे करीन.

श्री.एकनाथ शिंदे.....

परंतु सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप लांडे यांच्यावर तशी वेळ येणार नाही. कारण राज्याचे नगरविकास मंत्री सक्षम आहेत व त्यांची मागणी मान्य होईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गणेश नाईक यांना मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, आपण देखील मंत्री पदी होते. त्यामुळे सिडकोची स्थापना व वेगवेगळे नियम हे आताच्या सरकारने केलेले नसून ते पूर्वीचेच आहेत. त्यांनी लिजचा विषय मांडला. लिज ही फ्री होल्ड होत नसली तरीही संबंधित व्यक्ती हा त्या जागेचा मालकच असतो. हे नियम आता तयार केलेले नसून सिडकोच्या स्थापनेपासूनचे आहेत.

श्री.गणेश नाईक (खाली बसून) : अध्यक्ष महोदय, माझा मुद्दा असा आहे की, एखाद्या भाडेकरुला लिजने जमीन दिली असेल व नंतर त्याला ती विकायची असेल तर हा व्यवहार करताना पुन्हा सिडकोला पैसे द्यावे लागतात.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा मुद्दा तपासून घेण्यात येईल. तसेच भुमिपुत्रांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात मला पत्र द्यावे.

अध्यक्ष महोदय, सर्वच सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांची मी नोंद घेतलेली आहे. अर्थात, सर्वच बाबी मी या ठिकाणी मांडल्या नसतील याचीही मला खात्री आहे. परंतु घेण्यात आलेल्या नोंदींप्रमाणे निश्चितपणे कार्यवाही होईल.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नगरविकास विभागाकरिता सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी मागणी क्रमांक एफ-१ ते मागणी क्रमांक एफ-५ व मागणी क्रमांक एफ-७ ते मागणी क्रमांक एफ-८ मध्ये कार्यक्रमावरील

श्री.एकनाथ शिंदे.....

आणि अनिवार्य खर्चासाठी मागणी केल्याप्रमाणे एकूण रुपये ४४ हजार ३०६ कोटी १६ लक्ष ८६ हजार इतक्या रकमेच्या मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करीत आहे. मी सभागृहाला आपल्यामार्फत विनंती करतो की, सदर मागण्यांना मंजुरी द्यावी.

असुधारित प्रत

श्री.आदित्य ठाकरे (पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी पर्यावरण विभागाशी संबंधित वेगवेगळे मुद्दे मांडले.

अध्यक्ष महोदय, मला हे पाहून आनंद वाटला की पर्यावरणावर देखील आज एवढा वेळ बोलण्यात आले. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, श्री.रविंद्र वायकर, श्री.अतुल भातखळकर, श्री.यशवंत माने, श्री.विक्रमसिंह सावंत, डॉ.राहुल पाटील, श्री.अबु आजमी, श्री.दिलीपराव बनकर अशा सर्वांनी वेगवेगळया मागण्या व त्यांचे म्हणणे मांडले. यातील प्रामुख्याने समोर आलेल्या दोन-तीन छोटया विषयांवर मी अगोदर बोलणार आहे. त्यानंतर महत्त्वाच्या मोठया विषयांवर मी बोलेल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.राहुल पाटील यांनी कार्बन क्रेडिट आणि सोलार बँक, सोलार पॉवर संदर्भात मत मांडले. ही बाब देश, राज्य व ग्रीन इकॉनॉमीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. आदित्य ठाकरे...

त्यावर आम्ही सकारात्मक विचार करीत आहोत. पुढे जात असताना सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी २ महत्त्वाचे विषय मांडले आहेत. हे दोन्ही विषय मुंबई आणि देशासाठी महत्त्वाचे आहेत. पहिला विषय माहूलचा आहे. या माहूलच्या बाबतीत सन २०१६-१७ पासून मुंबईत आंदोलन सुरू होते. त्या आंदोलनात मी देखील सहभागी होतो. तत्कालीन मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, आपण तेथे यावे आणि तेथील परिस्थिती बघावी. तेव्हा जेवढे झाले नाही त्यानंतर थोडे आम्ही करण्याचा प्रयत्न केला आहे. ते होत असताना पॅरलली एनजीटीमध्ये एक केस सुरू झाली. सन्माननीय सदस्यांनी आज जे येथे नमूद केले त्यानुसार एनजीटीच्या ऑर्डरप्रमाणे दंड आकारला होता. त्यावेळी एनजीटीने न्यायमूर्ती श्री. कानडे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती बनविली होती. त्यांना सूचित केले आहे की, त्यांनी ती दंडाची रक्कम पुढे न्यावी, घ्यावी. त्यांचे जे काही नॉर्म्स आहेत त्यामध्ये बसण्यासाठी ती एक समिती आहे. त्यामध्ये आमचा थेट संबंध येत नाही जेवढा एका सदस्याचा सहभाग असतो. ते होत असताना आमच्या पर्यावरण खात्याचा रोल काय आहे तर त्यातील जे महत्त्वाचे विषय होते त्यामध्ये ४ कंपन्या होत्या. HPCL आणि BPCL या केंद्र सरकारच्या कंपन्या आहेत. तसेच त्या ठिकाणी Aegis Logistics Ltd. (ALL) आणि Sea Lord Containers Ltd. (SLCL) या दोन कंपन्या असून इतरही अनेक छोट्या कंपन्या आहेत. या कंपन्या चेंबूर आणि माहूलच्या परिसरात प्रदुषण करीत असतात, असे आढळून आल्यानंतर तत्कालीन पर्यावरण मंत्री महोदयांसमवेत मी चर्चा करुन Air Quality Monitoring यंत्र तेथे बसविण्यात आले. त्यानंतर आपल्याला असे आढळून आले की, तिकडचे जे प्रदुषणकर्ते आहेत ते तिकडेच नाही तर कुलाबा, दक्षिण मुंबई या भागात सुध्दा प्रदुषण करतात. कारण वारे जसे वाहतात तसे ते प्रदुषण वाहते आणि तसे ते इतर ठिकाणी ही आढळून येते. तरी देखील आम्ही सन २०१९ आणि २०२० मध्ये त्या चारही कंपन्यांसमवेत बसून काही महत्त्वाची पावले टाकली आहेत. ती मी आज आपल्यासमोर मांडू इच्छितो.

श्री. आदित्य ठाकरे...

अध्यक्ष महोदय, यामध्ये पहिले पाऊल म्हणजे Nitrogen Blanketing हे फार महत्त्वाचे असते. जेव्हा टँकर्सचे फिलिंग आणि रिफिलींग होते तेव्हा Nitrogen Blanketing महत्त्वाचे असते. ते आपण करुन घेतले आहे. दुसरे म्हणजे Bottom Filling. जास्तीत जास्त टँकर्समध्ये वरुन फिलिंग केले जाते. हे volatile liquid असल्यामुळे ते शरीराला हानिकारक असे केमिकल आहे. जेव्हा वरुन टँकरमध्ये हे केमिकल पाडते तेव्हा ते bounce back होते आणि ते जेव्हा हवेमध्ये मिसळले जाते तेव्हा हवेमध्ये प्रदुषण तयार होते. म्हणून आपण त्यांना compulsory Bottom Filling ची सूचना केली आहे. कदाचित देशात हे एकमेव ठिकाण असेल की जेथे टँकर्स खालून भरतो ते वरुन भरत नाही. आपण ते या चारही कंपन्यांना अनिवार्य केल्यामुळे त्यांनी त्या पध्दतीने सुविधा करुन घेतली आहे आणि त्यांनी हे मान्य सुध्दा केले आहे. त्यामुळे त्याच्यावर कारवाई झाली आहे.

अध्यक्ष महोदय, तिसरी गोष्ट म्हणजे हे volatile liquid असल्याने ते थोडे फार उडले तर त्यातील fumes वरुन बाहेर येत असत. त्यामुळे त्या टँकर्ससाठी आपण Floating Caps बसविलेल्या आहेत. जे स्टोअसेज असते त्यावर सुध्दा आपण या Floating Caps बसविलेल्या आहेत. त्यामुळे त्या लिक्वीडला कुठेही धक्का लागला तरी त्यामधून fumes बाहेर येणार नाहीत आणि ज्या प्रमाणात प्रदुषण व्हायचे त्या प्रमाणात ते होणार नाही.

अध्यक्ष महोदय, चौथी गोष्ट म्हणजे तेथे एलएसी, बेन्झीन असे वेगवेगळे केमिकल्स होते. आपण एमपीसीबीमार्फत त्यांना सूचित केले आहे की आपण ते दुसऱ्या बाजूला न्यावेत. काही काही गोष्टी आपल्याला ज्या आणखी आढळून आल्या आहेत की त्यामधून हवा प्रदुषण होते, पाणी प्रदुषण होते. त्यांना तेथून ते बाहेर नेण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत आणि त्या सूचनेनुसार ती कार्यवाही झाली आहे.

श्री. आदित्य ठाकरे...

अध्यक्ष महोदय, आणखी २ गोष्टी ज्या प्रॅक्टीकल होत्या. त्यात पहिली म्हणजे आपण ईस्टर्न फ्री वेवरुन त्यांना जाण्यासाठी आधी परवानगी देत नव्हतो. परंतु आता त्यांना रात्रीच्या वेळेसाठी तशी परवानगी दिली आहे. त्यामुळे ते टँकर्स खड्यांमध्ये जात नाहीत आणि त्यामुळे ते केमिकल ज्या प्रमाणात उडायचे तेवढे ते उडत नाही आणि पूर्वीच्या प्रमाणात ते fumes बाहेर येत नाहीत.

अध्यक्ष महोदय, त्यांना एक स्वतंत्र पार्किंगची जागा हवी होती. कारण ते टँकर्स जेथे जेथे पार्क असतात तेथून साहजिकच ते fumes बाहेर येत असतात. याबाबत एमएमआरडीएसोबत आम्ही २-३ वेळा चर्चा केली. त्यानुसार त्या ठिकाणी एमएमआरडीएचे एक कास्टींग यार्ड आहे. त्यासंबंधी बैठक घेऊन ते देखील त्यांना हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला आहे. एमएमआरडीए लवकरात लवकर ते मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करील. तेथे त्यांची पार्किंगची व्यवस्था होईल. हे माहूल गावच्या बाबतीत झाले.

अध्यक्ष महोदय, दुसरा विषय सन्माननीय सदस्यांनी जो मांडला तो Causis E-Mobility Company संबंधी आहे. यामध्ये पर्यावरण विभागाचा नक्की रोल काय होता हे मी आधी नमूद करु इच्छितो. त्यानंतर मी सविस्तर बोलतो. UKEF – United Kingdom Export Finance नावाची एक संस्था आहे. ही Government of United Kingdom ची एक संलग्न संस्था आहे. त्यांचे High Commissioner, Trade Commissioner यांनी त्यांची व आमची ओळख करुन दिली. त्यांच्या बैठकीत आमची भेट झाली आणि त्यांचे त्यामध्ये एवढेच म्हणणे होते की, आपल्या देशामध्ये, आपल्या राज्यामध्ये आणि इतर काही राज्यांमध्ये UKEF च्या मार्फत आणि High Commissioner of United Kingdom यांच्या मार्फत येथे गुंतवणूक करायची आहे. याबाबत आपण Electric Mobility ला जास्त भर दिला आहे. सन २०२१ मध्ये आपली Electric Mobility Policy आली. त्यानंतर आपण महाराष्ट्रात बघितले असेल तर याबाबतच्या

श्री. आदित्य ठाकरे...

नोंदणीमध्ये १५७ टक्क्यांनी आपण वाढ केली आहे. अधिकची जम्प घेतली आहे. देशामध्ये असे कोणत्याही राज्यात घडलेले नाही. याबाबत निती आयोगाचे उपाध्यक्ष श्री. राजीवकुमार यांनी आणि श्री. अमिताभ कांत यांनी आपले कौतुक केले आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. आदित्य ठाकरे.....

Electric Vehicle Policy च्या विषयाबाबत मी सांगू इच्छितो की, आपण जगभरातील सर्वच कंपन्यांना आमंत्रित केलेले आहे. येत्या २ तारखे पासून पुण्यामध्ये Pune Alternate Fuel Conclave आयोजित करण्यात येत आहे. जगभरातील टु व्हिलर, थ्री व्हिलर, फोर व्हिलर, बसेस, ट्रक किंवा टेम्पो निर्मिती करणाऱ्या सर्व कंपन्यांना आपण या ठिकाणी आमंत्रित करीत आहोत. आपण या आणि महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करा. आमच्या पॉलिसीमध्ये जे काही आहे आणि आम्ही जे करु शकतो ते करु. तसेच तेलंगणा आणि गुजरात राज्याने देखील केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, Causis E-Mobility कंपनी बाबत मला काही माहिती प्राप्त झालेली आहे. ती माहिती अशी आहे की, या कंपनीने तळेगाव येथे एमआयडीसीची जागा घेतलेली आहे. तिथे त्यांनी २०० कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. महाराष्ट्रामध्ये ३००० कोटी रुपयांची प्रस्तावित गुंतवणूक आहे. त्याही पुढे जाऊन तिथे एक चांगला MOU होत होता. जसे कोविडच्या काळात ३.२५ लाख कोटी रुपयांचे MOU झाले. प्रत्येक ठिकाणी मी राज्य शिष्टाचार मंत्री म्हणून काम करीत होतो. अर्थातच परदेशी गुंतवणूक आल्यानंतर त्या-त्या देशाचे Consul General तिथे उपस्थित असतात. बीईएसटीचा विषय हा माझ्या अखत्यारितील नाही तर तो नगर विकास विभाग आणि महानगरपालिकेच्या अखत्यारितील विषय आहे. तरी देखील मी इथे नमूद करु इच्छितो की, आपण ७०० किंवा ९०० बसेसचे जे कंत्राट केले आहे ते जीसीसी कंत्राट आहे. यामध्ये बस येईपर्यंत आपण कोणत्याही कंपनीला एक रुपयाही देत नाही किंवा एक रुपयाचा ही व्यवहार केला जात नाही. हे सर्व OPEX Model वर आहे. आपल्या राज्याने किंवा शहराच्या ULB ने किंवा संस्थेने ज्या कंपनीची सेवा hire केली असेल आणि त्यांची बस आपल्या शहरात येते किंवा पहिले किलोमीटर चालते आणि त्यांची सेवा मिळाल्यानंतरच आपल्याला त्यांना त्याचे पैसे द्यावे लागतात. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी सांगितलेल्या माहितीच्या अनुषंगाने आम्ही चौकशी करु. कारण त्यांनी काही आंतरराष्ट्रीय लागेबांधे सांगितले आहेत. ते आपण आमच्या डोळयासमोर आणले

श्री. आदित्य ठाकरे.....

त्याबाबत मी त्यांचे आभार मानतो. राज्य शासनाला केंद्र सरकारच्या Department of Corporate Affairs किंवा Ministry of External Affairs यांच्याकडून या अनुषंगाने काही पत्र येत असतात. आम्ही केंद्र शासनाबरोबर या अनुषंगाने पत्र व्यवहार करुन यामध्ये काही चुकीचे आढळले तर योग्य तो निर्णय घेण्यात येईल हे मी आपल्याला आश्वासित करतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम यांनी एक विषय मांडला आहे. ती चुकीची माहिती रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, त्यांनी १० हजार मॅट्रीक टनचा आकडा सांगितला आहे, हा आकडा सन २०१६-१७ पर्यंत होता. मुंबई शहराची २ कोटी लोकसंख्या आहे. ओला आणि सुका कचरा असे विलगीकरण करुन हा आकडा आता ६ हजार ५०० मॅट्रीक टनवर आलेला आहे. यामध्ये साधारणत: ५०० ते ६०० मॅट्रीक टन पुढे किंवा मागे होऊ शकते. याचे कारण असे की, कोविडच्या काळात कचऱ्याचे जास्त कलेक्शन होत नव्हते. महत्त्वाची बाब हीच आहे की, आम्ही Vision Document काढलेले आहे. आम्ही ALMs आणि लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करुन तिकडच्या तिकडे कंम्पोस्टिंग कसे होईल, सुका कचरा बाहेर कसा काढता येईल व कचऱ्याचे विलगीकरण आणि निचरा कसा करता येईल यावर काम करीत आहोत. मला खात्री आहे की, आपण लवकरच Zero Waste पर्यंत पोहोचू शकू.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, चर्चा चांगलीच सुरु आहे. आम्ही माननीय मंत्र्यांच्या उत्तरामध्ये अडचण निर्माण करीत नाही.

अध्यक्ष महोदय, मी Causis E-Mobility कंपनीच्या आंतरराष्ट्रीय संबंधांबाबत येथे भाष्य केले. त्यावर मंत्री महोदयांनी असे सांगितले की, केंद्र शासनाच्या संबंधित अथॉरिटीशी संपर्क करुन याची चौकशी करून योग्य असेल ती कारवाई करण्यात येईल. याचे मी स्वागत करतो आणि त्यांना धन्यवाद देतो. माझा दुसरा मुद्दा माहूल संदर्भात होता. आपल्याला Air Pollution Mitigation Plan करावयाचा होता. एन.जी.टी.ने ALL आणि SLCL या दोन कंपन्यांना १४२ कोटी

ॲड. आशिष शेलार....

रुपये दंड ठोठावला होता आणि ती रक्कम Air Pollution Mitigation Plan अंतर्गत माहूल येथे वापरायची होती. तेथील चारही कंपन्यांकडून १४ हजार कोटी रुपयांचा दंड वसूल केला पाहिजे असा NEERI चा अहवाल आला. मी काही मंत्री महोदयांवर आरोप करीत नाही. परंतु सकारात्मक चर्चा व्हावी.... आपण हा प्लान केला नाही तर तो हवेतच राहिल. माहुल येथून त्याची सुरुवात आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार ...

माहुल भागाकरिता Air Pollution Mitigation Plan अंतर्गत १४ हजार रुपयांचा दंड आपण एन.जी.टी.ला सबमिट केला नाही. याचे कारण काय आहे मला माहीत नाही. या विषयी चौकशी करणार काय की, हा एन.जी.टी.समोर का आणला गेला नाही, असा माझा प्रश्न आहे. हे आवश्यक नाही की, आपल्या स्तरावर हे झाले असेल, कोणाच्याही स्तरावर झाले असेल. याबाबत आपण चौकशी केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सर्वोच्च न्यायालयात या दोन कंपन्यांनी स्टे घेतला. आपण Air Pollution Mitigation Plan अंतर्गत ४ गोष्टी केल्या आहेत. टँकरमधून जे fumes निघतात त्याला आपण अडवणार या चांगल्या गोष्टी आहेत. आणखी अधिक काही गोष्टी करण्यासाठी हा फाईन उपयोगात येणार होता. ते करण्यासाठी सरकार काय करणार आहे ?

श्री. आदित्य ठाकरे : अध्यक्ष महोदय, एनजीटीने या संबंधी न्यायमूर्ती कानडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार केली होती. ती समिती आमच्या अखत्यारित नव्हती. फाईन संदर्भातील विषय सदर समितीच्या अखत्यारित होता. आमच्या माध्यमातून त्या ठिकाणी प्रॅक्टीकल सोल्युशन काढायचे होते. आम्ही लाँग टर्म व शॉर्ट टर्म उपाययोजने संदर्भातील कामे केली आहेत. मी देखील या आंदोलनात सखोल सहभागी झालो होतो. या आंदोलनामध्ये समाजातील वेगवेगळे घटक होते. उच्च न्यायायलाच्या ऑर्डर नंतर तेथील दोन हजार परिवारांच्या झोपड्या पाईपलाईन वरुन हटविण्यात आल्या. त्यांना विस्थापित करुन माहुल येथे आणले गेले. सन्माननीय सदस्यांनी नगर विकास विभागाबाबत प्रश्न मांडला की, जेव्हा एखादा प्रोजेक्ट केला जातो तेव्हा तेथील लोकांचे किती दूर पुनर्वसन करावयाचे या बाबत चर्चा झाली होती. मी त्यांच्याशी चर्चा केली आहे. हे जे विस्थापित आहेत, ते माहुल गावात वर्षानुवर्षे राहत आहेत त्यांना कदाचित सवय झाली असेल, ते इम्युन झाले असतील. मात्र या बाबत काही प्रश्न निर्माण झाले नाहीत. तरी देखील आम्ही National Clean Air Policy अंतर्गत सर्व ठिकाणी २४ तास air monitoring

श्री. आदित्य ठाकरे...

करीत आहोत. CPCB आणि MPCB जवळून काम करीत आहोत. जर काही फाईन लावण्याची आवश्यकता असेल तरी तो आम्ही लावू. सन्माननीय सदस्यांनी विषय मांडला आहे की, फाईन किंवा नीरीच्या रिपोर्टचे पुढे काय झाले. मी याबाबत सांगू इच्छितो की, याविषयी आम्ही चौकशी करु.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरिता पर्यावरण व वातावरणीय बदल या विभागाच्या मागणी क्र. यु-१ ते य-५ अंतर्गत अनिवार्य घटकांतर्गत रु. १६ कोटी ४३ लक्ष ५ हजार फक्त व घटकांतर्गत कार्यक्रम करिता रु. ४७३ कोटी ५० लक्ष १ हजार असे एकूण रु. ४८९ कोटी ९३ लक्ष ६ हजार फक्त इतकी अर्थसंकल्पीय तदतूद सदनाने मंजूर करावी, अशी मी विनंती करीत आहे.

तालिका सभाध्यक्ष : आता मी १) गृह विभाग २) नगर विकास विभाग ३) ३) गृहनिर्माण विभाग ४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक बी-१, बी-२, बी-३, बी-४, बी-५, बी-६, बी-७, बी-८, बी-९, बी-१०, बी-११, बी-१२, एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, क्यु- २, क्यु-३, क्यु-४, क्यु-६, यू-२, यू-३, यू-४, यू-५, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

असुधारित प्रत

सभागृहातील कामकाजाबाबत

तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण): आजच्या कामकाजपत्रिकेतील नियम २९३ अन्वयेचा प्रस्ताव व अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात येत आहे.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची विशेष बैठक सोमवार, दि. २१ मार्च ,२०२२ रोजी सकाळी १०.०० ते १०.४५ या वेळेत भरेल. या बैठकीत लक्षवेधी सूचनेवर चर्चा होईल. सकाळी ११.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री ८ वाजून २४ मिनिटांनी, सोमवार दिनांक २१ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली)